अध्याय दुसरा.

श्रीगणेशायनमः । जय जय देवाधिदेवा । भोगिसी गुरुत्वें सुहावा । विश्वीं विश्वात्मा ये सद्भावा । एकपणें जेव्हां विलोकिसी ॥ १ ॥ ते विश्वीं जो विश्ववासी । त्यातें विश्वासी म्हणसी । तेणें विश्वासें प्रसन्न होसी । तैं पायांपासीं प्रवेशु ॥ २ ॥ त्या चरणारविंदकृपादृष्टीं । अहं सोहं सुटल्या गांठी । एकसरें तुझ्या पोटीं । उठाउठी प्रवेशलों ॥ ३ ॥ यालागीं तूं निजात्ममाये । या हेतू जंव पाहों जायें । तंव बापपण तुजमाजी आहे । अभिनव काय सांगावें ॥ ४ ॥ येथ मातापिता दोनीं । वेगळीं असती जनीं । ते दोनीं एक करोनी । एकाजनार्दनीं निजतान्हें ॥ ५ ॥ आतां उभयस्नेहें स्नेहाळा । वाढविसी मज बाळा । परी नित्य नवा सोहळा । संभ्रम आगळा निजबोधाचा ॥ ६ ॥ शिव शक्ति गणेशु । विश्व विष्णु चंडांशु । ऐसा अलंकार बहुवसु । निजविलासु लेवविशी ॥ ७ ॥ यापरी मज निजबाळा । लेणीं लेवविशी स्वलीळा । आणि लेइलेपणाचा सोहळा । पाहाशी वेळोवेळां कृपादृष्टीं ॥ ८ ॥ बाळका लेवविजे लेणें । तयाचें सुख तें काय जाणे । तो सोहळा मातेनें भोगणें । तेवीं जनार्दनें भोगिजे सुख ॥ ९ ॥ आपुल्या चिद्रत्नांच्या गांठी । आवडी घालिशी माझ्या कंठीं । यालागीं मज पाठोवाठीं । निजात्मदृष्टि सवें धांवे ॥ १० ॥ समर्थ जयाचा जनकू । त्यास मानिती सकळ लोकू । एका जनार्दनीं एकू । अमान्य अधिकू मान्य कीजे ॥ ११ ॥ बाळक स्वयें बोलों नेणे । त्यासी माता शिकवी वचनें । तैशीं ग्रंथकथाकथनें । स्वयें जनार्दनें बोलविजे ॥ १२ ॥ तेणें नवल केलें येथ । मूर्खाहातीं श्रीभागवत ।

हे देवाधिदेवा, तुझा जयजयकार असो. तूं गुरुत्वानें ब्रह्मसुख भोगितोस. तूं एकात्मभावानें जेव्हां पाहातोस १ तेव्हां या विश्वांत विश्वात्मा भरून राहिल्याचें अनुभवास येतें. त्या विश्वामध्यें राहणारा जो जगन्निवास त्यावर विश्वास ठेव, असें तूं म्हणतोस. त्या विश्वासानेंच तूं प्रसन्न होतोस व तूं प्रसन्न झालास कीं तुझ्या पायापाशीं आमचा प्रवेश होतो. २ म्हणून तुझ्या चरणकमलाच्या कृपादृष्टीनें अहं आणि सोहं यांच्या गांठीं सुटून मीं एकदम तुझ्यामध्यें प्रवेश केला. ३ पण तूं आपल्या भक्तांची माता आहेस, या भावनेनें जों तुझ्याकडे पहावें तों त्यांचें पितृत्वहि तुझ्याकडे येतें, हें आश्चर्य काय सांगावें ! ४ माता व पिता हीं दोघें लौकिकांत भिन्न असतात. पण तूं त्या दोघांचें एका जनार्दनांत ऐक्य करून मला आपलें तान्हें लेंकरूं म्हटलेंस. ५ तरी आतां हे प्रेमळा ! त्या दोघांच्या प्रेमानेंच मज बालकाला वाढवावें. रोज नव्या नव्या प्रकारचा आत्मज्ञानाचा सोहळा मला दाखवावा. ६ शिव, शक्ति, गणेश, विश्व, विष्णु, सूर्य, असे अनेकप्रकारचे अलंकार तूं मजकडून लीलेनें लेववितोस. ७ अशा प्रकारचीं भूषणें मला लेंकराला कौतुकानें लेववून दागिन्यांनीं मला सजविल्याचा सोहळा तूं कृपादृष्टीनें वेळोवेळीं पहातोस. ८ तान्ह्या बाळाला दागिने घातले तर त्याला त्यापासून कसलें सुख वाटणार ? तें पहाण्यानें खरें सुख त्याच्या मातेला होतें. त्याप्रमाणें जनार्दनस्वामींनें मला ज्ञानानें भूषित करून स्वतः सुख भोगावें. ९ तूं आपल्या चिन्द्रत्नाच्या माळा मोठ्या हौसेनें माझ्या गळ्यांत घालतोस व त्या अलौकिक चिद्रत्नाचें रक्षण करण्यासाठीं तुझी ज्ञानदृष्टि माझ्या मागोमाग धांवत येते. १० ज्याचा पिता नामांकित आहे, अशा मुलाला सर्व लोक मान देतात. त्याप्रमाणें ज्या अर्थीं जनार्दनस्वामींनीं एकनाथाला आपलें म्हटलें, त्या अर्थीं तो योग्यता नसतांहि अधिक मान्यतेला प्राप्त झाला. ११ लेंकराला स्वतः कांहीं बोलतां येत नाहीं. त्याला त्याची आई जे शब्द शिकविते, तेच तो उच्चारितो, त्याप्रमाणेंच ही ग्रंथकथा स्वतः श्रीजनार्दनस्वामीच माझ्या तोंडून बोलवीत आहेत. १२ त्यांनीं येथें केवढें आश्चर्य केलें पहा ! त्यांनीं शेवटीं श्रीभागवताच्या

शेखीं बोलविलें प्राकृत । एकादशार्थ देशभाषा ॥ १३ ॥ परिसोनी प्रथम अध्यावो । उगाचि राहिल कुरुरावो । पुढें कथाकथनीं ठावो । कांहीं अभिप्रावो दिसेना ॥ १४ ॥ आपण करावा प्रश्न । तंव हा सांगेल कृष्णनिधन । यालागीं राजा मौन । ठेला धरून निवांत ॥ १५ ॥ जाणोनि त्याचा अभिप्रावो । बोलता जाहला शुकदेवो । तो म्हणे मोक्षाचा प्रस्तावो । तो हा अध्यावो परीक्षिती ॥ १६ ॥ हा एकादश अलोलिक । श्लोकाहून श्लोक अधिक । पदोपदीं मुक्तिसुख । लगटले देख निजसाधकां ॥१७॥ ऐसें ऐकतांचि वचन । राजा जाहला सावधान । मुक्तिसुखीं आवडी गहन । अवधानें कान सर्वांग केले ॥ १८ ॥ ऐसें देखोन परीक्षिती । शुक सुखावे अत्यंत चित्तीं । तो म्हणे अवधानमूर्ती । ऐक निश्चितीं गुह्य ज्ञान ॥ १९ ॥ द्वितीयाध्यायीं निरूपण । नारदवसुदेवसंवाद जाण । निमिजायंतांचे प्रश्न । मुख्य लक्षण भागवतधर्म ॥ २० ॥

श्रीशुक उ० गोविंदभुजगुप्तायां द्वारवत्यां कुरूद्वह । अवात्सीन्नारदोऽभीक्ष्णं कृष्णोपासनलालसः ॥ १ ॥

जो मुक्तांमाजीं अग्रणी । जो ब्रह्मचर्याशिरोमणी । योगी वंदिती मुकुटस्थानीं । जो भक्तमंडणीं अतिश्रेष्ठ ॥२१॥ जो ब्रह्मरसाचा समुद्र । जो निजबोधाचा पूर्णचंद्र । तो बोलता झाला शुकयोगींद्र । श्रोता नरेंद्र कुरुवंशींचा ॥ २२ ॥ तो म्हणे व्यासाचा जो निजगुरू । आणि माझाही परमगुरू । नारद महामुनीश्वरू । त्यासी अतिआदरू श्रीकृष्णभजनीं ॥ २३ ॥ द्वारकेहूनि स्वयें श्रीकृष्ण । पिंडारका पाठवी मुनिगण । तेथूनि नारद आपण । द्वारकेसी जाण पुनः पुनः येतु ॥ २४ ॥ हो कां जे द्वारकेआंत । न रिघे भय काळकृत ।

अकराव्या स्कंधाचा अर्थ आपल्या मराठी मातृभाषेंत मज मूर्खाच्या हातून करविला. १३ पहिला अध्याय ऐकून कुरुराजा परीक्षिती गप्प बसला. पुढल्या कथा ऐकण्याचा त्याचा आशय दिसेना. १४ आपण जर याला प्रश्न केला तर हा कृष्णनिधन सांगेल, म्हणून राजा मौन धरून स्वस्थ बसला. १५ त्याच्या मनांतील हा आशय जाणून शुकाचार्य म्हणाले, "हे परीक्षित् राजा, हा अध्याय म्हणजे मोक्षाचा प्रस्तावच आहे. १६ हा अकरावा स्कंध मोठा अलौकिक आहे. यांत एकाहून एक सरस श्लोक आहेत. साधकाला मुक्तीचें सुख पावलोपावलीं येऊन चिकटतें." १७ त्यांचें हें भाषण ऐकतांच परीक्षिती सावध झाला, त्याला मुक्तिसुखाची अत्यंत आवड असल्यामुळें त्यानें आपलें चित्त स्थिर करून सर्व लक्ष त्याकडे लाविलें. १८ परीक्षितीची अशी उत्कंठा पाहून शुकाचार्याला अत्यंत आनंद झाला. तो म्हणाला, "हे मूर्तिमंत राजा! तें गुह्य ज्ञान आतां ऐक. १९ या दुसऱ्या अध्यायांत नारद व वसुदेव यांच्या संवादानें भागवतधर्मांचीं मुख्य लक्षणें निमिजायंतांच्या प्रश्नरूपानें सांगितलीं आहेत." २०.

[या दुसऱ्या अध्यायांत नारदानें भक्तीनें प्रश्न करणाऱ्या वसुदेवाला निमि व जायंत यांच्या संवादरूपानें भागवत धर्म सांगितला आहे.]

श्रीशुकः उवाच--श्रीशुकाचार्य म्हणाले. **कुरूद्वह**--हे कुरुश्रेष्ठा **कृष्णोपासनलालसः**--श्रीकृष्णाच्या उपासनेची ज्याला लालसा आहे असा **नारदः**--नारदमुनि **अभीक्ष्णं**--वारंवार येऊन **गोविंदभुजगुप्तायां**--गोविंदानें आपल्या बाहुबलानें रक्षिलेल्या **द्वारवत्यां**--द्वारकेंत **अवात्सीत्**--राहिला. [कुरुश्रेष्ठ परीक्षित् राजाला श्रीशुकाचार्य म्हणाले कीं, श्रीकृष्ण वारंवार निरोप देऊन जरी नारदमुनीला इतरत्र पाठवीत असत तरी तो श्रीकृष्णभजनाच्या लालसेनें द्वारकेंत पुनः पुनः येऊन राहात असे. दक्षादिकांच्या शापामुळें नारदाचा एका ठिकाणीं वास जरी संभवत नव्हता तरी गोविंदानें रक्षिलेल्या द्वारकेंत शापादिकांचें सामर्थ्यच चालत नव्हतें.] १.

जो मुक्तांचा अग्रणी, ब्रह्मचर्यांचा शिरोमणी, योग्यांना वंद्य, अति श्रेष्ठ भक्त, २१ ब्रह्मरसाचा समुद्र व आत्मज्ञानाचा पूर्ण चंद्र श्रीशुकयोगीन्द्र तो वक्ता आणि कुरुवंशज परीक्षित् राजा श्रोता झाला. २२ शुकाचार्य म्हणतात-जो व्यासांचा साक्षात् गुरु व माझा परम गुरु महामुनीश्वर नारद त्याला श्रीकृष्णभजनाची फार आवड होती. २३ श्रीकृष्णानें सर्व मुनींना स्वतः पिंडारक क्षेत्रांत पाठविलें, पण नारद तेथून पुनः पुनः द्वारकेंत येत असे. २४

जेथ स्वयें श्रीकृष्णनाथ । असे नांदत निजसामर्थ्यें ॥ २५ ॥ दक्षशाप नारदासी पाहीं । मुहूर्त राहों नये एके ठायीं । तो शाप हरिकीर्तनीं नाहीं । यालागीं तो पाहीं कीर्तननिष्ठु ॥ २६ ॥ ज्याची गाइजे कीर्तनीं कीर्ती । तो द्वारकेसी वसे स्वयें श्रीपती । तेथें शापबाधेची न चले प्राप्ती । यालागीं नित्य वस्ती नारदासी तेथें ॥ २७ ॥ नारदासी पूर्ण ब्रह्मज्ञान । त्यासी कां कृष्णमूर्तीचें ध्यान । श्रीकृष्णदेह चैतन्यघन । यालागीं श्रीकृष्णभजन नारदासी पढियें ॥२८॥ यापरी कृष्णभजन । मुक्तांसी पढियें पूर्ण । त्यासी न भजे अभागी कोण । तेंचि निरूपण शुक सांगे ॥ २९ ॥

को नु राजन्निन्द्रियवान्मुकुन्दचरणाम्बुजम् । न भजेत्सर्वतोमृत्युरुपास्यममरोत्तमैः ॥ २ ॥

ऐकें बापा नृपवर्या । येऊनि उत्तमा देहा या । जो न भजे श्रीकृष्णराया । तो गिळिला माया अतिदुःखें ॥ ३० ॥ ज्या भगवंतालागुनी । माथां धरूनि पायवणी । सदाशिव बैसला आत्मध्यानीं । महाश्मशानीं निजवस्ती ॥ ३१ ॥ पोटा आला चतुरानन । इतरांचा पाड तो कोण । देहा येवोनि नारायण । न भजे तो पूर्ण मृत्युग्रस्त ॥ ३२ ॥ सांडूनि श्रीकृष्णचरण । इंद्रादि देवांचें करितां भजन । ते देव मृत्युग्रस्त पूर्ण । मा भजत्याचें मरण कोण वारी ॥ ३३ ॥ असोनि इंद्रियपाटव पूर्ण । जो न भजे श्रीकृष्णचरण । त्यासी सर्वत्र बाधी मरण । क्षणक्षण निर्दाळी ॥ ३४ ॥ तो नारद महामुनीश्वरू । मुक्त होऊनि भजनतत्परू । द्वारके वसे निरंतरू । श्रीकृष्णीं थोरू अतिप्रीति तया ॥ ३५ ॥

कारण जेथें स्वतः श्रीकृष्णनाथ स्वसामर्थ्यानें सुखानें नांदत होता त्या द्वारकेंत यमाचेंहि भय नव्हतें. २५ दक्षाचा शाप नारदाला क्षणभराहि एके ठिकाणीं राहूं देईना. पण हरिकीर्तनामध्यें तो शाप आड येत नसे, म्हणूनच नारद कीर्तननिष्ठ झाला होता. २६ शिवाय कीर्तनांत ज्याची कीर्ति गावयाची तो स्वतः श्रीपतिच द्वारकेंत रहात असे. त्यामुळें तेथें शापाचा प्रभाव कांहीं चालत नसे. म्हणून नारद नेहमीं द्वारकेंतच राहात असे. २७ नारद पूर्ण ब्रह्मज्ञानी होता, मग त्याला कृष्णमूर्तीच्या ध्यानाचा काय उपयोग ! श्रीकृष्णाचें स्वरूप चैतन्यपूर्ण होतें, म्हणून नारदाला त्याचें भजन करणें अतिशय आवडत असे. २८ याप्रमाणें श्रीकृष्णभजन मुक्तांनाहि जर इतकें प्रिय आहे, तर कोणता दुर्दैवी मनुष्य तें करणार नाहीं ! तेंच आतां श्रीशुकाचार्य सांगतात. २९.

—मुक्तांना देखील ज्याच्या भजनाची इतकी उत्सुकता असते त्याला कोण भजणार नाहीं असें आतां सांगतात– **राजन्**–हे राजा **इंद्रियवान्**–श्रोत्रादि इंद्रियांनीं युक्त असलेला **सर्वतोमृत्युः**–ज्याला सर्व लोकांमध्यें मृत्यु आहे असा **को नु** कोण बरें **अमरोत्तमैः उपास्यं**–श्रेष्ठ देवांना उपासना करण्यास योग्य असलेल्या **श्रीकृष्णचरणाम्बुजं**–श्रीकृष्णाच्या चरणकमलाला **न भजेत्**–भजणार नाहीं. [हे राजा, ज्या भजनामध्यें इंद्रियांनीं युक्त असणें एवढ्यानेंच अधिकार प्राप्त होतो तें श्रीकृष्णाचें भजन इंद्रादि श्रेष्ठ अमरहि जर करितात तर मग सर्व लोकीं मृत्युमुखांत पडणारा कोणता मर्त्य तें करणार नाहीं !] २.

हे राजा, उत्तम मनुष्यदेह मिळाला असूनहि जो श्रीकृष्णाचें भजन करीत नाहीं, तो अपार संसारदुःखांत पडतो. ३० शंकर त्यांचेंच ध्यान करीत महाश्मशानांत नित्य वास करितो व त्याच्या पायांपासून निघालेली गंगा मस्तकावर धारण करितो. ३१ फार काय, पण ब्रह्मदेवसुद्धां ज्याचा पुत्र झाला त्या नारायणाचें भजन मनुष्यदेह धारण करूनहि जो करीत नाहीं तो मृत्यूच्या दाढेंत सांपडलाच असें समजावें. ३२ इंद्रादि इतर देवांचें भजन केलें तर ते स्वतःच मृत्युवश होणारे, तेव्हां ते आपल्या भक्तांचें मरण कसें टाळणार ! यास्तव कृष्णाचे चरण सोडणें केव्हांहि युक्त नव्हे. ३३ इंद्रियादि सर्व सामग्री परिपूर्ण असतांनाहि जो श्रीकृष्णभक्ति करीत नाहीं त्याला मृत्यु वारंवार पीडितो. ३४ महर्षि नारद मुक्त असूनहि भजनांत तत्पर होऊन श्रीकृष्णाच्या प्रेमामुळें निरंतर द्वारकेंत रहात असे. ३५.

तमेकदा तु देवर्षि वसुदेवो गृहागतम् । अर्चितं सुखमासीनमभिवाद्येदमब्रवीत् ॥ ३ ॥

धन्य धन्य तो नारदू । ज्यासी सर्वी सर्वत्र गोविंदू । सर्वदा हरिनामाचा छंदू । तेणें परमानंद सदोदित ॥ ३६ ॥ जो श्रीकृष्णाचा आवडता । ज्यासी श्रीकृष्ण आवडे सर्वथा । त्याचेनि संगें तत्त्वतां । नित्यमुक्तता जडजीवां ॥ ३७ ॥ तो नारदु एके वेळां । स्वानंदाचिया स्वलीळा । आला वसुदेवाचिया राउळा । तेणें देखोनि डोळां हरिखला ॥ ३८ ॥ केलें साष्टांग नमन । बैसों घातलें वरासन । ब्रह्मसद्भावें पूजन । श्रद्धासंपूर्ण मांडिलें ॥ ३९ ॥ नारद तोचि नारायण । येणें विश्वासेंकरूनि जाण । हेमपात्रीं चरणक्षाळण । मधुपर्कविधिपूर्ण पूजा केली ॥ ४० ॥ पूजा करूनि सावधानीं । वसुदेव बैसोनि सुखासनीं । हृदयीं अत्यंत सुखावोनी । काय आल्हादोनी बोलत ॥ ४१ ॥

वसुदेव उ०–भगवन्भवतो यात्रा स्वस्तये सर्वदेहिनाम् । कृपणानां यथा पित्रोरुत्तमश्लोकवर्त्मनाम् ॥

स्वलीला कृपा केली तुम्हीं । तेणें सभाग्य जाहलों आम्ही । तुमचेनि आगमनें आम्ही । कृतकृत्य स्वामी सन्निधिमात्रें ॥ ४२ ॥ चुकलिया निजजननी । बाळक दीन दिसे जनीं । त्यासी मातेच्या आगमनीं । संतोष मनीं निर्भर ॥ ४३ ॥ त्याहूनि श्रेष्ठ तुमची यात्रा । नित्य सुखदाती भूतमात्रां । स्वलीला तुम्ही मही विचरां । दीनोद्धारालागुनी ॥ ४४ ॥ मातेच्या आगमनीं निजबाळा । दृष्टिउत्संगीं नित्य नवा सोहळा । तुमची यात्रा दीनां सकळां । भोगवी स्वलीला निजात्मसुख ॥ ४५ ॥

तु एकदा–एकदां **वसुदेवः**–वसुदेव **गृहागतं**–घरीं आलेल्या **अर्चितं**- पूजिलेल्या **सुखं आसीनं**–सुखासनावर बसलेल्या **तं महर्षि**–त्या महर्षि नारदाला **अभिवाद्य**–नमस्कार करून **इदं**–असें **अब्रवीत**–बोलला. [एकदां नारद वसुदेवाच्या घरीं आले असतां त्यानें त्या मुनीची पूजा केली, सुखासनावर बसविलें व त्यास नमस्कार करून असें म्हटलें.] ३.

ज्याला सर्व भूतांमध्यें सर्वदा गोविंद दिसत होता, ज्याला हरिनामाचा छंदच लागला होता व त्यामुळेंच ज्याला परमानंद होत असे, तो नारद खरोखर धन्य होय. ३६ श्रीकृष्णाला तो व त्याला श्रीकृष्ण आवडत असे. ज्याच्या समागमानें जड जीवांनाहि नित्य मुक्ति मिळत असे. ३७ तो नारद एकदां सहज वसुदेवाच्या घरीं आला. त्याला पाहून वसुदेवाला अत्यानंद झाला. ३८ त्याने नारदाला साष्टांग नमस्कार केला, बसावयास उत्तम आसन दिलें आणि मोठ्या श्रद्धेनें ब्रह्मभावनेनें त्याची पूजा आरंभिली. ३९ हा नारद नारायणच आहे, अशा पूर्ण श्रद्धेनें सुवर्णपात्रांत त्याचें पादप्रक्षालन केलें व मधुपर्कादिकांनीं सांग पूजा केली. ४० नंतर तो मनांत अत्यंत आनंदित होऊन स्वतः सुखासनावर बसला आणि म्हणाला. ४१.

वसुदेवः उवाच–वसुदेव बोलला **भगवन्**– हे पूज्य महर्षे, **यथा**–ज्याप्रमाणें **पित्रोः यात्रा**–मातापित्यांचें आगमन **(अपत्यानां) स्वस्तये**–मुलांच्या आनंदाला कारण होतें किंवा **उत्तमश्लोकवर्त्मनां यात्रा**–परमात्म्याचे मार्गभूत जे महात्मे त्याचें आगमन **कृपणानां स्वस्तये**–दीनजनांच्या कल्याणाला कारण होतें (**तथा**–त्याप्रमाणें) **भवतः यात्रा**–आपलें आगमन **सर्वदेहिनां**–सर्व मनुष्य प्राण्यांच्या **स्वस्तये (भवति)**–कल्याणाला कारण होतें. [हे मुने, आईबापांचें आगमन मुलांना, व भगवद्भक्तांचें आगमन दीनजनांना जसें सुखावह होतें, तसें आपलें आगमन सर्व जीवांच्या परम कल्याणाला कारण होतें.] ४.

वसुदेव नारदाला म्हणाला, आपण फार मोठी कृपा केली. आपल्या आगमनानें आम्ही मोठे भाग्यवान् झालों. तुमच्या नुसत्या सांनिध्यानेंच आम्ही धन्य आहोंत. ४२ मातेची चुकामूक झाली असतां बालक दीन होतें, पण ती दिसतांच त्याला फार संतोष होतो. ४३ तुमचें आगमन प्राण्यांना त्याहिपेक्षां अतिशय सुख देतें. दीनांच्या उद्धारासाठींच तुम्ही संत लीलेनें त्रिभुवनांत संचार करितां. ४४ आईच्या दर्शनानें लेंकराला जें सुख होतें तें क्षणभंगुर असतें; पण तुमच्या आगमनानें नित्य चित्सुख प्राप्त होतें. ४५–४६ तुम्ही भागवतधर्ममार्गानें

माता सुख दे तें नश्वर । तुमच्या आगमनीं अनश्वर । नित्य चित्सुख चिन्मात्र । परात्पर भोगावया ॥ ४६ ॥ तुम्ही भागवतधर्ममार्गगामी । तैंचि तुमची भेटी लाहों आम्ही । जैं पुण्यकोटी निष्कामीं । प्रयागसंगमीं केलिया ॥ ४७ ॥ नारदा तूं भगवद्रूप । तुझी भेटी करी निष्पाप । तुवां कृपा केलिया अल्प । स्वयें चित्स्वरूप ठसावे ॥ ४८ ॥ तुझेनि भक्तीसी माहिमा अमूप । तुझेनि वाढला भक्तिप्रताप । तुझेनि भक्ति भगवद्रूप । तूं चित्स्वरूप निजनिष्ठा ॥ ४९ ॥ तूं भक्तिप्रकाशकु दिवटा । कीं भक्तिमार्गींचा मार्गद्रष्टा । नारदा तुझा उपकार मोठा । भक्तीच्या पेठा वसविल्या तुवां ॥ ५० ॥ मुख्य भागवतशास्त्र पूर्ण । तुवां व्यासासी उपदेशून । प्रकट करविलें दशलक्षण । दीन जन उद्धरावया ॥ ५१ ॥ नारदा तूं देवासमान । हेही उपमा दिसे गौण । तेचिविषयीं निरूपण । वसुदेव आपण निरूपी ॥ ५२ ॥

भूतानां देवचरितं दुःखाय च सुखाय च । सुखायैव हि साधूनां त्वादृशामच्युतात्मनाम् ॥ ५ ॥

देवांपासूनि भूतसृष्टी । सुखदुःखें शिणे पोटीं । अतिवृष्टी का अनावृष्टी । भूतकोटीं आकांतू ॥ ५३ ॥ त्या देवांपरीस साधु अधिक । हें साचचि मज मानलें देख । देवचरितें उठी सुखदुःख । साधु निर्दोख सुखदाते ॥ ५४ ॥ त्यांहीमाजीं तुजसारिखा । जोडल्या कृपाळू निजात्मसखा । तैं पेठ पिके परमार्थसुखा । हा महिमा लोकां न कळेचि ॥ ५५ ॥ दिधल्या सुखासी मागुती । च्युती हों नेणे कल्पांतीं । ते अच्युतात्मस्थिती । तुजपाशीं निश्चितीं नारदा ॥ ५६ ॥ तुझिये महिमेपाशीं । मुदल देवो नये तुकासी । तेंही सांगेन मी तुजपाशीं । यथार्थेसीं नारदा ॥ ५७ ॥ देवाचा अवतार होये । दासां सुख दैत्यां भये । तेथही ऐसें विषम आहे । हें न समाये तुजमाजी ॥ ५८ ॥ तूं देवांचा आप्त होसी ।

जाणारे आहां, अनंत पुण्यांनींच आम्हांला तुमची भेट होते. असो; ४७ नारदा, तूं भगवद्रूप आहेस, तुझें दर्शन आमच्यासारख्यांना पावन करितें. तूं थोडीशी जरी कृपा केलीस तरी चित्स्वरूप आमच्या मनांत ठसतें. ४८ तुझ्या भक्तीचा महिमा विचित्र आहे. तुझ्यामुळेंच भक्तीचा प्रताप वाढला आहे. भक्ति भगवद्रूप झाली आहे व तं स्वरूपामध्यें तत्पर झाला आहेस. ४९ तूं भक्तीला प्रकाशित करणारा प्रदीप आहेस. भक्तिमार्ग दाखविणारा वाटाड्या आहेस. नारदा, सर्व लोकांवर तूं मोठे उपकार केले आहेस. तूं भक्तीच्या पेठा वसविल्या आहेस. ५० तूं व्यासांना मुख्य भागवतशास्त्राचा उपदेश करून त्यांच्याकडून दहा लक्षणांनीं युक्त असलेलें तें शास्त्र दीनजनांच्या उद्धारासाठीं प्रकट करविलेंस. ५१ नारदा, तुला देवाची उपमा दिल्यास तीहि अपुरी होते. महात्म्यांना देवाचीहि उपमा अनुचित आहे, असें आतां वसुदेव सांगतो. ५२.

देवचरितं–देवांचे आचरण **भूतानां**–मानवांच्या **दुःखाय च सुखाय च**–दुःखाला व सुखाला (कारण होतें) **हि**–पण **त्वादृशां**–तुझ्यासारख्या **अच्युतात्मनां साधूनां**–अच्युत ज्यांचा आत्मा आहे अशा साधूंचें आचरण **सुखाय एव (भवति)**–सुखालाच कारण होतें. [देव मानवांना अतिवृष्टि इत्यादिकांच्या योगानें सुखाबरोबर दुःखहि देतात; पण तुमच्यासारख्या महात्म्यांकडून परम सुखच प्राप्त होतें.] ५.

देवांपासून जीवसृष्टीला सुख होतें. पण तें निर्दोष नसतें. त्याबरोबर दुःखाचें शीणहि होतात, अतिवृष्टि झाली तरी भूतांना कष्ट सोसावे लागतात. ५३ अनावृष्टि झाली तरी दुष्काळाचें दुःख सोसावें लागतें; पण साधु निर्दोष सुख देतात. त्यांच्यापासून कोणालाहि कधींच दुःख होत नाहीं, म्हणून देवांपेक्षांहि साधु श्रेष्ठ असेंच माझ्या मनानें घेतलें आहे. ५४ त्यांतहि तुझ्यासारखा कृपाळु हितकर्ता लाधल्यास मग तर काय परमार्थसुखाची लूटच होते. पण सामान्य लोकांना हा साधूंचा महिमा कळत नाहीं. ५५ त्यांनीं दिलेलें सुख कल्पांतींहि नाश पावत नाहीं. नारदा, तुझ्यापाशीं अक्षय आत्मस्थिति आहे. ५६ तुझ्या माहात्म्याची बरोबरी मुख्य देवालाहि करितां येत नाहीं. ५७ कारण त्या देवदेवाचा अवतार झाला म्हणजे त्याच्या भक्तांना सुख होतें व दैत्य भयभीत होतात; पण असलें वैषम्य तुजमध्यें

दैत्यही विश्वासती तुजपाशीं । रावण तुज नेऊनि एकांतासी । निजगुह्यासी स्वयें सांगे ॥ ५९ ॥ देव रावणें घातलें बंदीं । तो रावण तुझे चरण वंदी । शेखीं रामाचा आप्त तूं त्रिशुद्धी । विषम तुजमधीं असेना ॥ ६० ॥ जरासंधू कृष्णाचा वैरी । तुझी चाल त्याच्या घरीं । आणि कृष्णाचे सभेमाझारीं । आप्तत्वें थोरी पैं तुझी ॥ ६१ ॥ नाम घेवों नेदी देवांचें । हें बिरुद हिरण्यकशिपूचें । त्यासी कीर्तन तुझें रुचे । विषमत्व साचें तुज नाहीं ॥ ६२ ॥ लांचुगी बुद्धी सदा देवांसी । तैसी नाहीं तुम्हां साधूंसी । ऐक त्याही अभिप्रायासी । यथार्थेसीं सांगेन ॥ ६३ ॥

भजन्ति ये यथा देवान् देवा अपि तथैव तान् । छायेव कर्मसचिवाः साधवो दीनवत्सलाः ॥ ६ ॥

जे जैसे देव यागीं यजिजती । तैसतैसीं त्यां फळें देव देती । न भजत्यातें विघ्नें सूचिती । ऐसी गती देवांची ॥ ६४ ॥ जैसजैसा पुरुष बैठे । तैसतैसी छाया नटे । तेवीं भजनें देव प्रसन्न मोटे । येरवीं उफराटें विघ्न करिती ॥ ६५ ॥ जंव जंव सूर्य प्रकाशत असे । तंव तंव छाया सरिसी दिसे । निजकर्में देवही तैसे । कर्मवशें प्रसन्न ॥ ६६ ॥ सूर्यअस्तमानीं छाया नासे । अभजनें देव क्षोभती तैसे । एवं लांचुगे देव ऐसे । तूंही ऐसें जाणसी ॥ ६७ ॥ इतर देवांची कथा कोण । थोरला देव लांचुगा पूर्ण । तोही न भेटे जीव घेतल्याविण । भेटल्याचे आपण गर्भवास सोसी ॥ ६८ ॥ त्याचें जीवें

नाहीं. ५८ देव व दैत्य हे दोघेहि तुझ्यावर सारखेच विश्वास ठेवितात. रावण देवांचा महाशत्रु, पण तो स्वतः एकांतांत बसून, तुझ्या चरणांना वंदन करून, तुला आपलें गुह्यहि सांगत असे. तिकडे रामाचाहि तूं परम आप्त होतास. ५९–६० जरासंध कृष्णाचा हाडवैरी, पण तुझा प्रवेश त्याच्या घरींहि होता, व इकडे कृष्णाच्या सभेंतहि तूं श्रीकृष्णाचा मोठा आप्त मानला जात होतास. ६१ देवाचें नांवहि कोणाला घेऊं द्यावयाचें नाहीं हें हिरण्यकशिपूचें व्रत, पण त्याला सुद्धां तुझें कीर्तन आवडत असे. त्यामुळें खरोखर तुझ्या ठिकाणीं विषमत्व नाहीं. ६२ देव उपकार करणारावरच प्रत्युपकार करितात; पण तुम्हां साधूंची बुद्धि तशी नाहीं. ती कशी तेंहि आतां मी सांगतों. ६३.

——प्राण्यांना सुख देणारे देवहि त्यांच्या यज्ञयागादि भजनाच्या अनुसार ते देतात; पण साधु तसें नाहींत, असें आतां वसुदेव सांगतो——

ये–जे **यथा**–ज्याप्रमाणें **देवान्**–देवांना **भजन्ति**–भजतात **तान्**–त्यांना **देवाः अपि**–देवहि **तथा एव**–त्याचप्रमाणें [**भजन्ति**–भजतात] **छाया इव**–देव पुरुषाच्या सावलीप्रमाणें **कर्मसचिवाः**–कर्मसहाय आहेत. **साधवः**–पण साधु **दीनवत्सलाः**–दीनवत्सल असतात. [मनुष्य जसें व जितकें कांहीं करितो तसेंच व तितकेंच त्याची छायाहि करिते. त्याचप्रमाणें देवहि ज्यानें जितकें कर्म केलें असेल तितकेंच त्याला उलट फल देतात म्हणजे देवांची वृत्ति एखाद्या व्यवहारी माणसाप्रमाणें असते. पण साधु दीनावर आपल्या अपत्याप्रमाणें निःस्वार्थ प्रेम करणारे असतात. ते खरे सुहृद–प्रत्युपकाराची अपेक्षा न करितां उपकार करणारे असतात.] ६.

कर्मठ गृहस्थ यज्ञ-यागादिकांनीं देवांची जशी पूजा करितात तसेंच ते त्यांना फल देतात; पण जे त्यांचें भजन करीत नाहींत त्यांच्या व्यवहारांत अनेक विघ्नें आणितात. ६४ पुरुष उभा राहिला कीं त्याची छाया उभी रहाते, तो बसला कीं बसते, तो चालत असला, धावूं लागला किंवा कोणाला मारूं लागला कीं तीहि तसेंच करितें. तसे देव कोणी भजन केलें तर त्यांवर मोठे प्रसन्न होतात, एरवीं विघ्न करितात. ६५ सूर्य जसा जसा प्रकाशूं लागतो तशी तशी छायाहि स्पष्ट दिसते, सूर्याचा अस्त झाला कीं छाया मुळींच दिसेनाशी होते. त्याचप्रमाणें मनुष्य जसें जसें कर्म करील तसे तसे देव प्रसन्न होतात. ६६ आणि मनुष्याच्या अभजनानें त्याच्यावर क्षुब्ध होतात. देव असे मोठे स्वार्थी आहेत आणि ही गोष्ट तुलाहि ठाऊक आहे. ६७ अरे बाबा, इतर देव तर राहूंच दे, पण हा थोरला देव तर सगळ्यांपेक्षां अधिक स्वार्थी आहे. अहो, तो भक्ताचा जीवभाव काढून घेतल्यावांचून त्याला भेटतच नाहीं आणि ज्याला भेटतो त्याच्या पोटीं येऊन गर्भवासहि सोसतो. ६८ जीवानें आपलें सर्वस्व

सर्वस्वें भजन । केल्या निजांग देऊनि होये प्रसन्न । परी न भजत्याच्या घरा जाण । विसरोनि आपण कदा न वचे ॥ ६९ ॥ तैसी नव्हे तुमची बुद्धि । दीनदयाळ त्रिशुद्धी । तूं तंव केवळ कृपानिधी । ऐक तो विधि सांगेन ॥ ७० ॥ तुवां व्यास देखोनि सज्ञान । उपदेशिलें गुह्यज्ञान । ध्रुव बाळक अज्ञान । म्हणोनि जाण नुपेक्षिसी ॥ ७१ ॥ प्रल्हाद उपदेशिला जेव्हां । दैत्यपुत्र न म्हणसी तेव्हां । तुझिया कृपेचा हेलावा । तो निजविसांवा दीनांसी ॥ ७२ ॥ केवळ वाटपाडा देख । भजनेंवीण एकाएक । महाकवि केला वाल्मीक । अमर आवश्यक वंदिती त्यासी ॥ ७३ ॥ देखोनि ज्याचिया ग्रंथासी । सुख वोसंडे सदाशिवासी । ऐसा तूं कृपाळू होसी । अनाथांसी कुवांसा ॥ ७४ ॥ वरिवरी दाविसी मिणधा कोप । कोपोनि सांडविशी त्याचें पाप । शेखीं सायुज्याचे दीप । दाविशी सद्रूप दयाळुवा ॥ ७५ ॥ तुम्ही अच्युतात्मे निजनिर्धारीं । म्हणोनि देवो तुमचा आज्ञाधारी । तुम्ही म्हणाल त्यातें उद्धरी । येऱ्हवीं हातीं न धरी आनातें ॥ ७६ ॥ ऐसा तूं दीनदीक्षागुरू । ब्रह्मज्ञानें अतिउदारू । तरी पुसेन तो विचारू । निजनिर्धारू सांगावा ॥ ७७ ॥

ब्रम्हंस्तथापि पृच्छामो धर्मान्भागवतांस्तव । यान् श्रुत्वा श्रद्धया मर्त्यो मुच्यते विश्वतो भयात् ॥ ७ ॥

आदरें म्हणे देवऋषी । आजि सकळ पुण्यें आलीं फळासी । मायबाप तूं घरा आलासी । निजसुखासी दायक ॥ ७८ ॥ कृपा केली मागील शिष्यां । तेचि कृपेचा घालीं ठसा । मज तुझा पूर्ण भरंवसा । सोडवीं भवपाशापासूनी ॥ ७९ ॥ तुझेनि दर्शनें कृतकृत्यता । जऱ्ही मज जाली तत्त्वतां । तऱ्ही भागवतधर्मकथा । कृपेनें तत्त्वतां सांगावी ॥ ८० ॥ ऐसे सांगावे भागवतधर्म । जेणें निरसे

अर्पण करून त्याचें भजन केल्यास आपलें निजांग देऊनहि तो प्रसन्न होतो. पण भजन न करणाऱ्याच्या घरीं कधीं चुकूनहि जात नाहीं. ६९ तुमची भावना तशी नाहीं. तुम्हीं दीनदयाळ केवळ कृपानिधि आहांत. ७० पहा, व्यास मोठे ज्ञानी पाहून त्यांना गुह्यज्ञान सांगितलेंत. पण ध्रुवबाळ अज्ञ समजून त्याची कांहीं [illegible] केली नाहींत. ७१ प्रल्हादाला उपदेश करितांना हा दैत्याचा पुत्र आहे, असें कांहीं तुम्हीं मनांत [illegible] नाहीं. ७२ अहो, वाल्मीकि मूळचा वाटमाऱ्या, पण तुम्हीं त्याला रामनामाचा उपदेश करून तत्काळ मह[illegible] बनविलेंत, त्यामुळें देवहि त्याला वंदन करूं लागले. ७३ त्याचा रामायण ग्रंथ पाहून सदाशिवाला सुद्धां आ[illegible] भरतें येतें. असा तूं मोठा कृपाळु आहेस; तुझ्या कृपेचा तरंग दीन व अनाथ यांचा विसांवा किंवा मोठा आधार आहे. ७४ तूं वरवर कोप आलेला दाखवितोस, पण त्या कोपानें लोकांकडून पाप टाकवितोस व पुण्याचरणानें शेवटीं त्यांस सायुज्य मुक्तीचा दीप दाखवितोस. ७५ तुम्हीं संत म्हणजे खरोखर अच्युताचे आत्मे आहांत.– 'ज्ञानी त्वात्मैव मे मतम्' 'मयि ते तेषु चाप्यहम्' सु. गी. ७. पृ. १५२.– म्हणूनच तो देव तुमच्या आज्ञेंत असतो. तुम्ही सांगाल त्याचा उद्धार करितो आणि इतरांकडे ढुंकूनहि पहात नाहीं. ७६ असे तुम्हीं दीनांना सन्मार्गाची दीक्षा देणारे गुरू आहां. ब्रह्मज्ञानानें मोठे उदार झाला आहां, म्हणून मी तुम्हांला कांहीं विचारतो. तें निश्चयानें सांगावें. ७७.

तथापि–तरी पण **ब्रह्मन्**–हे ब्रह्मन् **तव भागवतान् धर्मान्** तुला भागवत धर्म **पृच्छामः**—आम्हीं विचारतों. **यान्**–ज्या धर्मांना **श्रद्धया श्रुत्वा**–श्रद्धेनें ऐकून **मर्त्यः**–मनुष्य **विश्वतः भयात्**–सर्व भयापासून **मुच्यते**–मुक्त केला जातो. [आपल्या आगमनानेंच जरी आम्हीं कृतार्थ झालों आहों तरी ज्या भागवत धर्मांनीं भगवान् तुम्हांवर प्रसन्न झाला व जे धर्म श्रद्धेनें ऐकून मनुष्य सर्व भयांपासून मुक्त होतो ते भागवत धर्म आम्हीं तुम्हांला विचारतों] ७

हे देवर्षे, आत्मसुख देणारा तूं मायबाप आज माझ्या घरीं आल्यामुळें माझीं सर्व पुण्यें फलद्रूप झालीं. ७८ तूं मागील शिष्यावर जशी कृपा केलीस तशीच आतां मजवर कर. माझी तुजवर पूर्ण श्रद्धा आहे. मला संसारबंधांतून सोडीव. ७९ तुझ्या दर्शनानें मी जरी खरोखरच कृतकृत्य झालों आहें, तरी मला कृपा करून भागवत धर्माची कथा सांग. ८० जे धर्म मोठ्या श्रद्धेनें ऐकिले असतां जन्ममरण चुकतें आणि संसाराला कारण होणारें

क्रियाकर्म । श्रद्धेनें ऐकतां परम । जन्ममरण हारपे ॥ ८१ ॥ भवभय अतिदारुण । त्याचें माया निजकारण । तें समूळ होय निर्दळण । ऐसे धर्म कृपेनें सांगावे ॥ ८२ ॥ मज नाहीं अधिकार पूर्ण । ऐसें विचाराल लक्षण । तेविषयींची हे विनवण । सावधान अवधारीं ॥ ८३ ॥

अहं किल पुराऽनन्तं प्रजार्थो भुवि मुक्तिदम् । अपूजयं न मोक्षाय मोहितो देवमायया ॥ ८ ॥

मज अधिकारु नाहीं पूर्ण । हें मीही जाणतों आपण । मागें म्यां केलें भगवद्भजन । तें तूं कथन अवधारीं ॥ ८४ ॥ म्यां पूर्वीं आराधिलें देवराया । तें भजन ममता नेलें वांयां । प्रलोभविलों देवमाया । पुत्रस्नेहालागूनी ॥ ८५ ॥ मज देव तुष्टला प्रसन्नपणें । मागसी तें देईन म्हणे । तेथें मायेनें ठकिलें मजकारणें । माझा पुत्र होणें मी मागें ॥ ८६ ॥ तो हा माझा पुत्र श्रीकृष्ण । परी मज न सांगे ब्रह्मज्ञान । तोचि वंदी माझे चरण । म्हणे बाळक पूर्ण मी तुझें ॥ ८७ ॥ यापरी श्रीकृष्णापाशीं । ज्ञानप्राप्ति नव्हे आम्हांसी । कृष्ण परमात्मा हृषीकेशी । हें निश्चयेंसीं मी जाणें ॥ ८८ ॥ श्रीकृष्ण जन्मला माझिया कुशीं । म्हणोनि श्रद्धा आहे मजपाशीं । तेणेंचि तूं तुष्टलासी देवऋषी । तरी निजकृपेसीं उद्धरीं ॥ ८९ ॥ जे मायेनें ठकिलों वाडेंकोडें । ते माया समूळ झडे । ऐसें सांगिजे रोकडें । बहु बोलोनि पुढें काय काज ॥ ९० ॥

यथा विचित्रव्यसनाद्भवद्भिर्विश्वतो भयात् । मुच्येमह्यञ्जसैवाद्धा तथा नः शाधि सुव्रत ॥ ९ ॥

पुण्यपापहि नाहींसें होतें ते भागवत धर्म मला सांग. ८१ हे महर्षे, संसाराचें भय अति दारुण आहे. भगवानाची माया हें त्याचें मूळ कारण आहे. त्याचा समूळ नाश होईल असे धर्म मला कृपा करून सांग. ८२ मला ते धर्म ऐकण्याचा पूर्ण अधिकार नाहीं, म्हणून म्हणशील तर त्याविषयीं सांगतों, ऐक. ८३.

--- अरे वसु ! तुझ्यावांचून दुसरा कोणी भगवत्प्रसादाला पात्र आहे का ? म्हणून विचारशील तर सांगतों---

पुरा– पूर्वीं, **भुवि**–भूलोकीं, **प्रजार्थः अहं**–पुत्रप्राप्तीची इच्छा करणाऱ्या मीं, **मुक्तिदं अनन्तं**– मुक्ति देणाऱ्या अनंताला, **अपूजयं**–पूजिलें. पण **देवमायया**– त्या देवाच्या मायेनें, **मोहितः**–मोहित झालेल्या मीं, **मोक्षाय**-मोक्षासाठीं, **न**– त्याला पूजिलें नाहीं. [पूर्वीं मीं भूलोकीं पुत्रप्राप्तीसाठीं भगवानाची पूजा केली, मोक्षासाठीं नाहीं. श्लोकांतील ' किल ' या शब्दानें भगवानानें प्रसूतिगृहांत जें सांगितलें त्याचें स्मरण करून वसुदेव हें बोलत आहे, असें सुचविलें आहे.] ८.

मला भागवतधर्म श्रवणाचा अधिकार नाहीं, हें मीहि पूर्णपणें जाणतों. ८४ पूर्वीं मीं या देवाची आराधना केली. पण ममतेनें ती सर्व फुकट गेली. त्या देवाच्या मायेनें मी पुत्रसुखाला लांचावलों. ८५ माझ्या आराधनेनें देव मजवर प्रसन्न झाला आणि ' जें मागशील तें देईन' असें म्हणाला. पण त्या मायेनें मला त्यावेळीं ठकविलें आणि ' तूं माझा पुत्र हो' असा वर मागण्याची मला बुद्धि झाली. ८६ तोच भगवान् हा माझा श्रीकृष्ण पुत्र होय. पण तो मला ब्रह्मज्ञान सांगत नाहीं. उलट तोच माझ्या पायांवर मस्तक ठेवितो आणि मीहि त्याला माझा पुत्र म्हणतों, ८७ त्यामुळें श्रीकृष्णापासून मला ज्ञानप्राप्ति होणें शक्य नाहीं. श्रीकृष्ण परमात्मा आहे, तो इंद्रियांचा स्वामी आहे, हें मी निश्चयानें जाणतों; ८८ पण तो माझ्या पोटीं जन्मला, तो माझा पुत्र आहे असा माझा दृढ विश्वास आहे. तूं देवर्षि असून त्यामुळेंच माझ्यावर संतुष्ट झाला आहेस, तरी आतां मजवर कृपा करून माझा उद्धार कर. ८९ ज्या मायेनें मला आयत्या वेळीं असें सर्वथा फसविलें ती माया समूळ नाहींशी होईल असें ज्ञान मला स्पष्ट सांग. यापेक्षां मला अधिक बोलून काय करावयाचें आहे. ९०.

सुव्रत– हे सदाचारसंपन्न देवर्षे, **यथा**–ज्याप्रकारें, **विचित्रव्यसनात्**–ज्यांत नानाप्रकारचीं संकटें आहेत, **विश्वतः भयात्**–व सर्वतः भय आहे अशा संसारापासून, **भवद्भिः**--आपल्या योगें, **अंजसा एव**–अनायासानें, **अद्धा**–साक्षात् , **मुच्येमहि**–आम्हीं सोडविलें जाऊं, **तथा**–त्याप्रकारें, **नः**–आम्हांला, **शाधि**–उपदेश कर. [नारदा, नाना प्रकारच्या संकटांनीं युक्त व सर्व भयांनीं पूर्ण अशा या संसारापासून आपल्या निमित्तानें आम्ही अनायासानें ज्याप्रकारें साक्षात् मुक्त होऊं त्याप्रकारें आम्हांला भागवत धर्माचा उपदेश कर.] ९.

मायाजलें भवसागरू । भरला असे अतिदुस्तरू । त्याचा उतरावया पैलपारू । होय तूं तारूं मुनिराया ॥ ९१ ॥ याचें सकळ जळ क्षार । माजीं सावजें अनिवार । एकएकें चराचर । गिळिलें साचार निजशक्तीं ॥ ९२ ॥ लाटांवरी अचाट लाटा । मोहाचिया अतिदुर्घटा । आदळती अविवेकतटा । धैर्याचिया कांठा पाडित ॥ ९३ ॥ अहंकुवावो वाजतां थोरू । अवघाचि खवळे सागरू । मीमाझेनि गजरें घोरू । अति दुर्धरू गर्जत ॥ ९४ ॥ नाना वासनांचा वळसा । पाहें पां भंवताहे कैसा । येथ तरावया धिंवसा । नव्हे सहसा सुरनरां ॥ ९५ ॥ क्रोधाचें प्रबळ भरतें । भरे द्वेषाचिया तरियांतें । असूयातिरस्कारांची तेथें । चिडाणी उतें अनिवार ॥ ९६ ॥ कामपर्वतांचीं शिखरें । विषम भासतीं अपारें । आशे-इच्छेचीं वरी थोरें । झाडें विषयांकुरें वाढलीं ॥ ९७ ॥ संकल्पविकल्पांचे मीन । निंदेच्या सुसरी दारुण । ब्रह्मद्वेषाचे नक्र पूर्ण । सागरीं जाण तळपती ॥ ९८ ॥ एवढाही हा भवसागरू । शोषिता तूं अगस्ती साचारू । तुझेनि भवाब्धिपैलपारू । पावेन हा निर्धारू जाला आम्हां ॥ ९९ ॥ याचा विश्वतोभय हेलावा । तो आम्हां न बाधी तुमच्या कणवा । अप्रयासें नारददेवा । मरणार्णवा मज तारीं ॥ १०० ॥ पायीं उतरून भवसागरू । साक्षात् पावें परपारू । ऐसा भागवतधर्मविचारू । तो निजनिर्धारू प्रबोधी ॥ १ ॥ ऐकोनि वसुदेवाची उक्ती । नारद सुखावला चित्तीं । तोचि अभिप्रावो परीक्षिती । शुक स्वमुखें स्थिति सांगत ॥ २ ॥

श्रीशुक उ०–राजन्नेवं कृतप्रश्नो वसुदेवेन धीमता । प्रीतस्तमाह देवर्षिर्हरेः संस्मारितो गुणैः ॥ १० ॥

हे मुनिराज, हा संसारसागर मायाजलानें तुडुंब भरला आहे; त्यामुळें आमच्यासारख्या जीवांना तो अत्यंत दुस्तर झाला आहे. यास्तव त्याच्या परतीरास जाऊन पोंचण्यास तूं तारूं हो. ९१ या सागरांतील सर्व जल खारट, तोंडांत न घेण्यासारखें आहे; म्ह० या संसारांतील प्रत्येक वस्तु कटु अनुभव देणारी आहे. त्यांत एकाहून एक अधिक अशीं अनेक अनिवार चराचर सावजें आहेत. त्यांतील बलाढ्य जीवांनीं दुसऱ्या दुर्बलांना गिळून टाकिलें आहे. ९२ त्यांत मोहाच्या भयंकर लाटा एका मागून एक उठतात व या सागराच्या अविवेक तटावर येऊन आदळतात आणि धैर्याच्या बांधाला पाडवितात. ९३ अहंकाररूपी भयंकर वारा सुटला म्हणजे सगळा समुद्र खवळून जातो आणि 'मी व माझें' अशी त्याची घोर गर्जना सुरू होते. ९४ अहो, त्यांत अनेक विचित्र वासनांचा भोंवरा कसा गरगर फिरत आहे पहा. त्यांतून तरून जाण्याचें धैर्य कोणालाच होत नाहीं. ९५ त्याला क्रोधाचें भयंकर भरतें येतें. त्यामुळें द्वेषाचे खांचखळगे भरून जातात. दुसऱ्यांच्या गुणामध्यें दोषदृष्टि करणें ही असूया, तिरस्कार व अवमान यांची कांटेरीं झाडें समोंवार पसरतात. ९६ कामपर्वतांचीं अनंत शिखरें उंच सखल भासतात. त्यावर आशा व तृष्णा यांचीं मोठमोठीं झाडें शब्दादि विषयांकुरांनीं वाढतात. ९७ संकल्प विकल्प हेच मासे, निंदा याच भयंकर सुसरी व ब्रह्मद्वेष हेच मोठे मगर त्या सागरांत सर्वत्र संचार करितात. ९८ पण हा संसारसागर एवढा प्रचंड जरी असला तरी तूं त्याला शोषून टाकणारा अगस्त्यच आहेस. तुझ्या साह्यानें मी याच्या परतीरास जाऊन पोंचेन, असा माझा निश्चय झाला आहे. ९९ याचा सर्वप्रकारें भय देणारा प्रवाह तुझ्या कृपेनें मला पीडा देणार नाहीं. यास्तव हे देवर्षे, मला मृत्युयुक्त संसारसागरांतून अनायासानें सोडीव. १०० मी आपल्या पायांनींच याच्या परतीरास जाऊन पोंचेन असा भागवत धर्माचा विचार मला सांग. १ वसुदेवाचें हें भाषण ऐकून नारदाला फार संतोष झाला. श्रीशुकाचार्य परीक्षितीला आतां तेंच सांगत आहे. १०२.

श्रीशुकः उवाच–श्रीशुकाचार्य म्हणाले, **राजन्**–हे परीक्षित् राजा, **धीमता वसुदेवेन**–बुद्धिमान् वसुदेवाकडून, **एवं**–याप्रमाणें, **कृतप्रश्नः**–प्रश्न केलेला, **हरेः**–हरीच्या, **गुणैः**–गुणांनीं, **संस्मारितः**–आठवण करून दिला गेलेला, व **प्रीतः**–संतुष्ट झालेला, **देवर्षिः**–देवर्षि नारद, **तं**–त्या वसुदेवाला, **आह**–बोलला. [परीक्षित् राजा, बुद्धिमान् वसुदेवानें असा प्रश्न केला असतां वर्णन करण्यास योग्य अशा हरीच्या गुणांनीं ज्याला हरीचें स्मरण करून दिलें आहे असा नारद संतुष्ट झाला आणि त्याला म्हणाला.] १०.

सांगतां वसुदेवाचा प्रश्न । श्रीशुक जाला स्वानंदपूर्ण । नारदु बोळला चैतन्यघन । चित्सुखजीवन मुमुक्षां ॥ ३ ॥ श्रीशुक म्हणे नरदेवा । भावो मीनला नारदाच्या भावा । ऐकोनि प्रश्नसुहावा । तो म्हणे वसुदेवा धन्य वाणी ॥ ४ ॥ परिसतां हा तुझा प्रश्न । चित्सुखें प्रगटे नारायण । ऐसें बोलतां नारद जाण । स्वानंदें पूर्ण वोसंडला ॥ ५ ॥ रोमांच उचलले अंगीं । स्वेद दाटला सर्वांगीं । आनंदाश्रु चालिले वेगीं । स्वानंदरंगीं डुल्लतु ॥ ६ ॥ सप्रेम मीनलिया श्रोता । जैं पूर्ण सुखावेना वक्ता । तैं तो जाणावा अवघा रिता । कथासारामृता चवी नेणे ॥ ७ ॥ ऐकतां वसुदेवाचा प्रश्न । नारद सुखावे पूर्ण । मग स्वानंदगिरा गर्जोन । काय आपण बोलत ॥ ८ ॥

ना० उ०—सम्यगेतद्व्यवसितं भवता सात्वतर्षभ । यत्पृच्छसे भागवतान्धर्मांस्त्वं विश्वभावनान् ॥ ११ ॥

नारद म्हणे सात्वतश्रेष्ठा । वसुदेवा परमार्थनिष्ठा । धन्य धन्य तुझी उत्कंठा । तूं भावार्थी मोठा भागवतधर्मी ॥ ९ ॥ ज्याचेनि धर्मांचे प्रश्नोत्तरें । हें विश्व अवघेंचि उद्धरे । हें विचारिलें तुवां बरें । निजनिर्धारें श्रीकृष्णजनका ॥ ११० ॥ तुझेनि प्रश्नोत्तरें जाण । साधक निस्तरती संपूर्ण । साधकांचें नवल कोण । महापापी पावन येणें होती ॥ ११ ॥

वसुदेवाचा हा प्रश्न परीक्षित्-राजाला सांगत असतां शुकाचार्य आनंदपूर्ण झाले. नारद हाच कोणी एक ज्ञानरूप मेघ असून तो प्रसन्न होऊन मुमुक्षूंवर ब्रह्मानंदरूप जलाचा वर्षाव करण्यास तयार झाला. ३ राजा, त्यावेळीं वसुदेवाचा प्रश्न ऐकून नारदाला मोठा संतोष झाला व त्या दोघांचा आशय एकरूप झाल्यामुळें नारद म्हणतो—" वसुदेवा, तूं धन्य आहेस. ४ तुझा हा सुंदर प्रश्न ऐकून स्वतः नारायणच आनंदरूपानें प्रकट होतो. " ५ हें ऐकतांच वसुदेवालाहि आनंदाचें भरतें आलें, त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले, नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले आणि तो स्वानंदरंगांत डोलूं लागला. ६ अहो, वक्ता प्रेमानें भगवद्गुणांचें वर्णन करूं लागला असतां जो श्रोता त्यांत तल्लीन होऊन सुखी होत नाहीं, त्याचें सर्व श्रवण फुकट आहे. त्याला कथासारामृताची रुचि कळत नाहीं, किंवा श्रोता मोठ्या प्रेमानें श्रवणांत तल्लीन झाला असतां जो वक्ता प्रसन्न होत नाहीं तो खरा वक्ताच नव्हे. कारण त्याला कथामृताची चवच ठाऊक नसते. ७. पण वसुदेवाचा प्रश्न ऐकतांच नारदाला फार संतोष वाटला आणि तो आनंदपूर्ण वाणीनें गर्जना करून काय बोलला तें आतां ऐक. १०८.

—पुढील तीन श्लोकांनीं नारदाचा संतोषच प्रकट करितात—

नारदः उवाच—नारदमुनी म्हणाला, **सात्वतर्षभ**—हे सात्वतवंशांतील श्रेष्ठा वसुदेवा ! **यत्**—ज्याअर्थीं, **त्वं**–तूं, **विश्वभावनान् भागवतान् धर्मान्**—सर्वांना पावन करणारे भागवत धर्म, **पृच्छसे**—विचारीत आहेस त्याअर्थीं, **भवता**—तुझ्याकडून, **एतत्**—हें, **सम्यक् व्यवसितं**—फारच चांगलें कार्य केलें जात आहे. [वसुदेवा, तूं सर्व जगाचें शोधन करणारे भागवत धर्म विचारीत आहेस, हें खरोखरच तुझें अत्यंत प्रशंसनीय कार्य आहे.] ११.

नारद म्हणतो—" हे सात्वतकुलांतील श्रेष्ठ वसुदेवा, तूं परमार्थनिष्ठ आहेस. तुझी उत्कंठा प्रशंसनीय आहे. तुझी भागवत धर्मावर मोठी श्रद्धा आहे. ९ ज्या धर्माच्या प्रश्नोत्तरांनीं या सर्वेहि जगाचा उद्धार होतो ते धर्म तूं आपल्याच निश्चित बुद्धीनें विचारिलेस, हें फार चांगलें केलेंस. ११० तुझ्या या प्रश्नोत्तरांनीं साधक संसारसागरांतून तरून जातील, यांत कांहीं फारसें आश्चर्य नाहीं. पण महापातकीहि यांच्या योगानें पावन होतील. " १११.

श्रुतोऽनुपठितो ध्यात आदृतो वानुमोदितः । सद्यः पुनाति सद्धर्मो देवविश्वद्रुहोऽपि हि ॥१२॥

भागवतधर्माचेनि गुणें । एक उद्धरती श्रवणें । एक तरती पठणें । एक निस्तरती ध्यानें संसारपाशा ॥ ११२ ॥ एक श्रोतयांवक्तयांतें । देखोनि सुखावती निजचित्तें । सद्भावें भले म्हणती त्यांतें । तेही तरती येथें भागवतधर्में ॥११३॥ हें नवल नव्हे भागवतधर्मा । जो कां देवद्रोही दुरात्मा । अथवा विश्वद्रोही दुष्टात्मा । तोही तरे हा महिमा भागवतधर्मीं ॥ ११४ ॥ हृदयीं धरितां भागवतधर्म । अकर्म्याचें निर्दळी कर्म । अधर्म्याचे निर्दळी धर्म । दे उत्तमोत्तमपदप्राप्ती ॥ ११५ ॥ जेथ रिघाले भागवतधर्म । तेथ निर्दळे कर्माकर्मविकर्म । निंदा द्वेष क्रोध अधर्म । अविद्येचें नाम उरों नेदी ॥ ११६ ॥ ते भागवतधर्मीं अत्यादर । श्रद्धेनें केला प्रश्न तुवां थोर । निजभाग्यें तूं अति उदार । परम पवित्र वसुदेवा ॥ ११७ ॥ तुझें वानूं पवित्रपण । तरी पोटा आला श्रीकृष्ण । जयाचेनि नामें आम्ही जाण । परम पावन जगद्वंद्य ॥११८॥ तो स्वयें श्रीकृष्णनाथ । नित्य वसे तुझिया घरांत । तुझिया ऐसा भाग्यवंत । न दिसे येथ मज पाहातां ॥ ११९ ॥ वसुदेवा तुझिया नामतां । वासुदेव म्हणती अनंता । तें वासुदेव नाम स्मरतां । परम पावनता जगद्वंद्यां ॥ १२० ॥

त्वया परमकल्याण पुण्यश्रवणकीर्तनः । स्मारितो भगवानद्य देवो नारायणो मम ॥ १३ ॥

देव–हे वसुदेवा, **श्रुतः**–ऐकलेला, **अनुपठितः**–स्वतः पठण केलेला, **ध्यातः**–चिंतिलेला, **आदृतः**–आस्तिक्यानें ग्रहण केलेला, **वा**–किंवा, **अनुमोदितः**–अनुमोदन दिलेला, **सद्धर्मः**–भागवत धर्म, **विश्वद्रुहः अपि**–प्राणिमात्रांच्या द्वेष्ट्यालाहि, **सद्यः**–तत्काल, **पुनाति हि**–पावन करितोच. [या भागवत धर्माचें स्वतः श्रवण केलें असतां, गुरूपदेशानंतर त्याचें पठण केलें असतां, श्रद्धेनें त्याचें ग्रहण केलें असतां, किंवा इतरांकडून अनुष्ठिलेल्या त्या धर्मास अनुमोदन दिलें असतां हा भागवत धर्म देवें व सर्व जगत् यांचा जे द्रोह करितात त्यांनाहि पावन करितो.] १२– शिवाय तूं हा मजवर फार मोठा उपकार केला आहेस, असें नारद वसुदेवाला सांगतो—

या भागवत धर्माच्या केवळ श्रवणानेंच कित्येकांचा उद्धार होतो. कांहीं त्याच्या पठणानें तरतात. कोणी चिंतनानें हा संसारपाश तोडितात. ११२ कित्येक या धर्माचे श्रोते व वक्ते यांस पाहून मनांत संतुष्ट होतात. त्यांना सद्भावानें 'भले भले' असें म्हणतात. याप्रमाणें या धर्माला प्रोत्साहन देणारेहि तरून जातात. ११३ फार काय पण जो दुरात्मा देवांचा द्रोह करितो किंवा प्रत्येक प्राण्याचा द्वेष करितो तोहि या भागवत धर्माच्या माहात्म्यानें तरून जातो. ११४ हा धर्म मनांत वागविला असतां तो दुराचाऱ्याचें दुष्कर्म व अधर्मिकाचे अधर्म, यांचेंहि निरसन करून त्याला उत्तम पद प्राप्त करून देतो. ११५ जेथें भागवतधर्म शिरला तेथें तो कर्म, अकर्म, विकर्म, निंदा, द्वेष, क्रोध, अधर्म व अविद्या यांचें नांवहि उरूं देत नाहीं. ११६ व लोक भागवत धर्माचा मोठा आदर करूं लागतात. म्हणून हे वसुदेवा, तूं मोठ्या श्रद्धेनें हा फार महत्त्वाचा प्रश्न केलास. तुझें भाग्य फार मोठें आहे. ११७ तुझ्या पवित्रतेची थोरवी किती वर्णावी ! ज्याच्या नामस्मरणानें आम्ही परम पावन, जगद्वंद्य झालों, तो श्रीकृष्ण तुझ्या उदरीं आला. ११८ व तुझ्या घरामध्यें नित्य वास करीत आहे. तुझ्यासारखा भाग्यवान् पुरुष मला या त्रिभुवनांत कोठें दिसत नाहीं. ११९ तो तुझा पुत्र झाला म्हणून त्या अनंताला वासुदेव म्हणूं लागले. 'वसुदेव' या नांवावरून प्राप्त झालेल्या त्याच्या 'वासुदेव' या नांवाचें स्मरण जे करितात ते जगद्वंद्य परम पावन होतात. १२०.

त्वया अद्य–तूं आज **मम**–मला **पुण्यश्रवणकीर्तनः**–ज्याचें श्रवण व कीर्तन पवित्र आहे असा, **परमकल्याणः भगवान् नारायणः देवः**–परम कल्याण भगवान् नारायण देव, **स्मारितः**–आठवून दिलास. [तूं मला भगवानाचें स्मरण करून दिलेंस, हे तुझे मजवर मोठे उपकार आहेत.] १३.

---

१ अन्वयार्थांत 'हे देव विश्वद्रुहः' असा पदच्छेद करून अर्थ केला आहे व सारांशांत 'देवविश्वद्रुहः' हें एक सामासिक पद घेऊन अर्थ केला आहे.

ज्याचेनि श्रवणें वाढे पुण्य । ज्याचेनि नामें झडे भवबंधन । तो सद्य स्मरविला तुवां नारायण । तुझी वाचा कल्याण वसुदेवा ॥ २१ ॥ तुझा आजि ऐकतांचि प्रश्न । पूर्ण प्रगटला नारायण । मज तुझा हा उपकार पूर्ण । तूं परम कल्याण वसुदेवा ॥ २२ ॥ आशंका ॥ ऐकोनि नारदाचें वचन । झणें विकल्प धरील मन । यासी पूर्वीं होतें विस्मरण । आतां जाहलें स्मरण वसुदेवप्रश्नें ॥ २३ ॥ ज्यांची ऐसी विकल्पयुक्ती । ते जाणावे आत्मघाती । तेही अर्थींची उपपत्ती । ऐक निश्चितीं शुक सांगे ॥ २४ ॥ अग्निकुंडामाजी स्वयंभ असे । तो घृतावदानें अतिप्रकाशे । तेवीं सप्रेम प्रश्नवशें । सुख उल्लासे मुक्तांचें ॥ २५ ॥ सप्रेम भावार्थें मीनला श्रोता । मुक्तही उल्हासें सांगे कथा । तेथील सुखाची सुखस्वादुता । जाणे जाणता सवर्म ॥ २६ ॥ यालागीं मुक्त मुमुक्षु विषयी जन । भागवतधर्में निवती संपूर्ण । तोचि वसुदेवें केला प्रश्न । तेणें नारद पूर्ण सुखावला ॥ २७ ॥ जे कां पूर्वपरंपरागत । जीर्ण भागवतधर्म येथ । सांगावया नारदमुनि निश्चित । उपपादित इतिहासु ॥ २८ ॥

अत्राप्युदाहरन्तीममितिहासं पुरातनम् । आर्षभाणां च संवादं विदेहस्य महात्मनः ॥ १४ ॥

येच अर्थीं विदेहाचा प्रश्न । संवादती आर्षभ नवजण । ते भागवतधर्म जीर्ण । इतिहास संपूर्ण सांगेन ऐक ॥ २९ ॥ आर्षभ कोण म्हणसील मुळीं । त्यांची सांगेन वंशावळी । जन्म जयांचा सुकुळीं । नवांमाजीं जाहली ब्रह्मनिष्ठा ॥ १३० ॥

हे वसुदेवा, ज्याच्या श्रवणानें पुण्य वाढतें, नामानें संसारबंध तुटतो त्या नारायणाचें तूं मला या वेळीं स्मरण करून दिलेंस. तुझी वाणी शुभ आहे. २१ तुझा प्रश्न ऐकतांच माझ्या मनांत नारायण पूर्ण प्रकट झाला आहे. माझ्यावर तुझा हा मोठा उपकार आहे. तूं परम कल्याण आहेस. २२ नारदाचें हें वचन ऐकून कोणाला कदाचित् असें वाटेल कीं, या नारदाला पूर्वीं नारायणाचें विस्मरण झालें होतें व आतां वसुदेवाच्या प्रश्नानें त्याला स्मरण झालें. २३ पण ज्यांची अशी विपरीत भावना होते ते निःसंशय आत्मघातकी आहेत, असें समजावें. आतां श्रीशुक परीक्षित्-राजाला त्याची उपपत्ति सांगतात. २४ अग्नीच्या कुंडामध्यें अग्नि पूर्वींच असतो. तो घृताच्या आहुतीनें अधिक प्रदीप्त होतो. त्याच न्यायानें मुक्तांच्या मनांत नारायण नेहमीं असतो; पण त्याविषयीं कोणी प्रश्न केला असतां त्यांच्या मनाला सप्रेम सुखाचें भरतें येतें. २५ श्रोता सप्रेम भक्तीनें प्रश्न करूं लागला असतां मुक्तालाहि नारायणाची कथा सांगण्यास उल्हास वाटतो. त्या प्रसंगीं जें सुख होतें त्याची गोडी एखादा अनुभवीच जाणतो. २६ त्यामुळें मुक्त, मुमुक्षु व विषयी जनहि भागवत धर्मानें पूर्ण शांतीचा अनुभव घेतात. वसुदेवांनीं तोच प्रश्न केला आहे. त्यामुळें नारदाला फार सुख झालें. २७ जो पूर्व परंपरेनें प्राप्त झालेला सनातन भागवत धर्म तोच सांगण्याच्या निश्चयानें नारदमुनि प्राचीन इतिहास सांगूं लागले. १२८.

अत्र अपि–या भागवत धर्मनिर्णयाविषयींहि, **महात्मनः विदेहस्य**–महात्मा जनक, **च**–आणि, **आर्षभाणां**–आर्षभ यांचा, **संवादं**–संवादरूप, **इमं पुरातनं इतिहासं**–असा हा प्राचीन इतिहास, **उदाहरन्ति**–सांगतात. [पूर्वीं जनक व आर्षभ ऋषभपुत्र यांचा जो भागवत धर्माविषयीं संवाद झाला होता त्याचा हा असा प्राचीन इतिहास सांगतात.] १४.

पूर्वीं जनक राजानेंहि याच अर्थाचा प्रश्न केला होता व नऊ आर्षभांनीं त्याचीं उत्तरें दिलीं. सनातन भागवत धर्माचा तो इतिहास मी तुला सविस्तर सांगतों, ऐक. आर्षभ कोण असें तूं म्हणशील तर अगोदर त्यांची सर्व वंशावळ सांगतों. त्यांचा जन्म सत्कुलांत झाला होता आणि ते नऊहि आर्षभ ब्रह्मनिष्ठ होते. २९-१३०.

प्रियव्रतो नाम सुतो मनोः स्वायंभुवस्य यः । तस्याग्नीध्रस्ततो नाभिर्ऋषभस्तत्सुतः स्मृतः ॥ १५ ॥

स्वायंभु मनूचा सुतु । जाण नामें प्रियव्रतु । त्याचा आग्नीध्र विख्यातु । नाभी त्याचा सुतू सूर्यवंशीं ॥ ३१ ॥ त्या नाभीपासूनि ज्ञानविलासु । ऋषभ जन्मला वासुदेवांशु । मोक्षधर्माचा प्रकाशु । जगीं सावकाशु विस्तारिला ॥ ३२ ॥

तमाहुर्वासुदेवांशं मोक्षधर्मविवक्षया । अवतीर्णं सुतशतं तस्यासीद्वेदपारगम् ॥ १६ ॥

वृषभ वासुदेवाचा अंशु । ये लोकीं मोक्षधर्मविश्वासु । प्रवर्तावया जगदीशु । हा अंशांशु अवतार ॥ ३३ ॥ त्याचें पंचमस्कंधीं चरित्र । सांगितलें सविस्तर । त्यासी जाहलें शत पुत्र । वेदशास्त्रसंपन्न ॥ ३४ ॥ त्याहीमाजी ज्येष्ठ पुत्र । अतिशयें परम पवित्र । ऐक त्याचें चरित्र । अतिविचित्र सांगेन ॥ ३५ ॥

तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः । विख्यातं वर्षमेतद्यन्नाम्ना भारतमद्भुतम् ॥ १७ ॥

जो ज्येष्ठपुत्र भरत जाण । तो नारायणपरायण । अद्यापि भरतवर्षउच्चारण । त्याचेनि नांवें जाण विख्यात ॥ ३६ ॥ जो मनसा वाचा कर्मणा । अखंड भजे नारायणा । असतांही राज्यधर्मी जाणा । जो आत्मखुणा न चुके ॥ ३७ ॥ जेवीं मार्गीं चालतां । पाउलें वक्रेंही टाकितां । दैववशें अडखुळतां ।

— या पुढील सात श्लोकांनीं आर्षभांची उत्पत्ति त्यांच्या वंशासह सांगतात —

स्वायंभुवस्य मनोः–स्वायंभु मनूचा, **यः प्रियव्रतः नाम सुतः**– प्रियव्रत नांवाचा जो पुत्र, **तस्य आग्नीध्रः**–त्याचा पुत्र आग्नीध्र, **ततः**–त्याच्यापासून, **नाभिः**–नाभि, **तत्सुतः ऋषभः**–त्याचा पुत्र ऋषभ, **स्मृतः**–प्रसिद्ध आहे. [याप्रमाणें त्यांची वंशपरंपरा सांगितली.] १५.

स्वायंभु मनूचा प्रियव्रत नांवाचा पुत्र होता. त्याचा पुत्र आग्नीध्र, त्याचा पुत्र सूर्यवंशांतील नाभि, ३१ त्या नाभीपासून ऋषभ झाला, तो वासुदेवाचा अंश व महाज्ञानी होता. त्यानें मोक्षधर्माचा प्रकाश जगांत सर्वत्र पसरविला. -१३२.

मोक्षधर्मविवक्षया–मोक्षधर्माच्या उपदेशानें त्याचा संप्रदाय सुरू करण्याच्या इच्छेनें, **अवतीर्णं तं**–अवतार घेतलेल्या त्याला, **वासुदेवांशं**-वासुदेवाचा अंश असें, **आहुः**–म्हणतात, **तस्य**–त्याचे, **वेदपारगं**-वेदपारंगत, **सुतशतं**–शंभर पुत्र, **आसीत्**–होते. [मोक्षधर्माचा संप्रदाय सुरू करण्याच्या इच्छेनें जन्मलेल्या त्या ऋषभाला श्रीकृष्णाचा अंश म्हणतात. त्याला वेदवेत्ते शंभर पुत्र झाले.] १६.

भगवानांचा अंश असा तो ऋषभ मोक्षधर्मावरील श्रद्धा वाढवून त्यांचा संप्रदाय सुरू करण्यासाठीं भूलोकीं आला. ३३ पांचव्या स्कंधांत त्याचें चरित्र सविस्तर सांगितलें आहे. त्या ऋषभाला वेदशास्त्रसंपन्न शंभर पुत्र झाले. ३४ त्यांतील ज्येष्ठ पुत्र अतिशय पवित्र होता, त्याचें अलौकिक चरित्र सांगतों तें ऐक. १३५

— त्या ऋषभपुत्रांतील नव योगीश्वरांचें चरित्र सांगण्यासाठीं इतरांचें चरित्र त्याहून निराळें सांगतात–

तेषां वै—त्या शंभरांतील, **ज्येष्ठः**–वडिल, **भरतः**–भरत, **नारायणपरायणः**- भगवत्परायण होता. **तन्नाम्ना**–त्याच्या नांवानें, **एतत्**–हें, **अद्भुतं भारतं वर्षं**–अद्भुत भारतवर्ष, **विख्यातं**–प्रख्यात झालें. [त्या शंभरांतील वडिल पुत्र भरत हा मोठा भगवद्भक्त होता. त्याच्याच नांवानें हें भारतवर्ष जगांत अद्यापि प्रसिद्ध आहे.] १७.

त्या ऋषभाच्या शंभर पुत्रांतील भरत हा वडील पुत्र होता. तो नारायणाचा मोठा भक्त होता. त्याच्याच नांवानें या राष्ट्राला अद्यापि भरतखंड म्हणतात. ३६ जो भरत शरीर, वाणी आणि मन यांनीं नारायणाचें अखंड भजन करीत असे, तो राज्य करीत असतांना देखील क्षणभरहि आत्मचिंतन सोडीत नसे. ३७ ज्याप्रमाणें मार्गानें जात असतां व पावलें वाकडीं टाकीत असतां दैववशात् तो चालणारा जरी अडखळून पडला तरी त्याचा आश्रय

आश्रयो तत्त्वतां भूमिकाचि ॥ ३८ ॥ तेवींचि तयासी असतां । राज्यधर्म चाळितां । यथोचित कर्म आचरतां । निजीं निजात्मता पालटेना ॥ ३९ ॥ या नांव बोलिजे अखंड स्थिती । जे पालटेना कल्पांतीं । जेथ असतां सुखी होती । पुनरावृत्ति असेना ॥ १४० ॥ ऐसें करी सदाचरण । आणि नारायणपरायण । आईक त्याचेंही व्याख्यान । विशद करूनि सांगेन ॥ ४१ ॥ नराचा समुदाय गहन । त्यासी नार म्हणती जाण । त्याचें अयन म्हणजे स्थान । म्हणोनि म्हणती नारायण आत्मयासी ॥ ४२ ॥ त्याच्या ठायीं परायण । म्हणिजे अनन्यत्वें शरण । निबटुनियां आपुलें अहंपण । तद्रूपें जाण राहिला ॥ ४३ ॥ ऐसा तो ऋषभाचा पुत्र । जयासी नांव भरत । ज्याच्या नामाची कीर्ति विचित्र । परम पवित्र जगामाजीं ॥ ४४ ॥ तो भरतु राहिला भूमिकेसी । म्हणोनि भरतवर्ष म्हणती यासी । सकळ कर्मारंभीं करितां संकल्पासी । ज्याचिया नामासी स्मरताती ॥ ४५ ॥ ऐसा आत्माराम जऱ्ही झाला । तऱ्हीं विषयसंग नव्हे भला । यालागीं त्याचा वृत्तांतु पुढिला । सांगेन सकळां आइकें ॥ ४६ ॥ नामें ख्याती केली उदंड । यालागीं त्यातें म्हणती भरतखंड । आणीकही प्रताप प्रचंड । त्याचा वितंड तो ऐका ॥ ४७ ॥

स भुक्तभोगां त्यक्त्वेमां निर्गतस्तपसा हरिम् । उपासीनस्तत्पदवीं लेभे वै जन्मभिस्त्रिभिः ॥ १८ ॥

भूमिच असते, ३८ त्याच न्यायानें भरत राजकार्य करीत असतां व तो प्रसंगीं यथोचित कर्म आचरीत असतांहि त्याच्या अंतःकरणांतील आत्मनिष्ठा ढळत नसे. ३९ अशी कल्पांतींही न ढळणारी जी स्वरूपस्थिति तिलाच अखंड स्थिति म्हणावें. या स्थितींत भगवद्भक्त अत्यंत सुखी होतात. त्यांना पुनर्जन्म नाहीं. १४० वसुदेवा, जो दुसराहि कोणी असें सदाचरण करितो व नारायणपरायण होतो त्याचेंहि मी स्पष्टपणें वर्णन करितों, तें तूं ऐक. ४१ जीवांचा जो फार मोठा समुदाय त्याला नार असें म्हणतात. त्यांचें जें अयन म्ह० अधिष्ठान तोच नारायण होय. त्यालाच सर्व भूतांचा प्रत्यगात्मा म्हणतात. ४२ त्या आत्मरूप नारायणाला अनन्य शरण होणें हेंच नारायणपरायणत्व होय. आपलें अहंपण टाकून तो 'भरत-' नांवाचा ऋषभपुत्र नारायणरूपानें राहिला. ४३ ('नारायण-'शब्दाची ही तात्त्विक व्युत्पत्ति आहे. याचीच पौराणिक व्युत्पत्ति अशी–नर म्ह० परमात्मा त्याच्यापासून आप होतें म्हणून त्या 'नारा.' अवांतर प्रलय कालीं अपर ब्रह्म त्या 'नारांच्या'–जलाच्या आश्रयानें रहातें म्हणून त्याला 'नारायण' म्हणतात.) या जगांत त्याचें नांव प्रख्यात झालें. तो या भूमींत राहिला म्हणून तिला भरतवर्ष म्हणूं लागले, हें वर सांगितलेंच आहे. ४४ सर्व कर्मांच्या आरंभीं जो संकल्प करितात त्यांत 'भरतवर्षे' 'भरतखंडे' असा त्याच्या नांवाचा उच्चार करितात. ४५ भरत असा आत्माराम जरी झाला होता तरी विषयसंग केव्हांहि हितावह नाहीं हें श्रोत्यांच्या मनांत ठसण्यासाठीं त्याचा पुढील वृत्तान्त मी तुला सांगतों, तो ऐक. ४६ त्यानें आपल्या नांवानें फार मोठी प्रख्याति केली, म्हणून याला भरतखंड म्हणतात, हें आतां सांगितलेंच. आणखीहि त्याचा अघटित प्रताप तुला सांगतों तो ऐक. १४७.

भुक्तभोगां–जिच्यांतील सर्व विषयांचा उपभोग घेतला आहे अशा, **इमां**—या पृथ्वीचा, **त्यक्त्वा**–त्याग करून, **निर्गतः सः**–निघून गेलेला तो, **तपसा**–तपानें, **हरिं उपासीनः**–हरीची उपासना करणारा असा होत्साता, **त्रिभिः जन्मभिः**-तीन जन्मांनीं, **तत्पदवीं**–त्याच्या स्वरूपास, **लेभे वै**–प्राप्त झाला हें प्रसिद्ध आहे. [सर्व पृथ्वींतील भोगांचा उपभोग घेऊन तो निवृत्त झाला व तपानें श्रीहरीची उपासना करूं लागला. तीन जन्मांनीं त्याला विष्णुपद प्राप्त झालें.] १८.

तेणें दिग्मंडळ जिंतिलें । समुद्रवलयांकित राज्य केलें । नानाविध भोग भोगिले । जे नाहीं देखिले सुरवरीं ॥४८॥ अनुकूळ स्त्रिया पुत्र । अनुकूळ मंत्री पवित्र । अनुकूळ राज्य सर्वत्र । ते त्यागिले विचित्र नानाभोग ॥४९॥ ऐसे भोग भोगिलियापाठीं । सांडूनि वलयांकित राज्यसृष्टी । स्वयें निघाला जगजेठी । स्वहितदृष्टी हरिभजनीं ॥१५०॥ जे राज्यवैभव भोगिती । त्यांसी कदा नव्हे गा विरक्ती । भरतें केली नवल ख्याती । सेविला श्रीपती भोगत्यागें ॥५१॥ तो तेणेंचि जन्में जाण । होआवा मोक्षासी आरोहण । परी जाहलें जन्मांतरकारण । तेंही विंदाण सांगेन ॥५२॥ संनिहितप्रसूतिकाळीं । मृगी जळ प्राशितां जळीं । ऐकोनि पंचाननाची आरोळी । उडाली तत्काळीं अतिसत्राणें ॥५३॥ धाकें गर्भ तिचा पडतां जळीं । भरत स्नान करी ते काळीं । देखोनि कृपाळु कळवळी । काढी तत्काळीं दयाळुत्वें ॥५४॥ मृगी नयेचि परतोन । मातृहीन हें अतिदीन । भरत पाळी भूतदयेन । मृगममता पूर्ण वाढली ॥५५॥ स्नान संध्या अनुष्ठान । करितां मृग आठवे क्षणक्षण । आरंभिल्या जपध्यान । मृगमय मन भरताचें ॥५६॥ आसनीं भोजनीं शयनीं । मृग आठवे क्षणक्षणीं । मृग न देखतां नयनीं । उठे गजबजोनि ध्यानत्यागें ॥५७॥ ममता बैसली मृगापाशीं । मृग वना गेला स्वइच्छेंसीं । त्याचा खेदु करितां भरतासी । काळ आक्रमी देहातें ॥ ५८ ॥ यालागीं साचचि जाण । ममतेपाशीं असे मरण । जो निर्मम संपूर्ण । त्यासी जन्ममरण स्पर्शेना ॥ ५९ ॥ भरत तपिया थोर अंगें । तेथ काळ कैसेनि रिघे । ममतासंधी पाहोनि वेगें । मृत्यु तद्योगें पावला ॥ १६० ॥ देहासी येतां मरण । भरतासी मृगाचें ध्यान । तेणें मृगजन्म पावे आपण । जन्मांतरकारण जाहलें ऐसें ॥६१॥ कृपेनें केला जो संगु । तोचि योगियां योगभंगु । यालागीं जो निःसंगु । तो अभंगु साधक ॥ ६२ ॥ मृगाचेनि स्मरणें निमाला । यालागीं तो मृगजन्म पावला । जो कृष्णस्मरणें निमाला । तो कृष्णुचि झाला देहांतीं ॥ ६३ ॥ अंतकाळीं जे मती । तेचि प्राणियांसी जाण गती ।

त्यानें शौर्यानें सर्व भूलोक जिंकिला. देवांनाहि दुर्लभ असलेले विविध भोग भोगिले. ४८ त्याला सर्व अनुकूल असूनहि त्यानें सर्वांचा त्याग केला. ४९-१५०. स्वात्महिताच्या दृष्टीनें तो हरिभजनीं लागला मोठें राज्यवैभव प्राप्त असूनहि विरक्तीनें त्याचा त्याग करणें फार कठिण आहे. पण भरतानें त्याचा त्याग करून आपलें नांव अजरामर केलें. ५१ तो त्याच जन्मांत मुक्त व्हावयाचा, पण मध्येंच त्याच्या दुसऱ्या जन्माचें कारण उत्पन्न झालें. ५२ एकदां जिचा प्रसूतिकाळ अगदीं समीप आला आहे अशी एक हरिणी पाणी पीत असतां एकाएकीं सिंहाची गर्जना तिच्या कानीं पडली. तत्काळ तिनें अतिशय भयभीत होऊन वेगानें उडी मारिली. ५३ त्यामुळें तिचा गर्भ गळून पाण्यांत पडला. त्या वेळीं भरत तेथें स्नान करीत होता. तें पाहून त्याला दया आली व त्यानें सदयतेनें त्या पाडसाला लगेच पाण्यांतून वर काढिलें. ५४ त्याची आई, ती हरिणी परत आली नाहीं, म्हणून त्या अतिदीन मातृहीन पाडसाला भरतानें भूतदयेनें पाळलें. ५५ स्नानसंध्या करितांना क्षणोक्षणीं त्याला त्याचेंच स्मरण होई. जप किंवा ध्यान आरंभिल्यास त्याचें मन मृगमय होत असे. ५६ आसन, भोजन व शयन या प्रसंगीं त्याला पुनः पुनः त्या हरणाची आठवण होई व तें न दिसल्यास तो घाबरून ध्यान सोडूनहि उठत असे. ५७ याप्रमाणें त्याची त्या हरिणावर ममता बसली. एकदां तो हरिण स्वेच्छेनें वनांत गेला असतां भरताला मोठा खेद वाटला. इतक्यांत कालानें त्याच्या देहावर झडप घातली. ५८ खरोखर जेथें ममता तेथें मरण. जो ममताशून्य असतो त्याला जन्ममरण स्पर्श करीत नाहीं. ५९ भरत स्वतः महातपस्वी, तेथें काळाचा रिघाव कसा होणार ! पण त्याच्या ममतेची संधि साधून त्याच्यावर मृत्यूनें घाला घातला. १६० त्याच्या देहाला जेव्हां मरण आलें तेव्हां भरताला मृगाचा ध्यास लागला होता, म्हणून त्याला मृगजन्म प्राप्त झाला. असें त्याच्या जन्मान्तराला कारण झालें. ६१ दयेनें जो संग केला तोच त्याच्या योगभंगाला कारण झाला; म्हणून जो निःसंग असतो तो अबाधित साधक होतो. ६२ भरत हरणाचें ध्यान करीत मेला म्हणून त्याला मृगजन्म घ्यावा लागला; पण जो श्रीकृष्णस्मरण करीत मरतो तो देहान्तीं कृष्णच होतो ६३ अंतकाळीं जी मति असते तीच प्राण्याला गति मिळते. म्हणून श्रीकृष्णभक्तानें अहोरात्र आपल्या मनांत त्याचेंच

यालागीं श्रीकृष्ण चित्तीं । अहोरातीं स्मरावा ॥ ६४ ॥ परी मृगदेहीं जाण । भरतासी श्रीकृष्णस्मरण । पूर्वी केलें जें अनुष्ठान । तें अंतर जाण कदा नेदी ॥ ६५ ॥ मागुता तिसरे जन्में पाहें । तो जडभरत नाम लाहे । तेथें तो निर्ममत्वें राहें । तेणें होय नित्यमुक्त ॥ ६६ ॥ बहुतां जन्मींची उणीवी । येणें जन्में काढिली बरवी । निजात्मा आकळोनि जीवीं । परब्रह्मपदवी पावला ॥ ६७ ॥ ऋषभपुत्रउत्पत्ती । शतबंधू जाण निश्चितीं । त्यांत हे ज्येष्ठाची स्थिती । उरल्यांची गती ते ऐका ॥ ६८ ॥

तेषां नव नवद्वीपपतयोऽस्य समन्ततः । कर्मतन्त्रप्रणेतार एकाशीतिर्द्विजातयः ॥१९॥

नव नवखंडांप्रती । ते केले खंडाधिपती । एक्यायशींजणांची स्थिती । कर्ममार्गीं होती प्रवर्तक ॥६९॥ उरले जे नव जण । सकळ भाग्याचें भूषण । ब्रह्मज्ञानाचें अधिष्ठान । ऐक लक्षण तयांचें ॥१७०॥

नवाभवन्महाभागा मुनयो ह्यर्थशंसिनः । श्रमणा वातरशना आत्मविद्याविशारदाः ॥ २० ॥
कविर्हरिरन्तरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः। आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २१ ॥

ऋषभकुळीं कुळदीप । स्नेहसूत्रेंवीण देदीप्य । नवही जण स्वयें सद्रूप । सायुज्यस्वरूपप्रकाशक ॥ ७१ ॥ आत्माभ्यासीं परिश्रम । करून निरसिलें कर्माकर्म । यालागीं ते अकृताश्रम । निजनिभ्रम स्वयें जाहले ॥ ७२ ॥ शब्दबोधें सदोदित । ब्रह्मज्ञानपारंगत । शिष्यप्रबोधीं समर्थ । परमाद्भुत अतिदक्ष ॥ ७३ ॥ ते ब्रह्मविद्येचें चालते डिंब । त्यांचे अवेव ते ब्रह्मकोंब । ते विद्येचें पूर्णबिंब । स्वयें स्वयंभ

चिंतन करावें. ६४ भरताला याप्रमाणें मृगशरीर जरी प्राप्त झालें होतें तरी त्यानें पूर्वजन्मीं श्रीकृष्णाचें जें स्मरण केलें होतें त्यानें त्याला केव्हांहि सोडिलें नाहीं. ६५ त्यानंतर त्याला तिसरा जन्म प्राप्त झाला. त्याला जडभरत हें नांव मिळालें. तेथें तो निर्ममत्वानें राहिला आणि नित्यमुक्त झाला. ६६ त्याच्या मागच्या अनेक जन्मांत जी उणीव होती ती त्याच्या या जन्मानें भरून काढिली. त्याला आत्मसाक्षात्कार झाला व तो ब्रह्मपदाला पोंचला. ६७ ऋषभाच्या शंभर पुत्रांतील वडील पुत्राचा हा इतिहास झाला. आतां बाकीच्यांची काय गति झाली ती ऐका. १६८.

तेषां—त्यांतील, **नव**—नऊजण, **अस्य समन्ततः**—या भारतवर्षाच्या सभोंवार असलेल्या, **नव द्वीपपतयः**—नव द्वीपांचे स्वामी झाले, व **एकाशीतिः**—एक्यांयशी पुत्र, **कर्मतंत्रप्रणेतारः द्विजातयः**—कर्ममार्गप्रवर्तक ब्राह्मण झाले. [ऋषभाच्या शंभर पुत्रांतील नऊ पुत्र भारत वर्षाच्या सभोंवार असलेल्या ब्रह्मावर्तादि नवखंडांचे राजे झाले व दुसरे एक्यांयशी कर्ममार्गप्रवर्तक ब्राह्मण झाले.] १९.

नव ऋषभपुत्र नवखंडाचे अधिपति केले गेले व एक्यांयशी पुत्र कर्ममार्गी झाले आणि त्यांनीं कर्ममार्ग प्रवृत्त केला. ६९ बाकी राहिलेले जे नऊजण ते सर्व भाग्याचें भूषण व ब्रह्मज्ञानाचें अधिष्ठान झाले. त्यांचें लक्षण तूं ऐक. १७०.

कविः हरिः०-कवि हरि इत्यादि, **नव**—नऊजण, **महाभागाः**—मोठे भाग्यवान् ऋषभपुत्र, **अर्थशंसिनः**— परमार्थ निरूपण करणारे, **श्रमणाः**—आत्माभ्यासाविषयीं परिश्रम करणारे, **वातरशनाः**—दिगंबर, **आत्मविद्याविशारदाः**- आत्मविद्येमध्यें निष्णात, **मुनयः**—असे मुनी, **अभवन्**—झाले. [बाकीचे कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस व करभाजन हे नव ऋषभपुत्र महा भाग्यवान्, परमार्थदर्शी, आत्माभ्यासी, दिगंबर, आत्मज्ञाननिष्णात असे मुनी झाले.] २०.-२१.

ऋषभकुलाचे जणुंकाय कुलदीपकच असे कवि, हरि इत्यादि नवजण लौकिक दीपाप्रमाणें तेल व वात यांवांचूनच प्रकाश पावणारे स्वतः तद्रूप आत्माभ्यासासाठीं परिश्रम करून कर्म-अकर्मांचा नाश करणारे सायुज्य स्वरूपास प्रकाशित करणारे व स्वतः विश्रांति पावून निभ्रांत झाले होते. ७१-७२ ते ब्रह्मज्ञानपारंगत, शाब्दबोधांत निष्णात, शिष्यांना बोध करण्यास समर्थ, अत्यंत दक्ष, ७३ ब्रह्मविद्येच्या जणुंकाय चालत्या बोलत्या आकृतिच होत्या. त्यांचे अवयव हें जणुंकाय ब्रह्माचे अंकुरच, विद्येचें पूर्ण प्रतिबिंब, किंबहुना स्वतः स्वप्रकाश परब्रह्मच होतें. ७४

परब्रह्म ॥ ७४ ॥ दशदिशा एकूचि दोरा । भरूनि पांघरुणें मुनीश्वरा । वारा वळून कडदोरा । बांधिला पुरा ग्रंथीरूप ॥ ७५ ॥ आकाशाच्या ठायीं । अंबरत्व केलें तिहीं । ते चिदंबर पाहीं । एकचि नवांही पांघरूण ॥ ७६ ॥ प्राणापान वळूनि दोन्ही । गांठी केली नाभीच्या ठायीं । तंव जीवग्रंथी सुटली पाहीं । तेंचि नवांही ब्रह्मसूत्र ॥ ७७ ॥ ऐसे परब्रह्मवैभवें । निडारले निजानुभवें । त्यांचीं सांगेन मी नांवें । यथागौरवें तें ऐक ॥ ७८ ॥ ज्यांचें नाम ऐकतां । कांपत काळ पळे मागुता । संसार नुघवी माथा । नाम स्मरतां जयांचें ॥ ७९ ॥ त्यांचिया नामांची कीर्ती । आईक सांगेन परीक्षिती । त्यांचेनि नामें आतुडे मुक्ती । जाण निश्चितीं भाविकां ॥ १८० ॥ कवि हरि अंतरिक्ष । प्रबुद्ध पिप्पलायन देख । आविर्होत्र द्रुमिल सुटंक । चमस निर्दोष करभाजन ॥ ८१ ॥ एवं नवही नांवें जाण । यांचें करितां नामस्मरण । सकळ पापा निर्दळण । हे महिमा पूर्ण तयांची ॥ ८२ ॥ त्याची परमहंसस्थिती । सांगेन मी तुजप्रती । ज्यांचेनि पावन होय क्षिती । त्या नव मूर्ती पुण्य पूज्य ॥ ८३ ॥

एते वै भगवद्रूपं विश्वं सदसदात्मकम् । आत्मनोऽव्यतिरेकेण पश्यन्तो व्यचरन्महीम् ॥ २२ ॥

ते वेगळे दिसती नवांक । परी भगवद्रूपें अवघे एक । संतासंत जन अनेक । आपणांसकट देख एकत्वें पाहाती ॥ ८४ ॥ त्यांसी तंव असंतता । उरली नाहीं सर्वथा । संत म्हणावया पुरता । भेदु न ये हाता चिन्मयत्वें ॥ ८५ ॥ जग परिपूर्ण भगवंतें । आपण वेगळा नुरे तेथें । नवही भगवद्रूप समस्तें । भूताकृती ते प्रगट देखे ॥ ८६ ॥ हेंही देखतें देखणें । तेंही स्वयें आपण होणें । होणें न होणें येणें जाणें । हीं गिळूनि लक्षणें विचरती मही ॥ ८७ ॥

त्यांचीं वस्त्रें दशदिशा याच एका तंतूनें विणलेलीं होतीं. वारा हाच त्यांचा घट्ट वळून बांधलेला कडदोरा होता. ७५ त्यांनीं आकाशाचेंच वस्त्र केलें व तेंच त्या नवजणांचेंहि पांघरूण होतें. ७६ प्राण व अपान या दोहोंची दोरी वळून त्यांनीं नाभीमध्यें तिची गांठ दिली, त्याबरोबर 'मी जीव आहें' ही गांठ सुटली. तेंच त्या नवजणांचेंहि यज्ञोपवीत होय. ७७ याप्रमाणें ते परब्रह्मवैभवानें व स्वानुभवानें परिपक्व झाले. ७८ त्यांचीं पूर्वोक्त नांवें ऐकतांच काळ भयभीत होऊन पळून जातो. त्यांच्या नांवांचें स्मरण करितांच संसार आपलें डोकें वर काढीत नाहीं व ७९ भाविकांना त्यांच्या नांवांनेंच मुक्ति मिळते. सर्व पापनिवृत्ति होते. त्यांच्या नांवांचा असा महिमा आहे. त्यांची परमहंसस्थिति कशी होती ती मी तुला सांगतों. १८०.

कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, सुलक्षणी चमस, आणि पवित्र करभाजन ८१ अशीं त्या नऊजणांचीं नांवें होतीं. त्यांचें नामस्मरण केलें असतां सर्वपापांचें निरसन होतें, असा त्यांचा पूर्ण महिमा होता. ८२ त्यांचीं परमहंस स्थिति मी तुला सांगतों. ज्यांच्या योगानें पृथ्वी पावन होते, अशा त्या नवमूर्ति पुण्यवान आणि पूज्य होत्या. १८३.

— पुढील दोन श्लोकांनीं त्यांच्या परमहंस आश्रमाचें चरित्र सांगतात —

एते वै-हेच परमहंस झालेले नव आर्षभ, **सदसदात्मकं भगवद्रूपं विश्वं**-स्थूल-सूक्ष्मरूप भगवदात्मक जगाला, **आत्मनः अव्यतिरेकेण**-स्वरूपाहून अभेदानें, **पश्यन्तः**-पहाणारे होतसाते, **महीं**-पृथ्वीवर, **व्यचरन्**-संचार करूं लागले. [हे परमहंस नऊ ऋषभपुत्र भगवद्रूप स्थूल-सूक्ष्म जगाला स्वात्मभूत पहात पृथ्वीवर संचार करूं लागले.] २२.

ते शरीरानें जरी वेगवेगळे नऊ या संख्येनें युक्त दिसत होते तरी भगवद्रूपानें एकच होते. या जगांतील संत व असंत अशा अनेक प्रकारच्या लोकांना आपणांसह एकत्वानें पहात होते. ८४ कारण त्यांना असाधुत्व तर कोठें उरलेंच नव्हतें. आणि सर्व चिन्मय झाल्यामुळें संत म्हणावयास अवश्य असलेला जो भेद तो प्रतीत होत नव्हता. ८५ त्यांच्या दृष्टीनें हें जगत् भगवंतानें भरलेलें होतें. त्यामुळें ते स्वतःहि भगवंताहून वेगळे नव्हते. ते पूर्णपणें भगवद्रूप झाले. तथापि त्यांची मनुष्याकार शरीरें व्यक्त दिसत होतीं. ८६ त्यांनीं सर्व त्रिपुटी भगवद्रूप करून सोडिल्या होत्या आणि अशा निर्विकल्प स्वरूपानें ते पृथ्वीवर संचार करीत होते. १८७.

अव्याहतेष्टगतयः सुरसिद्धसाध्यगन्धर्वयक्षनरकिन्नरनागलोकान् ॥
मुक्ताश्चरन्ति मुनिचारणभूतनाथविद्याधरद्विजगवां भुवनानि कामम् ॥ २३ ॥

वैकुंठ कैलास सुरसिद्धस्थानें । सप्तपाताळादि गमनें । एवं श्लोकोक्त चवदा भुवनें । स्वइच्छा विचरणें कामनारहित ॥ ८८ ॥ त्यांसी जीवीं नाहीं विषयासक्ती । यालागीं खुंटेना त्यांची गती । इच्छामात्रें गमनशक्ती । सुखें विचरती निष्काम ॥ ८९ ॥

ते एकदा निमेः सत्रमुपजग्मुर्यदृच्छया । वितायमानमृषिभिरजनाभे महात्मनः ॥ २४ ॥

जेथें मनाचा प्रवेशु नाहीं । त्यांची पायवाट ते ठायीं । ऐसे स्वइच्छा विचरतां मही । आले ते पाहीं कर्मभूमीसी ॥ १९० ॥ मही विचरतां वितंड । पातले अजनाभखंड । तंव विदेहाचा याग प्रचंड । मीनले उदंड ऋषीश्वर ॥ ९१ ॥ याग वेदोक्तविधी निका । कुंडमंडप वेदिका । आवो साधोनि नेटका । विधानपीठिका अतिशुद्ध ॥ ९२ ॥ स्रक् स्रुवा त्रिसंधानें । विस्तारूनि परिस्तरणें । अखंड वसुधारा दंडाप्रमाणें । ऋषिमंडणें होम करिती ॥ ९३ ॥ होम होतां संपूर्ण । पूर्णाहुतिसमयीं जाण । येतां देखिले नवही जण । देदीप्यमान निजतेजें ॥ ९४ ॥

तान्दृष्ट्वा सूर्यसंकाशान्महाभागवतान्नृप । यजमानोऽग्नयो विप्राः सर्व एवोपतस्थिरे ॥ २५ ॥

अव्याहतेष्टगतयः–ज्यांची इष्ट गति कोठेंहि कुंठित झालेली नाहीं, **मुक्ताः**–असे मुक्त आर्षभ, **सुर–सिद्ध-साध्य-गंधर्व-यक्ष-नर-किन्नर-नागलोकान्**–देव, सिद्ध, साध्य, गंधर्व, यक्ष, मनुष्य, किन्नर व नाग यांच्या लोकांतून, **मुनि-चारण-भूतनाथ-विद्याधर-द्विज-गवां-भुवनानि**–मुनि, चारण, भूताधिपति, विद्याधर, द्विज व गायी यांच्या भुवनांतून, **कामं**–यथेष्ट, **चरन्ति**–संचार करीत असत. [ज्यांच्या अभीष्टगति कोठेंहि प्रतिबद्ध होत नसत, असे ते अनासक्त आर्षभ देवादिकांच्या लोकांतून व मुनि, चारण इत्यादिकांच्या भुवनांतून सर्वत्र यथेष्ट संचार करीत असत.] २३.

वैकुंठ, कैलास, देव, सिद्ध, इत्यादिकांचीं स्थानें, सप्तपातालादि, तात्पर्य श्लोकांत सांगितलेल्या चौदा भुवनांतून ते स्वेच्छेनें विहार करीत असत. ते स्वतः सर्व कामनाशून्य होते. ८८ त्यांच्या ठिकाणीं विषयासक्ति नसल्यामुळें त्यांची गति कोठेंहि कुंठित होत नसे. केवळ इच्छेनेंच त्यांना वाटेल तेथें जाण्याचें सामर्थ्य असल्यामुळें ते अनायासानें सर्वत्र संचार करीत असत. १८९.

एकदा–एकदां, **ते**–ते आर्षभ, **अजनाभे**–भारतवर्षांत, **महात्मनः निमेः**–महात्म्या निमिकुलोत्पन्न जनक राजाच्या, **ऋषिभिः**–ऋषींकडून, **वितायमानं**–अनुष्ठान केल्या जाणाऱ्या, **सत्रं**–यागास, **यदृच्छया**–सहज, **उपजग्मुः**–आले. [एकदां ते नव परमहंस आर्षभ भारतवर्षांत चालू असलेल्या महात्म्या निमिवंशज जनक राजाच्या सत्रांत सहज प्राप्त झाले.] २४.

जेथें मनाचाहि प्रवेश होत नाहीं, तेथें यांना सहज जातां येत असे. याप्रमाणें पृथ्वीवर स्वेच्छेनें संचार करीत असतांना एकदां ते या कर्मभूमीस प्राप्त झाले. १९० ही पृथ्वी अफाट आहे. तींत संचार करीत असतां एकदां यदृच्छेनें ते अजनाभखंडास आले. तेथें निमिराजाचा प्रचंड याग सुरू होता. त्यांत अनेक ऋषीश्वर जमले होते. ९१ तो याग वेदोक्त विधीनें उत्तमप्रकारें चालला होता. कुंड, मंडप, मुख्य देवतेसाठीं वेदि, दिशासाधन, अनुष्ठानाची पीठिका इत्यादि सर्व यथाशास्त्र संपादन केलें होतें. ९२ स्रुक्, स्रुवा, इत्यादि यज्ञपात्रें, शुल्कादि रज्जु, परिस्तरणें इत्यादिकांचें यथाशास्त्र आसादन–पात्रादिकांची मांडणी केली होती. यागसमाप्तीनंतर ऋषिमंडळ अखंड वसुधारेचा होम करीत होतें. ९३ तो होम समाप्त होऊन पूर्णाहुति देण्याच्या वेळीं आपल्या तेजानें देदिप्यमान होणारे हे नऊहि आर्षभ येत असलेले दिसले. १९४.

नृप–हे राजा, **सूर्यसंकाशान् महाभागवतान्**–सूर्यासारख्या त्या महाभागवतांस, **दृष्ट्वा**–पाहून, **यजमानः**–यजमान राजा, **अग्नयः**–आहवनीयादि अग्नि, **विप्राः**–ऋत्विजादि ब्राह्मण, **सर्वे एव**–हे सर्वच, **उपतस्थिरे**–उभे राहिले. [ते सूर्यासारखे तेजस्वी महाभगवद्भक्त आर्षभ आलेले पाहून यजमानादि सर्वांनीं त्यांस उत्थापन दिलें.] २५.

अमित सूर्यांचिया कोटी। हारपती नखतेजांगुष्ठीं। तो भगवंत जिहीं धरिला पोटीं। त्यांची तेजाची गोष्टी अलोलिक ॥ ९५ ॥ त्यांचिया अंगप्रभा। सूर्य लोपताहे उभा। जिहीं प्रभेसी आणिली शोभा। चैतन्यगाभा साकार ॥ ९६ ॥ ते भगवद्भाववैभव। भगवंताचें निजगौरव। भक्तीचे भाग जे नव। ते जाणा सर्व मूर्तिमंत ॥ ९७ ॥ नवखंड पृथ्वीचे अलंकार। नवनिधींचें निजसार। नवरत्नांचेंही निजभांडार। तें हे साकार नवही जण ॥ ९८ ॥ कीं ते नवही नारायण। स्वयें प्रगटले आपण। नवही नृसिंह जाण। देदीप्यमान पैं आले ॥ ९९ ॥ आव्हानिले तीन्ही अग्नी। उभे ठेले त्यांतें देखोनी। ते हे भागवतीं देखिले नयनीं। इतरांलागुनी दिसेना ॥ २०० ॥ येतां देखोनि तेजोमूर्ती। ऋत्विज आचार्य उभे ठाकती। साउमा धांवे विदेह नृपती। स्वानंदवृत्ती सन्मानी ॥ १ ॥ सवेग घाली लोटांगण। मुगुट काढोनि आपण। मस्तकीं वंदूनियां चरण। पूर्ण आदरें जाण आणितां जाला ॥ २ ॥

विदेहस्तानभिप्रेत्य नारायणपरायणान्। प्रीतः संपूजयांचक्र आसनस्थान्यथार्हतः ॥ २६ ॥

त्यांतें जाणोनियां भगवत्पर। विदेहा आल्हाद थोर। त्यांचे पूजेसी अत्यादर। स्वयें सादर पैं जाला ॥ ३ ॥ श्रद्धायुक्त चरणक्षालन। धूप दीप सुमन चंदन। पूजा मधुपर्कविधान। केलें संपूर्ण यथायोग्य ॥ ४ ॥

तान्रोचमानान्स्वरुचा ब्रह्मपुत्रोपमान्नव। पप्रच्छ परमप्रीतः प्रश्रयावनतो नृपः ॥ २७ ॥

निजांगींच्या निजप्रभा। अंगासी आणिली शोभा। काय ब्रह्मविद्येचा गाभा। शोभे नवप्रभा शोभायमान ॥५॥ निजहृदयींचें ब्रह्मज्ञान। परिपाकें प्रकाशलें पूर्ण। तेंचि निजांगामंडण। इतर भूषण त्यां

ज्याच्या नखांच्या तेजापुढें कोट्यवधि सूर्य लोपून जातात, त्या भगवंताला ज्यांनीं आपल्या हृदयांत धारण केलें त्यांच्या तेजाचा महिमा काय सांगावा ? ९५ त्यांच्या अंगकांतीपुढें साक्षात् सूर्यहि लोपून जात होता. त्यांनीं प्रभेला शोभा आणली होती. ९६ ते नऊ आर्षभ म्हणजे मूर्तिमंत चैतन्याचा गाभाच होते. ते भगवद्भावाचें वैभव, भगवंताचे खास गौरव, ९७ नवखंड पृथ्वीचे अलंकार, नवनिधींचें सार, नवरत्नांचें भांडार किंबहुना ९८ ते नऊजण स्वतः नारायणच प्रकट झाले होते. असे ते नऊ देदिप्यमान नरसिंह आलेले पाहून ९९ आहवनीय, दक्षिण व गार्हपत्य या तीन अग्नींनीं त्यांना उत्थापन दिलें, पण त्या भगवद्भक्तांनाच हे अग्नि दिसले. इतरांना दिसले नाहींत. २०० त्या तेजोमूर्तींना येतांना पाहून ऋत्विज व आचार्य उभे राहिले. विदेह देशाचा राजा निमी त्यांना त्वरेनें सामोरा गेला. त्यानें अतिशय संतुष्ट होऊन त्यांचा सन्मान केला. २०१ मस्तकावरील मुकुट काढून त्वरेनें त्यांच्यापुढें लोटांगण घातलें आणि अत्यादरानें त्यांना यज्ञमंडपांत आणिलें. २०२.

विदेहः—विदेह देशाचा राजा, **आसनस्तान्**—आसनावर बसलेल्या, **तान्**—त्या आर्षभांना, **नारायणपरायणान्**—भगवत्परायण, **अभिप्रेत्य**—जाणून, **प्रीतः**—संतुष्ट होऊन, **यथार्हतः**—योग्यतेप्रमाणें, **संपूजयांचक्रे**—पूजा करिता झाला. [विदेह राजानें आसनावर बसलेल्या त्या आर्षभांना नारायणपरायण जाणून संतुष्ट चित्तानें त्यांच्या योग्यतेप्रमाणें पूजा केली.] २६.

ते आर्षभ भगवत्परायण आहेत हें जाणून विदेह देशाच्या राजाला फार आनंद वाटला, आणि मोठ्या आदरानें त्यांची पूजा करण्यास स्वतः तो तयार झाला. ३ त्यानें श्रद्धेनें त्यांचे चरण धुतले व चंदन, पुष्प, धूप, दीप-मधुपर्क इत्यादि उपचारांनीं त्यांची यथाविधि पूजा केली. २०४.

परमप्रीतः प्रश्रयावनतः नृपः— अत्यंत संतुष्ट व विनयानें नम्र झालेला राजा, **स्वरुचा रोचमानान्**—आपल्या अंगकांतीनें प्रकाशमान होणाऱ्या, **ब्रह्मपुत्रोपमान्**—ब्रह्मदेवाच्या सनकादि पुत्रासारख्या, **तान् नव**—त्या नव आर्षभांस, **पप्रच्छ**—असें विचारता झाला. [नंतर त्या अत्यंत संतुष्ट झालेल्या नम्र राजानें आपल्या अंगकांतीनें सुशोभित झालेल्या-अलंकारादिकांच्या प्रकाशानें नव्हे—सनत्कुमारादि ब्रह्मपुत्रांची ज्यांना उपमा आहे अशा त्या नऊ आर्षभांस असा प्रश्न केला.] २७.

त्या आर्षभांच्या ब्रह्मविद्याप्रकाशानें त्यांच्या शरिरांना भूषित केलें होतें, त्यामुळें त्यांच्या त्या स्वाभाविक शोभेचें काय वर्णन करावें ! ५ त्यांच्या हृदयांतील ब्रह्मज्ञान परिपक्व होऊन बाहेर प्रकट झालें होतें. त्यांचें तेंच भूषण

नाहीं ॥ ६ ॥ मुगुट कुंडलें कंकण । मूर्खाअंगीं बाणलीं पूर्ण । ते शोभा लोपूनि मूर्खपण । बाहेर संपूर्ण प्रकाशे ॥७॥ तैसे नव्हती हे ज्ञानघन । ब्रह्मपूर्णत्वें विराजमान । तेंचि त्यांसी निजांगामंडण । इतर भूषण त्यां नाहीं ॥ ८ ॥ ब्रह्मानुभवें पूर्णत्व पूर्ण । इंद्रियद्वारा विराजमान । तें त्यासी निजशांतिभूषण । मुगुट कंकण तें तुच्छ ॥ ९ ॥ मागां वाखाणिले सनकादिक । त्यांसमान कीं हे अधिक । ऐसा विचारितां परिपाक । त्यां यां वेगळीक दिसेना ॥ २१० ॥ त्यांची यांची एक गती । त्यांची यांची एक स्थिती । त्यांची यांची एक शांती । भेदु निश्चितीं असेना ॥ ११ ॥ त्यांच्याऐसे हे सखे बंधू । त्यांच्याऐसा समान बोधू । त्यांच्याऐसा हा अनुवादु । सवर्था भेदु असेना ॥ १२ ॥ ते चौघे हे नवजण । अवघ्यां एकचि ब्रह्मज्ञान । त्यांची यांची शांति समान । हें विदेहासी पूर्ण कळूं सरलें ॥ १३ ॥ ऐसें परिपूर्णत्व जाणोनी । राजा सुखावे स्थिति देखोनी । मग अतिविनीत होऊनी । मृदु मंजुळ वचनीं विनवीत ॥ १४ ॥

वि० उ०–मन्ये भगवतः साक्षात्पार्षदान्वो मधुद्विषः । विष्णोर्भूतानि लोकानां पावनाय चरन्ति हि ॥ २८ ॥

सार्वभौम चक्रवर्ती । देहीं असोनि विदेहस्थिती । तो जनक आर्षभांप्रती । अतिप्रीतीं विनवितु ॥ १५ ॥ त्यांच्या भेटीसवें उलथलें सुख । विदेहासी देहेंविण हरिख । तेणें हरिखेंकरूनियां देख । प्रीतिपूर्वक विनवितु ॥ १६ ॥ तुमचें सामर्थ्य पाहतां येथ । तुम्ही ईश्वररूप समस्त । देहभावें तरी भगवद्भक्त । जैसे पार्षद हरीचे ॥१७॥ देवो आपुला आपण भक्तू । ऐसा जो कां उपनिषदर्थू । तो

होतें. दुसरें कोणतेंहि नाहीं. ६ मूर्खाच्या अंगावर मुकुट, कुंडलें, कंकण इत्यादि भूषणें असतात. पण त्यांच्या शोभेला लोपवून त्यांचें मूर्खपण बाहेर प्रकट होतें. ७ पण यांची स्थिति त्याहून अगदीं भिन्न होती. हे स्वतः ज्ञानरूप होते. ब्रह्माच्या पूर्णत्वानें ते विराजमान होत होते. त्यांच्या शरीराचें भूषण तेंच होय. ८ ब्रह्मसाक्षात्कारानें त्यांना प्राप्त झालेलें पूर्णत्व इंद्रियांच्या द्वारां शांतिरूपानें प्रकट झालें असून तेंच त्यांचें खरें भूषण होतें. त्यापुढें मुकुटादि इतर भूषणें तुच्छ होत. ९ पूर्वीं आम्हीं सनकादिकांचें वर्णन केलें आहे. पृ. १५ हे त्यांच्या सारखेच आहेत कीं त्याहून अधिक आहेत असा त्या दोघांच्या ज्ञानपरिपाकाच्या दृष्टीनें विचार करूं लागलें असतां त्यांच्यांत कांहींच भेद दिसला नाहीं. २१० सनकादिक व हे आर्षभ यांची गति, स्थिति व शांति एकरूप होती. त्यामुळें त्यांच्यांत भेद मुळींच नव्हता. ११ त्यांच्यासारखेच हे सखे भाऊ होते. त्यांच्याप्रमाणें यांचा अनुभव होता, त्यांचा व यांचा प्रतिपाद्य विषयहि समान होता, १२ ते चौघे होते, हे नऊजण होते. तथापि त्या सर्वांचें ब्रह्मज्ञान एकसारखेच होतें आणि शांतिहि समान होती, हें विदेह राजाला पूर्णपणें कळून चुकलें होतें. १३ त्यांचें हें परिपूर्णत्व जाणून व त्यांची स्थिति प्रत्यक्ष पाहून राजाला अत्यंत आनंद झाला आणि तो अतिशय नम्र होऊन मृदु व मंजुळ शब्दानें त्यांस असें बोलला. २१४.

—पुढील दोन श्लोकांनीं राजा त्यांच्या दर्शनानें झालेला आनंद परमप्रीतीनें व्यक्त करितो...

विदेहः उवाच–विदेह राजा बोलला. **वः**–तुम्हांला, **भगवतः मधुद्विषः**-भगवान् मधुसूदनाचे, **साक्षात् पार्षदान्**–प्रत्यक्ष अनुचर किंवा सभासद, **मन्ये**–मी समजतों, **हि**–कारण, **विष्णोः भूतानि**–विष्णूचे भक्त, **लोकानां पावनाय**–लोकांना पावन करण्यासाठीं, **चरन्ति**–संचार करीत असतात. [आपण भगवानाचे प्रत्यक्ष सभासद आहां असें मी समजतों. कारण आपल्यासारखे विष्णुभक्त लोकांचा उध्दार करण्यासाठींच सर्वत्र संचार करीत असतात.] २८.

सार्वभौम चक्रवर्ती जनक देहांत असून विदेह स्थितीचा अनुभव घेत होता. तो आर्षभांना मोठ्या प्रीतीनें विनंति करूं लागला. १५ त्यांची भेट होतांच जनकाच्या सुखाला भरतें आलें. विदेहाला देहसंबंधावांचून हर्ष झाला आणि त्या हर्षामुळें तो मोठ्या प्रेमानें असें विनवूं लागला. १६ " तुमचें सामर्थ्य पाहिलें असतां तुम्ही सर्वसाक्षात् ईश्वररूप आहां. पण हरीच्या पार्षदांप्रमाणें तुम्ही देहभावानें भगवद्भक्त आहां. १७ देव आपणच आपला

साच करूनि वेदार्थू । निजपरमार्थू अनुभवा ॥१८॥ शिव होऊनि शिवु याजिजे । हें लक्षण तुम्हांसीच साजे । येरीं हे बोलचि बोलिजे । परी बोलते बोजे अर्थ न लभे ॥१९॥ विष्णूनें सृष्टीं जें जें सृजणें । तें तें तुम्हीं पवित्र करणें । मही विचरायाचीं कारणें । कृपाळूपणें दीनोद्धारा ॥ २२० ॥ तुम्ही विचरा विश्वकणवा परी भेटी होय प्राप्त तेव्हां । आजि लाधलों तुमची सेवा । उद्भट दैवा आथिलों मी ॥ २१ ॥ आजि माझें धन्य दैव । आजि माझें धन्य वैभव । आजि धन्य मी सर्वी सर्व । हे चरण अपूर्व पावलों ॥ २२ ॥

दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभङ्गुरः । तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुण्ठप्रियदर्शनम् ॥ २९ ॥

सकल देहांमाजीं पहाहो । अतिदुर्लभ मनुष्यदेहो । त्याचिया प्राप्तीचा संभवो । तो अभिप्रावो अतिदुर्गम ॥ २३ ॥ सुकृतदुष्कृत समान समीं । तैं पाविजे कर्मभूमी । तेंचि जैं पडे विषमीं । तैं स्वर्गगामी कां नरकीं ॥ २४ ॥ समान कर्मी नरदेह जोडे । तरी समस्तां समबुद्धि न घडे । त्या समांमाजी विषम गाढें । जेणें पडे तें ऐका ॥ २५ ॥ पापाचा एकु महाचिरा । पुण्यें जोखणीं चाराचुरा । समान आलिया तुळाभारा । येणें जन्में नरा दृढ पापबुद्धी ॥२६॥ वाळू आणि सुवर्ण । जोखितां झाल्याही समान । सोनियालागीं वेंचिती धन । वाळू ते जाण न घेती फुकट ॥२७॥ एकाचें पुण्य अत्यंत थोर । पाप लहानसहान एकत्र । करूनि जोखितां तुळाभार । समान साचार जैं होय ॥२८॥ ऐसेनि कर्मे जे जन्मती । त्यांसी पुण्या-

भक्त आहे असा जो उपनिषदांचा सिद्धान्त तोच वेदार्थ तुम्हीं आपल्या स्वानुभवानें खरा करून दाखविला आहे.१८ 'शिव होऊन शिवाचें पूजन करावें ' हें लक्षण तुम्हांलाच शोभतें. बाकीच्यांनीं नुस्ते शब्द बोलावे. १९ विष्णूनें सृष्टींत जें जें उत्पन्न करावें त्याला त्याला पवित्र करण्याच्या उद्देशानेंच तुम्ही पृथ्वीवर संसार करतां. केवळ दीनांचा कृपाळूपणें उद्धार करणें हेंच तुमच्या संचाराचें कारण आहे. २२० तुम्ही सर्व जनांवर कृपा करण्यासाठींच जरी असे संचार करीत असलां तरी जेव्हां जीवाच्या भाग्याचा उदय होतो तेव्हांच तुमची भेट होते. आज तुमची सेवा लाधली, त्यामुळें खरोखरच मी आज श्रेष्ठ भाग्यानें संपन्न झालों आहें. २१ हे कधीं न दिसणारे चरण मला दिसले त्या अर्थी मी धन्य आहें. माझें दैव, माझें वैभव, किंबहुना माझें सर्वस्व आज कृतार्थ झालें. " २२२.

—मी महा भाग्यवान् आहे म्हणूनच मला आज हें दुर्लभ दर्शन झालें असें विदेहराजा सांगतो—

देहिनां—जीवांना, **क्षणभङ्गुरः मानुषः देहः**—क्षणभंगुर मनुष्यदेह, **दुर्लभः**—दुर्लभ आहे, **तत्रापि**—त्या मनुष्य देहांतहि, **वैकुंठप्रियदर्शनं**—ज्यांना वैकुंठ म्ह० भगवान विष्णु प्रिय आहे त्यांचें दर्शन, **दुर्लभं**—अत्यंत दुर्लभ आहे, **मन्ये**—असें मी समजतों. [ज्यांना अनेक देह प्राप्त होतात ते देही म्ह० जीव. त्यांना क्षणभंगुर असलेला मनुष्यजन्महि दुर्लभ आहे; कारण तो परम पुरुषार्थाचें साधन आहे. पण त्या तसल्या मनुष्य जन्मांतहि भगवान् ज्यांना प्रिय आहे, किंवा भगवानाला जे प्रिय आहेत अशा भक्तांचें दर्शन त्याहूनहि दुर्लभ आहे.] २९.

सर्व देहांमध्यें मनुष्यदेह अति दुर्लभ आहे. पुण्य व पाप हीं जेव्हां समसमान असतात तेव्हां या देहाची प्राप्ति होते. २३ पण तें पापपुण्याचें प्रमाण जेव्हां विषम असतें, तेव्हां पुण्याधिक्य पक्षीं स्वर्ग व पापाधिक्य पक्षीं नरक-प्राप्ति होते. २४ पुण्यपापांचें प्रमाण सारखें असलें म्हणजे नरदेह जरी मिळत असला तरी सर्वच मानवांची बुद्धि सारखी नसते. पण त्या समपुण्यपापामध्यें असें विषमत्व कोणत्या कारणानें येतें, तें ऐका. २५ पापाचा एक फार मोठा दगड आहे. त्याच्याशीं जोखण्यासाठीं पुष्कळसा पुण्याचा चाराचुरा घातला आणि त्या दोहोंचा भार सारखा झाला. अशा पुण्यपापांच्या भारानें जेव्हां मनुष्यजन्म मिळतो तेव्हां त्याची पापबुद्धि दृढ असते. २६ तागडींत एकीकडे सोनें व दुसरीकडे वाळू घालून जोखल्यास त्या दोहोंचा भार समसमान होतो. पण त्यांतील सोनें घेण्यासाठीं लोक धन खर्च करितात. आणि वाळू फुकट दिली तरी घेत नाहींत. २७ याच्या उलट एकाचें पुण्य फार मोठें आहे. आणि लहानसहान पापाची भर घालून त्यांचें प्रमाण सारखें झालें आणि त्याला मनुष्यजन्म मिळाला. २८ अशा पुण्य-पापांच्या साम्यानें ज्याला मनुष्यजन्म मिळतो त्याची पुण्यावर मोठी प्रीति असते. पुण्य व पाप या दोहोंचीहि जेव्हां

वरी अति प्रीती । पुण्य पाप दोनी झडती । तैं नित्यमुक्ती पाविजे ॥ २९ ॥ अतिसूक्ष्म ऐशा संकटीं । मनुष्यदेहीं होय भेटी । तेथेंही अभिमान अति उठी । धन दारा दिठी विषयांच्या ॥ २३० ॥ मनुष्य-देहींचेनि आयुष्यें । विषयी सायास करिती कैसे । अमृत देऊनि घे जैसें । तान्हे सावकाशें मृगजळ ॥ ३१ ॥ गंधर्वनगरींची ठाणीं । घेतलीं देऊनि चिंतामणी । तैसी लटिकियालागीं आटणी । विषयसाधनीं नरदेहा ॥ ३२ ॥ तोडूनि कल्पतरूंचें उद्यान । सायासीं तें वाहोनि रान । तेथें साक्षेपें पेरिली जाण । आणूनि आपण विजया जैसी ॥ ३३ ॥ तैसें नरदेहा येऊनि नरा । करिती आयुष्याचा मातेरा । पूर्ण व्यवसावो शिश्नोदरां । उपहास निद्रा कां निंदा ॥ ३४ ॥ नित्य प्रपंचाची कटकट । सदा विषयांची खटपट । कदा आरायिल्या चोखट । स्वेच्छा सारीपाट खेळणें ॥ ३५ ॥ नाना विनोद टवाळी । नित्य विषयांची वाचाळी । त्यासी जपतां रामनामावळी । पडे दांतखिळी असंभाव्य ॥ ३६ ॥ घरा आली कामधेनू । दवडिती न पोसवे म्हणूनू । तेवीं श्रीरामनाम नुच्चारूनू । नाडला नरू नरदेहीं ॥ ३७ ॥ करितां नरदेहीं अलंकार । तंव तो देहचि क्षणभंगुर । देहीं देहवंता भाग्य थोर । जैं भगवत्पर भेटती ॥ ३८ ॥ ज्यांसी भगवद्भक्तीची अति गोडी । त्यांवरी भगवंताची आवडी । त्यांस भेटी होय रोकडी । जैं पुण्याच्या कोडी तिष्ठती ॥ ३९ ॥ ज्यांचिया आवडीच्या लोभा । भगवंतू पालटें आला गर्भा । दशावतारांची शोभा । जाहली पद्मनाभा ज्यांचेनी ॥२४०॥ ऐसे कृष्णकृपा-समारंभें । जे भगवंताचे वालभें । त्यांची भेटी तैंचि लाभे । जैं भाग्यें सुलभें पैं होती ॥ ४१ ॥ निष्कामता निजदृष्टी । अनंत पुण्यकोट्यानकोटी । रोकड्या लाभती पाठोवाठीं । तैं होय भेटी हरिप्रियांची ॥ ४२ ॥

सर्वथा निवृति होते, तेव्हां नित्य मुक्ति लाधते. २९ अशा अति सूक्ष्म, सूक्ष्मतर संकटांतून सुटतां सुटतां केव्हां तरी एकदां मनुष्यजन्म मिळतो. पण त्यांतहि भयंकर अभिमान उठतो. धन, स्त्री, पुत्र, आणि इतर विषय यांवरील अभिनिवेश अधिक वाढतो. २३० मनुष्येदहाचें जेवढें आयुष्य आहे, तें सर्व कामीजन विषयसंपादनार्थ कष्ट करण्यांत कसें घालवितात हें प्रसिद्धच आहे. एखाद्या तृषेनें व्याकुळ झालेल्या मनुष्यानें मिळालेलें अमृत देऊन मृगजळ जसें घ्यावें ३१ व त्या मृगजळानें तृषा शांत करण्याची जशी इच्छा करावी, तसेंच हे विषयीजन करितात. ज्याप्रमाणें चिंतामणी देऊन गंधर्वनगरांतील ठाणीं घ्यावी, ३२ किंवा कल्पतरूंचें उद्यान मोठ्या कष्टानें तोडून व त्याला दूर टाकून देऊन मोठ्या अभिनिवेशानें त्याच्या जागीं भांग पेरावी ३३ त्याप्रमाणें जीव नरदेहास येऊन आपल्या आयुष्याचें मातेरें करितात. ते इंद्रियांची तृप्ति हाच एक व्यवसाय आयुष्यभर करितात. कोणाचा उपहास कर, कोणाची निंदा कर, किंवा स्वस्थ झोंपून रहा, यांत ते आपल्या कालाचा अपव्यय करितात. ३४ त्यांच्या प्रपंचाची कटकट व विषयांची खटपट सारखी चाललेली असते. सुदैवानें एखादे वेळीं अवकाश मिळाल्यास खुशाल सोंगट्या खेळत बसतात. ३५ त्यांत विनोद, टवाळी, विषयांची वायफळ वटवट इत्यादि सर्व चालतें. पण रामनामाचा जप करण्याची वेळ आली असतां त्यांची न भूतो न भविष्यति अशी दांताखिळी बसते. ३६ घरीं कामधेनु चालून यावी व आपल्याच्यानें तिला पोसवणार नाहीं म्हणून तिला जसें घालवून द्यावें, त्याप्रमाणें हा जीव रामनामाचा उच्चार न करतां या नरदेहांत जणुंकाय कष्टी होतो. ३७ नरदेहावर अहंकार ठेवावा तर तो देहच मुळीं क्षणभंगुर. देहवानाला जेव्हां भगवद्भक्त भेटतात तेव्हां त्यांच्या देहांत थोर भाग्याचा उदय होतो. ३८ ज्याला भगवद्भक्तीची अतिशय गोडी असते त्याची भगवंतालाहि आवड असते. हजारों पुण्याच्या राशी जेव्हां फलोन्मुख होतात, तेव्हां त्याचें प्रत्यक्ष दर्शन होतें. ३९ भक्तांच्या लोभानेंच भगवानानें अनेक अवतार घेतले. त्या पद्मनाभाला दशावतारांची शोभा भक्तांमुळेंच आली. २४० याप्रमाणें जे भगवंताचे लाडके व श्रीकृष्णकृपेस पात्र झालेले भगवद्भक्त ते मोठ्या भाग्यानेंच सुलभ होतात व त्यांची भेट होते. ४१ हरिभक्तांची भेट होणें हें पुण्यांच्या कोट्यानुकोटि फलोन्मुख झाल्यावांचून शक्य नाहीं. ४२ व्याघ्र, सिंह यांचें दूध, चंद्रांतील अमृत इत्यादि अलभ्य पदार्थहि हातीं

व्याघ्रसिंहांचें दूध जोडे। चंद्रामृतही हाता चढे। परी हरिप्रियांची भेटी नातुडे। दुर्लभ भाग्य गाढें मनुष्यां ॥ ४३ ॥ व्याघ्रसिंहदुधासाठीं। अतिसबळता जोडे पुष्टी। परी जन्ममरणांची तुटी। दुधासाठीं कदा नव्हे ॥ ४४ ॥ म्हणती चंद्रामृत जो आरोगी। तो होय नित्य निरोगी। मुख्य चंद्रचि क्षयरोगी। त्याचें अमृत निरोगी करी केवीं ॥ ४५ ॥ व्याघ्रसिंहदुग्धशक्ती। प्राणी जैं अजरामर होती। तैं तेणें दुग्धें ज्यांची उत्पत्ती। ते कां मरती व्याघ्रसिंह ॥४६॥ जैं हरिभक्तांची भेटी घडे। तैं न बाधी संसारसांकडें। जन्ममरण समूळ उडे। त्यांची भेटी आतुडे अतिभाग्यें ॥ ४७ ॥ आजि मी भाग्यें सभाग्य पूर्ण। लाधलों तुमचें दर्शन। तरी 'आत्यंतिक क्षेम' कोण। तें कृपा करून मज सांगा ॥ ४८ ॥

अत आत्यन्तिकं क्षेमं पृच्छामो भवतोऽनघाः। संसारेऽस्मिन्क्षणार्धोऽपि सत्सङ्गः शेवधिर्नृणाम् ॥३०॥

म्हणों तुम्ही निष्पाप निर्मळ। तंव तुमचेनि दर्शनें तत्काळ। नासती सकळ कलिमळ। ऐसे निजनिर्मळ तुम्ही सर्व ॥ ४९ ॥ स्नान केलिया गंगा। पवित्र करी सकळ जगा। ते गंगाही निजपाप-भंगा। तुमचे चरणसंगा वांछित ॥ २५० ॥ तुमची दर्शनसंगचिद्‌गंगा। अत्यंत दाटुगी माजीं जगा। दर्शनमात्रें ने भवभंगा। जन्ममरण पैं गा मग कैंचें ॥ ५१ ॥ तेथें कायसा गंगेचा पडिपाडु। नाहीं तीर्थ-महिमेसी पवाडु। तीर्थां भवदोष अवघडु। त्यांचा करी निवाडू दृष्टिसंगें ॥ ५२ ॥ ऐशी पवित्रता प्रबळ। दृष्टिउत्संगीं वाढवा सकळ। आजि जालों मी अतिनिर्मळ। तुम्ही दीनदयाळ भेटलेती ॥ ५३ ॥ ऐसे पवित्र आणि कृपामूर्ती। भाग्यें लाधलों हे संगती। सत्संगाची निजख्याती। सांगतां श्रुति मौनावल्या ॥ ५४ ॥ ब्रह्म निर्धर्म नेणे निजधर्मा। साधुमुखें ब्रह्मत्व ये ब्रह्मा। त्या सत्संगाचा महिमा। अतिगरिमा

लागतील, पण मनुष्याला भाग्योदयावांचून हरिभक्तांची भेट होणार नाहीं. ४३ व्याघ्र, सिंह यांच्या दुधानें शरीर पुष्ट व सबळ होतें, पण त्यानें जन्ममरणपरंपरा तुटत नाहीं. ४४ जो चंद्रांतील अमृत प्राशन करितो, तो नित्य निरोगी होतो, असें म्हणतात. पण स्वतः चंद्र जर क्षयरोगी आहे, तर त्याचें अमृत कसें निरोगी करणार ! ४५ व्याघ्रादिकांच्या दुधानें जर प्राणी अजरामर झाले असते तर त्यांच्याच दुधावर पोसलेले व्याघ्रसिंहादिक कां मेले असते ! ४६ हरिभक्तांची जेव्हां महद्‌भाग्यानें भेट होते तेव्हां जीवाला संसारदुःख होत नाहीं. जन्ममरणाचा समूळ उच्छेद होतो. ४७ आज मी खरोखरच मोठा भाग्यवान झालों. कारण मला आपलें दर्शन झालें, म्हणून आतां आत्यंतिक क्षेम काय आहे तें मला कृपाकरून सांगा. २४८.

अतः—म्हणून, हे **अनघाः**—अहो, निष्पाप भगवद्भक्त हो, आम्ही, **भवतः**— आपल्याला, **आत्यंतिकं क्षेमं**—आत्यंतिक क्षेम, **पृच्छामः**—विचारतों. कारण, **अस्मिन् संसारे**—या संसारांत, **क्षणार्धः अपि सत्सङ्गः**— एक क्षणभर घडलेलाहि सत्संग, **नृण**—मनुष्यांचा, **शेवधिः**—निधि आहे. [अहो पवित्र भगवद्भक्तहो, मी तुम्हांला नित्य क्षेमाचें म्ह० मोक्षाचें साधन विचारतों. कारण एक क्षणभरहि झालेला सत्संग मनुष्यांच्या परम संतोषाला कारण होतो. लौकिक निधीचा लाभ झाला असतां जसा परम आनंद होतो, तसाच सत्संगामध्येंहि परम आल्हाद होत असतो.] ३०.

तुम्ही निष्पाप निर्मल आहां. तुमच्या दर्शनानें सर्व कलिमल नाश पावतात. ४९ गंगेमध्यें स्नान केलें असतां जी सर्व जगाला पवित्र करिते, तीच आपल्या पापाचा नाश होण्यासाठीं पुनः तुमच्या चरणसंगाची इच्छा करिते. २५० अर्थात् तुमचें दर्शन व संग हीच चिद्‌गंगा या जगांत अत्यंत समर्थ आहे. तिचें दर्शन होतांच ती संसाराचा उच्छेद करते. मग जन्ममरण कोठचें ? ५१ आणि या गंगेपुढें लौकिक गंगा किंवा इतर तीर्थें यांचें काय महत्त्व आहे ? ५२ अशी विलक्षण पवित्रता तुमच्या ठिकाणीं आहे. तुमच्या दर्शनानें मी आज पावन झालों. ५३ मोठ्या भाग्यानेंच मला तुमची संगति लाधली. सत्संगाचें महत्त्व वर्णन करतांना श्रुतीहि मुक्या झाल्या. ५४ ब्रह्म स्वतः सर्वधर्मशून्य आहे; तें आपल्या धर्माला जाणत नाहीं. साधूंच्या मुखानेंच ब्रह्माला ब्रह्मत्व येतें. अशा या सत्संगाचा महिमा सर्वथा अवर्णनीय आहे. त्याला उपमा नाहीं. ५५ सत्संगाला निधीची उपमा द्यावी तर जोडलेला निधि क्षय पावतो, त्याला

निरुपम ॥५५॥ सत्संग म्हणों निधीसमान । निधी जोडल्या हारपे जाण । सत्संगाचें महिमान । साधका संपूर्ण सद्रूप करी ॥ ५६ ॥ निधी सांपडलिया साङ्ग । अत्यंत वाढे विषयभोग । तैसा नव्हे जी सत्संग । निर्विषयें चांग सुखदाता ॥ ५७ ॥ इंद्रियांवीण स्वानंदू । विषयांवीण परमानंदू । ऐसा करिती निजबोधू । अगाध साधु निजमहिमा ॥ ५८ ॥ निमिषार्ध होतां सत्संग । तेणें संगें होय भवभंग । यालागीं सत्संगाचें भाग्य । साधक सभाग्य जाणती ॥ ५९ ॥ संतचरणीं ज्यांचा भावो । भावें तुष्टती संत स्वयमेवो । संतसन्निधिमात्रें पहाहो । संसार वावो स्वयें होय ॥ २६० ॥ नाना विकार विषयविधी । संसार सबळत्वें बाधी । त्या संसाराची अवधी । जाण त्रिशुद्धी सत्संग ॥ ६१ ॥ दीपाचिये संगप्राप्ती । निःशेष कापुरत्वाची शांती । तेवीं जाहलिया सत्संगती । संसारनिवृत्ती क्षणार्धें ॥ ६२ ॥ ते तुमची सत्संगती । भाग्यें पावलों अवचितीं । आत्यंतिक क्षेम कैशा रीती । प्राणी पावती तें सांगा ॥ ६३ ॥ आत्यंतिक क्षेमाचें वर्म । जरी म्हणाल भागवतधर्म । त्या धर्मांचा अनुक्रम । साङ्ग सुगम सांगा जी ॥ ६४ ॥

धर्मान्भागवतान्ब्रूत यदि नः श्रुतये क्षमम् । यैः प्रसन्नः प्रपन्नाय दास्यत्यात्मानमप्यजः ॥ ३१ ॥

परिसावया भागवतधर्मीं । श्रवणाधिकारी असों जरी आम्ही । तरी कृपा करूनि तुम्हीं । सांगावे स्वामी सकळ धर्म ॥ ६५ ॥ नवल या धर्मांची ख्याती । सप्रेम आदरितां प्रीती । तेणें तुष्टोनियां श्रीपती । दे सेवकां हातीं आपणिया ॥ ६६ ॥ अजन्मा या नामाची ख्याती । वेदशास्त्रीं मिरवी श्रीपती । तो भागवतधर्मांचिया प्रीती । सोशी जन्मपंक्ती भक्तांचिया ॥ ६७ ॥ एवं भागवतधर्मीं जाण । जो कोणी अनन्य शरण । त्यासी तुष्टोनियां नारायण । निजात्मता पूर्ण स्वयें देतु ॥ ६८ ॥

कोणी चोरून नेतात. पण सत्संग साधकांना सद्रूप करितो. ५६ निधि सर्व उपकरणांसह जरी सांपडला तरी त्यापासून विषयभोग वाढतात. पण सत्संगापासून विषयाविषयीं विरक्ति येते, त्यामुळें तो निर्विषयत्वानें सुख देणारा आहे. ५७ साधूंचा महिमा अगाध आहे. ते इंद्रियांवांचून स्वानंद व विषयावांचून परमानंद होईल असा बोध करितात. ५८ अर्धा क्षण जरी सत्संग घडला तरी संसारक्षय होतो. भाग्यवान् साधकच या सत्संगाचें महत्त्व जाणतात. ५९ संतचरणांवर ज्यांचा भाव असतो त्यांवर संत आपणच संतुष्ट होतात. केवळ संतांच्या सान्निध्यानेंच संसार मिथ्या ठरतो. २६० सत्संग हाच सर्व अनर्थाला कारण होणाऱ्या संसाराचा शेवट आहे. ६१ कापुराला दीपाची संगति लाधली कीं त्याची निःशेष शांति होते. त्याच न्यायानें सत्संगति घडतांच संसारनिवृत्ति होते. ६२ आज मोठ्या भाग्यानेंच मला तुमची संगति लाधली आहे. म्हणून प्राण्यांना आत्यंतिक क्षेम कोणत्या रीतीनें प्राप्त होईल तें सांगा. ६३ भागवत धर्म हेंच आत्यंतिक क्षेम म्हणजे निरतिशय सुखाचें साधन आहे, म्हणून म्हणाल तर, त्याच धर्माचा सांग व सुगम अनुक्रम सांगा. २६४.

यदि–जर, **नः**–आमच्या, **श्रुतये**-श्रवणास, **क्षमं**-योग्य असेल तर, **भागवतान् धर्मान्**-भागवत धर्मांना, **ब्रूत**–सांगा. **यैः**-ज्या धर्मांनीं, **प्रसन्नः**-प्रसन्न झालेला, **अजः**-हरि, **प्रपन्नाय**-शरण आलेल्याला, **आत्मानं अपि दास्यति**-स्वतःलाहि अर्पण करितो. [जर आम्ही भागवत धर्मश्रवणाचे अधिकारी आहों असें आपणांस वाटत असेल तर ज्या धर्मांनीं प्रसन्न झालेला परमात्मा भक्ताला स्वरूपाचेंहि समर्पण करितो ते भागवत धर्म आम्हांला सांगा.] ३१.

आम्ही भागवतधर्म श्रवण करण्यास योग्य आहों, असें जर तुम्हांला वाटत असेल तर कृपाकरून आम्हांला ते सर्व धर्म सांगा. ६५ या भागवतधर्मांची ख्याति मोठी विलक्षण आहे. त्या धर्मांचें प्रीतीनें व आदरानें आचरण केलें असतां संतुष्ट झालेला श्रीपति स्वतःलाच भक्तांच्या हातीं देतो. ६६ हा श्रीपति अजन्मा आहे, अशी त्याची वेदशास्त्रांत प्रसिद्धि आहे. पण तो भक्तांकरितां भागवतधर्मावरील प्रीतीनें अनेक जन्म घेतो. ६७ याप्रमाणें भागवतधर्मामध्यें जो अनन्य शरण झालेला असतो त्याला नारायण संतुष्ट होऊन निजात्मत्व देतो. ६८

भागवतधर्मश्रवणार्थ । मज अधिकारु जरी नसेल येथ । तरी मी अनन्य शरणागत । आणि तुम्ही समस्त कृपाळु ॥ ६९ ॥ भूतदयेचें निडारलेपण । तुमच्या ठायीं वोसंडे पूर्ण । तुम्ही दयानिधी संपूर्ण । दीनोद्धरण तुमचेनी ॥ २७० ॥ जेथ तुमची कृपा पूर्ण । तेथ न राहे जन्ममरण । सर्वाधिकार संपूर्ण सहज आपण वोळंगे ॥ ७१ ॥ तंव तुमचे कृपेपरतें । आन सामर्थ्य नाहीं येथें । ऐसें जाणोनियां निश्चितें । शरण तुम्हांतें मी आलों ॥ ७२ ॥ कायशी ज्ञातेपणाची लाज । येथें तुमचे कृपें माझें काज । ऐसे विदेहें प्रार्थूनि द्विज- । चरणरज वंदिले ॥ ७३ ॥ ऐकोनि विदेहाचा नम्र प्रश्न । संतोषले नवही जण । तेंचि श्रीमुखें नारद आपण । करी निरूपण वसुदेवा ॥ ७४ ॥

ना०उ०-एवं ते निमिना पृष्टा वसुदेव महत्तमाः । प्रतिपूज्याब्रुवन्प्रीत्या ससदस्यर्त्विजं नृपम् ॥ ३२ ॥

जो जगाची स्थितिगती जाणता । जो हरिहरांचा पढियंता । जो निजात्मज्ञानें पुरता । तो जाला बोलता नारद ॥ ७५ ॥ नारद म्हणे वसुदेवा । विदेहें प्रश्न केला बरवा । तेणें परमानंद तेव्हां । त्या महानुभावां उलथला ॥ ७६ ॥ संतोषोनि नवही मूर्ती । धन्य धन्य विदेहा म्हणती । ऋत्विजही सादर परमार्थी । सदस्य श्रवणार्थी अतितत्पर ॥ ७७ ॥ ऐसें देऊनि अनुमोदन । बोलते जाले नवही जण । तेचि कथेचें निजलक्षण । नव प्रश्न विदेहाचे ॥ ७८ ॥ 'भागवतधर्म', 'भगवद्भक्त' । 'माया' कैसी असे नांदत । तिचा 'तरणोपाव' येथ । केवीं पावत अज्ञानी ॥ ७९ ॥ येथ कैसें असे 'परब्रह्म' । कासया नांव म्हणिजे 'कर्म' । 'अवतारचरित्रसंख्या' परम । 'अभक्तां अधमगति' कैशी ॥ २८० ॥ 'कोणे युगीं कैसा धर्म' । सांगावा जी उत्तमोत्तम । ऐसे नव प्रश्न परम । जनक सवर्म पुसे ॥ ८१ ॥ ऐसे विदेहाचे प्रश्न । अनुक्रमें नवही जण । उत्तर देती आपण । तयांत प्रथम प्रश्न कवि सांगे ॥ ८२ ॥

मला भागवतधर्मश्रवणाचा अधिकार जर नसेल तर मी तुम्हांला शरण आलों आहें. तुम्ही सर्व कृपाळु आहां. ६९ तुमच्यामध्यें भूतदया परिपक्व झाली आहे. तुम्ही दयासागर आहां. तुमच्या कृपेनें दीनांचा उद्धार होतो. २७० ज्याच्यावर तुमची पूर्ण कृपा होते, त्याची जन्ममरणपरंपरा तुटते. त्याला सर्व अधिकार प्राप्त होतात. ७१ यास्तव तुमची कृपा हेंच परम सामर्थ्य आहे. असें जाणून मी तुम्हांला शरण आलों आहें. ७२ मला त्यांत माझ्या ज्ञातेपणाला लाज आणील असें कांहीं वाटत नाहीं. मला तुमच्या कृपेची गरज आहे." असें बोलून विदेहराजानें त्यांना वंदन केलें. ७३ त्याचा तो नम्र प्रश्न ऐकून ते नऊहि आर्षभ संतुष्ट झाले. हीच गोष्ट नारद आपल्या मुखानें वसुदेवास सांगत आहे. २७४.

नारदः उवाच—नारद म्हणाला, **वसुदेव**—हे वसुदेवा, **एवं**—याप्रमाणें, **निमिना पृष्टाः**—निमिराजाकडून विचारले गेलेले, **ते महत्तमाः**-ते श्रेष्ठ महात्मे, **ससदस्यर्त्विजं नृपं**-सभासद व ऋत्विज यांसह वर्तमान असलेल्या राजाचा, **प्रीत्या**-प्रीतीनें, **प्रतिपूज्य**—उलट सत्कार करून, **अब्रुवन्**—बोलले. [जनकाच्या यज्ञांतील सभासद व ऋत्विज हेहि राजाबरोबर भागवत धर्मश्रवणास तयार झाले. तेव्हां राजानें प्रश्न केलेले ते नऊ महात्मे त्या सर्वांचें अभिनंदन करून संतोषानें असें बोलले. भागवत-धर्म, भगवद्भक्त भगवानाची माया, तिच्या उल्लंघनाचे उपाय, ब्रह्मकर्म, अवतारकृत्य, भक्तांना प्राप्त होणारें फल व युगक्रम हें जाणण्याच्या इच्छेनें राजानें नऊ प्रश्न केले व त्या आर्षभांतील प्रत्येकांनीं त्यांचीं क्रमानें उत्तरें दिलीं.] ३२.

जगाची स्थितिगति जाणणारा, हरिहरांचा लाडका, आत्मज्ञानानें तृप्त झालेला नारद वसुदेवास म्हणतो; ७५ हे वसुदेवा, विदेह राजानें केलेला हा उत्तम प्रश्न ऐकून त्या नऊहि आर्षभांना अतिशय संतोष झाला. ७६ त्यांनीं राजाला धन्यवाद दिले. यज्ञांतील ऋत्विज व सभासदहि त्या परमार्थाच्या गोष्टी ऐकण्यास फार उत्सुक झाले आहेत असें पाहून व ७७ राजाबरोबर त्यांनाहि श्रवणाचें अनुमोदन देऊन ते नऊहि आर्षभ बोलूं लागले. ७८ विदेहानें १ भागवतधर्म, २ भगवद्भक्त, ३ माया, ४ तिला तरून जाण्याचा उपाय, ५ परब्रह्म, ६ कर्म, ७ अवतारांचें चरित्र, ८ अभक्तांची अधोगति, ९ युगधर्म, याप्रमाणें क्रमानें मार्मिक नऊ प्रश्न केले. ७९-८१ त्या नवजणांनी त्यांचीं उत्तरेंहि क्रमानेंच दिलीं. पहिल्या भागवतधर्मविषयप्रश्नाचें उत्तर कवीनें असें दिलें. २८२.

कविरुवाच—मन्येऽकुतश्चिद्भयमच्युतस्य पादाम्बुजोपासनमत्र नित्यम् ।
उद्विग्नबुद्धेरसदात्मभावाद्विश्वात्मना यत्र निवर्तते भीः ॥ ३३ ॥

रायें पुशिलें 'आत्यंतिक क्षेम'। तदर्थी कवि ज्ञाता परम। तो आत्यंतिक क्षेमाचें वर्म। भागवत-धर्म प्रतिपादी ॥ ८३ ॥ ऐक राया नवलपरी। आपुला संकल्प आपणा वैरी। देहबुद्धी वाढवूनि शरीरीं। अतिदृढ करी भवभया ॥ ८४ ॥ जयापाशीं देहबुद्धी। त्यासी सुख नाहीं त्रिशुद्धी। ते बुडाले द्वंद्वसंधी। आधिव्याधिमहार्णवीं ॥ ८५ ॥ जे देहबुद्धीपाशीं। सकळ दुःखांचिया राशी। महाभयाचीं भूतें चौंपाशीं। अहर्निशीं झोंबती ॥ ८६ ॥ देहबुद्धीचिया नरा। थोर चिंतेचा अडदरा। संकल्पविक-ल्पांचा मारा। ममताद्वारा अनिवार ॥ ८७ ॥ देहबुद्धीमाजी सुख। अणुमात्र नाहीं देख। सुख मानिती ते महामूर्ख। दुःखजनक देहबुद्धी ॥ ८८ ॥ दीपाचे मिळणीपाशीं। केवळ दुःख पतंगासीं। तरी आलिंगूं धांवे त्यांसी। तेवीं विषयांशी देहबुद्धी ॥ ८९ ॥ ऐशी असंत देहबुद्धी कुडी। वाढवी विषयांची गोडी। तेथें महाभयाची जोडी। जन्ममरणकोडी अनिवार॥२९०॥एवढा अनिवार संताप। देहबुद्धीपाशीं महापाप। जाणोनि धरी जो अनुताप। विषयीं अल्प गुंतेना ॥ ९१ ॥ धरितां विषयांची गोडी। भोगाव्या जन्ममरणकोडी। येणें भयें विषय वोसंडी। इंद्रियांतें कोंडी अतिनेमें ॥ ९२ ॥ इंद्रियें कोंडितां न कोंडती। विषय सांडितां न सांडती। पुढतपुढती बाधूं येती। यालागीं हरिभक्ती द्योतिली वेदें ॥ ९३ ॥ इंद्रियें

—प्रथम आत्यंतिक क्षेम सांगतात—

कविः उवाच—कवि बोलला, **अत्र**—या संसारांत, **असदात्मभावात् नित्यं उद्विग्नबुद्धेः**—देहादिकांमध्यें जो आत्मभाव त्यापासून ज्याची बुद्धि नित्य उद्विग्न झाली आहे, त्याला, **अच्युतस्य पादांबुजोपासनं**-अच्युताच्या चरणकमलाचें उपासन, **अकुतश्चिद्भयं**—सर्वतः भयशून्य आहे, **मन्ये**—असें मी समजतों, **यत्र**—ज्या चरणकमलसेवनांत, **विश्वात्मना भीः**—निःशेष भीति, **निवर्तते**—निवृत्त होते. [भगवानाच्या चरणकमलाचें सेवन हेंच या संसारांत विरक्त पुरुषाचें आत्यंतिक क्षेम आहे, 'शरीरादिकच मी' या असदात्मभावनेपासून ज्याची बुद्धि उद्विग्न झाली आहे अशा पुरुषाला भगवच्चरणसेवन हेच निर्भय करितें, कारण त्यांत सर्व प्रकाराची भीति सर्वथा निवृत्त होते.] ३३.

विदेहराजानें आत्यंतिक क्षेम विचारिलें. त्या विषयांत कवि अत्यंत निष्णात होता. म्हणून तोच भागवत-धर्माचें प्रतिपादन करूं लागला. कारण भागवतधर्म हेंच आत्यंतिक क्षेमाचें वर्म आहे. ८३ राजा, मी तुला एक आश्चर्याची गोष्ट सांगतों. आपला संकल्पच आपला वैरी आहे. तोच देहात्मबुद्धीला वाढवून संसारभयाला अति दृढ करतो. ८४ 'देहच आत्मा' अशी ज्यांची भावना असते त्यांना सुख त्रिकाळींहि मिळणें शक्य नाहीं. ते सुख-दुःख, शीत-उष्ण, आधि-व्याधि यांच्या महासागरांत बुडाले असें तूं समज. ८५ देहबुद्धीपाशी महादुःखांच्या राशी उभ्या असतात. त्याला महाभयाचीं भूतें चहूंबाजूंनीं अहोरात्र झोंबत असतात. ८६ 'देहच मी' असें मानणाऱ्या मनुष्याला चिंता कधींच सोडीत नाहीं. त्याच्यावर ममतेच्या द्वारां संकल्पविकल्पांचा मारा एकसारखा चालू असतो. ८७ राजा, या देहबुद्धीमध्यें सुखाचा गंधहि नाहीं, तथापि त्यांत जे सुख मानतात ते महामूर्ख होत. कारण 'देहच मी' ही बुद्धीच सर्व दुःखांचें बीज आहे. ८८ पतंग दीपज्योतीला भेटतांच त्याला मरणदुःखच प्राप्त होतें. तथापि तो स्वसंतोषानेंच तिच्यावर झडप घालितो. देहात्मबुद्धि पुरुषहि विषयांमध्यें तसाच आसक्त होतो. ८९ राजा, ही देहबुद्धि फार वाईट आहे. ती विषयांची गोडी वाढविते आणि जन्म-मरणपरंपरेंत पाडिते. २९० या संसारांतील सर्व संताप या देहबुद्धीपासूनच उद्भवतात असें जाणून विरक्त पुरुष विषयासक्त होत नाहींत. ९१ विषयांमध्यें आसक्त झाल्यास जन्म-मरणाच्या परंपरा भोगाव्या लागतील या भीतीनें विवेकी विषयांचा त्याग व इंद्रियांचा निग्रह करितात. ९२ पण इंद्रियांना कोंडूं म्हटल्यानें तीं कोंडलीं जात नाहींत. उलट इंद्रियांचा निग्रह करूं लागल्यास तीं अधिकच क्षुब्ध होतात आणि विषयांचा त्याग करूं लागल्यास ते अधिक अधिक पाठीस लागतात. म्हणून वेदानें हरिभक्ति सांगितली आहे. ९३ त्यांत इंद्रियें कोंडावीं लागत नाहींत. विषयासक्ति अनायासानें

कोंडावीं न लगती । सहज राहे विषयासक्ती । एवढें सामर्थ्य हरिभक्तीं । जाण निश्चितीं नृपवर्या ॥९४॥ योगी इंद्रियें कोंडिती । तीं भक्त लाविती भगवद्भक्तीं । योगी विषय जे त्यागिती । ते भक्त अर्पिती भगवंतीं ॥ ९५ ॥ योगी विषय त्यागिती । त्यागितां देह दुःखी होती । भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ॥ ९६ ॥ हें नव्हे म्हणती विकल्पक । याचिलागीं येथें देख । 'कायेन वाचा' हा श्लोक । अर्पणद्योतक बोलिजेला ॥ ९७ ॥ दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण । हे भागवतधर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ॥ ९८ ॥ अकराही इंद्रियवृत्ती । कशा लावाव्या भगवद्भक्तीं । ऐक राया तुजप्रती । संक्षेपस्थितीं सांगेन ॥ ९९ ॥ मनें करावें हरीचें ध्यान । श्रवणें करावें कीर्तिश्रवण । जिव्हेनें करावें नामस्मरण । हरिकीर्तन अहर्निशीं ॥ ३०० ॥ करीं करावें हरिपूजन । चरणीं देवालयगमन । घ्राणीं तुलसीआमोदग्रहण । जिहीं हरिचरण पूजिले ॥ १ ॥ नित्य निर्माल्य मिरवे शिरीं । चरणतीर्थ अभ्यंतरीं । हरिप्रसाद ज्याचे उदरीं । त्या देखोनि दुरी भवभय पळे ॥ २ ॥ वाढतेनि सद्भावें जाण । चढतेनि प्रेमें पूर्ण । अखंड ज्यासी श्रीकृष्णभजन । त्यासी भवबंधन असेना ॥ ३ ॥ सकल भयांमाजी थोर । भवभय अतिदुर्धर । तेंही हरिभक्तीसमोर । बापुडें किंकर केवीं राहे ॥ ४ ॥ करितां रामकृष्णस्मरण । ऊठोनि पळे जन्ममरण । तेथें भवभयाचें तोंड कोण । धैर्यपण धरावया ॥ ५ ॥ जेथें हरिचरणभजनप्रीती । तेथें भवभयाची निवृत्ती । परम निर्भय भगवद्भक्ती । आमची मती निजनिश्चयो ॥ ६ ॥ कृतनिश्चयो आमुचा जाण । येथें साक्षी वेद शास्त्र पुराण । सर्वात्मना भगवद्भजन । निर्भयस्थान सर्वांसी ॥ ७ ॥ असो वेद शास्त्र पुराण । स्वमुखें बोलिला श्रीकृष्ण । मी सर्वथा भक्तिआधीन । भक्तिप्रधान भगवद्वाक्य ॥ ८ ॥ उभवूनियां चारी बाह्या । निजात्मप्राप्तीच्या उपाया । 'भक्त्याहमेकया ग्राह्यः' । बोलिला लवलाह्या श्रीकृष्ण ॥ ९ ॥

सुटते. हरिभक्तीमध्यें इतकें सामर्थ्य आहे. ९४ योगी इंद्रियांना कोंडतात व भक्त त्यांना भगवद्भक्तींत लावितात. योगी ज्या विषयांना सोडतात त्यांचेंच भक्त भगवंतीं समर्पण करितात. ९५ योगी विषय सोडितात, पण देहत्याग करितांना दुःखी होतात. भक्त विषयांना भगवंतीं समर्पण करून त्यामुळेंच नित्यमुक्त होतात. ९६ यासाठींच येथें 'कायेन वाचा' हा अर्पणद्योतक श्लोक सांगितला आहे. ९७ स्त्री, पुत्र, गृह, प्राण भगवंताला अर्पण करावे, हा पूर्ण भागवतधर्म असून यालाच मुख्यत्वेंकरून भजन हें नांव आहे. ९८ हे राजा, अकराहि इंद्रियांच्या वृत्ति भगवद्भक्तींत कशा लावाव्या तें मी तुला थोडक्यांत सांगतों. ९९ मनानें हरीचें ध्यान करावें. श्रवणेंद्रियानें त्याच्या कीर्तीचें श्रवण करावें, जिव्हेनें अहोरात्र नामस्मरण व हरिकीर्तन करावें, ३०० हातांनीं हरीचें पूजन करावें, पायांनीं देवळांत जावें आणि घ्राणेंद्रियानें ज्या तुळसींनीं हरीचे चरण पुजिले असतील त्यांचा वास घ्यावा. १ ज्याच्या मस्तकावर हरीचा निर्माल्य नेहमीं शोभतो व ज्याच्या उदरांत हरीचें चरणतीर्थ असतें अशा हरिप्रसादास प्राप्त झालेल्या भक्ताला पाहून संसारभय दूर पळतें. २ उत्तरोत्तर वाढणाऱ्या सद्भावानें व प्रेमानें ज्याचें श्रीकृष्णभजन अखंड चालतें त्याला भवबंधन नसतें. ३ सर्व भयांमध्यें संसारभय अति दुर्धर आहे, पण तेंहि बिचारें हरिभक्तीपुढें उभें कसें राहणार? ४ अहो, रामकृष्णस्मरण केलें असतां जन्म-मरण धूम पळत सुटतें, तेथें संसारभयाला धैर्य धरण्यास तोंड कोठें आहे! ५ जेथें हरिचरणभजनाची प्रीति असते तेथें भवभयाची निवृत्ति होते, हें पाहून भगवद्भक्ति अतिशय निर्भय आहे, ६ असा आमचा दृढ निश्चय झाला आहे. याविषयीं वेद, शास्त्र व पुराणें साक्षी आहेत. सर्वभावानें भगवद्भजन करणें हें सर्वांना निर्भयस्थान आहे. ७ केवळ वेदशास्त्रादिकच हें सांगतात असें नाहीं, तर स्वतः श्रीकृष्ण 'भक्त्याहमेकया ग्राह्यः' अशा भक्तिप्रधान वाक्यानें आपल्या चारहि भुजा उभारून अनन्यभक्ति हाच आपल्या प्राप्तीचा उपाय स्वमुखानें सांगतां झाला. ३०९.

ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये । अञ्जः पुंसामविदुषां विद्धि भागवतान् हि तान् ॥ ३४ ॥

न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ती । ऐशिया अज्ञानां निजात्मप्राप्ती । सुगम जोडे ब्रह्मस्थिती । यालागीं हरिभक्ती प्रकाशिली देवें ॥ ३१० ॥ न करितां वेदशास्त्रपठण । जडमूढ म्हणाल तरले कोण । उन्मत्तगजेंद्रउद्धरण । गर्भसंरक्षण परीक्षितीचें ॥ ११ ॥ अंबरीषगर्भनिवारण । करावया भक्तीच कारण । 'अहंभक्तपराधीनः' । स्वमुखें नारायणा बोलिला ॥ १२ ॥ वनचर वानर नेणों किती । उद्धरले भगवद्भक्ती । अस्वलें तारावया निश्चितीं । विवरीं जांबवती भक्तीस्तव वरिली ॥ १३ ॥ जाण पां अविवेकी केवळ । गौळी गोधनें गोपाळ । तेही उद्धरिले सकळ । श्रीकृष्णसखे प्रबळ अनन्यप्रीतीं ॥ १४ ॥ शास्त्रविरुद्ध अविवेकस्थिती । जारभावें श्रीकृष्णप्रीती । गोपी उद्धरिल्या नेणों किती । अनन्यभक्तिसख्यत्वें ॥ १५ ॥ न करितां नाना व्युत्पत्ती । सुगमोपायें ब्रह्मप्राप्ती । अबळें तारावया निश्चितीं । भगवंते निजभक्ति प्रगट केली ॥ १६ ॥ तें हें राया भागवत जाण । मुख्यत्वें भक्तिप्रधान । भावें करितां भगवद्भजन । अज्ञान जन उद्धरती ॥ १७ ॥ हें भागवत नव्हे नव्हे । अज्ञानालागीं निजपव्हे । भवाब्धि तरावया भजनभावें । महा नाव देवें निर्माण केली ॥ १८ ॥ भागवताचे महानावे । जे रिघाले भजनभावें । त्यांसी भवभयाचे हेलावे । भजनस्वभावें न लागती ॥ १९ ॥ स्त्रीशूद्रादि आघवे । घालूनियां ये नावे । एकेच खेपे स्वयें न्यावे । भजनभावें परतीरा ॥ ३२० ॥ जे आवलितां भावबळें । तोडी कर्माकर्मक्रूरजळें । स्वबोधाचेनि पाणीढाळें । काढिती एकवेळ निजात्मतीरा ॥ २१ ॥ वैराग्याचे निजनावाडे । अढळ बसले चहूंकडे । विषयांचे आदळ रोकडे । चुकवूनि धडपडे काढिती कांठा ॥ २२ ॥ संचितक्रियमाणांच्या लाटा । मोडोनि लाविती नीट वाटा । वेंचूनि प्रारब्धाचा सांठा ।

—भागवतधर्माचें लक्षण सांगतात—

भगवता—भगवानानें, **अविदुषां पुंसां**—अविद्वान् पुरुषांच्या, **अञ्जः हि आत्मलब्धये**—अनायासानेंच आत्मप्राप्तीसाठीं, **ये वै उपायाः**—जे प्रसिद्ध उपाय, **प्रोक्ताः**—सांगितले, **तान् हि भागवतान्**—त्यांनाच भागवतधर्म, **विद्धि**—समज. [मन्वादिकांच्या द्वारां वर्णाश्रमादि धर्म सांगून भगवानानें स्वमुखानेंच अविद्वान् पुरुषांनाहि अनायासानें आत्मप्राप्ति होण्यासाठी जे अतिगुह्य उपाय सांगितले आहेत त्यांनाच तूं भागवत धर्म समज.] ३४.

ज्यांनीं वेदशास्त्रांचें अध्ययन केलेलें नाहीं, अशा अज्ञ जीवांनाहि अनायासानें आत्मप्राप्ति व ब्रह्मस्थिति सुलभ व्हावी म्हणून देवानें हरिभक्ति प्रकट केली आहे. ३१० वेदशास्त्राचें अध्ययन न करितां कोण जडमूढ तरले म्हणून विचाराल तर सांगतों. उन्मत्त गजेंद्राचा उद्धार, परीक्षितीचें गर्भांतील रक्षण, ११ अंबरीषाच्या गर्भत्रासाचें निवारण, या सर्वांचें भक्ति हेंच कारण आहे. 'मी भक्तपराधीन आहें' असें नारायण आपल्या मुखानें बोलला आहे. १२ भगवद्भक्तीनें किती वनचर वानरांचा उद्धार झाला हें कांहीं कळत नाहीं. अस्वलांचा उद्धार करण्यासाठीं भगवानानें जांबवतीच्या भक्तीस्तव विवरामध्यें तिला वरिलें. १३ राजा, गौळी, गायी, गोपाळ हे सर्व अविवेकी होते. पण ते अनन्य प्रीतीनें श्रीकृष्णाचे सखे झाले व त्यांचा उद्धार झाला. १४ गोपींची स्थिति शास्त्रांच्याविरुद्ध व केवळ अविवेकमूल होती. पण अनन्यभक्तीच्या बलावर त्यांचाहि उद्धार झाला. १५ तात्पर्य, अध्ययनाचें प्रयास न करितां जड जीवांनाहि ब्रह्मप्राप्ति होण्यासाठीं भगवंतानें निजभक्ति प्रकट केली. १६ हें राजन, हें भागवतपुराण मुख्यत्वेंकरून भक्तिप्रधान आहे. प्रेमानें भगवद्भजन केलें असतां अज्ञजनांचा उद्धार होतो. १७ अहो, हे भागवत नव्हे, ही अज्ञजनांसाठीं पाणपोयी आहे. भजनभावानचेंच संसारसागर तरून जाण्यासाठीं देवानें ही मोठी नौकाच निर्माण केली आहे. १८ जे भक्त भजनभावानें या भागवतरूपी नौकेंत बसून संसारपरतीरास जावयास निघतात, त्यांना संसारभयाचे हेलकावे बसत नाहींत. १९ या नौकेंत स्त्री-शूद्रादि सर्वांना एकदांच बसवून भजनभावानें परतीरास न्यावें ३२० भावबलानें या नौकेला वल्हवूं लागलें असतां ती कर्म व अकर्म या क्रूर जलाला तोडून वेगानें जाऊं लागते आणि आत्मबोधाच्या पाणवळ्यानें एकाच वेळीं सर्वांना आत्मतीरावर उतरविते. २१ वैराग्याचे अढळ नावाडी या नौकेंत चोहोंकडे बसलेले असतात. ते विषयांचे खडक चुकवून नौकेला सुरक्षितपणें परतीरावर नेऊन पोंचवितात, २२ संचित व क्रियमाण यांच्या लाटा मोडून नौकेला सरळ मार्गाला लावितात आणि

निजात्मतटा काढिती ॥ २३ ॥ तेथ गुरुवचन साचोकारें । सांभाळीत उणेंपुरें । भूतदयेचेनि दोरें । निजनिर्धारें वोढिती ॥ २४ ॥ तंव एकाएकीं एकसरीं । काढिली परात्परतीरीं । तंव प्रत्यावृत्ती येरझारी । आत्मसाक्षात्कारीं खुंटली ॥ २५ ॥ येथ धरिला पुरे भावो । तैं बुडणेंचि होय वावो । मग ठाकावा जो ठावो । तो स्वयमेवो आपण होय ॥ २६ ॥ येथ पोहणेयावीण तरणें । प्रयासेंवीण प्राप्ति घेणें । सुखोपायें ब्रह्म पावणें । यालागीं नारायणें प्रकाशिली भक्ती ॥ २७ ॥ भागवतधर्माचिये स्थिती । भाळीं भोळीं भवाब्धि तरती । सुखोपायें ब्रह्मप्राप्ती । तेचि श्लोकार्थीं विशद सांगे ॥ २८ ॥

यानास्थाय नरो राजन्न प्रमाद्येत कर्हिचित् । धावन्निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ॥ ३५ ॥

जो श्रुतिस्मृती नेणता । भावें भजे भगवत्पथा । त्यासी विधिनिषेधबाधकता । स्वप्नींही सर्वथा प्रमाद न घडे ॥ २९ ॥ सद्भावेंसीं सप्रेम । आचरितां भागवतधर्म । बाधूं न शके कर्माकर्म । भावें पुरुषोत्तम संतुष्ट सदा ॥ ३३० ॥ श्रुतिस्मृति हे दोनी डोळे । येणेंवीण जे आंधळे । तेही हरिभजनीं धांवतां भावबळें । पडे ना आडखुळे सप्रेमयोगें ॥ ३१ ॥ प्रेमेंवीण श्रुतिस्मृतिज्ञान । प्रेमेंवीण ध्यानपूजन । प्रेमेंवीण श्रवणकीर्तन । वृथा जाण नृपनाथा ॥ ३२ ॥ माता देखोनि प्रेमभावें । बाळक डोळे झांकूनि धांवे । ते धांवेसवें झेंपावे । अति सद्भावें निजमाता ॥ ३३ ॥ तैसा सप्रेम जो भजे

प्रारब्धाचा सांठा खर्चून आत्मतीरावर घेऊन जातात. २३ खरोखर या प्रवासांत जें न्यून असेल तें गुरुवचन भरून काढितें. भूतदयेच्या दोरांनीं आत्मनिर्धारानें ते त्या नौकेला ओढून घेतात. २४ सारांश, या नौकेच्या द्वारां अनायासानें परात्परतीरीं जाऊन पोंचल्यावर जन्म-मरणादि सर्व क्लेश निवृत्त होतात.२५ या धर्मावर नुस्ता भाव धरला कीं पुरें, मग 'बुडणें' हा शब्दच फोल होतो. आणि जेथें जाऊन पोंचावयाचें असतें तें स्थान हा स्वतःच बनतो. २६ पोहण्यावांचून तरून जाणें, प्रयासावांचून प्राप्ति होणें व अनायासानें ब्रह्म पावणें यासाठीं नारायणानें भक्ति प्रकट केली. २७ राजा, या भागवतधर्माच्या योगानें बिचारीं भाळीभोळींसुद्धां हा संसारसागर तरून जातात, त्यांना अनायासानें ब्रह्मप्राप्ति होते. हेंच आतां पुढल्या श्लोकांत कवि स्पष्टपणें सांगेल. ३२८.

—पूर्वश्लोकांत अंजः-' शब्दानें सांगितलेल्या सुकरत्वाचें विवरण करितात—

राजन्—हे राजन, **यान् आस्थाय**—ज्या भागवतधर्माचा आश्रय करून, **नरः**— मनुष्य, **कर्हिचित्**—कधींहि, **न प्रमाद्येत**—प्रमाद करीत नाहीं. **नेत्रे निमील्य धावन् वा**—डोळे मिटून धांवत असतांहि, **इह न स्खलेत् न पतेत्**—या धर्मांत तो अडखळत नाहीं किंवा पडत नाहीं. [योगादि इतर उपायांच्या अनुष्ठानास आरंभ केला असतां त्यांत जशीं अनेक विघ्नें येतात तशीं या भागवतधर्मानुष्ठानांत विघ्ने येत नाहींत. शिवाय या भागवधर्मामध्यें डोळे मिटून धांवत असलेलाहि भक्त अडखळत नाहीं. येथील नेत्रनिमीलन म्हणजे अज्ञान. 'श्रुति व स्मृति' हे ब्राह्मणाचे दोन नेत्र आहेत. त्यांतील एका नेत्रानें विहीन असलेला ब्राह्मण काणा व दोन्ही नेत्रांनीं रहित असलेला अंध म्हटला आहे. वास्तव नेत्र मिटून म्हणजे न जाणतांहि, ज्याप्रमाणें पुढील पाय ठेवण्याच्या स्थानाचें उल्लंघन करून त्याच्या पुढील स्थानीं पाऊन ठेवीत शीघ्र गमन करणें हेंच धांवणें होय. तसेंच येथेंहि अनुष्ठानाच्या कांहीं पायऱ्या सोडून त्वरेनें पुढील उपायांचें अनुष्ठान करणें हें धांवणें आहे. असें अनुष्ठान करणाराहि या भागवतधर्मांत स्खलन पावत नाहीं म्ह० प्रत्यवायी—दोषी होत नाहीं. तसाच तो पडत नाहीं म्ह० फलापासून च्युत होत नाहीं. ब्राह्मणादिकांच्या उक्त धर्माचेंहि आचरण न करणारा कोणी एखादा श्रवणकीर्तनादि भागवतधर्म आचरीत राहिल्यास त्याला त्याचें फल मिळतें.] ३५.

श्रुति-स्मृतींना न जाणणाराहि जो भागवतधर्ममार्गाला भक्तीनें अनुसरतो, त्याला विधि-निषेधांची बाधा होत नाहीं व कधीं स्वप्नांतहि त्याच्याहातून प्रमाद घडत नाहीं. २९ जो मोठ्या भक्तीनें व प्रेमानें भागवतधर्माचें आचरण करितो, त्याला कर्म व अकर्म बाधूं शकत नाहींत. त्याच्या भक्तीनेंच पुरुषोत्तम सदा संतुष्ट होतो. ३३० श्रुति व स्मृति हे दोन डोळे आहेत. ते ज्याला नाहींत ते आंधळे होत. पण या हरिभजनांत भक्तिबळानें धांवत असतां तेहि कोठें अडखळत नाहींत व पडत नाहींत. ३१ ईश्वराच्या प्रेमावांचून श्रुति-स्मृतींचें ज्ञान, ध्यान,पूजन,श्रवण, कीर्तन हें सर्व फुकट आहे. ३२ आईला पहातांच बाळक प्रेमानें डोळे झांकून धांवतें,पण आई त्याला एकदम उचलून घेते, ३३.

भक्तु । त्या भजनासवें भगवंतु । भुलला चाले स्वानंदयुक्तु । स्वयें सांभाळितु पदोपदीं ॥ ३४ ॥ ऐसे आचरितां भागवतधर्म । बाधूं न शके कर्माकर्म । कर्मासी ज्याची आज्ञा नेम । तो पुरुषोत्तम भजनामाजी ॥ ३५ ॥ ऐसा भागवतधर्मे गोविंदु । तुष्टला चाले स्वानंदकंदु । तेथें केवीं रिघे विधि-निषेधु । भक्तां प्रमादु कदा न बाधी ॥ ३६ ॥ जेवीं कां स्वामीचिया बाळा । अवरोधु न करवे द्वार-पाळा । तेवीं भागवतधर्मभजनशीळा । कर्मार्गळा बाधूं न शके ॥ ३७ ॥ ज्यासी भगवद्भजनीं विश्वासु । विधिनिषेध त्याचा दासु । देऊनि निजभजनविलासु । स्वयें जगन्निवासु सुखावे ॥ ३८ ॥ भागवतधर्मे राहे कर्म । तंव तंव सुखावे पुरुषोत्तम । सप्रेमभक्ता बाधी कर्म । हा वृथा भ्रम भ्रांतांसी ॥ ३९ ॥ कर्म करूं पावे प्रमादु । तंव प्रमादीं प्रगटे गोविंदु । यालागीं विधिनिषेधु । न शकती बाधूं हरिभक्तां॥४०॥ अजामिळा कर्मबाध । यमपाशीं बांधितां सुबद्ध । तेथें प्रकटोनि गोविंद । केला अतिशुद्ध नाममात्रें ॥ ४१ ॥ स्वधर्म कर्म हेच दोनी ॥ निजसत्ता भोयी करूनी । जो पहुडे भजन सुखासनीं । तो पडे तैं दंडणीं स्वधर्मकर्मां ॥ ४२ ॥ भजनप्रतापसत्तालक्षणें । स्वधर्मकर्मां ऐसें दंडणें । वर्णाश्रमांचा ठावो पुसणें । होळी करणें कर्मांची ॥ ४३ ॥ एवं भागवतधर्मे जे सेवक । स्वधर्मकर्म त्यांचें रंक । तें राहों न शके त्यांसन्मुख । मा केवीं बाधक हों शकेल ॥ ४४ ॥ कैसे कैसे भागवतधर्म । केवीं भगवंतीं अर्पे कर्म । हें अतिगुह्य उत्तमोत्तम । निजभजनधर्म ऐक राया ॥ ४५ ॥

त्याचप्रमाणें जो भक्त मोठ्या प्रेमानें भगवद्भजन करितो, त्यावर भगवंतहि भजनामुळेंच संतुष्ट होतो व त्याला पदोपदीं स्वतः सांभाळितो. ३४ याप्रमाणें भागवतधर्माचें आचरण करूं लागलें असतां त्याला पुण्य व पाप बद्ध करूं शकत नाहींत. कारण कर्माला ज्याची आज्ञा प्रमाण असते तो पुरुषोत्तमच भजनामध्यें असतो. ३५ याप्रमाणें गोविंद भागवतधर्मानें संतुष्ट होऊन भक्ताबरोबर त्याला संभाळीत चालू लागतो. मग तेथें विधिनिषेधाला अवकाश कोठून मिळणार ! अशा भक्ताला विघ्नें तरी कशीं येणार ! ३६ अहो, द्वारपाळ कांहीं राजपुत्राला द्वारावर अडवूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें भागवतधर्मभजनशीलाला कर्मरूपी अडसर प्रतिबंध करूं शकत नाहीं. ३७ ज्याचा भगवद्भजनावर विश्वास असतो, त्याचे विधि- निषेध दास होतात. आपल्या भजनाचा विलास पाहून स्वतः जगन्निवासहि प्रसन्न होतो. ३८ भागवतधर्माचें जसें जसें अनुष्ठान करूं लागावें, तसें तसें पाप कमी होऊं लागतें व पुरुषोत्तम संतुष्ट होतो, यास्तव प्रेमळ भक्ताला कर्म बद्ध करितें असा हा अज्ञांना वृथा भ्रम झाला आहे.*३९ कर्म विघ्न करण्यास जों तयार होतें, तोंच गोविंद तेथें प्रकट होतो. म्हणून हरिभक्ताला विधि-निषेध बाधूं शकत नाहीं. ३४० अजामिळाला कर्माचा बाध झाला, यमाच्या पाशानें त्याला घट्ट बांधिलें, पण गोविंद तेथें प्रकट झाला व त्यानें त्याला नारायण-नामस्मरणानें अति पावन केलें. ४१ जो भक्त भजनरूप पालखींत सुखानें शयन करितो आणि स्वधर्म व कर्म या दोहोंना निजसत्तेनें तिला वाहणारे भोयी करून त्यांच्याकडून ती वाहवितो, त्या वेळीं स्वधर्म व कर्म हीं दोन्ही प्रतिबंधांत पडतात. म्ह० भगवद्भक्ताला ती प्रतिबंध करूं शकत नाहींत. ४२ याप्रमाणें भजनप्रतापानें स्वधर्म व कर्म यांना दंड करावा, वर्णाश्रमांचा मागमूस नाहींसा करावा व कर्माची होळी करावी. ४३ असे जे भागवतधर्मसेवक असतात त्यांचे स्वधर्म व कर्म भिकारी होतात. त्यांच्या समोर ते उभेहि राहूं शकत नाहींत, मग बाधा कशी करणार ! ४४ हे राजा, ते भागवतधर्म कसे कसे आहेत, भगवंताच्या ठिकाणीं कर्मार्पण कसें होतें, हें अति गुह्य, उत्तमोत्तम निजभजनधर्म तूं आतां ऐक. ३४५.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् ।
करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ ३६ ॥

हेतुक अथवा अहेतुक । वैदिक लौकिक स्वाभाविक । भगवंतीं अर्पे सकळिक । या नांव देख भागवतधर्म ॥ ४६ ॥ उदकीं तरंग अतिचपळ । जिकडे जाय तिकडे जळ । तैसें भक्ताचें कर्म सकळ । अर्पे तत्काल भगवंतीं ॥ ४७ ॥ ये श्लोकींचें व्याख्यान । पहिलें मानसिक अर्पण । पाठीं इंद्रियें बुद्धि अभिमान । कायिक जाण श्लोकान्वयें ॥ ४८ ॥ भागवतधर्मांची निजस्थिती । मन बुद्धि चित्त अहंकृती । आदिकरूनि इंद्रियवृत्ती । भगवंतीं अर्पिती तें ऐक ॥ ४९ ॥ बाधूं न शके स्वधर्मकर्म । ऐक राया त्याचें वर्म । मनीं प्रगटला पुरुषोत्तम । अतिनिःसीम निजबोधें ॥ ३५० ॥ म्हणोनि संकल्पविकल्प । अवघे जाहले भगवद्रूप । यालागीं भक्त नित्य निष्पाप । सत्यसंकल्प हरिदास ॥ ५१ ॥ जेवीं बुद्धिबळांचा खेळ । राजा प्रधान गज दळ । अवघे काष्ठचि केवळ । तेवीं संकल्प सकळ भगवद्रूप ॥ ५२ ॥ जो जो संकल्पकामीं कामू । तो तो होय आत्मारामू । तेथ भजनाचा संभ्रमू । अतिनिःसीम् स्वयें वाढे ॥ ५३ ॥ जागृती सुषुप्ती स्वप्न । तिहीं अवस्थां होय भजन । तेथ अखंड अनुसंधान । निजबोधें पूर्ण ठसावे अंगीं ॥ ५४ ॥ मना होतां समाधान । समाधानें अधिक भजन । पूर्ण बाणलें अनुसंधान । ध्येय ध्याता ध्यान समरसें भजे ॥ ५५ ॥ तुर्या साक्षी उन्मनी । याही लाविल्या भगवद्भजनीं । जंव-वरी अवस्था आपणीं । आपआपणा मुकल्या नाहीं ॥ ५६ ॥ ऐसा भावनेवीण उपजे भावो । तों तों तत्काळ होय देवो । मग अर्पणाचा नवलावो । न अर्पितां पहाहो स्वयें होय ॥ ५७ ॥ स्वरूपें मिथ्या

—ईश्वराला अर्पण केलेलीं सर्व कर्मे, हेच भागवतधर्म कवि सांगतो—

कायेन—शरीरानें, **वाचा**—वाणीनें, **मनसा**—मनानें, **इंद्रियैः**—इंद्रियांनीं, **बुद्ध्या**—बुद्धीनें, **वा आत्मना**—चित्तानें किंवा अहंकारानें, **अनुसृतस्वभावात्**—अध्यासयुक्त ब्राह्मणत्वादि स्वभावानें, **यत् यत् करोति**—जें जें करितो, **तत् सकलं**—तें सर्व, **परस्मै नारायणाय**—परमेश्वर नारायणाला, **इति**—असें ह्मणून, **समर्पयेत्**—समर्पण करावें. [अनुसृत जो स्वभाव त्यामुळें ह्म० केवल विधितः केलेलें तेवढेंच कर्म असा नियम नाहीं. तर शरीरादिकांनीं स्वभावानुसार होणारें लौकिक कर्महि जें जें करितो तें सर्व, 'यत्करोषि यदाश्नसि०' या भगवद्गीतावचनाप्रमाणें 'नारायणाय इदं न मम' असें म्हणून ईश्वरार्पण करावें, म्हणजे तें सर्वहि कर्म भागवत धर्म होतो. किंवा कर्म शरीरादिकांचेंच आहे, आत्म्याचें नाहीं, अशी आशंका घेऊन 'अनुसृतस्वभावात् आत्मना', असें म्हटलें आहे. अध्यासानें अनुसरलेल्या ब्राह्मणत्वादि स्वभावामुळें जें जें करतो असा संबंध.] ३६.

सहेतुक किंवा निर्हेतुक, वैदिक, लौकिक, स्वाभाविक असें सकाम किंवा निष्काम कर्म भगवंताला अर्पण करणें हाच भागवतधर्म होय. ४६ उदकांतील अति चपळ तरंग कोठें जरी गेला तरी तें जळच. तसेंच भक्ताचें सर्व कर्म तत्काळ भगवंताचे ठिकाणीं समर्पित होतें. ४७ या श्लोकाचें व्याख्यान असें—पहिलें मानसिककर्माचें अर्पण, नंतर इंद्रियें, बुद्धि, अहंकार, यांचीं कर्मे व शेवटीं कायिक कर्मे भगवंतास अर्पण करावी. ४८ मन, बुद्धि, चित्त, अहंकार इत्यादि इंद्रियवृत्ति भगवंतीं अर्पितात, तीच भागवतधर्माची निजस्थिति होय. ४९ भगवद्भक्तांच्या श्रेष्ठ आत्मबोधानें त्यांच्या मनांत पुरुषोत्तम प्रकट झालेला असतो. त्यामुळें त्यांना स्वधर्मकर्म बाधूं शकत नाहीं. ३५०. भक्ताचे संकल्पविकल्प भगवद्रूप झाल्यामुळें तो नित्य निष्पाप व सत्यसंकल्प होतो. ५१ बुद्धिबळांतील राजा, प्रधान, हत्ती, घोडा, इत्यादि सर्व जसें काष्ठच, त्याचप्रमानें भक्ताचे सर्व संकल्प भगवद्रूप असतात. ५२ त्याची जी जी वृत्ति उत्पन्न होते, ती ती आत्माराममय असते, ५३ त्यामुळें जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्यें त्याचें आत्मानुसंधान अखंड चालतें. त्यांच्या मनांत निजबोध ठसतो. ५४ मनाला समाधान होतें. समाधानानें भजन अधिक होऊं लागतें. ध्याता, ध्यान इत्यादि त्रिपुटी एकरूप होतात. ५५ तुर्या, साक्षी, उन्मनी या अवस्थाहि त्यानें भगवद्भजनीं लावलेल्या असतात. ५६ पुढें अशा दीर्घ भजनानें सर्व अवस्थाशून्य भाव उत्पन्न होतो, त्यामुळें भक्त स्वतःच देव होतो. मग अर्पण न करितांच सर्व ईश्वरार्पण होतें. ५७ स्वरूपज्ञानानें स्वप्नादि तीन अवस्थांना भिन्न

केलें स्वप्न । जागृती सोल्हूनि काढिलें ज्ञान । निवडोनि सुषुप्तिसुखसमाधान । तिहींतें पूर्ण एकत्र केलें ॥ ५८ ॥ तये स्वरूपीं सगळें मन । स्वयेंचि करी निजात्मार्पण । तेथींचें सुखसमाधान । भक्त सज्ञान जाणती स्वयें ॥ ५९ ॥ यापरी मानसिक जाण । सहज स्वरूपीं हो अर्पण । आतां इंद्रियांचें समर्पण । होय तें लक्षण ऐक राया ॥ ३६० ॥ दीपु लाविजे गृहाभीतरीं । तोचि प्रकाशे गवाक्षद्वारीं । तेवीं मनीं प्रगटला श्रीहरी । तोचि इंद्रियांतरीं भजनानंदु ॥ ६१ ॥ तेंचि इंद्रियव्यापार । सांगिजती सविस्तर । स्वाभाविक इंद्रियव्यवहार । भजनतत्पर परब्रह्मीं ॥ ६२ ॥ जंव दृष्टी देखे दृश्यातें । तंव देवोचि दिसे तेथें । यापरी दृश्यदर्शनातें । अर्पी भजनसत्ते दृष्टीचा विषयो ॥ ६३ ॥ दृश्य द्रष्टा आणि दृष्टी । देखतां तिन्ही एकवटी। सहजें ब्रह्मार्पण ते दृष्टी । भक्त जगजेठी यापरी अर्पी ॥ ६४ ॥ दृश्य प्रकाशी दृश्यपणें । तेंचि दृष्टीमाजी होय देखणें । ऐसोनि अभिन्नपणें । दर्शनार्पणें भजती भक्त ॥ ६५ ॥ हे एकपणीं तीनही भाग । तिन्हींमाजी एक अंग । ऐसें जें देखणें चांग । त्याचि अर्पणें साङ्ग सहजें अर्पी ॥ ६६ ॥ नाना पदार्थ प्रांजळे । नीट नवे देखती डोळे । परी अर्पणाचे सोहळे । निजात्ममेळें अर्पिती स्वयें ॥ ६७ ॥ यापरी दृष्टीचें दर्शन । भक्त करिती ब्रह्मार्पण । आतां श्रवणाचें अर्पण । अर्पी तें लक्षण ऐक राया ॥ ६८ ॥ जो बोलातें बोलविता । तोचि श्रवणीं जाला श्रोता । तोचि अर्थावबोधु जाणता । तेथें ब्रह्मार्पणता सहजेंची ॥६९॥ शब्द शब्दत्वें जंव उठी । तंव शब्दविता प्रगटे पाठींपोटीं । तेणें अकृत्रिम भजन उठी । ब्रह्मार्पणमिठी श्रवणीं पडे ॥३७०॥ शब्द बोलासवें अर्थबाढी । तंव शब्दविता घे शब्दार्थगोडी । तेणें हरिभजनीं आवडी । स्वयें उठी गाढी श्रवणार्पणेंसीं ॥ ७१ ॥ शब्द जंव कानीं पडे । तंव शब्दार्थें भजन वाढे । बोलवित्याच्या अंगा घडे । अर्पण उघडें करितांची ॥ ७२ ॥ बोलासी जो बोलविता । त्यासी दृढ केली एकात्मता । तें भजन चढे श्रवणाच्या हाता । ब्रह्मार्पणता निजयोगें ॥ ७३ ॥ सद्गुरुवचन पडतां कानीं । मनाचें मनपण विरे मनीं । तेंचि श्रवण ब्रह्मार्पणीं । भगवद्भजनीं सार्थकता ॥ ७४ ॥ श्रवणेंचि यापरी श्रवण । करितां

करून त्यांतील पूर्ण ज्ञान एकत्र केलें ५८ असतां स्वतः मनच त्यांत आत्मसमर्पण करितें. येथील सुखाचा अनुभव एक ज्ञानी भक्तच जाणतात. ५९ याप्रमाणें मानसिक समर्पण सहज स्वरूपीं कसें होतें तें सांगितलें. आतां इंद्रियांचें समर्पण कसें होतें, तें ऐक. ३६० घरांत दीप लाविला असतां त्याचा प्रकाश जसा खिडक्यांतून बाहेर पडतो, त्याप्रमाणें मनांत प्रकट झालेला श्रीहरि इंद्रियांमध्यें भजनानंदाच्या रूपानें प्रकट होतो. ६१ आतां इंद्रियव्यापारच सविस्तर सांगतों. ६२ दृष्टीनें जों दृश्याला पहावें तों तेथें देवच दिसतो. याप्रमाणें दृश्य व दर्शन यांना भजनांत अर्पण करावें म्हणजे दृष्टीचा विषय तो देवच होतो. ६३ दृश्य, द्रष्टा व दृष्टि या तिहींना एकरूप पाहिलें असतां दृष्टि अनायासानें ब्रह्मार्पण होते; याप्रमाणें भक्त दृष्टीचा विषय ईश्वरार्पण करितो. ६४।६५ त्रिपुटींतील तीनहि भाग एकरूप पहाणें, हेंच सांग समर्पण आहे. ६६ त्यामुळें डोळ्यांनीं क्षणोक्षणीं कितीहि जरी नवे नवे पदार्थ पाहिले तरी ते त्यांना आत्मरूप पहातात व अर्पणाचा सोहळा अनुभवितात. ६७ याप्रमाणें भक्त दृष्टीच्या दर्शनाला ब्रह्मार्पण करितात. आतां श्रवणाचें अर्पण कसें करावें तें ऐक. ६८ जो शब्दांना बोलविणारा म्ह० जो वागिंद्रियांत राहून शब्दोच्चार करविणारा तोच श्रोत्रेंद्रियांत राहून श्रोता झाला आणि तोच साक्षीरूपानें शब्दाचा अर्थ जाणूं लागला. या प्रसंगीं श्रवणाचें ब्रह्मार्पणत्व सहजच सिद्ध होतें. ६९ शब्द शब्दत्वानें जो उत्पन्न होतो, तोंच त्याच्या मागोमाग शब्द करविणारा प्रकट होतो. त्यामुळें स्वाभाविक भजन सिद्ध होतें आणि श्रवणामध्यें ब्रह्मार्पणाची मिठी पडते. ३७० शब्द उच्चारतांच अर्थ निष्पन्न होतो, तोंच बोलविणारा शब्दार्थाचें माधुर्य जाणतो. त्यामुळें हरिभजनामध्यें आवड उत्पन्न होते. ७१ शब्द कानीं पडला कीं, शब्दार्थानें भजन वाढतें. ७२ शब्दाचा जो प्रवर्तक त्याच्याशीं आपली दृढ एकात्मता केली कीं, श्रवणाची ब्रह्मार्पणता स्वभावतःच सिद्ध होते. ७३ सद्गुरूचें वचन कानीं पडतांच मनाचें मनपण मनांतच विरून जातें. ७४ याप्रमाणें श्रवणाचें ब्रह्मार्पण श्रवणानेंच सहज सिद्ध होतें. आणि निष्काम भगवद्भजन

उठिलें ब्रह्मार्पण । हेतुरहित भगवद्भजन । स्वभावें जाण स्वयें होत ।। ७५ ।। भजनें तुष्टला जगन्निवास । होय वासाचा निजवास । मग घ्राणद्वारा परेश । भोगी सुवास ब्रह्मार्पणेंसीं ।। ७६ ।। जो सुमना सुमनपण जोडी । तो घ्राणाचेंहि घ्राण होय आवडी । मग नाना सुवासपरवडी । ब्रह्मार्पणवोढी निजभोग अर्पी ।। ७७ ।। वासाचा अवकाश होय आपण । घ्राणीं ग्राहकपणें जाण । तो भोगुचि स्वयें संपूर्ण । कृष्णार्पण सहज होतु ।। ७८ ।। रसना रस सेवूं जाये । तंव रसस्वादु देवचि होये । मग रसनेमाजी येऊनि राहे । ब्रह्मार्पणें पाहे रसभोगवृत्ती ।। ७९ ।। जे जे रसना सेवी गोडी । ते ते हरिरूपें धडफुडी । स्वादा येऊनि रोकडी । ब्रह्मार्पणपरवडी निजभोग अर्पी ।। ३८० ।। रस रसना रसस्वादू । त्रिविधभेदें निजअभेदू । रससेवनीं परमानंदू । स्वानंदकंदू वोसंडे ।। ८१ ।। कटु मधुर नाना रस । रसना सेवी साव-काश । परी तो अवघा ब्रह्मरस । स्वादीं सुरस परमानंदू ।। ८२ ।। यापरी रसीं रसना । भोगें रतली कृष्णार्पणा । आतां स्पर्शविषयरचना । अर्पे ब्रह्मार्पण तें ऐक राया ।। ८३ ।। स्पर्श घेइजे निजदेहीं । तंव देहींच प्रगटे विदेही । मग स्पर्शी जें जें कांहीं । तो तो भोगू पाहीं ब्रह्मार्पणें उठी ।। ८४ ।। स्पर्शास्पर्शें जें स्पार्शिजे । तंव स्पर्शावया नाडळे दुजें । तेणें एकपणाचेनि व्याजें । कृष्णार्पणवोजें भजन प्रगटे ।।८५।। तेथ जो जो घेइजे पदार्थु । तो तो पदार्थु होय समर्थु । तेणेंचि भजनें परमार्थु । निजस्वार्थु निजभक्तां ।। ८६ ।। द्यावया कांहीं देवो जाये । तंव देतां भजन कैसें होये । देतें घेतें दान स्वयें । देवोचि होये निजांगें ।। ८७ ।। जेउतें जेउतें चालवी पाये । तो तो मार्गु देवोचि होये । मग पाउलापाउलीं पाहे । निजभजन होये ब्रह्मार्पणेंशीं ।। ८८ ।। चरणा चरणा निजगती । तोचि निजांगें क्षितीची क्षिती । चालतां तैशिया युक्ती । सहज ब्रह्मस्थिति निजकर्में अर्पी ।। ८९ ।। बोल बोलविती या वदनें भेटी । बोल न लाजे त्याचिया दृष्टी । ते लाज गिळून बोलणें उठी । निजभजनपुष्टी ब्रह्मार्पणेंसीं ।। ३९० ।। शब्द

आपोआप घडतें. ७५ भजनानें संतुष्ट झालेला जगन्निवास सुवासाचाहि आधार होतो, मग तो परमात्मा घ्राणेंद्रियाच्या द्वारां सुवासाचा भोग घेतो. ७६ पुष्पाला पुष्पत्व ज्याच्यामुळें येतें तो त्या पुष्पाच्या आवडीनें घ्राणाचेंहि घ्राण होतो आणि अनेक प्रकारचे सुवास घेतो. ७७ परमात्माच सुवासाचा आधार पुष्प होतो. घ्राणामध्यें तोच त्या सुगंधाचा ग्राहक होतो आणि स्वतःच त्याचा उपभोग घेतो. याप्रमाणें अवघ्राणाचेंहि कृष्णार्पण सहज सिद्ध होतें. ७८ रसना जों रसाचें सेवन करूं लागते, तों स्वतः देवच रसास्वाद होतो आणि रसनेंत येऊन रहातो. ७९ रसना ज्या ज्या पदार्थाची गोडी घेते, तो तो रस खरोखर हरिरूप असतो. त्यामुळे रसनेचा रसास्वाद हा हरिरूपाचाच साक्षात्कार आहे. ३८० रस, रसना व रसास्वाद हा त्रिविध भेद एक अभिन्न आत्माच होतो, त्यामुळेंच रससेवनामध्यें परमानंद प्रकट होतो. ८१ रसना कटु, मधुर वगैरे अनेक रसांचा स्वाद घेते. पण तो सर्व एक ब्रह्मरसच आहे अशा भावनेनें रसनेंद्रिय रसास्वाद घेऊं लागलें, म्हणजे तें ब्रह्मार्पणच होतें. ८२ आतां स्पर्श विषयाची रचना ब्रह्मार्पण कशी होते ती ऐक. ८३ आपल्या देहानें विषयाला जों स्पर्श करूं लागावें तों देहांतच तो देहरहित परमात्मा प्रकट होतो आणि मग भक्त ज्याला ज्याला स्पर्श करितो तो तो ब्रह्मार्पणानेंच निष्पन्न होतो. ८४ त्वगिंद्रियांनीं ज्याला स्पर्श करावा असें दुसरें कांहीं सांपडतच नाहीं, त्यामुळें एकत्वाच्या निमित्तानें कृष्णार्पणरूप भजन प्रकट होतें. ८५ जो जो पदार्थ घ्यावा तो तो समर्थ श्रीकृष्णच होतो आणि अशा भजना-नेंच भक्ताचा परमार्थ साधतो. ८६ देवाला कांहीं अर्पण करायला जों जावें, तों दान देणें व घेणें हीं दोन्हीं स्वतः देवच होतो. ८७ पायांनीं जेवढें चालावें तों सर्व मार्ग देवच होतो. मग प्रत्येक पावलागणिक निजभजन ब्रह्मार्पण होतें. ८८ चरणांची गती तीच पृथ्वीची स्वाभाविक स्थिति होत असल्यामुळें तशा युक्तीनें चालूं लागलें असतां भक्त अनायासानेंच तें आपलें कर्म ब्रह्मार्पण करूं शकतो. ८९ याप्रमाणें वागादि इंद्रियांची प्रत्येक क्रिया परमात्म्याच्या अधिष्ठानानेंच होत असल्यामुळें भगवद्भक्त जें जें कर्म करितो, तें तें त्याच्या भगवन्निष्ठेमुळें भगवदर्पण

मावळे निःशब्दीं। निःशब्दचि बोलिजे शब्दीं। तोचि अर्पणाचा विधी। जाण त्रिशुद्धी समर्पिते-निशीं ॥ ९१ ॥ बोलु बोलवितां बोलाआंतू। तो बोलु अर्पणेसींच येतू। ऐसा शब्देंचि निज भजनार्थू। प्रगटे परमार्थू ब्रह्मार्पणेंसीं ॥ ९२ ॥ ऐसा मनें कर्में वचनें। जो दृढावला भगवद्भजनें। तेंचि भजन अभिमानें। निजनिर्वाणें दृढ धरी ॥ ९३ ॥ तरंग समुद्राआंतौता। म्हणे माझेनि मेघु तत्त्वतां। जगातें निववितां जीववितां। तृषा हरितां चातकांची ॥ ९४ ॥ माझेनि सस्यें पिकती। माझेनि सरिता उसळती। मागुती मजमाजी मिळती। समरसती सिंधुत्वें ॥ ९५ ॥ तेवीं मुळींचें पूर्णपण। पावोनि भजे अभिमान। त्याचे भजनाचें लक्षण। सावधान अवधारीं ॥ ९६ ॥ म्हणे मी सकललोककर्ता। कर्म करोनि अकर्ता। मी सर्वभोगभोक्ता। नित्य अभोक्ता मी एकु ॥ ९७ ॥ सकळ लोकीं माझी सत्ता। सकळीं सकळांचा नियंता। सकळां सकळत्वें मी प्रकाशिता। होय मी शास्ता सकळिकांचा ॥ ९८ ॥ सकळां भूतीं मी एकु। मीचि व्याप्य व्यापकु। जनिता जनयिता जनकु। नहोनि अनेकु जगद्रूप मी ॥ ९९ ॥ मी देवांचा आदिदेवो। देवीं देवपणा माझाचि भावो। व्ययामाजीं मी अज अव्ययो। अक्षरीं अक्षरभावो माझेनि अंगें ॥ ४०० ॥ ईश्वरीं जे जे सत्ता। ते ते माझी सामर्थ्यता। भगवंतीं भगवंतता। जाण तत्त्वतां माझेनी ॥ १ ॥ मी आपरूपीं आपु। मी प्रकृतिपुरुषांचा बापु। सृष्टिरचनेचा संकल्पु। निर्विकल्पू पैं माझेनी ॥ २ ॥ मी आदीची अनादि आदी। मी समाधीची निजसमाधी। निजशुद्धीसी माझेनी शुद्धी। यापरी त्रिशुद्धी अभिमानार्पण ॥ ३ ॥ मी अजन्मा न जन्मोनि जन्में। मी अकर्मा न करोनि करी कर्में। माझेनि योगें पुरुषोत्तमें। पाविजे महिमे उत्तमत्वाचे ॥ ४ ॥ सच्छब्दें माझें अंग। चिच्छब्दें मीचि चांग। नहो-नियां तिन्ही भाग। आनंद निर्व्यंग तोचि मी ॥ ५ ॥ माझेनि सूर्यदृष्टी डोळस। मजमाजी चिदाकाशाचा अवकाश। माझेनि अंगें जगन्निवास। सावकाश नांदतु ॥ ६ ॥ अजा अजपणें मी अज। निःशेष

होतें. ९० याप्रमाणें शरीर, वाणी आणि मन यांच्या क्रियांनीं दृढ भगवद्भजन करण्याची ज्यांना संवय झालेली असते, त्यांचें तें भजन त्याच अभिमानानें अतिशय दृढ होतें. ९१-९३ समुद्रांत असलेला तरंग म्हणतो कीं, माझ्या-मुळें मेघ जगाला वृष्टीनें तृप्त करितो, जीवन देतो व चातकाची तृषा शांत करितो. ९४ माझ्यामुळें सर्व शेतें पिक-तात, नद्या दुथडी वाहूं लागतात, पुनः येऊन माझ्यांतच मिळतात आणि समुद्ररूप होतात. ९५ त्याच न्यायानें भगवद्भक्तहि आपल्या मूळच्या पूर्णपणाला प्राप्त होऊन पूर्णत्वाच्या अभिमानानेंच भजन करूं लागतो. ९६ तो म्हणतो कीं, मी सकल लोककर्ता आहें. कर्म करून अकर्ता आहें. मीच सर्व भोग भोगणारा पण स्वरूपानें नित्य अभोक्ता व एक आहें. ९७ सर्व लोकीं माझीच सत्ता आहे. मीच सर्वांचा सर्वरूपानें नियंता, प्रकाशिता व शास्ता आहें. ९८ सर्व भूतांमध्यें मी एक, मीच व्याप्य म्ह० कार्य व व्यापक म्ह० कारण आहें. मीच सर्वांचा उत्पादक जनक असून उत्पन्न होणाराहि मीच आहें. मी आपलें एकत्व न सोडितां जगद्रूप होतों. ९९ मी देवांचा आदिदेव आहें. देवांचें देवपण हें माझेंच स्वरूप आहे. विनाशी पदार्थांत अव्यय व अज मी आहें. माझ्याच स्वरूपानें अक्षराला अक्षरत्व आहे. ४०० ईश्वरामध्यें जी सत्ता आहे ती माझ्यामुळेंच आहे. फार काय, पण भगवंतांतील भगवंतपणा वस्तुतः मजमुळेंच आहे. १ मी जलांत रसरूप आहें. मी प्रकृतिपुरुषांचा जनक म्ह० आधार, सृष्टिरचनेचा संकल्प आहें. पण स्वरूपतः निर्विकल्प आहें. २ मी सर्व कारणांचें आदिकारण, समाधींची नित्यसिद्ध समाधि. माझ्यामुळेंच पवित्र पदार्थांना पावित्र्य प्राप्त झालें आहे. याप्रमाणें भगवद्भक्त ईश्वराच्या ठिकाणीं अभिमान अर्पण करितो. ३ मी वस्तुतः जन्मशून्य आहें. त्यामुळें अविद्यादिकांच्या अधीन होऊन वास्तविक जन्म न घेतां मायिक जन्म मी घेतों. मी अकर्मा आहें. त्यामुळें वस्तुतः कांहीं न करितां शरीरेंद्रियांच्या द्वारां सर्व कर्में मी करितों. माझ्यामुळेंच पुरुषोत्त-माला उत्तमत्व प्राप्त झालें आहे. ४ सत्, चित् व आनंद या अभिन्न तीन धर्मांनीं मीच बोलला जातों. ५ माझ्या-मुळेंच सूर्याची सर्व दृष्टी डोळस झाली आहे म्ह० माझ्यामुळेंच सूर्याला सर्व प्रकाशकत्व आलें आहे. मीच चैतन्याचा आधार आहें. माझ्या स्वरूपानेंच जगन्निवास जगांत नांदत आहे. ६ मी अज आहें. अजत्वानेंच मायेला अजत्व

निर्बीजा मी बीज । माझेनि निजांगें निज । निजभोज स्वयें नाचे ॥ ७ ॥ अधिष्ठाना मजमाजीं अधिवासु । मी जगदीशांचा पूर्ण ईशु । मी परम पुरुषाचाही पुरुषु । परेशा परेशु मीच स्वयें ॥ ८ ॥ असंत माझेनि संत होये । अचित् माझेनि चिद्त्व लाहे । निजानंदाशिही पाहें । आनंदू निर्वाहे माझेनी ॥ ९ ॥ मी सकळ सिद्धींची निजसिद्धी । मी सर्वांगदेखणी बुद्धीची बुद्धी । मोक्ष म्हणणें तोही उपाधी । जाण त्रिशुद्धी माझेनी ॥४१०॥ मी साचार निजधर्म । मजमाजी ब्रह्म विसरे कर्म । ब्रह्मसमाधीचें परब्रह्म । निजनिःसीम मीच मी ॥ ११ ॥ हरि हर ब्रह्मा निजनिर्धारीं । हेही माझे अंशांशधारी । मी दशावतारांचा अवतारी । माझी निजथोरी मीही नेणें ॥ १२ ॥ ऐसिया नाना विवंचना । अभिमानें भजे भगवद्भजना । ब्रह्माहमस्मि दृढ भावना । आपआपणयां पूर्णत्वें अर्पी ॥ १३ ॥ जीव घालूनि पूर्णत्वाआंत । जें जें अभिमान कल्पित । तें तें साचचि स्वयें होत । तेंही पूर्णत्व अर्पितु निजपूर्णत्वीं ॥ १४ ॥ ब्रह्माहमस्मि नुसधें वचन । ये अहंते नाम भगवद्भजन । मा हा तंव तद्रूप होऊन । भजे अभिमान ब्रह्मार्पणेंसीं ॥ १५ ॥ सांडूनि देहबुद्धीचा केरू । भजनें उठिला अहंकारू । तो अपरोक्ष निजसाक्षात्कारू । पावूनि पूर्ण निर्धारू पूर्णत्वें वर्ते ॥ १६ ॥ म्हणोनि मनना मीचि मनन । स्मरणा मीचि नित्यस्मरण । चित्तासी मी निजचिंतन । चिंत्यधर्मेंवीण सर्वदा ॥ १७ ॥ ज्याची सहसा प्राप्ती नव्हे । तें तें निजचित्तें चिंतावें । तंव अप्राप्तीसीचि प्राप्ति पावे । चित्त निजानुभवें सहज भजतां ॥ १८ ॥ तेव्हां निश्चतें जें जें चिंती चित्त । तें तें स्वयेंचि होय समस्त । या प्रतीती चित्त भजत । ब्रह्मार्पणयुक्त निजबोधें ॥ १९ ॥ नाथिलें चिंती ते अतिचिंता । आथिलें चिंती ते निश्चिंतता । आथीनाथी सांडूनि चित्ता । सहजें न भजतां भजन होय ॥ ४२० ॥ चित्त चिंत्य आणि चिंतन । या तिहीं जाहलें समाधान । तें समाधानही कृष्णा-

---

प्राप्त झालें आहें. सर्व निर्बीज पदार्थांतील बीज मीच आहें. माझ्याच स्वरूपानें हा मायानट अनेक वेष घेऊन हें जगद्रूप नाटक करून दाखवीत आहे. ७ मी सर्व अधिष्ठानांचें अधिष्ठान, सर्व जगदीशांचा पूर्ण ईश, परम पुरुषाचाहि पुरुष व स्वतः परेशाचाहि परेश आहें. ८ सर्व असत् म्ह० मिथ्या पदार्थहि माझ्या सत्तेनें सत्तावान होतात, जड पदार्थहि सचेतन होतात व माझ्या आनंदानें सानंद होतात. ९ मी सर्व सिद्धींची मूळसिद्धि, बुद्धींची सर्वांगसुंदर बुद्धि. 'मोक्ष' ही सुद्धां माझ्यामुळेंच उत्पन्न झालेली उपाधि आहे. ४१० मी आत्मधर्म आहें. माझ्यामध्येंच ब्रह्म कर्मालाहि विसरतें. ब्रह्मसमाधीचें निरसीम अधिष्ठान एक मीच आहें. ११ ब्रह्मा, विष्णु, महेश्वर हेहि माझ्या अंशाच्याहि अंशाला धारण करितात. मी दशावतारांचाहि अवतारी आहें. माझें स्वभाविक महत्त्व मीच जाणत नाहीं. १२ अशा नाना विवंचनांच्या अभिमानांनीं तो भगवद्भजन करितो. 'मीच ब्रह्म आहें' अशा भावनेनें आपल्यालाच आपलें समर्पण करितो. १३ जीवाला पूर्णत्वामध्यें मिळवून जें जें अभिमानानें कल्पितो, तें तें तो स्वतःच खरोखर होतो. आणि तें अभिमानानें संपादन केलेलें पूर्णत्वहि आपल्या स्वाभाविक पूर्णत्वांत अर्पितो. १४ 'मी ब्रह्म आहें' हें नुस्तें वचन आहे. त्यांतील अहंतेला भगवद्भजन हें नांव आहे. त्यामुळें भक्त अभिमानानें तद्रूप होऊन ब्रह्मार्पणाचा अनुभव घेतो. १५ देहबुद्धीचा केर टाकून भजनानें जो अहंकार उत्पन्न होतो, तोच अपरोक्ष आत्मसाक्षात्कार होय. त्याच्या योगानें आपल्या पूर्णत्वाचा निश्चय करून तो पूर्णत्वानेंच रहातो. १६ म्हणून मननाचें मननहि मीच. स्मरणाचें नित्यस्मरणहि मीच. चिन्त्य धर्मावांचून चित्ताचें निजचिंतन सर्वदा मीच आहें. १७ ज्याची प्राप्ति होत नाहीं, त्याचेंच चित्त चिंतन करितें, पण चित्त स्वानुभवानें भजूं लागलें असतां तें अप्राप्तालाच सहज प्राप्त होतें. १८ म्ह० चित्त निश्चयानें ज्याचें ज्याचें चिंतन करितें तें स्वतःच तद्रूप बनतें. या प्रतीतीनें चित्त स्वानुभवानें ब्रह्मार्पणयुक्त भजन करितें १९ नसलेल्याचें चिंतन करणें ही अति चिंता आणि असलेल्याचें चिंतन करणें ही निश्चितता. 'असणें व नसणें' हे दोन्ही भाव सोडिले असतां भजन न करितांहि चित्ताचें भजन सहज सिद्ध होतें. ४२० चित्त, चिंत्य आणि चिंतन या त्रिपुटीचें

र्पण । सहजीं संपूर्ण स्वयें होये ।। २१ ।। ऐसिया भगवद्भजनविधी । भजनशील जाली बुद्धी । तैं सकळ कर्मीं समाधी । जाण त्रिशुद्धी स्वयें जाली ।। २२ ।। कर्माचरणीं समाधी । एक म्हणती न घडे कधीं । ते पावले नाहीं निजात्मबोधीं । जाण त्रिशुद्धी विदेहा ।। २३ ।। ताटस्थ्या नांव समाधी । म्हणेल त्याची ठकली बुद्धी । ते समाधी नव्हे त्रिशुद्धी । जाणावी नुसधी मूर्च्छा आली ।। २४ ।। ताटस्थ्यापासूनि उठिला । तैं तो समाधीस मुकला । तेव्हां एक देशी भावो आला । मंद या बोला न मानिती सत्य ।। २५ ।। समाधी आणि एकदेशी । बोलतां बोलणें ये लाजेसी । सत्य मानीं ते शब्दपिशी । शुद्ध स्वरूपासी अनोळख ।। २६ ।। येथें प्राचीन अतिसमर्थ । ते मूर्च्छा आणोनि करी तटस्थ । बांचूनि चालते समाधिस्थ । जाण पां निश्चित वसिष्ठादिक ।।२७।। पाहें पां देवर्षि नारदु । विनोदें न मोडे समाधिबोधु । याज्ञवल्क्याचा समाधिसंबंधु । ऋषि प्रसिध्दु परीक्षा केली ।। २८ ।। स्वरूप देखोनि मूर्छित जाहला । तो आपणियां आपण तरला । स्वयें तरूनि जन उद्धरिला । तो बोधु प्रकाशिला शुकवामदेवीं ।।२९।।यालागीं समाधि आणि व्युत्थान । या दोनी अवस्थांसहित जाण । बुद्धी होये ब्रह्मार्पण । अखंडत्वें पूर्ण समाधी ।।४३०।। अर्जुना देऊनि निजसमाधी । सर्वेचि घातला महायुद्धीं । परी तो कृष्ण कृपानिधी । ताटस्थ्य तें त्रिशुद्धी नेदीच स्पर्शों ।। ३१ ।। सकळ कर्मीं समाधी । हे सद्‌गुरूचि बोधी बुद्धी । तरी युद्धींही त्रिशुद्धी । निजसमाधी न मोडे ।। ३२ ।। बुद्धीं आकळलें परब्रह्म । तैं अहेतुक चाले कर्म । हेंचि बुद्धीचें अर्पण परम । इतर तो भ्रम अनुमानज्ञान ।। ३३ ।। स्वरूपीं दृष्टी निरवधी । अनवच्छिन्न समानबुद्धी । कर्माकर्मीं अज्ञान न बाधी । परमसमाधी तिये नांव ।। ३४ ।। निःशेष गेलिया देहबुद्धी । स्वरूपपणें फुंज न बाधी । कर्माकर्मीं

समाधान म्ह० एकरूपत्व झालें असतां, तें समाधानहि आपोआपच पूर्ण कृष्णार्पण होतें. २१ अशा भगवद्भजन प्रकारानें बुद्धि भजनशील झाली कीं, सर्व कर्मांमध्यें साक्षात् समाधान झालें असें समजावें. २२ कर्माचरण करीत असतांना चित्ताचें समाधान रहात नाहीं, असें कित्येक म्हणतात. पण त्यांना आत्मसाक्षात्कार झाला नाहीं हें तूं निश्चयानें जाण. २३ समाधि ही एक निराळी अवस्था आहे, असें जो म्हणेल, त्याची बुद्धि भ्रांत झाली आहे असें समज. ती खरी समाधि नसून मूर्च्छा आहे. २४ जो समाधीला पृथगवस्था जाणतो तो तिला मुकला आहे असें समजावें. कारण समाधीला तटस्थ मानिल्यानें त्याला एकदेशी भाव प्राप्त झाला असें समजावें; पण मतिमंद हें आमचें बोलणें सत्य मानीत नाहींत. २५ समाधि आणि ती एकदेशी असें म्हणणें हें बोलणाराला लज्जास्पद आहे. पण त्यालाहि जो सत्य मानितो, तो शब्दपांडित्यानें वेडा झाला आहे असें समजावें. त्याला शुद्धस्वरूपाची ओळखच नाहीं. २६ वसिष्ठादि प्राचीन अति समर्थ ज्ञानी भक्त चालते बोलते समाधिस्थ होते. ते समाधीला मूर्च्छेप्रमाणें तटस्थ मानीत नव्हते. २७ देवर्षि नारदाकडे पहा! त्याचा समाधिबोध कधीं लीलेनेंहि भंग पावत नाहीं. याज्ञवल्क्याचा समाधिसंबंध किती दृढ होता त्याची परीक्षा ऋषींनीं तुझ्याच यज्ञांत केली आहे. २८ स्वरूपाला पाहून जो मूर्च्छित झाला तो आपला आपणच तरला. व त्यानें स्वतः तरून लोकांचाहि उद्धार केला. शुक, वामदेव, इत्यादिकांनीं अशा प्रकारचाच बोध प्रकट केला आहे. २९ म्हणून समाधि आणि व्युत्थान या दोन्ही अवस्थांसह बुद्धीनें ब्रह्मरूप होणें हीच अखंड पूर्ण समाधि आहे. ४३० अर्जुनाला आत्मसमाधि देऊन तत्काळ महायुद्धामध्यें गुंतविलें. तरी पण कृपासागर कृष्णानें त्याला तटस्थपणाचा स्पर्शहि होऊं दिला नाहीं. ३१ सर्व कर्मांमध्यें चित्ताचें समाधान ठेवणें हीच युक्ति सद्‌गुरु सांगतात. श्रीकृष्णानें अर्जुनाला तीच युक्ति सांगितली. त्यामुळें घोर युद्धप्रसंगींहि अर्जुनाची समाधि ढळली नाहीं. ३२ बुद्धीनें परब्रह्माचें ग्रहण केलें म्हणजे निर्हेतुक कर्म अविछिन्न चालतें. हेंच बुद्धीचें परम अर्पण आहे. बाकी सर्व अनुमानज्ञान हा भ्रम आहे. ३३ स्वरूपामध्यें दृष्टि तन्मय होऊन गेली म्हणजे मग कर्म-अकर्मप्रसंगीं अज्ञान त्या समबुद्धि पुरुषाला बाधा करूं शकत नाहीं. हीच परम समाधि होय. ३४ देहबुद्धि निःशेष गेली म्हणजे मग अहंकार जीवमात्रानें पीडा देत नाहीं. ३५ बुद्धि

अज्ञान न बाधी । दे परमसमाधी निर्दुष्ट ॥ ३५ ॥ तें स्वरूपीं निरवधी । भजनशीळ जाली बुद्धी । ते सकळ कर्मीं समाधी । निजार्पणविधी स्वयें जाहली ॥ ३६ ॥ जेथें शमली मनाची आधी । ते जाणावी परमसमाधी । समाधी घेणें ते देहबुद्धी । काष्ठ तें त्रिशुद्धी मूर्च्छितप्राय ॥ ३७ ॥ मनासी ठाउकें नसे । इंद्रियीं व्यापारू तरी दिसे । कर्म निपजे जें जें ऐसें । तें जाणिजे आपैसें कायिक ॥ ३८ ॥ श्वासोच्छ्वासांचें परिचार । कां निमेषोन्मेषांचे व्यापार । तेही नारायणपर । केले साचार निजस्वभावें ॥ ३९ ॥ तरी देहगेहवर्णाश्रमें । स्वभागा आलीं जीं जीं कर्में । तीं तीं आचरोनि निजधर्में । पूर्वानुक्रमें अनहंकृती ॥ ४४० ॥ साकरेचें कारलें प्रौढ । तें देंठकाटेनशीं सर्व गोड । तेवीं इंद्रियें कर्मगूढ । स्वादिष्ठ सदृढ ब्रह्मार्पणें ब्रह्मीं ॥ ४१ ॥ कर्मकलापु आघवा । आचरोनि आणी गौरवा । परी कर्तेपणाचिया गांवा । अहंभावा स्पर्शेना ॥ ४२ ॥ मजपासून जालें सत्कर्म । माझा आचार अति उत्तम । म्यां निरसिलें मरणजन्म । हा स्वभावें देहधर्म उठोंचि नेणे ॥ ४३ ॥ देहसंगें तरी वर्तणें । वरी देहधर्म धरूं नेणें । देहस्वभावलक्षणें । ब्रह्मार्पणें विचरती ॥ ४४ ॥ देहधर्माचा नुठे फांटा । ज्ञानगर्वाचा न चढे ताठा । यालागीं सहजभजना माजिवठा । जाला तो पैंठा अनहंकृती ॥ ४५ ॥ त्यापासूनि जें जें निपजे । तें तें देवो म्हणे माझें खाजें । यालागीं ब्रह्मार्पणवोजें । त्याचे स्वभाव सहजें नार्पितां अर्पिती ॥ ४६ ॥ परिसाचे कसवटीवऱ्हें । जें जें लागे तें तें साडेपंधरें । तेवीं निपजे जें जें शरीरें । तें तें खरें परब्रह्म ॥ ४७ ॥ त्याचा खेळ तेंचि महापूजन । त्याची बडबड तेंचि प्रिय स्तवन । त्याचे स्वभावीं स्वानंदपूर्ण । श्रीनारायण सुखावे ॥४८॥ तो जेउती वास पाहे । आवडीं देवो तेउता राहे । मग पाहे अथवा न पाहे । तरी देवोचि स्वयें स्वभावें दिसे ॥ ४९ ॥ तयासी चालतां मार्गें । तो मार्गू होइजे श्रीरंगें । तो देवाचिया दोंदावरी

भजनशील होऊन स्वरूपामध्यें तादाम्य पावली म्हणजे सर्व कर्मांमध्यें समाधि स्थिर रहाते, अशी निरवधि बुद्धि हीच आत्मनिवेदनरूप नववी भक्ति आहे. ३६ मनाची तळमळ नाहींशी होणें हीच परम समाधि होय. बाकी देहबुद्धीला न टाकतां नुसतें चित्ताला स्थिर करणें, म्हणजें देहाला काष्ठासारखें मूर्च्छित करण्यासारखेंच आहे. ३७ मनाला न कळतांच इंद्रियें सर्व व्यापार करीत असतात असें दिसतें. अशा स्थितींत जीं जीं कर्में होतात तीं तीं सर्व स्वाभाविक कायिक कर्में होत. ३८ श्वासोच्छ्वास, निमेषोन्मेष इत्यादि व्यापारहि ज्यानें स्वभावतःच नारायणार्पण केले त्याचें सर्व कर्म ब्रह्मार्पण होतें. ३९ देह, गेह, वर्ण, आश्रम यांच्या संबंधानें जीं जीं कर्में आपल्या वांट्याला आलीं असतील, तीं तीं अहंकार सोडून स्वधर्मानें आचरिलीं असतां स्वभावतःच ब्रह्मार्पण होतात. ४४० साखरेचें मोठें थोरलें कारलें केलें, तर त्याचा देंठ, कांटे, इत्यादि सर्वच जसे गोड, त्याप्रमाणें कर्मांमध्यें गढून गेलेलीं इंद्रियें ब्रह्मार्पणामुळें ब्रह्मामध्यें स्वानंदपूर्ण होतात. ४१ सर्व कर्मसमूह मोठ्या समारंभानें आचरितो, पण कर्तृत्वाभिमानाला स्पर्श करीत नाहीं. ४२ माझ्यापासून सत्कर्म झालें, माझा आचार अति उत्तम आहे, मीं जन्ममरणाचें निरसन केलें, हा स्वाभाविक देहधर्म उठूं देत नाहीं. ४३ देहसंबंधानें तर वर्तन करितो, पण देहाभिमान कसा धरावा तें जाणत नाहीं, तर केवळ ब्रह्मार्पणबुद्धीनें देहस्वभावानें वागतो. ४४ देहधर्माचा अंकुर उत्पन्न होऊं देत नाहीं, ज्ञानगर्वाचा ताठा चढत नाहीं, तर सहज भजनामध्यें देहभान विसरून प्रवृत्त होतो, तो निरहंकार पुरुष ब्रह्मार्पणांत प्रविष्ट झाला असें समजावें. ४५ ज्याच्यापासून जें जें कांहीं उत्पन्न होतें, तें तें सर्व माझेंच खाद्य आहे असें देव समजतो. त्यामुळें ब्रह्मार्पणाच्या निमित्तानें ब्रह्मार्पण न केलेलेंहि सर्व ब्रह्मार्पण होतें. ४६ परिसाच्या कसोटीवर जें जें लोखंड लागतें तें तें शंभर नंबरी सोनें होतें. त्याचप्रमाणें शरीरानें जें जें घडतें तें तें सर्व परब्रह्मच होतें. ४७ याचा जो खेळ तेंच महापूजन, याची जी बडबड तेंच प्रिय स्तोत्र, याप्रमाणें स्वानंदपूर्ण नारायण त्याच्या स्वभावामध्यें सुखी होतो.४८ तो जेथें जेथें पहातो, तेथें तेथें देव उभा रहातो. पुढें मग त्यानें जरी पाहिलें किंवा न पाहिलें तरी त्याला स्वभावतः स्वतः देवच दिसतो. ४९ तो मार्गानें जाऊं लागला असतां स्वतः श्रीरंगच त्याचा मार्ग बनतो. आणि मग देवाच्या

वेगें। चाले सर्वांगें डुल्लत ॥ ४५० ॥ जें जें कर्म स्वाभाविक । तें तें ब्रह्मार्पण अहेतुक । या नांव भजन निर्दोख। भागवतधर्म देख या नांव ॥ ५१ ॥ स्वाभाविक जें वर्तन । तें सहजें होय ब्रह्मार्पण। या नांव शुद्ध आराधन। भागवतधर्म पूर्ण जाण राया ॥ ५२ ॥ यापरी भगवद्भजनकथा। भय नाहीं गा सर्वथा। अभय पुशिलें नृपनाथा। तें जाण तत्त्वतां भजनें होय ॥ ५३ ॥ येथें भयाचें कारण। राया तूं म्हणशील कोण। तेंही सांगों सावधान। ऐक श्रवणसौभाग्यनिधी ॥ ५४ ॥

भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यादीशादपेतस्य विपर्ययोऽस्मृतिः ।
तन्मायया‌ऽतो बुध आभजेत्तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा ॥३७॥

आत्मा पूर्णत्वें सर्वत्र एक। तेथ जो म्हणे मी वेगळा देख। तेंचि अज्ञान भयजनक। दुःखदायक अतिद्वंद्वें ॥ ५५ ॥ भयाचें मूळ दृढ अज्ञान। त्याचें निवर्तक मुख्य ज्ञान। तेथ कां लागलें भगवद्भजन। ऐसा ज्ञानाभिमान पंडितां ॥५६॥ ऐक राया येचि अर्थी। ज्ञानासी कारण मुख्य भक्ती। हा कृतनिश्चयो आमुच्या मतीं। तेही उपपत्ती अवधारीं ॥ ५७ ॥ अज्ञानाचें मूळ माया। जे ब्रम्हादिकां न ये आया। गुणमयी लागली प्राणियां। जाण ते राया अति दुस्तर ॥ ५८ ॥ त्या मायेचें मुख्य

अंगावर हा आपल्या सर्वांगानें डुलत चालतो. ४५० जें जें स्वाभाविक कर्म तें तेंच निष्काम ब्रह्मार्पण होय. यालाच निर्दोष भजन व भागवतधर्म असें नांव आहे. ५१ हे राजा, भगवद्भक्ताचें जें स्वाभाविक वर्तन तें तें सहज ब्रह्मार्पण होय. यालाच शुद्ध आराधन व पूर्ण भागवतधर्म हें नांव आहे, असें तूं समज. ५२ याप्रमाणें जी भगवद्भजनकथा तिला कोठेंहि भय नाहीं. हे राजा, तूं जें अभय विचारिलें होतेंस तें या भजनानें प्राप्त होतें, असें तूं तत्त्वतः जाण. ५३ जनका, या संसारांत भयाचें कारण काय आहे म्हणून विचारशील, तर तेंहि सांगतों, सावधान चित्तानें ऐक. ४५४.

— अज्ञानकल्पित भयाची केवळ ज्ञानानेंच जर निवृत्ति होणें शक्य आहे तर मग अशा परमेश्वरभजनाचा काय उपयोग, अशी घेऊन शंका कवी सांगतो—

ईशात् अद्पेतस्य-ईश्वरापासून विमुख झालेल्या पुरुषाला, **तन्मायया**—त्याच्या मायेनें, **अस्मृतिः**—भगवत्स्वरूपाचें विस्मरण होतें. **ततः विपर्ययः**—त्यामुळें देह मी अशी भावना होते. त्या कारणानें, **द्वितीयाभिनिवेशतः**—द्वैताभिमानामुळें, **भयं**—भय होतें. **अतः बुधः**—म्हणून विवेकी पुरुषानें, **गुरुदेवतात्मा सन्**— गुरुच देवता म्ह० ईश्वर व आत्मा म्ह० अतिशय प्रिय ज्याला आहे असा होऊन, **एकया भक्त्या**—अव्यभिचारिणी भक्तीनें, **तं ईशं आभजेत्**—त्या ईश्वराला सर्वप्रकारें भजावें. [ज्याअर्थी त्याच्या मायेनें भय उत्पन्न होतें, त्याअर्थी बुद्धिमानानें त्याचेंच भजन करावें. " अहोपण, 'देहादिकच मी ' अशा अभिनिवेशामुळें भय उद्भवतें, तो देह अहंकारामुळें होतो. अहंकार स्वरूपाच्या विस्मरणामुळें होतो. तेव्हां त्या भयोत्पत्तीला माया कशी कारण होते, " असें कोणी विचारील म्हणून कवि म्हणतो कीं, ईश्वरापासून जो विमुख होतो त्याला ईश्वराच्या मायेनें भगवत्स्वरूपाचा अनुभव येईनासा होतो. त्याच स्वरूपविस्मरणामुळें 'देहच मी ' अशी विपरीत भावना होते. या विपरीत भावनेमुळें द्वैताविषयीं आग्रह उद्भवतो आणि द्वैतदर्शनामुळें भय होतें. लौकिक मायेमध्येंहि असाच अनुभव येतो. भगवद्गीतेंतहि ' ही माझी दैवी गुणमयी माया तरून जाणें फार कठिण आहे. मलाच जे शरण येतात तेच तिचें उल्लंघन करितात'. सु. गी. अ. ७. १४. पृ. १५१ असें सांगितलें आहे. म्हणून अनन्य भक्तीनें सर्व भावानें ईश्वराचें भजन करावें, आणि त्या भक्तानें आपला गुरु हाच ईश्वर व अति प्रिय आत्मा आहे अशी दृष्टी ठेवावी.] ३७.

आत्मा पूर्णत्वानें सर्वत्र एक आहे. तथापि ' मी त्याहून वेगळा आहें ' असें समजणें हेंच भयजनक अज्ञान आहे. ते द्वंद्वांच्या द्वारां दुःख देणारें आहे. ५५ भयाचें दृढ मूळ अज्ञान आहे व त्याचें मुख्य निवर्तक ज्ञान आहे. तेव्हां भगवद्भजन त्याचें निवर्तन कसें करणार ? असा पंडितांना ज्ञानाभिमान असतो. ५६ पण राजा, ज्ञानाचें मुख्य कारण भक्ति आहे, असा आमचा दृढनिश्चय आहे. त्याविषयीं युक्ति सांगतों ती ऐक. ५७ ब्रह्मादिकांच्याहि आटोक्यांत न येणारी माया अज्ञानाचें मूळ आहे. ती गुणमयी माया प्राण्यांच्या पाठीस लागली आहे व ती अति

लक्षण । स्वस्वरूपाचें आवरण । द्वैताचें जें जें स्फुरें स्फुरण । मूळमाया जाण तिचें नांव ॥ ५९ ॥ ब्रह्म अद्वयत्वें परिपूर्ण । ते स्वरूपीं स्फुरे जें मीपण । तेंचि मायेचें जन्मस्थान । निश्चयें जाण नृपनाथा ॥४६०॥ ते मायेच्या निजपोटीं । भयशोकदुःखांचिया कोटी । ब्रह्माशिवादींचे लागे पाठी । इतरांची गोठी ते कोण ॥६१॥ ते महामायेची निवृत्ती । करावया दाटुगी भगवद्भक्ती । स्वयें श्रीकृष्ण येचि अर्थीं । बोलिला अर्जुनाप्रती गीतेमाजी ॥ ६२ ॥

॥ भगवद्गीताश्लोकार्ध ॥ मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥

माया म्हणिजे भगवच्छक्ती । भगवद्भजनें तिची निवृत्ती । आन उपाय तेथें न चलती । भक्त सुखें तरती हरिमाया ॥ ६३ ॥ हरीची माया हरिभजनें । हरिभक्तीं सुखेंचि तरणें । हें निजगुह्य अर्जुनाचेनि कारणें । स्वयें श्रीकृष्णें सांगितलें ॥ ६४ ॥ मायेची हेचि निजपुष्टी । स्वरूपीं विमुख करी दृष्टी । द्वैतभावें अत्यंत लाठी । भ्रमाची त्रिपुटी वाढवी सदा ॥ ६५ ॥ भयाचें जनक द्वैतभान । द्वैतजनक माया जाण । मायानिवर्तक ब्रह्मज्ञान । हें संतसज्ञान बोलती ॥ ६६ ॥ ऐसें श्रेष्ठ जें ब्रह्मज्ञान । तें भक्तीचें पोषण जाण । न करितां भगवद्भजन । ब्रह्मज्ञान कदा नुपजे ॥ ६७ ॥ जरी जाहले वेदशास्त्रसंपन्न । तिंहीं न करितां भगवद्भजन । मायानिवर्तक ब्रह्मज्ञान । तयांसीही जाण कदा नुपजे ॥ ६८ ॥ शब्दज्ञानाची व्युत्पत्ती । दाटुगी होय लौकिक स्थिती । मायानिवर्तक ज्ञानप्राप्ती । न करितां हरिभक्ति कदा नुपजे ॥ ६९ ॥ हरिगुणांची रसाळ कहाणी । ते ब्रह्मज्ञानाची निजजननी । हरिनामाचेनि गर्जनीं । जीव घेऊनी माया पळे ॥४७०॥ माया पळतां पळों न लाहे । हरिनामधाकें विरोनि जाये । यालागीं हरिमाया पाहें । बाधूं न लाहे हरिभक्तां ॥ ७१ ॥ नामाची परम दुर्धर गती । माया साहों न शके निजशक्ती । हरिभक्त माया सुखें तरती । यालागीं श्रीपती बोलिला स्वयें ॥ ७२ ॥ सायुज्यादि चारी मुक्ती । अंकीं वाढवी भगवद्भक्ती । ते न करितां अनन्यगती । शास्त्रज्ञां मुक्ती न घडे

दुस्तर आहे. ५८ स्वरूपाला आच्छादित करणें हें तिचें मुख्य लक्षण आहे. द्वैतस्फुरण यालाच 'मूळमाया' असें नांव आहे. ५९ ब्रह्म एकत्वानें परिपूर्ण आहे. पण त्या स्वरूपामध्येंहि जें मीपण स्फुरतें तेंच मायेचें जन्मस्थान आहे, असें तूं निश्चयानें जाण. ४६० या मायेच्या पोटीं भय, शोक, दुःख यांच्या कोटि उत्पन्न होतात. ती ब्रह्मा, शिव इत्यादिकांच्याहि पाठीस लागली आहे, तेथें इतरांची काय कथा ! ६१ या महामायेची निवृत्ति करण्यास एक भगवद्भक्तीच समर्थ आहे. 'मलाच जे शरण येतात ते या मायेला तरून जातात' असें श्रीकृष्णांनीं गीतेंत अर्जुनाला सांगितलें आहे. ६२ माया म्ह० भगवानांची शक्ति. त्यामुळें भगवद्भजनानेंच तिची निवृत्ति होते. तेथें अन्य उपाय चालत नाहींत. भक्त हरीच्या मायेला अनायासानें तरतात, ६३ हें निजगुह्य श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितलें आहे. ६४ स्वरूपापासून पुरुषाची दृष्टि विमुख करणें, यांतच मायेची सर्व पुष्टि आहे. ती द्वैतभावानें द्रष्टा, दर्शन, दृश्य इत्यादि भ्रमाची त्रिपुटी सदा वाढविते. ६५ द्वैताचें भान हेंच भयाचें कारण आहे. माया द्वैताची जननी आहे व ब्रह्मज्ञान मायानिवर्तक आहे, असें ज्ञानी संत सांगतात. ६६ पण असें जें मायानिवर्तक ब्रह्मज्ञान तें भक्तीनें उत्पन्न होतें. भगवद्भजन केल्यावांचून ब्रह्मज्ञान केव्हांहि होत नाहीं. ६७ जरी कोणी मोठे वेद-शास्त्रसंपन्न झाले तरि त्यांनाहि भगवद्भजनावांचून मायानिवर्तक ब्रह्मज्ञान होत नाहीं. ६८ शास्त्रव्युत्पत्ति कितीहि जरी दांडगी असली व लोकव्यवहारहि उत्तम प्रकारें कळत असला तरी हरिभक्ती केल्यावांचून मायेची निवृत्ति करणारी ज्ञानप्राप्ति होत नाहीं. ६९ हरिगुणांची रसाळ कथा ब्रह्मज्ञानाची आई आहे. हरिनामाची गर्जना ऐकून माया जीव घेऊन पळत सुटते, ४७० पण हरिनामाच्या धाकानें तिला पळवतहि नाहीं, तर ती जागच्या-जागींच विरून जाते. ती हरिभक्ताला बाध करूं शकत नाहीं. ७१ नामाचें माहात्म्य माया स्वसामर्थ्यानें सहन करूं शकत नाहीं. त्यामुळें हरिभक्त तिला अनायासानें तरून जातात, असें श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. ७२ सायुज्यादि चारहि मुक्तींना हरिभक्ति आपल्या अंकावर वाढविते. त्यामुळें अनन्यभावानें भगवद्भक्ति केल्यावांचून

कदा ॥ ७३ ॥ हरिभजनीं जे विमुख । त्यांसी सदा द्वैत संमुख । महाभयेंसीं दुःखदायक । प्रपंचु देख दृढ वाढे ॥ ७४ ॥ जेवीं एकाएकीं दिग्भ्रम पडे । तो पूर्व म्हणे पश्चिमेकडे । तैसी वस्तु विमुखें वाढे। अतिगाढें मिथ्या द्वैत ॥ ७५ ॥ द्वैताचिये भेदविहिरे । सुटती संकल्पविकल्पांचे झरे । तेथ जन्ममरणांचेनि पूरें । बुडे एकसरें ब्रह्मांडगोळ ॥ ७६ ॥ जन्ममरणांचिया वोढी । नाना दुःखांचिया कोडी । अभक्त सोशिती सांकडीं । हरिभक्तांतें वोढी स्वप्नींही न लगे ॥ ७७ ॥ भक्तीचें अगाध महिमान । तेथें रिघेना भवबंधन । तें करावया भगवद्भजन । सद्गुरुचरण सेवावे ॥७८॥ निजशिष्याची मरणचिंता । स्वयें निवारी जो वस्तुतां । तोची सद्गुरु तत्त्वतां । येर ते गुरुता मंत्रतंत्रोपदेशें ॥ ७९ ॥ मंत्रतंत्र उपदेशिते । घरोघरीं गुरु आहेत आइते । जो शिष्यासी मेळवी सद्वस्तूतें । सद्गुरु त्यातें श्रीकृष्ण मानी ॥ ४८० ॥ गुरु देवो गुरु माता पिता । गुरु आत्मा ईश्वरु वस्तुतां । गुरु परमात्मा सर्वथा । गुरु तत्त्वतां परब्रह्म ॥ ८१ ॥ गुरूचे उपमेसमान । पाहतां जगीं न दिसे आन । अगाध गुरूचें महिमान । तो भाग्येंवीण भेटेना ॥ ८२ ॥ निष्काम पुण्याचिया कोडी । अगाध वैराग्य जोडे जोडी । नित्यानित्यविवेक आवडी । तैं पाविजे रोकडी सद्गुरुकृपा ॥ ८३ ॥ सद्गुरुकृपा हातीं चढे । तेथें भक्तीचें भांडार उघडे । तेव्हां कळिकाळ पळे पुढें । कायसें बापुडें भवभय ॥८४॥ गुरूतें म्हणों मातापिता । ते एकजन्मीं सर्वथा । हा सनातन तत्वतां । जाण पां वस्तुता मायबापू ॥ ८५ ॥ अधोद्वारें उपजविता । ते लौकिकीं मातापिता । अधोद्वारा आतळों नेदिता । तो सद्गुरु पिता सत्यत्वें शिष्यां ॥ ८६ ॥ गुरूतें म्हणों कुळदेवता । तिची कुळकर्मींच पूज्यता । हा सर्व कर्मीं अकर्ता । पूज्य सर्वथा सर्वार्थी ॥ ८७ ॥ गुरु म्हणों देवासमान । तंव

शास्त्रज्ञाला मुक्ति केव्हांहि मिळत नाहीं. ७३ हरिभजनापासून जे विमुख असतात त्यांना द्वैत सदा संमुख असतें, तें महाभयाच्या द्वारां दुःख देतें आणि प्रपंचाचा विस्तार कमी न होतां वाढतच जातो. ७४ एकाएकीं दिग्भ्रम झाला असतां मनुष्य पूर्वेलाच पश्चिम म्हणतो. त्याप्रमाणें परमात्म्यापासून विमुख होतांच द्वैतभ्रम अतिशय वाढतो. ७५ द्वैताच्या भेदविहिरीला संकल्प-विकल्पांचे झरे लागतात आणि जन्म-मरणांच्या पुरांत सर्व ब्रह्मांड सरकसट बुडून जातें. ७६ अभक्त जीव जन्म-मरणांच्या ओढीला लागला म्हणजे असंख्य दुःखांच्या कचाटींत सांपडून अनेक संकटें सोशितो. पण हरिभक्तांना कधीं स्वप्नांतहि तशी ओढ लागत नाहीं. ७७ भक्तीचा महिमा अगाध आहे. त्यांत संसारबंधनाला वावच मिळत नाहीं. म्हणून भगवद्भजन करण्यासाठीं सद्गुरुचरणाचें सेवन करावें. ७८ जो स्वतः आपल्या शिष्याच्या मरणाचिंतेचें निवारण करितो तोच खरा सद्गुरु, 'बाकीचे सर्व मंत्र-तंत्रोपदेशानेंच गुरु बनतात.' ७९ अहो 'मंत्र-तंत्राचा उपदेश करणारे गुरु घरोघर आयतेच हवे तितके आहेत.' पण जो शिष्याला सद्वस्तूशीं नेऊन भिडवितो त्याला श्रीकृष्ण सद्गुरु मानतात. ४८० गुरु देव आहे, गुरु माता-पिता आहे, गुरु आत्मा व वस्तुतः ईश्वर आहे. गुरु सर्वथा परमात्मा व तत्त्वतः परब्रह्म आहे. ८१ गुरूला उपमा देतां येईल, असें या त्रिभुवनांत कांहीं नाहीं. गुरूचा महिमा अगाध आहे. असा सद्गुरु भाग्यावांचून भेटत नाहीं. ८२ निष्काम पुण्याचा फार मोठा संचय, तीव्र वैराग्याची मोठी जोड व नित्यानित्यविवेकाची आवड इतकी सामुग्री जेव्हां एकत्र जमवावी तेव्हां सद्गुरूची कृपा साक्षात् होते. ८३ सद्गुरुकृपा हातीं आली म्हणजे भक्तीचें भांडार अनायासानें उघडतें. मग कळिकाळहि पळूं लागतो, त्यापुढें बापड्या संसारभयाची काय कथा? ८४ गुरूंना आईबाप म्हणावें तर ते एका जन्मापुरतेच असतात. पण सद्गुरु हा तत्त्वतः नित्य आई-बाप आहे. ८५ लौकिक आई-बाप गर्भवास देतात, पण हा सद्गुरु योनिप्राप्तीचें निवारण करितो, म्हणून शिष्याचा खरा पिता सद्गुरूच आहे. ८६ गुरूला कुळदेवता म्हणावें तर कुळधर्मामध्येंच ती पूज्य असते. पण गुरु स्वतः अकर्ता असूनहि सर्व कर्मांमध्यें सर्वप्रकारें सर्वस्वीं पूज्य आहे. ८७ गुरु देवासारखा आहे, म्हणून

देवांसी याचेनि देवपण । मग त्या सद्गुरुसमान । देवही जाण तुकेना ॥ ८८ ॥ गुरु ब्रह्म दोनी समान । हेही उपमा किंचित न्यून । गुरुवाक्यें ब्रह्मा ब्रह्मपण । तें सद्गुरुसमान अद्वयत्वें ॥ ८९ ॥ यालागीं अगाध गुरुगरिमा । उपमा नाहीं निरुपमा । ब्रह्मीं ब्रह्मत्व प्रमाणप्रमा । हे वाक्यमाहिमा गुरूची ॥ ४९० ॥ ब्रह्म सर्वांचें प्रकाशक । सद्गुरु तयाचाही प्रकाशक । एवं गुरूहूनि अधिक । नाहीं आणिक पूज्यत्वें ॥ ९१ ॥ यालागीं गुरूतें मनुष्यबुद्धी । पाहों नये गा त्रिशुद्धी । ऐशिये भावार्थबुद्धी । सहजें चित्तशुद्धी सच्छिष्या ॥ ९२ ॥ ज्यांचा गुरुचरणीं निःसीम भावो । त्यांचा मनोरथ पुरवी देवो । गुरुआज्ञा देवो पाळीं पहावो । गुरुवाक्यें स्वयमेवो जड मूढ तारी ॥ ९३ ॥ ब्रह्मभावें जे गुरुसेवक । देवो त्यांचा आज्ञाधारक । त्यांसी नित्य पुरवी निजात्मसुख । हे गुरुमर्यादा देख नुल्लंघी देवो ॥९४॥ देवो गुरुआज्ञा स्वयें मानी । तंव गुरु देवासी पूज्यत्व आणी । एवं उभयतां अभिन्नपणीं । भावार्थियांलागोनी तारक ॥ ९५ ॥ सद्भावो नाहीं अभ्यंतरीं । बाह्य भक्ति भावेंचि करी । भावानुसारें संसारीं । नानापरी स्वयें ठकती ॥ ९६ ॥ ठकले ते मनुष्यगती । ठकले ते निजस्वार्थीं । ठकले ते ब्रह्मप्राप्ती । दंभें हरिभक्ति कदा नुपजे ॥९७॥ येथ भावेंवीण तत्त्वतां । परमार्थु न ये हाता । सकळ साधनांचे माथां । जाण तत्त्वतां सद्भावो ॥९८॥ कोरडिये खांबीं धरितां सद्भावो । तेथेंचि प्रगटे देवाधिदेवो । मा सद्गुरु तो तंव पहावो । स्वयें स्वयमेवो परब्रह्म ॥ ९९ ॥ यालागीं गुरुभजनापरता । भजावया मार्गु नाहीं आयता । ज्ञानभक्ती जे तत्त्वतां । ते जाण सर्वथा सद्गुरुभक्ती ॥५००॥ गुरूहूनि श्रेष्ठ ब्रह्म । म्हणतां गुरुत्वा आला कनिष्ठ धर्म । ऐसा भाव धरितां विषम । ब्रह्मसाम्य शिष्यां नुपजे ॥ १ ॥ आह्मां सद्गुरु तोचि परब्रह्म । ऐसा नित्य निजभाव सप्रेम । हेचि गुरुसेवा उत्तमोत्तम । शिष्य परब्रह्म स्वयें होये ॥ २ ॥ ऐशिये गुरुसेवेआंत । प्रल्हाद झाला द्वंद्वातीत । नारद स्वानंदें गात

म्हणावें तर देवांना याच्यामुळेंच देवपण येतें. त्यामुळें देवहि सद्गुरूच्या तुलनेस योग्य नाहींत. ८८ गुरु आणि ब्रह्म हीं दोन्हीं सारखीं आहेत, असें म्हणावें तर ही उपमाहि थोडीशी कमीच पडते. कारण गुरुवाक्यानेंच ब्रह्माला ब्रह्मत्व येतें व तें ब्रह्म अद्वयत्वानें सद्गुरुसमान आहे. ८९ म्हणून गुरूचा महिमा अगाध आहे, त्याला उपमा नाहीं. ब्रह्मांतील ब्रह्मत्व, प्रमाण, प्रमा, हा वाक्यमहिमा गुरूच आहे.४९० ब्रह्म सर्वांचें प्रकाशक आहे. पण सद्गुरु त्याचाहि प्रकाशक आहे. म्हणून पूज्यत्वानें गुरुहून अधिक कांहीं नाहीं. ९१ म्हणून गुरूला मनुष्यबुद्धीनें केव्हांहि पाहूं नये. अशी गुरूच्या ठिकाणीं ब्रह्मदृष्टि ठेवणाऱ्या सच्छिष्याची चित्तशुद्धि अनायासानें होते. ९२ गुरुचरणांवर ज्याचा निस्सीम भाव असतो त्याचा मनोरथ देव पूर्ण करितो. अहो, गुरूची आज्ञा देवसुद्धां पाळितो. कारण तो गुरुवाक्यानें जड व मूढ यांनाहि तारतो. ९३ ब्रह्मभावनेनें गुरूची सेवा करणारे जे असतात त्यांना गुरूचा आज्ञाधारक देव नित्य सुख देतो. गुरूची मर्यादा देवहि उल्लंघन करीत नाहीं. ९४ देव स्वतः गुरूची आज्ञा मानितो व गुरु देवाला पूज्यत्व आणितो. याप्रमाणें ते दोघे अभिन्नत्वानें भक्तांचे तारक होतात. ९५ मनांत सद्भाव नाहीं, पण बाहेर मात्र जे भक्तीचा डौल आणितात ते आपल्या भावानुसार संसारामध्येंच नानाप्रकारें खितपत पडतात. ९६ त्यांचा मनुष्यजन्म फुकट जातो. त्यांचा स्वार्थहि साधत नाहीं. त्यांना ब्रह्मप्राप्ति होत नाहीं. कारण दंभानें हरिभक्ति केव्हांहि उत्पन्न होत नाहीं. ९७ भावावांचून परमार्थ हातीं लागत नाहीं. सद्भाव सर्व साधनांमध्यें श्रेष्ठ आहे. ९८ अहो, शुष्क काष्ठामध्यें जरी सद्भाव धरला तरी तेथें देवाधिदेव प्रकट होतो. मग सद्गुरूच्या ठिकाणीं ब्रह्मभावना केल्यास तेथें परब्रह्म साक्षात् कां प्रकट होणार नाहीं ! ९९ यास्तव गुरुभजनासारिखा ईश्वराचें भजन करण्याचा दुसरा सोपा मार्ग नाहीं. जी खरी ज्ञानभक्ति ती सर्वथा सद्गुरुभक्तिच आहे. ५०० गुरूहून ब्रह्माला श्रेष्ठ म्हटल्यास गुरुत्वाला कमीपणा येतो आणि असा विषमभाव धरल्यानें शिष्याला ब्रह्मसाम्य कधींहि प्राप्त होत नाहीं. १ सद्गुरूच आमचें परब्रह्म आहे, असा नित्य सप्रेम आत्मभाव ठेवावा. हीच उत्तमोत्तम गुरुसेवा आहे. तिच्या योगानेंच शिष्य स्वतः परब्रह्म होतो. २ अशा गुरुसेवेनेंच प्रल्हाद द्वंद्वातीत झाला, नारद स्वानंदानें व ब्राह्म साम्यानें गातनाचत सुरासुरां-

नाचत । ब्रह्मसाम्यें विचरत सुरासुरस्थानें ॥ ३ ॥ ऐसीची गुरुसेवा करितां । चुकली अंबरीषाची गर्भव्यथा । ते गर्भीचि जाहला देवो साहता । भक्तां भवव्यथा बाधों नेदी ॥ ४ ॥ ऐशिया अभिन्न भावना । सुबुद्धी भजती गुरुचरणां । ते पढियंते जनार्दना । त्यांसी भवभावना शिवों नेदी ॥ ५ ॥ गुरु ब्रह्म दोनी एक । शिष्यही असे तदात्मक । जे भेदें मानिती वेगळिक। तेही मायिक कवि सांगे ॥६॥

अविद्यमानोऽप्यवभाति हि द्वयो ध्यातुर्धिया स्वप्नमनोरथौ यथा ।
तत्कर्मसंकल्पविकल्पकं मनो बुधो निरुन्ध्यादभयं ततः स्यात् ॥ ३८ ॥

पुरुषासी जो प्रपंचु दिसे । तो नसतांचि मिथ्या आभासे । जेवीं कां एकला निद्रावशें । स्वप्ना-माजी जग कल्पी ॥ ७ ॥ असोनि निद्रावशें दिसे स्वप्न । जो जागा होवोनी आपण । करूं बैसे मनोरथ ध्यान । तो नसतेंचि जन वन एकत्वीं देखे ॥ ८ ॥ हो कां घालोनि आसन । जो करी मूर्तिचिंतन । त्यासी ध्येय ध्याता उपचार ध्यान । नसतेंच जाण कल्पित भासे ॥ ९ ॥ जेवीं धनलोभ्याचें हारपे धन । परी वासना न सांडी धनधान्य । धनातें आठवितां मन । धनलोभें पूर्ण पिसें होये ॥ ५१० ॥ मन स्वयें जरी नव्हे धन । तरी धनकोश आठवी मन । तंव स्मृती बळघे वन । व्यामोहें पूर्ण पिसें होय ॥ ११ ॥ तेवीं व्यामोहाचें पूर्ण भरित । मिथ्या भासे देहादि द्वैत । तें अहंभावें मानितां आप्त । भव-भय निश्चित आदळे अंगीं ॥ १२ ॥ भवभयाचें कारण । मनःकल्पना मुख्य जाण । त्या मनाचें करा-

---

च्या स्थानांतून संचार करूं लागला.३ अशीच गुरुसेवा केल्यानें अंबरीषाची गर्भव्यथा शांत झाली. अंबरीषाचे जन्मच स्वतः देवानें सहन केले आणि भक्ताला संसारव्यथा होऊं दिली नाहीं. ४ अशा अभिन्न भावनेनें जे बुद्धिमान भक्त गुरुचरणाची सेवा करितात ते जनार्दनाला फार आवडतात. ५ गुरु व ब्रह्म हे दोन्हीं एकाच आहेत आणि शिष्यहि तद्रूप आहे. पण या तिघांनाहि जे भेदानें पहातात तेहि मायिक आहेत, असें आतां कवि सांगतो. ५०६.

—' अहोपण, विषयांविषयीं ज्याचें चित्त विक्षिप्त झालें आहे, त्या पुरुषाची अव्यभिचारिणी भक्ति कोणत्या कारणानें संभवते ? आणि तसल्या भक्तीच्या अभावीं अभय तरी कोठचें ? ' अशी आशंका घेऊन विषय वास्तविक नाहींत, तर केवळ मनोविलासमात्र आहेत. यास्तव मनोनियमन करून भजन केल्यानें अभय प्राप्त होतें, असें सांगतात.—

अविद्यमानः अपि द्वयः–विद्यमान नसलेलाहि द्वैतप्रपंच, **ध्यातुः धिया**–ध्यान करणाऱ्या पुरुषाच्या मनानें, **यथा स्वप्नमनोरथौ** –जसें स्वप्न आणि मनोरथ त्याप्रमाणें, **अवभाति**–भासतो, **तत्**–म्हणून, **बुधः**–विवेकी पुरुषानें, **कर्मसंकल्पविकल्पकं मनः**–कर्मांचा संकल्प व विकल्प करणाऱ्या मनाचा, **निरुन्ध्यात्**–निरोध करावा. **ततः**–त्यामुळें, **अभयं स्यात्**–अभयप्राप्ति होते. [विषय वस्तुतः नाहींत तथापि स्वप्न किंवा मनोरथ जसे मनोमात्र त्याप्रमाणें विषयचिंतन करणाऱ्या पुरुषाच्या संकल्पानेंच विषय भासतात. म्हणून कर्मादिकांचा संकल्प-विकल्प करणाऱ्या मनाचा निरोध करावा. म्हणजे अनन्य भक्तीनें भजन केल्यानें अभयप्राप्ति होते.] ३८.

ज्याप्रमाणें निजलेला मनुष्य निद्रावशात् एकटाच स्वप्नामध्यें जगत् कल्पितो, त्याप्रमाणें पुरुषाला जो प्रपंच दिसतो तो वस्तुतः नसतांनाच मिथ्या भासतो. स्वतः निद्रावश असतांना त्याला स्वप्न दिसतें. ७ जागा झाल्यावर तो जेव्हां मनोरथ करूं लागतो, तेव्हांहि एकाकीच असलेल्या त्याला नसलेलें जन, वन इत्यादि दिसतें ८ किंवा तो आसन स्थापून मूर्तीचें चिंतन करावयास जरी बसला तरी त्याला नसलेलेंच ध्येय, ध्याता, उपचार, ध्यान इत्यादि कल्पित भासतें. ९ धनलोभ्याचें धन जरी कोणीं हिरावून नेलें, तरी त्याची वासना कांहीं त्या धन-धान्याला सोडीत नाहीं, उलट धनाची आठवण होतांच त्याचें मन धनलोभानें अगदीं वेडें होतें. ५१० स्वतः मन कांहीं धन नव्हे. तर तें केवळ धनाची आठवण करितें आणि तेवढ्यानेंच वेडें होतें, ११ त्याच न्यायानें देहादि भ्रामक द्वैत मिथ्या भासतें आणि ' हा मी व हें सर्व माझें ' अशा अहंभावानें त्याला आपलेसें मानिलें असतां संसारभय निश्चयानें ओढवतें. १२ मनःकल्पना हें संसारभयाचें मुख्य कारण आहे. त्या मनाचा निरोध करावयास सद्गुरुवचनावरील

वया निरोधन । सद्गुरुवचननिजनिष्ठा ॥ १३ ॥ हें जाणोनि सच्छिष्य ज्ञाते । गुरुवाक्यें विश्वासयुक्तें । विवेकवैराग्याचेनि हातें । निजमनातें आकळिती ॥ १४ ॥ तेचि आकळती हातवटी । संक्षेपें राया सांगेन गोष्टी । सद्गुरुवाक्यपरिपाटी । जे मनातें थापटी निजबोधें ॥ १५ ॥ चंचळत्वें विषयध्यान । करितां देखे जें जें मन । तें तें होय ब्रह्मार्पण । सद्गुरुवचननिजनिष्ठा ॥ १६ ॥ धरूनियां विषयस्वार्थू । मनें जो जो घेइजे अर्थू । तो तो होय परमार्थू । हा अनुग्रहो समर्थू गुरुकृपेचा ॥ १७ ॥ जो भुईभेणें पळों जाये । तो जेथें पळे तेथें भू ये । मग येणेंजाणें स्वयें राहे । ठायीं ठायें पांगुळला ॥ १८ ॥ तैसें मनासी लाविजे वर्म । जें जें देखे तेंचि ब्रह्म । जें जें करूं बैसे कर्म । तेथ पुरुषोत्तम स्वयें प्रगटे ॥ १९ ॥ एवं इंद्रियवृत्तिउल्हाळें । मोडिलें गुरुवाक्यप्रतीतिबळें । निजाधिष्ठानमेळें । कळासलें येके वेळे अखंड कुलुप ॥ ५२० ॥ ऐसें नेमितां बाह्य कर्म । मनाचा मोडे द्वैतभ्रम । तंव सबाह्य परब्रह्म । पूर्ण चिद्व्योम कोंदाटे ॥ २१ ॥ ऐसें भजनें मन नेमितां स्वयें । न रिघे कल्पांतकाळभयें । भक्त होऊनियां निर्भयें । विचरती स्वयें निःशंक ॥ २२ ॥ हे अगाध निष्ठा परिपूर्ण । भोळ्याभाळ्या न टके जाण । यालागीं सुगम साधन । सांगेन आन तें ऐक ॥ २३ ॥

शृण्वन् सुभद्राणि रथाङ्गपाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके ।
गीतानि नामानि तदर्थकानि गायन्विलज्जो विचरेदसङ्गः ॥ ३९ ॥

दृढनिष्ठा हाच उपाय आहे, १३ असें जाणून ज्ञाते सच्छिष्य गुरुवचनावर विश्वास ठेवून विवेक व वैराग्य यांच्या योगानें आपल्या मनाचा निरोध करितात. १४ राजा ! मनाला स्वाधीन ठेवण्याची तीच युक्ति मी तुला थोडक्यांत सांगतों— सद्गुरुवाक्य मनाला आत्मबोध करून स्थिर करितें. १५ त्यामुळें मन स्वाभाविक चंचलपणानें विषयध्यान करतांना जें जें कांहीं पहातें तें तें सर्व सद्गुरुवचननिष्ठेनें ब्रह्मार्पण होतें. १६ अभिलाषानें मन ज्या ज्या विषयाचें ग्रहण करितें तो तो परमार्थ आहे, असें समजणें हा सद्गुरुकृपेचा दृढ अनुग्रह आहे. १७ भूमीला भिऊन जो पळूं लागतो, तो जेथें जेथें जाईल, तेथें तेथें भूमि त्याच्या पाठोपाठ येतेच. मग तो जागच्याजागींच पांगळा होऊन उभा रहातो.१८ जेथें जावें तेथें भूमि आहेच, हें कळल्यावर तो पळण्याचे वृथा श्रम करीत नाहीं. मनालाहि तसाच धडा द्यावा. तें जें जें पहातें तेंच ब्रह्म, जें जें कर्म करूं लागतें तेथें तेथें पुरुषोमत्त स्वतः प्रकट होतो. १९ याप्रमाणें गुरूपदेशाच्या बलानें इंद्रियवृत्तींचा कल्लोळ शांत होतो. ब्रह्मरूप अधिष्ठानाशीं त्याचें ऐक्य होतें आणि बाह्यप्रवृत्ति एकदम कुलुप घातल्याप्रमाणें बंद पडते. ५२० याप्रमाणें बाह्यकर्मांचा निग्रह केला असतां मनाचा द्वैतभ्रम निवृत्त होतो आणि सबाह्य-अभ्यंतर पूर्ण परब्रह्म प्रकट होतें. २१ अशा भजनानें मनाचा निग्रह केला असतां भक्त निर्भय होतात. त्यांना कल्पांतकाळाचेंहि भय वाटत नाहीं. व ते निःशंकपणें संचार करितात. २२ ही अगाध निष्ठा भाळ्याभोळ्या लोकांना साध्य होत नाहीं, म्हणून मी तुला आणखी एक सुगम उपाय सांगतों, तो ऐक. ५२३.

—हें अत्यंत अशक्य आहे अशी आशंका घेऊन सुगम मार्ग सांगतात—

रथाङ्गपाणेः–चक्रपाणीचीं, **यानि सुभद्राणि जन्मानि कर्माणि**–जीं अतिशय कल्याणरूप जन्म-कर्में आणि, **तदर्थकानि**–जन्म व कर्म हा ज्यांचा अर्थ आहे अशीं, **लोके गीतानि नामानि**–लोकांत गायलेलीं नावें तीं स्वतः, **शृण्वन् च गायन्**–ऐकत व गात, **असंगः विलज्जः विचरेत्**–असंग व लोकलज्जा सोडलेला असा होऊन संचार करावा. [श्रीकृष्णाचीं अतिशय कल्याणकर अशीं कर्में व जन्म, त्याचप्रमाणें ते जन्म व तीं कर्में हाच ज्यांचा अर्थ आहे अशीं गायलेलीं नामें ऐकत व स्वतः गात भगवद्भक्तानें सर्वत्र संचार करावा. तीं गातांना कोणाची लाज धरूं नये व कशावर आसक्ति ठेवूं नये. पण भगवानाचीं कर्में, जन्म वगैरे पूर्णपणें कळणें अशक्य आहे, अशी आशंका घेऊन जे जन्म व जीं कर्में लोकांमध्यें प्रसिद्ध आहेत तीं ऐकत व गात संचार करावा.] ३९.

तरावया भाळेभोळे जन । मुख्य चित्तशुद्धीच कारण । जन्मकर्म हरीचे गुण । करावे श्रवण अत्यादरें ॥२४॥ चुकल्या पुत्राची शुद्धिवार्ता । जेणें सादरें ऐके माता । तेणें सादरें हरिकथा । सार्थकता परिसावी ॥ २५ ॥ हरीचीं जन्मकर्में अनंत गुण । म्हणाल त्यांचें नव्हेल श्रवण । लोकप्रसिद्ध जें पुराण । तें श्रद्धा संपूर्ण ऐकावें ॥ २६ ॥ बहु देव बोलिले पुराणीं । तेही लागती ज्याचे चरणीं । तो समर्थ चक्रपाणी । जो वेदपुराणीं वंदिजे ॥ २७ ॥ त्याचीं जीं जीं जन्में अतिअद्भुत । जीं जीं कर्में परमार्थयुक्त । स्वमुखें बोलिला भगवंत । तीं तीं ज्ञानार्थ परिसावीं ॥२८॥ जें जें केलें पुराणश्रवण । तें तें व्यर्थ होय मननेंविण । यालागीं श्रवणाचें मनन । सावधान करावें ॥ २९ ॥ मोलें घेतली जे गाये । दुभतें खातां विषय होये । तेचि दान देतां लवलाहे । दुभती होये परमामृतें ॥ ५३० ॥ तेवीं केलें जें श्रवण । तें मननें परम पावन । तेंचि उपेक्षितां जाण । परिपाकीं पूर्ण वांझ होय ॥३१॥ हरिनाम पडतां श्रवणीं । येकां गिळोनि जाये वदनीं । येकां ये कानींचें ते कानीं । जाय निघोनि हरिनाम ॥३२॥ हरिनाम पडतां श्रवणीं । ज्याचे रिघे अंतःकरणीं । सकळ पापा होवोनि धुणी । हरिचरणीं तो विनटे ॥ ३३ ॥ यापरी श्रवणीं श्रद्धा । मननयुक्त करितां सदा । तैं विकल्प बाधीना कदा । वृत्ति शुद्धा स्वयें होये ॥ ३४ ॥ ऐसें मननयुक्त श्रवण । करितां वोसंडे हर्ष पूर्ण । तेणें हर्षें हरिकीर्तन । करि आपण स्वानंदें ॥ ३५ ॥ हरिचरित्रें अगाध । ज्ञानमुद्रापदबंध । कीर्तनीं गातां विशद । परमानंद वोसंडे ॥ ३६ ॥ वानिती अजन्मयाचीं जन्में । वानिती अकर्मियाचीं कर्में । स्मरती अनामियाचीं नामें । अतिसप्रेमें डुल्लत ॥ ३७ ॥ साधावया निजकाज । सांडूनि लौकिकाची लाज । कीर्तनीं नाचती भोज । अतिनिर्लज्ज निःशंक ॥ ३८ ॥ कीर्तनें निर्दाळिले दोष । जप तप ठेले निरास । यमलोक पाडिला वोस । तीर्थांची आस निरास जाहली ॥ ३९ ॥ यमनियमा पडती उपवास । मरों टेंकले योगाभ्यास । कीर्तनगजरें हृषीकेश ।

भाळ्याभोळ्या जनांचा उद्धार व्हावयास चित्तशुद्धि हेंच मुख्य कारण आहे. त्यासाठीं हरीचे जन्म, गुण व कर्में मोठ्या आदरानें ऐकावीं. २४ चुकलेल्या पुत्राचा शोध लागला असतां त्याची ती वार्ता माता ज्या आदरानें ऐकते, त्याच आदरानें हरिकथा ऐकावी. २५ हरीचे जन्म, गुण व कर्में अनंत आहेत. त्यामुळें त्या सर्वांचें श्रवण होणें शक्य नाहीं. म्हणून म्हणाल तर लोकप्रसिद्ध पुराण मोठ्या श्रद्धेनें ऐकावें. २६ पुराणांत अनेक देव सांगितले आहेत. पण ते सर्व ज्याच्या चरणीं लागतात असा समर्थ चक्रपाणि वेद व इतर शास्त्रें आणि पुराणें यांस वंद्य आहे. २७ त्याचे जे जे अति अद्भुत जन्म व परमार्थयुक्त कर्में स्वतः भगवानानें स्वमुखानें सांगितलीं आहेत तीं तीं ज्ञानासाठीं ऐकावीं. २८ पण मननावांचून पुराणादि श्रवण व्यर्थ होत असतें, म्हणून श्रवण केलेल्या पुराणाचें मनन सावधान चित्तानें करावें. २९ मोलानें विकत घेतलेल्या गायीचें दुभतें स्वतः खाल्ल्यास ती भोग्य होते, पण तात्काळ तिचें दान दिल्यास ती परम अमृतानें दुभती होते, म्ह० परम मोक्ष देते. ५३० त्याचप्रमाणें केलेलें श्रवण मननानें परम पावन होतें. पण मनन न करितां श्रवणाची उपेक्षा केल्यास फलसमयीं तें सर्व व्यर्थ जातें. ३१ हरीचें नांव ऐकतांच कित्येकांच्या मुखांतून तें आंत जातें व कित्येकांच्या एका कानांत शिरून दुसऱ्या कानांतून निघून जातें. ३२ हरिनाम कानीं पडतांच तें ज्याच्या अंतःकरणांत शिरतें त्याचें सर्व पाप नाहींसें होतें व तो हरिचरणीं तल्लीन होतो. ३३ याप्रमाणें मननयुक्त श्रवणावर पूर्ण श्रद्धा ठेविली असतां विकल्प कधींहि बाधत नाहीं आणि वृत्ति आपोआप शुध्द होते. ३४ मननयुक्त श्रवणानें हर्षाला भरतें येतें आणि त्या हर्षभरांत भक्त स्वानंदानें हरिकीर्तन करूं लागतो. ३५ परमात्म्याची ज्ञानमुद्रायुक्त शब्दांनीं रचलेलीं अगाध चरित्रें कीर्तनांत स्पष्ट गात असतां परमानंद होतो. ३६ ज्याला जन्म नाहीं, त्याचे जन्म आणि ज्याला कर्म नाहीं त्याचीं कर्में ते वाखाणतात, नामरहितांचीं नामें स्मरतात आणि ते अति प्रेमानें डुलत रहातात. ३७ आपलें कार्य साधण्यासाठीं लौकिकाची लाज सोडून कीर्तनामध्यें नटाप्रमाणें निःशंकपणें नाचतात. ३८ कीर्तनानें सर्व दोषांचें निर्दलन होतें. जप, तप निराधार होतात, यमलोक ओस पडतो, तीर्थांची निराशा होते. ३९ यम-नियमांना उपवास घडतो, योगाभ्यास मरावयास टेंकतो.

निर्दाळी दोष नाममात्रें ॥५४०॥ कीर्तनाचा घडघडाट । आनंदु कोंदला उद्भट । हरुषें डोले वैकुंठपीठ । तेणें सुखें नीलकंठ । तांडवनाचें नाचतु ॥ ४१ ॥ यापरी हरिकीर्तन । देत परम समाधान । हा भक्तिराजमार्ग पूर्ण । ये मार्गीं स्वयें रक्षण चक्रपाणी कर्ता ॥ ४२ ॥ चक्र घेऊनि भक्ताचे ठायीं । म्हणे तुझें कार्य कायी । मज जगीं वैरीचि नाहीं । भक्तद्वेषी पाहीं निजशस्त्रें नाशी ॥ ४३ ॥ चक्रें अभिमानाचा करी चेंदा । मोहममता छेदी गदा । शंखें उद्बोधी निजबोधा । निजकमळें सदा निजभक्त पूजी ॥ ४४ ॥ जेथें चक्रपाणी रक्षिता । तेथें न रिघे भयाची कथा । बार्ता यापरी कीर्तिमंता । हरि सर्वथा स्वयें रक्षी ॥ ४५ ॥ ज्यांसी न करवे कथाश्रवण । अथवा न टके हरिकीर्तन । तिंहीं करावें नामस्मरण । रामकृष्ण गोविंद ॥ ४६ ॥ अच्युतनामाची निजख्याती । चेवल्या कल्पांतीं हों नेदी च्युती । त्या नामातें जे नित्य स्मरती । ते जाण निश्चिती अच्युतावतार ॥ ४७ ॥ रामकृष्णादि नामश्रेणी । अखंड गर्जे ज्यांची वाणी । त्यांसी तीर्थें येती लोटांगणीं । सुरवर चरणीं लागती स्वयें ॥ ४८ ॥ बाप नामाचें निजतेज । यम वंदी चरणरज । नामापाशीं अधोक्षज । चतुर्भुज स्वयें तिष्ठे ॥ ४९ ॥ नामाचेनि पडिपाडें । कायिसें भवभय बापुडें । कळिकाळाचें तोंड कोणीकडे । नामापुढें रिघावया ॥ ५५० ॥ जेवढी नामाची शक्ति । तेवढें पाप नाहीं त्रिजगतीं । नामापाशीं चारी मुक्ती । जाण निश्चितीं विदेहा ॥५१॥ ऐक राया सावधान । नामापरतें सुगम साधन । सर्वथा नाहीं नाहीं आन । निश्चय जाण नेमस्त ॥५२॥ जन्म नाम कर्म श्रीधर । श्रवणें उद्धरती पामर । यालागीं हरिलीला सुभद्र । शास्त्रज्ञ नर वर्णिती ॥ ५३ ॥ ऐसा बाणल्या भक्तियोग । न धरी जाणपणाचा फुग । त्यजुनी अहंममतापांग । विचरती निःसंग हरिकीर्तनें ॥ ५४ ॥ करितां श्रवण स्मरण कीर्ती । तेणें वाढे सप्रेम भक्ती । भक्त विसरे देहस्फूर्ती । ऐक तेही स्थिती सांगेन राया ॥ ५५ ॥

कारण हृषीकेश कीर्तनाच्या गजरानें व केवल नामानें सर्व दोषांचें निरसन करितो. ५४० कीर्तनाचा धडधडाट सुरू झाला म्हणजे सर्वत्र आनंद भरून जातो. भगवान् विष्णु हर्षानें डोलूं लागतो व शंकर तांडव नृत्य करूं लागतो. ४१ याप्रमाणें हरिकीर्तन परम समाधान देतें. हा पूर्ण भक्तिराजमार्ग आहे. या मार्गांत स्वतः चक्रपाणि रक्षण करितो. ४२ हातांत चक्र घेऊन श्रीहरि भक्ताला म्हणतो कीं, या जगांत माझा वैरी कोणी नाहीं, तुझें काय कार्य आहे ? असें म्हणून तो भक्ताच्या द्वेष्ट्यांना आपल्या शस्त्रानें नाहींसे करितो. ४३ चक्रानें अभिमानाचा चेंदा करितो. गदेनें मोहममतेचा उच्छेद करितो. शंखानें आत्मबोधाला जागृत करितो आणि आपल्या पद्मानें भक्तांची सदा पूजा करितो .४४ जेथें चक्रपाणि रक्षण करणारा असतो, तेथें भयाचें नांवहि ऐकूं येत नाहीं. कारण कीर्तिमान भक्तांचें रक्षण स्वतः हरि करितो. ४५ ज्याच्यानें कथाश्रवण करवत नाहीं किंवा ज्यांना हरिकीर्तन करितां येत नाहीं, त्यांनीं राम-कृष्ण-गोविंद असें नामस्मरण करावें. ४६ अच्युतनामाची ख्याति जागृत झाली असतां ती भक्तांचा अधःपात केव्हांहि होऊं देत नाहीं. अशा नामाचें जे नित्य स्मरण करितात ते निश्चयानें अच्युतावतार आहेत, असें समज. ४७ ज्यांची वाणी राम-कृष्णादिनावांची अखंड गर्जना करिते, त्यांच्या पायापाशीं तीर्थें लोटांगणें घालीत येतात आणि देवश्रेष्ठ त्यांच्या चरणाला लागतात. ४८ नामाचा प्रभाव फार मोठा आहे. नामकीर्तन करणाराच्या चरणरजाला यम वंदन करितो. स्वतः चतुर्भुज अधोक्षज नामापाशीं उभा राहतो. ४९ नामापुढें बिचाऱ्या संसारभयाची कथा काय व कळिकाळाचें तोंड तरी कोठून दिसणार ! ५५० नामाची जितकी शक्ति आहे तेवढें पाप या जगांत नाहीं. हे जनका ! नामापाशीं चारी मुक्ति आहेत, असें तूं निश्चयानें जाण. ५१ नामाहून दुसरें अधिक सुगम साधन नाहीं, असा तूं निश्चय कर. ५२ भगवानाचा जन्म, नाम व कर्म यांच्या श्रवणानें पामरजनांचा उद्धार होतो, म्हणूनच भाग्यशाली शास्त्रज्ञ पुरुष हरिलीला वर्णितात. ५३ असा भक्तियोग जाणल्यास ज्ञानित्वाचा गर्व कोणीहि धरीत नाहीं. तर अहंममतेची व्यथा टाकून ते हरिकीर्तनानें निःसंग संचार करितात. ५४ परमात्म्याच्या कीर्तीचें श्रवण व स्मरण केलें असतां सप्रेम भक्ति वाढते आणि भक्त देहभाव विसरतो. आतां ही स्थितीहि मी तुला सांगतों, ती ऐक. ५५

एवंव्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः ।
हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्याति लोकबाह्यः ॥ ४० ॥

हरिनामगुणकीर्तनकीर्ती । अखंड आवडे जागृतीं । स्वप्नींही तेचि स्थिती । दृढ हरिभक्ती ठसावे ॥ ५६ ॥ ऐशियापरी भक्तियुक्त । दृढतर जाहलें ज्याचें व्रत । तंव तंव होय आर्द्रचित्त । प्रेमा अद्भुत हरिनामकीर्ती ॥ ५७ ॥ आत्मा परमप्रिय हरी । त्याचे नामकीर्तीचा हर्ष भारी । नित्य नवी आवड वरी । सबाह्याभ्यंतरीं हरि प्रगटे ॥ ५८ ॥ चुकल्या मायपूतां संकटीं । एकाकीं बहुकाळें जाहली भेटी । तेणें वोरडे घालोनि मिठी । चाले जेवीं पोटीं अनिवार रुदन ॥ ५९ ॥ तेवीं जीवशीवां अवचटी । भक्तीचे पेठे जाहली भेटी । आत्मसाक्षात्कारें पडे मिठी । ते संधीमाजीं उठी अनिवार रुदन ॥ ५६० ॥ परमात्मयासी आलिंगन । तेणें अनिवार स्फुंदन । रोमांचित रुदन । सप्रेम पूर्ण उसासोनि करी ॥६१॥ सर्वेचि गद्गदोनि हांसे । मानी मजमाजींच मी असें । मा चुकलों भेटलों हें ऐसें । देखोनि आपुलें पिसें हांसोंचि लागे ॥ ६२ ॥ मी अखंडत्वें स्वयें संचलों । अभेदपूर्णत्वें अनादि रचलों । तो मी अव्ययें म्हणे जाहलों मेलों । येणें आठवें डोलडोलों हांसोंचि लागे ॥ ६३ ॥ पळतां दोराच्या

—यात्रमाणें भजन करणाऱ्या आणि त्यामुळेंच ज्याला प्रेमलक्षण भक्तियोगाची प्राप्ति झाली आहे त्याची संसारधर्मातीत गति सांगतात—

एवंव्रतः—ज्याचें वर्तन असें आहे, **स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागः**—आपला प्रिय जो हरि त्याच्या नामसंकीर्तनानें ज्याचें प्रेम उत्पन्न झालें आहे व त्यामुळेंच, **द्रुतचित्तः**—ज्याचें चित्त प्रेमार्द्र झालें आहे असा, **लोकबाह्यः**—पराधीन भगवद्भक्त, **उच्चैः हसति**—मोठ्यानें हंसतो, **अथो रोदिति**—व रडतो, **रौति**—आक्रोश करितो, **गायति**—गातो, **उन्मादवत् नृत्यति**—उन्माद झाल्याप्रमाणें नाचतो. [याप्रमाणें वर्तन करणारा, आपल्या प्रिय हरीच्या नामसंकीर्तनानें प्रेमयुक्त झालेला, आर्द्रचित्त भक्त, एखादे वेळीं भगवान् भक्ताकडून पराभूत झाला आहे, असें मानून मोठ्यानें हंसतो. एखादे वेळीं अरे अरे, एवढा वेळ भगवानांनीं माझी उपेक्षा केली, असें म्हणून रडतो. कधीं कधीं अति औत्सुक्यामुळें मोठ्यानें ओरडतो. केव्हां केव्हां अति हर्षानें गातो. केव्हां केव्हां ' जितं जितं ' असें म्हणून नाचतो. ' तर मग एखाद्या दांभिकाप्रमाणें दुसऱ्याला दाखविण्यासाठीं तो हें सर्व करितो कीं काय !' नाहीं, नाहीं, एखाद्या भूतसंचार झालेल्या मनुष्याप्रमाणें देहभान विसरून तो हें सर्व करितो.] ४०.

हरिनाम व गुण यांच्या कीर्तनाची कीर्ति जागेपणीं सतत आवडते व स्वप्नांतहि तीच स्थिति होते. याप्रमाणें हरिभक्ति दृढ ठसते. ५६ ज्याचें असें भक्तियुक्त व्रत उत्तरोत्तर दृढ होत जातें त्याचें चित्त तसें तसें आर्द्र होत जातें व हरिनामकीर्तनाविषयीं अद्भुत प्रेम उत्पन्न होतें. ५७ हरि सर्वांचा परम प्रिय आत्मा आहे, त्यामुळें त्याच्या नामसंकीर्तनाचा मोठा हर्ष होतो. भक्त हरिकीर्तनाची नित्य नवी आवड धरतो. त्यामुळें त्याच्या सबाह्य अभ्यंतरीं हरि प्रकट होतो. ५८ एखाद्या संकटसमयीं आईची व मुलाची चुकामुक व्हावी व दीर्घ काळानें त्यांची एकाकर्की भेट व्हावी, म्हणजे तीं दोघें एकमेकांच्या गळ्यांत मिठी घालून जशीं ओक्साबोक्शीं रडतात, ५९ त्याप्रमाणें फार दिवसांपासून ताटातुट झालेल्या जीव-शिवांची भक्तीच्या पेठेंत एकाएकीं भेट झाली म्हणजे आत्मसाक्षात्कारानें त्यांची मिठी पडते. त्या संधीमध्यें अनिवार रडें कोसळतें. ५६० जीव परमात्म्याला आलिंगन देतो, त्यामुळें त्याचा देह पूर्णप्रेमानें रोमांचित होतो व तो स्फुंदस्फुंदून व उसासे टाकून रडतो. ६१ लगेच तो खदखदां हंसूं लागतो. माझ्यामध्येंच मी आहें, असें तो समजतो. मी वस्तुतः चुकलों नव्हतों व आतां भेटलोंहि नाहीं, पण मला चुकल्याचा नुस्ता भ्रम झाला होता, असें समजून तो हंसूं लागतो. ६२ मी स्वतःच अखंडपणें भरून राहिलों आहें, मुख्य अभेदानें मी अनादिसिद्ध आहें. मी वस्तुतः अविनाशी असून जन्माला आलों व मेलों असें आजवर वृथा समजत होतों व अशी आठवण झाली असतां तो डोलडोलून हंसूं लागतो. ६३ कोणी एखादा दोरीला साप समजून पळूं लागला असतां तो भीतीनें अडखळतो व पडतो. पण तो साप नसून दोरी आहे

सर्पभेण । पडे अडखळे भयें पूर्ण । तोच दोरातें वोळखोन । आपणियां आपण स्वयें हांसे ॥ ६४ ॥ तेवीं संसाराचा अभावो । देहभाव समूळ वावो । तेथें नाथिली ममता अहंभावो । मज होतां पहावो म्हणूनि हांसे ॥ ६५ ॥ बाप गुरुवाक्य निजनिर्वाहो । देहीं असतां विदेहभावो । माझे चारी देह जाले वावो । येणें अनुभवें पहावो गर्जों लागे ॥ ६६ ॥ म्हणे धन्य धन्य भगवद्भक्ती । जिणें मिथ्या केल्या चारी मुक्ती । मी परमात्मा निजनिश्चितीं । येणें उल्हासें त्रिजगती गर्जवी गजरें ॥६७॥ धन्य भगवंताचें नाम । नामें केलों नित्य निष्काम । समूळ मिथ्या भवभ्रम । गर्जोनि निःसीम हाक फोडी ॥ ६८ ॥ आतां दुजें नाहींच त्रिलोकीं । दिसे तें तें मीच मी कीं । मीच मी तो एकाकी । येणें वाक्यें अलोलिकी हाक फोडी ॥ ६९ ॥ दुर्धर भवबंध ज्याचेनी । निःशेष गेला हारपोनी । त्या सद्गुरूच्या निजस्तवनीं । गर्जवी वाणी अलोलिक ॥ ५७० ॥ म्हणे संसार झाला वावो । जन्ममरणांचा अभावो । कळिकाळासी नाहीं ठावो । म्हणोनियां पहावो हाक फोडी ॥ ७१ ॥ ऐशा हाकांवरी हाका । फोडूं लागे अलोलिका । सवेंचि गाये निजात्मसुखा । स्वानंदें देखा डुल्लतु ॥ ७२ ॥ परम सख्याची गोड कथा । तृप्ती न बाणे स्वयें सांगतां । तेवीं निजानुभवें हरि गातां । धणी सर्वथा पुरेना ॥ ७३ ॥ त्याचें गाणें ऐकतां । सुखरूप होय सज्ञान श्रोता । मुमुक्षां होय परमावस्था । जरी तो अवचिता गावो लागे ॥ ७४ ॥ गातां पदोपदीं निजसुख । कोंदाटे अधिकाधिक । वोसंडतां परम हरिख । स्वानंदें अलोलिक नाचों लागे ॥ ७५ ॥ सारूनि दुजेपणाचें काज । निरसोनि लौकिकाची लाज । अहंभावेंविण सहज । आनंदाचे भोजें अलोलिक नाचे ॥ ७६ ॥ जो मोलें मदिरा खाये । तो मदिरानंदें नाचे गाये । जेणें ब्रह्मानंदु सेविलाहे । तो केवीं राहे आवरला ॥७७॥ यालागीं

असें ओळखल्यावर तो आपणच आपल्याला हंसूं लागतो. ६४ त्याप्रमाणें संसाराचा अभाव आहे, देहभाव समूळ मिथ्या आहे, पण त्यावरहि माझी ममता व अहंभाव दृढ झाला होता, हा केवढा चमत्कार आहे पहा ! असें म्हणून तो हंसतो. ६५ श्रेष्ठ गुरुवाक्यच माझा आधार आहे, त्याच्या योगानें देहांत असतां मला विदेहभाव प्राप्त झाला, माझें स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे चारहि देह मिथ्या झाले, या अनुभवानें तो गर्जूं लागतो. ६६ जिनें चारी मुक्ति मिथ्या केल्या ती भगवद्भक्ति धन्य धन्य आहे, असें तो म्हणतो. निश्चयानें व मोठ्या उल्हासानें तो 'मी परमात्मा आहें' या गजरानें त्रिभुवनाला गाजवून सोडतो. ६७ भगवंताचें नांव धन्य आहे, त्या नांवानेंच मला नित्य निष्काम केलें, हा संसारभ्रम समूळ मिथ्या आहे, अशी मोठ्यानें गर्जना करून तो सर्वांना ओरडून सांगतो. ६८ आतां त्रैलोक्यामध्यें दुजें म्हणून कांहीं नाहींच, जें जें दिसतें तें केवळ मीच मी आहें, तो एक, अद्वितीय मीच मी आहें, या वाक्यानें तो विलक्षण गर्जना करितो. ६९ ज्याच्यामुळें दुर्धर संसारबंध समूळ निवृत्त झाला त्या सद्गुरूच्या स्तवनामध्यें आपल्या अलौकिक वाणीचा गर्जून उपयोग करितो. ५७० तो म्हणतो संसार मिथ्या झाला, जन्ममरणांचा अभाव झाला, कळिकाळाचा आतां कोठें पत्ता नाहीं, असें तो ओरडून सांगूं लागतो, ७१ तो अशा अलौकिक गर्जनावर गर्जना करूं लागतो. लगेच आत्मसुखाचें गायन करितो, आणि स्वानंदानें डोलूं लागतो. ७२ त्या परम आत्म्याची अमृतासारखी मधुर कथा सांगतांना त्याची तृप्ति होत नाहीं. त्याचप्रमाणें स्वानुभवानें हरिनाम गात असतांना तें पुरेसें वाटत नाहीं. ७३ आणि हरिनामाचें गान करणाऱ्या त्या भक्ताचें गान ऐकतांना श्रोता सुखी व ज्ञानी होतो. फार काय, पण एखादा मुमुक्षुहि जर अवचित हरिनामें गाऊं लागला तर त्यालाहि परम अवस्था प्राप्त होते. ७४ हरिनामाचें गान करीत असतांना पदोपदीं निजसुख अधिकाधिक होऊं लागतें आणि त्याला भरतें आलें असतां भक्ताला परम हर्ष होतो आणि तो स्वानंदानें नाचूं लागतो. ७५ द्वैतभाव विसरून, लौकिकाची लाज सोडून, स्वभावतःच अभिमानरहित होऊन, आनंदानें बागडूं लागतो. ७६ अहो, जो पदरमोड करून मदिरा विकत घेऊन ती पितो तोहि जर तिच्या धुंदींत अस्ताव्यस्त नाचतो व बेफाम गातो, तर मग ज्यानें ब्रह्मानंदाचें सेवन केलें आहे, तो स्थिर कसा राहील ? ७७ यास्तव जो सामान्य लोकांची मर्यादा सोडून ब्रह्मानंदांत

तो लोकबाह्यता । स्वयें नाचे ब्रह्मउन्मादतां । लोक मानिती तया पिशाचता । हा बोधूं पंडितां सहसा न कळे ॥ ७८ ॥ त्याचिया निजबोधाची कथा । ऐक सांगेन नृपनाथा । एक भगवंतावांचूनि सर्वथा । त्यासी लौकिकता दिसेना ॥ ७९ ॥

खं वायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्वानि दिशो द्रुमादीन् ।
सरित्समुद्रांश्च हरेः शरीरं यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः ॥ ४१ ॥

ब्रह्मउन्मादपरमानंदें । जंव जंव पाहे स्वानंदबोधें । तंव तंव चराचर पूर्णानंदें । देखे स्वानंदकंदें दुमदुमित ॥५८०॥ पृथ्वी आप तेज वायु नभ । देखे हरिरूप स्वयंभ । भूतां महाभूतांचें डिंभ । न देखे भिन्न कोंभ अभिन्नत्वें ॥ ८१ ॥ जेवीं न पेरितां मळा । पाहतां जैसा केळीचा कळा । स्वयें विकासे फळां दळां । तेवीं वस्तु हे पांचाला भूतभौतिकात्मक ॥ ८२ ॥ जेवीं कांतोनियां रंध्रसळें । स्फटिकदीपगृह-अंगमेळें । चितारिलीं अश्वगजदळें । तीं भासती सोज्ज्वळें आंतुलेनि दीपें ॥ ८३ ॥ तेवीं सोमसूर्यादि तेजशक्ती । कां वन्हि नक्षत्रें जे लखलखिती । जननयनादि निजदीप्ती । देखे आत्मज्योती सतेज ॥ ८४ ॥ युक्तीं मेळवितां द्रव्यांतर । अग्नि परिभासे पुष्पाकार । तेवीं वस्तु स्वलीला साचार । रविचंद्राकार नानात्वें भासे ॥ ८५ ॥ पृथ्वी गंधरूपें स्वयें असे । तो गंधु कस्तूर्यादिकीं भासे । तेवीं भगवत्सत्ता सर्वत्र असे । परी सात्विकीं दिसे अतिप्रगट ॥८६॥ यालागीं सात्विकाठायीं सत्व । तेथ देखे भगवत्तत्व । सत्वें सत्ववंतां महत्त्व । अति मान्यत्व हरिरूपें ॥ ८७ ॥ पृथ्वीसी जळावरण आहे । तेंचि चतुःसमुद्र नांव लाहे । तैसें देवाचेंचि अंग पाहें । दिशात्वें वाच्य होये दशदिशां ॥ ८८ ॥ पूर्वपश्चिमादि

प्रविष्ट झाला आहे व ज्याला ब्रह्मोन्माद झाला आहे तो स्वतः नाचूं लागला तर त्यांत काय आश्चर्य आहे! सामान्य लोक मात्र त्याला पिशाचबाधा झाली आहे असें मानितात; पण हें रहस्य शब्दपंडितांना सहसा कळत नाहीं. ७८ पण हे राजा, मी तुला असल्या आत्मरूप भगवद्भक्ताच्या आत्मज्ञानाची कथा सांगेन. एका भगवंतावांचून त्याच्या ठिकाणीं दुसरी लौकिकता सर्वथा दिसत नाहीं. ५७९.

खं....समुद्रान्-आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, ज्योति, सर्वभूतें, दिशा, वृक्षादिक, नद्या व समुद्र, **यत्किंच भूतं**-इत्यादि-जें जें कांहीं भूतमात्र आहे, **तत् हरेः शरीरं**-तें हरीचें शरीर आहे, असें समजून, **अनन्यः**-अनन्य होऊन **प्रणमेत्**-प्रणाम करावा. [प्रत्येक भूत हें हरीचें शरीर आहे असें जाणून अनन्यमनानें त्याला प्रणाम करावा.] ४१.

ब्रह्मोन्मादाच्या परमानंदानें आणि स्वानंदबोधानें जों जों पहातो, तों तों भगवद्भक्ताला सर्व चराचर पूर्णानंद स्वानंदकंदानें दुमदुमलेलें दिसतें. ५८० तो पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश इत्यादि सर्व स्वयंसिद्ध हरिरूप पहातो. त्याला हीं महाभूतें हरिरूपाहून भिन्न दिसत नाहींत, तर तो सर्वांना अभिन्नपणानेंच पहातो. ८१ ज्याप्रमाणें मळ्यांत केळीची पेरणी न करितां पहिल्या केळीला कोंब आला असतां तोच आपोआप फळें आणि पानें यांनीं विकास पावतो, ८२ त्याप्रमाणें हे राजा, ब्रह्मस्वरूप-हरीरूप भूत--भौतिकांच्या आकारानें विकास पावतें. भोंकें पाडण्याच्या हत्यारानें कातून स्फटिकदीपगृहाच्या भिंतीवर अश्व-गजादि सैन्यें चितारिलीं असतां आंतल्या दीपानें तीं सुंदर भासतात, ८३ त्याप्रमाणें चंद्र, सूर्य, अग्नि, चमकणारीं नक्षत्रें, प्राण्यांचे नेत्र इत्यादि सर्व आंतील आत्मज्योतीनें सतेज दिसतात. ८४ युक्तीनें दुसरा पदार्थ मिळविला असतां अग्नि पुष्पाकार भासतो, त्याप्रमाणें आत्मवस्तु स्वभावतःच सूर्य, चंद्र इत्यादि नाना पदार्थांच्या आकारानें भासते. ८५ पृथ्वी गंधरूपानें स्वतःच सिध्द असते. पण तो तिचा गंध कस्तुरी, कापूर इत्यादिकांमध्यें स्पष्ट भासतो. त्याप्रमाणें भगवत्सत्ता सर्वत्र असते; पण ती अंतःकरणाच्या सात्विक वृत्तींत अतिशय स्पष्ट दिसते. ८६ म्हणून सात्विकांतील सत्त्वामध्यें भगवत्तत्त्व पहावें. सात्विकांना सत्त्वामुळेंच महत्त्व येतें आणि त्यालाच हरिरूपानेंच मोठी मान्यता आहे. ८७ पृथ्वीला जलाचें आवरण आहे. त्यालाच चतुःसमुद्र हें नांव प्राप्त झालें आहे. त्याचप्रमाणें दश-दिशांमध्यें देवाचेंच अंग दिशात्वानें वाच्य होतें व त्यालाच दिशा

योग । दशदिशांचे दिग्विभाग । तेही देवाचेंचि अंग । तद्रूप श्रीरंग स्वयें भासे ।। ८९ ।। तृण दूर्वा दर्भ द्रुम । देखोनि म्हणे हेही हरीचे रोम । अनोळखा हें अतिविषम । निजांगीं सर्व सम हरिरूप पाहतां ।। ५९० ।। जैशा आपुलिया आंगोळिया । गणितां दिसती वेगळालिया । परी असती लागलिया । स्वयें सगळिया अखंड अंगीं ।।९१।। तेवीं वनवल्लीदर्भदांग । देखोनि म्हणे हें हरीचें अंग । अनन्यभावें लगबग । भिन्न भाग देखेना ।। ९२ ।। म्हणे दूर्वाद्रुमवनवल्ली । हेचि अनंत कोटी रोमावळी । हरीचेनि अंगें असे वाढली । त्या निजशोभा शोभली हरिरूपत्वें ।। ९३ ।। जेवीं वटाच्या पारंबिया । लोंबोनि वाढती वेगळालिया । त्याही वटरूपें संचलिया । वटत्वा मुकलिया म्हणों नये ।। ९४ ।। तेवीं चैतन्यापासोनि बोध । निघाले सरितारूप अनेग । तेही चैतन्यघन चांग । चिद्रूपें साङ्ग सदा वाहती ।। ९५ ।। हो कां चंद्रबिंबीं अमृत जैसें । बिंबीं बिंबरूप होऊनि असे । तेवीं भगवंतीं संसारू भासे । भजनविश्वासें भगवद्रूप ।। ९६ ।। ऐसे वेगवेगळे भाग । पाहतां उल्हासे जंव चांग । तंव अवघें उघडें जग । देवोचि साङ्ग स्वयें जाला ।। ९७ ।। यालागीं सर्व भूतांचे ठायीं । अनन्यशरण कैसा पाहीं । लवण जैसें सागरापायीं । ठायीं ठायीं जडोनि ठाके ।। ९८ ।। तेथ मुंगीही देखोनि जाण । हरिरूपीं वंदी आपण । मशकासही अनन्यशरण । घाली लोटांगण भगवद्रूपें ।। ९९ ।। गो खर चांडाळ श्वान । अति निंद्य जे हीन जन । ते भगवद्रूप देखोनि पूर्ण । घाली लोटांगण अनन्यभावें ।।६००।। हरिरूपें देखे पाषाण । भगवद्रूपें वंदी तृण । जंगमस्थावरादिकां शरण । घाली लोटांगण चिदैक्यभावें ।।१।। करितां हरिनामस्मरणकीर्ती । एकाएकीं एवढी प्राप्ती । झाली म्हणसी कैशा रीतीं । ऐके नृपती तो भावो ।।२।। करितां पूजाविधिविधान । कां श्रवण स्मरण कीर्तन । सर्वदा चिदैक्यभावना पूर्ण । पूर्ण प्राप्ति जाण त्यातेंचि वरी ।। ३ ।।

असें म्हणतात. ८८ पूर्व-पश्चिमादि योग व दशदिशांचें दिग्विभाग हेंहि देवाचेंच अंग आहे. श्रीरंग स्वतः त्या रूपानें भासतो. ८९ तृण, दूर्वा, दर्भ व वृक्ष यांना पाहून भगवद्भक्त हेहि हरीचेच रोम आहेत असें म्हणतो; पण आपल्या शरीरांत सर्व सम हरीरूप पहात असूनहि त्याला कोणी पहात नाहीं, हें मोठें विचित्र आहे. ५९० ज्याप्रमाणें आपल्या हाताचीं बोटें मोजूं लागलें असतां तीं वेगवेगळीं दिसतात. पण वस्तुतः तीं आपल्या अंगाला चिकटलेलींच आहेत. ९१ त्याप्रमाणें वन, वेली, दर्भ, दांग नांवाचें गवत यांना पाहून हें हरीचेंच अंग आहे, असें तो म्हणतो. अनन्यभावामुळें त्याला सहसा त्यांत भेद दिसत नाहीं. ९२ दूर्वा, वृक्ष, वेली वगैरे हीच असंख्य रोमावळी हरीच्या अंगावर वाढली आहे व हरिरूपानें तिला शोभा आली आहे. ९३ ज्याप्रमाणें वडाच्या पारंब्या खालीं लोंबूं लागल्या म्हणजे वडाहून वेगळ्या दिसतात, पण त्याच पुनः भूमीवर टेंकून वटाकार झाल्या म्हणजे मग त्या वडाहून भिन्न आहेत असें म्हणतां येत नाहीं. ९४ त्याचप्रमाणें हरिस्वरूपापासून नद्यासारखे अनेक पदार्थांचे ओघ निघाले असून तेहि चिद्घन आहेत व सर्वदा चिद्रूपानेंच पूर्णपणें वाहतात. ९५ चंद्रबिंबांतील अमृत चंद्रप्रतिबिंबांत तद्रूपानेंच भासतें. त्याचप्रमाणें भगवंतामध्यें हा संसार भासतो. तो भजनश्रद्धेनें भगवद्रूपच आहे. ९६ याप्रमाणें सृष्टींतील वेगवेगळे भाग पहात असतां ज्या भक्ताचा बोध उत्तम प्रकारें दृढ झालेला असतो, त्याला हें सर्व जगत् सांग देवच झाला आहे, असा प्रत्यय येतो. ९७ सागरांमध्यें लवण जसें ठिकठिकाणीं तद्रूप होऊन राहिलेलें असतें, त्याप्रमाणें सर्व भूतांमध्यें भगवद्भक्त अनन्य शरण होतो. ९८ तो मुंगीलाहि हरिरूप मानून वंदन करितो. मशकालाहि भगवद्रूपानें अनन्य शरण होऊन लोटांगण घालितो. ९९ गाय, गाढव, चांडाळ, कुत्रें व अति निंद्य हीनजन त्या सर्वांना भगवद्रूप पाहून तो अनन्यभावानें लोटांगण घालितो. ६०० तो पाषाणाला हरिरूप पहातो, तृणाला भगवद्रूपानें वंदन करितो व स्थावर-जंगमादिकांना शरण जाऊन ब्रह्मैक्य भावनेनें त्यांच्यापुढें लोटांगण घालितो. १ हरिनामाचें स्मरण व कीर्तन केल्यानें भक्ताला एकाएकीं एवढी मोठी फलप्राप्ति कशी झाली, म्हणून विचारशील तर हे राजा, त्यांचें कारण सांगतों, ऐक. २ यथाविधि पूजा, श्रवण, स्मरण किंवा कीर्तन करीत असतांना भक्ताची पूर्ण व अखंड ब्रह्मैक्यभावना होते व त्यालाच पूर्ण प्राप्ति वरते, असें तूं समज. ६०३.

भक्तिः परेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष त्रिक एककालः ।
प्रपद्यमानस्य यथाऽश्नतः स्युस्तुष्टिः पुष्टिः क्षुदपायोऽनुघासम् ॥ ४२ ॥

आइकें विदेहचक्रवर्ती । ऐशी जेथें भगवद्भक्ती । तीपाशीं विषयविरक्ती । ये धांवती गोवत्सन्यायें ॥४॥ हें असो जेवीं जावळीं फळें । हो नेणे येरयेरां वेगळें । तेवीं भक्ति विरक्ती एके काळें । भक्त तेणें बळें बळिष्ठ होती ॥ ५ ॥ जेथ भक्ति आणि विरक्ती । नांदो लागती सहजस्थितीं । तेथचि पूर्णप्राप्ती । दासीच्या स्थितीं सर्वदा राबे ॥ ६ ॥ यापरी भगवद्भक्ती । पूर्ण दाटुगी त्रिजगतीं । भक्तांघरीं नांदे प्राप्ती । भक्तिविरक्तिनिजयोगें ॥ ७ ॥ भक्ति विरक्ति अनुभवप्राप्ती । तिन्ही एके काळें होती । ऐक राया तेही स्थिती । विशदोक्तीं सांगेन ॥ ८ ॥ जैशी कीजे भगवद्भक्ती । जैसीच होय विषयविरक्ती । तदनुसारें अनुभवास्थिती । ती भक्त पावती तेचि क्षणीं ॥ ९ ॥ जेवीं कां भुकेलियापाशीं । ताट वाढिलें षड्रसीं । तो पुष्टि तुष्टि क्षुधानाशासी । जेवीं ग्रासोग्रासीं । स्वयेंचि पावे ॥ ६१० ॥ जितुका जितुका घेइजे ग्रास । तितुका तितुका क्षुधेचा नाश । तितुकाचि पुष्टिविन्यास । सुखोल्हास तितुकाचि ॥ ११ ॥ पुष्टि तुष्टि क्षुधानाशनी । जेवीं एका काळें येती तीनी । भोक्ता पावे स्वयें भोजनीं । तेवीं भगवद्भजनीं भक्त्यादि त्रिकू ॥ १२ ॥ सद्भावें करितां भगवद्भक्ती । भक्ति विरक्ति भगवत्प्राप्ती ।

—“ अहोपण, ही गति जे योगारूढ झाले आहेत त्यांनाहि अनेक जन्मांनीं सुद्धां मिळणें कठिण आहे. तेव्हां नुसत्या नामसंकीर्तनानेंच एकाच जन्मांत ती कशी मिळेल ! ” अशी आशंका घेऊन तिचें सदृष्टान्त समाधान सांगतात—

प्रपद्यमानस्य—हरीचें भजन करणाऱ्या पुरुषाला, **भक्तिः**—प्रेमलक्षण भक्ति, **परेशानुभवः**—प्रेमास्पद भगवद्रूपाची स्फूर्ति, **अन्यत्र विरक्तिः**—व त्या भगवत्स्वरूपानुभवानें तृप्त झालेल्या त्याची गृहादि इतर पदार्थांविषयीं विरक्ति, **एषः त्रिकः एककालः**— या तीन गोष्टी भजनाच्या वेळींच सिद्ध होतात, **यथा**—ज्याप्रमाणें, **अश्नतः**—भोजन करणाऱ्या पुरुषाचीं, **अनुघासं**—प्रत्येक घासाबरोबर, **तुष्टिः**—संतोष, **पुष्टिः**—उदरभरण व, **क्षुदपायः**—क्षुधानिवृत्ति, **स्युः**—हीं कार्यें होतात त्याप्रमाणें. [ग्रासोग्रासीं तृप्ति, उदरभरण व क्षुधेची निवृत्ति हीं कार्यें जशीं भोजन करणाराच्या प्रत्ययाला येतात त्याप्रमाणें हरिभक्ति करणाऱ्या पुरुषाची प्रेमलक्षण भक्ति, प्रेमास्पद भगवद्रूपाचा अनुभव व त्या अनुभवानें तृप्त झालेल्या त्याची हरीहून भिन्न असलेल्या गृहादिकांविषयीं विरक्ति हीं तीन कार्यें भजन करीत असतांनाच होतात. ‘ प्रतिघासं ’ —ग्रासोग्रासीं हें उदाहरणार्थ आहे. त्यामुळें प्रत्येक शिताबरोबरहि जसें सुखादि होतें त्याप्रमाणें एकेकदां भजन करतांनाहि प्रेमादि तीन कार्यें होतात, असें पाहून पुनः पुनः भजन करणाऱ्या पुरुषाच्या ठिकाणीं परमप्रेमादि उत्पन्न होतें. अनेक घास खाणाऱ्या पुरुषाला परम संतोषादि जसा होतो, त्याप्रमाणेंच हें समजावें.] ४२.

हे विदेहराजा, गायीपाशीं तिचें वत्स जसें धांवत येतें, त्याप्रमाणें अशा भवद्भक्तीपाशीं विषयविरक्ति धांवून येते. ४ किंबहुना जुळीं फळें एकमेकांपासून जशीं वेगळीं होत नाहींत, त्याप्रमाणें भक्ति व विरक्ति एकाच वेळीं भक्तामध्यें रहातात व त्यांच्या बलानें भक्त मोठा बलवान् होतो ५ आणि जेथें भक्ति व विरक्ति स्वभावतःच एकत्र नांदूं लागतात, तेथेंच पूर्णप्राप्ति दासीप्रमाणें सर्वदा राबते. ६ याप्रमाणें भगवद्भक्ति हें त्रिभुवनांत एक अत्यंत श्रेष्ठ साधन आहे. भक्तांच्या घरीं भक्ति व विरक्ति याबरोबर प्राप्तिहि नांदूं लागते. ७ भक्ति, विरक्ति आणि आत्मानुभव हीं तिन्ही एकाच वेळीं एकामध्यें कशीं रहातात हें मी तुला विशद करून सांगतों, तें ऐक. ८ जशी जशी भगवद्भक्ति करावी, तशी तशी विषयविरक्ति वाढूं लागते आणि त्यांच्या अनुसार भक्त तत्क्षणींच आत्मानुभवस्थितीला प्राप्त होतात. ९ क्षुधेनें व्याकुळ झालेल्या पुरुषापुढें षड्रस अन्न वाढलेलें ताट ठेविलें असतां तो प्रत्येक घासाबरोबर आपोआप तुष्टि, पुष्टि व क्षुधानाश यांस जसा प्राप्त होतो, ६१० म्हणजे जितका जितका घास घेतो, तितकी तितकी क्षुधेची निवृत्ति होते व तितकेंच पोट भरतें आणि घासांच्या प्रमाणांतच सुखानुभवहि येतो. ११ भोजन करणारा भोजनप्रसंगीं क्षुधानिवृत्यादि तीन फळांचा जसा एकाच वेळीं अनुभव घेतो, त्याप्रमाणें भगवद्भजनामध्यें भक्त्यादि तीन फलांचा अनुभव येतो. १२ याप्रमाणें सद्भावानें भगवद्भक्ति करूं लागले असतां, भक्ति, विरक्ति

तिनी एके काळें होती । ऐशिया युक्तीं जाणिजे राया ॥ १३ ॥ भक्ति म्हणिजे सर्व भूतीं । सप्रेम भजनयुक्ती । प्राप्ति म्हणिजे अपरोक्षस्थिती । भगवत्स्फूर्ती अनिवार ॥ १४ ॥ विरक्ति म्हणिजे ऐशी पहा हो । स्त्रीपुत्रदेहादि अहंभावो । समूळ जेथें होये वावो । विरक्तिनिर्वाहो या नांव राया ॥ १५ ॥ यापरी भजनाचे पोटीं । भक्ति विरक्ति प्राप्ति त्रिपुटी । ऐक्यभावें सद्भक्तां उठी । हरिभजनदिठी एकेचि काळीं ॥ १६ ॥ यालागीं राया निजहितार्थीं । आदरें करावी हरिभक्ती । तेणें अवश्य भगवत्प्राप्ती । उपसंहारार्थीं कवी सांगे ॥ १७ ॥

इत्यच्युताङ्घ्रिं भजतोऽनुवृत्त्या भक्तिर्विरक्तिर्भगवत्प्रबोधः ।
भवन्ति वै भागवतस्य राजंस्ततः परां शान्तिमुपैति साक्षात् ॥ ४३ ॥

यापरी अनन्यभक्ती । जे सर्वदा सर्व भूतीं करिती । ते भक्ति विरक्ति भगवत्प्राप्ती । सहज पावती अनायासें ॥ १८ ॥ राया हरिभक्तिदिव्यांजन । तें लेऊनि भक्त सज्जन । साधिती भगवन्निधान । निजभजनमहायोगें ॥ १९ ॥ करितां ऐक्यभावें निजभक्ती । उत्कृष्ट उपजे पूर्ण शांती । तेणें होये असतांची निवृत्ती । भक्तां पूर्ण प्राप्ती परमानंदें ॥ ६२० ॥ यालागीं धन्य भगवद्भक्त । इंद्रियीं वर्ततां विषयीं विरक्त । देहीं असोनि देहातीत । नित्यमुक्त हरिभजनें ॥ २१ ॥ भावें करितां भगवद्भक्ती । भुक्ती मुक्तिही न वांछिती । तरी त्यांपाशीं चारी मुक्ती । दास्य करिती सर्वदा ॥ २२ ॥ हा भागवतांचा निजमहिमा । अनुपम नाहीं उपमा । भावें भजोनि पुरुषोत्तमा । परमात्मगरिमा पावले ॥ २३ ॥ अगाध भगवंताची भक्ती । भक्तांची उत्कृष्ट प्राप्ती । ऐकतां विदेहचक्रवर्ती । आश्चर्यें चित्तीं चमत्कारिला ॥ २४ ॥ म्हणे धन्य धन्य भगवद्भजन । हरीखें कवीस लोटांगण । घालितां चालिलें

आणि भगवत्प्राप्ति हीं तीन्ही एकाच वेळीं अनुभवास येतात, असें समजावें. १३ भक्ति म्हणजे सर्व भूतांमध्यें सप्रेम भजनयोगप्राप्ति म्ह० साक्षात् अखंड भगवत्स्वरूपानुभव १४ आणि विरक्ति म्ह० स्त्री-पुत्र-देह यांवरील अहं-ममानुभवाचा सर्वथा निरास. राजा, १५ याप्रमाणें भजनापासून ही त्रिपुटी सद्भक्तामध्यें ऐक्यभावानें उद्भवते. १६ यास्तव ज्याला आपल्या अत्यंत हिताची लालसा असेल, त्यानें मोठ्या आदरानें हरिभक्ति करावी; म्ह० भगवत्प्राप्ति अवश्य होते असें कवि आतां पुढील उपसंहारश्लोकांत सांगत आहे. ६१७.

—आतां भगवत्प्रसादानें भक्त कृतार्थ होतो असें कवि सांगतो—

राजन्–हे राजा ! **इति**–याप्रमाणें, **अच्युताङ्घ्रिं**–अच्युतचरणाचे, **अनुवृत्त्या भजतः भागवतस्य**–अनन्यभावानें भजन करणाऱ्या भगवद्भक्ताची, **भक्तिः**–प्रेमलक्षण भक्ति, **विरक्तिः**–वैराग्य, **भगवत्प्रबोधः**–व भगवानांचा साक्षात्कार ही, **भवन्ति**–प्राप्त होतात. **ततः**–त्यानंतर, **साक्षात् परां शान्ति**–भक्त साक्षात् परम शान्तीला, **उपैति**–प्राप्त होतो. ४३.

याप्रमाणें जे अनन्यभावानें सर्वदा, सर्व भूतांमध्यें भगवच्चरणाचें भजन करितात ते भक्ति, विरक्ति व भगवत्प्राप्ति यांना अनायासानें प्राप्त होतात. १८ हे राजा ! सज्जनभक्त हरिभक्ति हेंच दिव्यांजन डोळ्यांत घालून आपल्या भजनरूप महायोगानें भगवद्रूप निधि साधितात. १९ ऐक्यभावानें आत्मभक्ति करूं लागले असतां उत्कृष्ट पूर्णशांति उपजते. त्यामुळें मिथ्या पदार्थांची निवृत्ति होते व भक्तांना परमानंदानें पूर्णप्राप्ति होते. ६२० म्हणून भगवद्भक्त धन्य आहेत. ते सर्व इंद्रियांनीं व्यवहार करीत असतां विषयांविषयीं विरक्त, देहांत असून नसल्यासारखे, व हरिभजनानें नित्यमुक्त होतात. २१ भावानें भगवद्भक्ति करीत असतांना ते भोग व मोक्ष यांचीहि इच्छा करीत नाहींत. तथापि चारी मुक्ति त्यांच्यापाशीं सर्वदा दास्य करीत रहातात. २२ भागवतांचा हा महिमा अनुपम आहे, त्याला उपमा नाहीं. भगवद्भक्त भावानें पुरुषोत्तमाला भजून परब्रह्माच्या श्रेष्ठत्वास प्राप्त झाले आहेत. २३ भगवंताची ही अगाध भक्ति आणि भक्तांची भगवत्प्राप्ति ऐकून जनकराजा आश्चर्यचकित झाला २४ आणि 'धन्य धन्य आहे भगवद्भजन !' असें बोलून हर्षानें

स्फुंदन । रोमांचित नयन अश्रुपूर्ण जाहले ॥ २५ ॥ आनंदस्वेदें कांपत । नावेक राहिला तटस्थ । सर्वोचि जाहला सावचित्त । म्हणे झणीं महंत न पुसतां जाती ॥ २६ ॥ ऐशिया अतिकाकुलतीं । नेत्र उघडोनी पाहे नृपती । बैसली देखोन मुनिपंक्ती । अतिशयें चित्तीं सुखावला ॥ २७ ॥ तेणें संतोषें डोलत । म्हणे पूर्णप्राप्ती भगवद्भक्त । जगीं कैसे कैसे विचरत । तीं चिन्हें समस्त पुसों पाहों ॥ २८ ॥

राजोवाच–अथ भागवतं ब्रूत यद्धर्मो यादृशो नृणाम् । यथाचरति यद्ब्रूते यैर्लिङ्गैर्भगवत्प्रियः ॥ ४४ ॥

भक्तां पूर्ण प्राप्ती सुगम । ऐकतां राजा निवाला परम । तो भक्तचिह्नानुक्रम । समूळ सवर्म पुसत ॥ २९ ॥ विदेह म्हणे स्वामी मुनी । पूर्ण प्राप्ति आकळोनी । ते भक्त कैसे वर्तती जनीं । तीं लक्षणें श्रवणीं लेलवा मज ॥ ६३० ॥ भक्तलक्षणभूषण । तेणें मंडित करा श्रवण । सावध ऐकतां संपूर्ण । होइजे आपण भगवत्प्रिय ॥ ३१ ॥ त्यांचा कोण धर्म कोण कर्म । कैसे वर्तती भक्तोत्तम । हृदयीं धरोनि पुरुषोत्तम । त्यांचें बोलतें वर्म तें कैसें ॥ ३२ ॥ कोणे परी कैशा स्थिती । हरिभक्त हरीस प्रिय होती । ऐशिया लक्षणांचिया पंक्ती । समूळ मजप्रती सांगिजे स्वामी ॥ ३३ ॥ विदेहाच्या प्रश्नावरी । संतोषिजे मुनीश्वरीं । कवीधाकुटा जो हरी । तो बोलावया वैखरी सरसावला ॥ ३४ ॥

त्यानें कवीला लोटांगण घातलें. त्याचें सर्व अंग रोमांचित झालें, नेत्र अश्रुपूर्ण झाले व कंठ सद्गदित झाला. २५ सात्त्विकभावानें त्याच्या शरीराला कंप सुटला, तो एक क्षणभर स्तब्ध राहिला, पण लागलीच देहभानावर आला. कारण त्याला वाटलें कीं, हे महंत कदाचित् मीं सर्व प्रश्न विचारण्यापूर्वींच निघून जातील ! २६ अशा भीतीनें तो आपले नेत्र उघडून जों पहात आहे तों त्यानें मुनींची पंक्ति आपल्यापुढें बसलेली पाहिली. त्यामुळें तो मनांत अतिशय हृष्ट झाला व हर्षानें डोलूं लागला. २७ ज्यांना पूर्ण परब्रह्मप्राप्ति झाली आहे असे भगवद्भक्त जगांत कसे राहतात, त्यांचीं सर्व चिन्हें काय आहेत, तें आपण यांस विचारावें, असें तो आपल्या मनांत म्हणाला. ६२८.

—राजा त्या भागवतांचें लक्षण विचारितो—

राजा उवाच–राजा म्हणाला, **अथ**–आतां, **भागवतं ब्रूत**–मला भागवताचें लक्षण सांगा. **यद्धर्मः**–तो ज्या धर्मामध्यें परिनिष्ठित होऊन रहातो, **नृणां यादृशः**–मनुष्यांमध्यें जशा स्वभावाचा तो असतो, **यथा चराति**–ज्या प्रकारें तो वागतो, **यत् ब्रूते**–जसें बोलतो, **यैः लिंगैः**–ज्या चिन्हांनीं, **भगवत्प्रियः**–भगवानाला प्रिय होतो, तें सर्व मला सांगा. [भगवन्, भगवद्भक्त कोणत्या धर्मामध्यें तत्पर असतो, लौकिकांत त्याचा स्वभाव, वर्तन व भाषण कसें असतें व तो कोणत्या चिन्हानें भगवानाला प्रिय होतो, तें आतां मला सांगा.] ४४.

भक्तांना पूर्णत्वाची प्राप्ती होणें सुगम आहे हें ऐकून राजाला अत्यंत समाधान वाटलें. तो भक्तांच्या लक्षणांचा अनुक्रम समूळ व सरहस्य विचारूं लागला. २९ विदेहराजा म्हणतो–हे स्वामिन् मुनिराज, ज्यांना अशी पूर्ण प्राप्ति झाली आहे ते भक्त लौकिकांत कोणत्या लक्षणांनीं युक्त होऊन वागतात तें मला ऐकवा. ६३० भक्तांचें लक्षण या भूषणानें माझ्या कानांना भूषित करा, कारण त्यांचीं लक्षणें सावधान चित्तानें पूर्णपणें ऐकल्यानें ऐकणाराहि भगवत्प्रिय होतो. ३१ भगवद्भक्तांचा धर्म कोणता, कर्म कोणतें, ते वागतात कसे, पुरुषोत्तमाला आपल्या हृदयामध्यें स्थिर करून ते जें बोलतात, त्यांत रहस्य काय आहे, ३२ कोणत्या प्रकारें व कशा स्थितीनें ते हरीला प्रिय होतात, तें मला सांगा. ३३ जनकाचा हा प्रश्न ऐकून ते मुनीश्वर संतुष्ट झाले आणि कवीचा कनिष्ठ भ्राता जो हरि तो या प्रश्नाचें उत्तर देण्यास पुढें सरसावला. ६३४.

हरिरुवाच–सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः । भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥ ४२ ॥

हरि म्हणे रायाप्रती । अमित भक्तलक्षणस्थिती । एक दिगंबरत्वें वर्तती । एक स्वाश्रमस्थिती निजाचारें ॥ ३५ ॥ एक सदा पडले असती । एकांची ते उन्मादस्थिती । एक सदा गाती नाचती । एक ते होती अबोलणें॥ ३६ ॥ एक गर्जती हरिनामें । एक निर्दाळिती निजकर्में । एक भूतदयाळू दानधर्में । एक भजननेमें राहती ॥ ३७ ॥ ऐशा अनंत भक्तस्थिती । सांगतां सांगावया नाकळे वृत्ती । त्यांमाजीं मुख्य संकलितीं । राया तुजप्रती सांगेन ॥ ३८ ॥ पूर्णप्राप्तीचा मुख्य ठावो । सर्वां भूतीं भगवद्भावो । हाचि पूर्णभक्तीचा निजगौरवो । तोचि अभिप्रावो हरि सांगे ॥ ३९ ॥ सर्व भूतीं मी भगवंत । सर्व भूतें मजआंत । भूतीं भूतात्मा मीचि समस्त । मीचि मी येथ परमात्मा ॥ ६४० ॥ ऐसें जें पूर्णत्वाचें मीपण । तेणें वाढे आत्माभिमान । सहजें निरसे निजनिरभिमान । तें शुद्ध लक्षण एक राया ॥ ४१ ॥ शुद्ध भक्तांचें निजलक्षण । प्रत्यगात्मयाचें जें मीपण । तेंही मानूनियां गौण । भावना पूर्ण त्यांची ऐसी ॥ ४२ ॥ सर्वां भूतीं भगवंत । भूतें भगवंतीं वर्तत । भूतीं भूतात्मा तोचि समस्त । मी म्हणणें तेथ मीपणा न ये ॥ ४३ ॥ सर्व भूतीं भगवंत पाहीं । भूतें भगवंताचे ठायीं । हें अवघें देखे जो स्वदेहीं । स्वस्वरूप पाहीं स्वयें होय ॥ ४४ ॥ तो भक्तांमाजीं अतिश्रेष्ठ । तो भागवतांमाजीं

—'हरि' या नांवाचा ऋषभपुत्र पुढील तीन श्लोकांनीं राजाच्या पहिल्या म्ह० 'भगवद्भक्त कोणत्या धर्मामध्यें तत्पर असतो' या प्रश्नाचें उत्तर देतो—

हरिः उवाच–हरि बोलला, **यः**–जो, **आत्मनः**–स्वतःचा, **सर्वभूतेषु**- सर्वभूतांमध्यें, **भगवद्भावं**-भगवद्भाव,**पश्येत्**-पाहतो, **भगवति आत्मनि भूतानि पश्येत्**–त्याचप्रमाणें नित्य ऐश्वर्यादिरूप आत्म्यामध्यें म्ह० हरीमध्यें सर्व भूतें पाहतो, **एष-भागवतोत्तमः**-तो भागवतश्रेष्ठ होय. [जो सर्वभूतांमध्यें ब्रह्मत्वानें स्वतःचा समन्वय पहातो, त्याचप्रमाणें अधिष्ठानभूत ब्रह्मरूप आत्म्यामध्यें सर्व भूतें पहातो, तो श्रेष्ठ भगवद्भक्त होय. किंवा सर्वत्र व्याप्त असल्यामुळें प्रमाता असल्यामुळें व 'आत्माच परम हरि आहे' असें तंत्रवचन असल्यामुळें मशकादि क्षुद्र भूतांमध्येंहि नियंतृत्वानें रहाणाऱ्या आत्म्याचा म्ह० हरीचा भगवद्भाव म्ह० निरतिशय ऐश्वर्यच जो पहातो, त्या भूतांमध्यें तारतम्य पहात नाहीं, त्याचप्रमाणें आत्म्यामध्यें म्ह० हरीमध्येंच सर्व भूतें पहातो तो भागवतोत्तम होय. पण तो आत्मा कसा तर भगवान् म्ह० ज्याचें ऐश्वर्यादिरूप कधींच च्युत होत नाहीं अशा आत्म्यामध्यें सर्व भूतें पहाणारा जड, मलिन भूतांच्या आश्रयत्वानें त्याच्या ठिकाणीं जाड्यादिकांची प्राप्ति होऊन त्याच्या ऐश्वर्यादिकांची हानि होते असें पहात नाहीं. याप्रमाणें सर्वत्र परिपूर्ण भगवत्तत्त्व पहाणारा भागवतोत्तम होय.] ४५.

हरि म्हणतो, हे राजा, भक्तांच्या लक्षणांची स्थिति एकाच प्रकारची नाहीं. कोणी दिगंबर होऊन फिरतात, कोणी आपल्या आश्रमाला विहित असलेला आचार पाळून रहातात, ३५ कांहीं अजगरवृत्तीनें सदा पडून रहातात, कित्येक उन्मत्तासारखे वागतात. कांहीं भक्त सदा गातात व नाचतात, कोणी मौनव्रत धरितात, ३६ कोणी हरिनामाची गर्जना करीत सुटतात, कित्येक स्वकर्मांचा त्याग करितात, कित्येक दयाळू भूतदयेनें दानधर्म करितात व कांहींजण भजनाचा नेम धरतात, ३७ भक्तांच्या अशा अनेक स्थिति आहेत. त्या सर्व सांगूं लागल्यास कधींच संपणार नाहींत. म्हणून हे राजा ! मी तुला थोडक्यांत मुख्य भक्तस्थिति सांगतों. ३८ सर्व भूतांमध्यें भगवत्स्वरूप पहाणें हा परमात्मप्राप्तीचा मुख्य उपाय आहे. तोच पूर्ण भक्तीचा गौरव आहे. हाच अभिप्राय हरी सांगतो. ३९ सर्व भूतांमध्यें मी भगवंत आहें. सर्व भूतें माझ्यामध्यें आहेत. समस्त भूतांतील भूतात्मा मीच आहें. सृष्टींत एक मीच मी परमात्मा आहें. ६४० अशा पूर्णत्वाभिमानानें आत्माभिमान वाढतो व देहाभिमान अनायासानें निवृत्त होतो. हे राजा, तें शुद्ध लक्षण ऐक. ४१ प्रत्यगात्म्याला मी समजणें हें शुद्ध भक्तांचें निर्दोष लक्षण आहे. पण त्यालाहि गौण मानून या शुद्ध भक्ताची अशी पूर्ण भावना असते. ४२ सर्व भूतांमध्यें भगवान् व भगवानामध्यें सर्व भूतें रहातात. सर्व भूतांतील तोच भूतात्मा मी आहें, असें म्हणणें यांत मीपणाचा दोष येत नाहीं. ४३ सर्व भूतीं भगवान् व भगवंतामध्यें सर्व भूतें अशा भावनेनें स्वदेहांत जो सर्व पहातो तो स्वतःच स्वस्वरूप होतो. ४४ तो भक्तांमध्यें अतिश्रेष्ठ, भागवतांमध्यें वरिष्ठ

वरिष्ठ । त्यासी उत्तमत्वाचा पाट । अवतार श्रेष्ठ मानिती ॥ ४५ ॥ तो योगियांमाजीं अग्रगणी । तो ज्ञानियांचा शिरोमणी । तो सिद्धांमाजीं मुगुटमणी । हें चक्रपाणी बोलिला ॥ ४६ ॥ जैशा घृताचिया कणिका । घृतेंसीं नव्हेति आणिका । तेवीं भूत भौतिक व्यापका । भिन्न देखा कदा नव्हती ॥ ४७ ॥ हे उत्तम भक्तांची निजस्थिती । राया जाणावी निश्चितीं । आतां मध्यम भक्त कैसे भजती । त्यांची भजनगती ऐक राया ॥ ४८ ॥

ईश्वरे तदधीनेषु बालिशेशु द्विषत्सु च । प्रेम मैत्री कृपोपेक्षा यः करोति स मध्यमः ॥ ४६ ॥

ईश्वर मानी उत्तमोत्तम । तद्भक्त मानी मध्यम । अज्ञान ते मानी अधम । द्वेषी ते परम पापी मानी ॥ ४९ ॥ ईश्वरीं प्रेम पवित्र । भक्तांसीं मैत्री मात्र । अज्ञानीं तो कृपापात्र । उपेक्षा निरंतर द्वेषियांची ॥ ६५० ॥ हे मध्यम भक्तांची भक्ती । राया जाण ऐशा रीतीं । आतां प्राकृत भक्तांची स्थिती । तेही तुजप्रती सांगेन ॥ ५१ ॥

अर्चायामेव हरये पूजां यः श्रद्धयेहते । न तद्भक्तेषु चान्येषु स भक्तः प्राकृतः स्मृतः ॥ ४७ ॥

पाषाण प्रतिमा हाचि देवो । तेथेंचि ज्याचा पूर्ण भावो । भक्तसज्जनांसी पहावो । अणुमात्र देहो लवों नेदी ॥ ५२ ॥ ते ठायीं साधारण जन । त्याची वार्ता पुसे कोण । त्यासी स्वप्नींही नाहीं सन्मान । यापरी भजन प्राकृताचें ॥ ५३ ॥ ऐशिया स्थितीं जो जड भक्तु । तो जाणावा मुख्य

व उत्तमत्वाचा आधार, असा अवतारश्रेष्ठ मानितात. ४५ तो योग्यांमध्यें अग्रगण्य, ज्ञान्यांचा शिरोमणि, सिद्धांचा मुकटमणि होय, असें स्वतः चक्रपाणीनें सांगितलें आहे. ४६ घृताच्या कण्या जशा घृताहून भिन्न नाहींत, त्याप्रमाणें आकाशादि भूतें व चतुर्विध भूतशरीरें व्यापक परमात्म्याहून केव्हांहि भिन्न नाहींत, ४७ अशी दृढ भावना ठेवणें ही उत्तम भक्ताची स्वाभाविक स्थिति आहे, असें हे राजा, निश्चयानें जाणावें. आतां मध्यम भक्ताच्या भजनाचा प्रकार मी सांगतों, तो ऐक. ६४८.

यः– जो, **ईश्वरे प्रेम**-ईश्वरावर प्रेम, **तदधीनेशु मैत्री**-भगवद्भक्तांशीं मैत्री, **बालिशेशु कृपा**-अज्ञांवर कृपा व, **द्विषत्सु उपेक्षा**-शत्रूंची उपेक्षा, **करोति**–करितो, **सः मध्यमः** तो मध्यम भक्त होय. [ईश्वरादि चौघांमध्यें जो प्रेमादि चार भावना करितो तो मध्यम भगवद्भक्त होय. कारण तो भूतांमध्यें असा भेद पहातो.] ४६.

जो ईश्वराला उत्तमोत्तम मानितो, त्याच्या भक्ताला मध्यम मानितो, अज्ञानी लोकांना अधम मानितो व ईश्वराचा व भूतांचा द्वेष करणारे जे नास्तिक व भूतद्रोही त्यांना परम पापी मानितो ४९ आणि ईश्वरावर पवित्र प्रम, भक्तांशीं केवळ मैत्री, अज्ञानजनांवर कृपा व पूर्वोक्त द्वेषीजनांची निरंतर उपेक्षा करितो ६५० तो मध्यम भक्त होय. राजा, मध्यम भक्ताची भक्ति ही अशी आहे, असें तूं समज. ६५१.

यः–जो, **अर्चायां एव**–प्रतिमेमध्येंच, **हरये पूजां**–हरीची पूजा, **श्रद्धया ईहते**–श्रद्धेनें करितो, **तद्भक्तेषु**–हरीच्या भक्तांमध्यें, **च अन्येषु न**–व इतर भूतांमध्यें हरिपूजा करीत नाहीं, **सः भक्तः**–तो भक्त, **प्राकृतः स्मृतः**–प्राकृत म्हटला आहे. [जो मूर्तीमध्यें हरीची पूजा श्रद्धेनें करितो, पण हरीच्या भक्तांमध्यें किंवा अन्य भूतांमध्यें त्याची भक्ति मुळींच करीत नाहीं तो प्राकृत भक्त होय. प्रकृति म्ह० प्रारंभ, आणि प्राकृत म्ह० ज्यानें नुक्ताच भक्तीला आरंभ केला आहे असा भक्त. तोच पुढें हळूहळू उत्तम भक्त होईल असा याचा भावार्थ.] ४७.

पाषाणाची प्रतिमा हाच देव व तेथेंच ज्याचा पूर्ण भाव आहे, त्या मूर्तीपुढें नाकधुऱ्या काढील, पण भक्त सज्जनापुढें आपल्या देहाला अणुमात्रहि वाकूं देत नाहीं. ५२ मग इतर साधारण जनांचें नांव कशाला पाहिजे ! तो स्वप्नांतहि त्यांचा सन्मान करीत नाहीं. प्राकृताचें भजन हें अशा प्रकारचें असतें. ५३ त्यांतल्या त्यांत अज्ञ भक्त हा

प्राकृतू । प्रतिमाभंगें अंतू । मानी निश्चितू देवाचा ॥५४॥ यापरी त्रिविध भक्त । सांगितले भजनयुक्त । परी उत्तमांचीं लक्षणें अद्भुत । तीं सांगावया चित्त उदित माझें ॥ ५५ ॥

गृहीत्वापींद्रियैरर्थान्यो न द्वेष्टि न हृष्यति । विष्णोर्मायामिदं पश्यन् स वै भागवतोत्तमः ॥ ४८ ॥

इंद्रियें विषयांतें सेविती । परी सुखदुःख नुमटे चित्तीं । विषय मिथ्यात्वें देखती । ते जाण निश्चितीं उत्तम भक्त ॥ ५६ ॥ मृगजळीं जेणें केलें स्नान । तो नाहता कोरडाचि जाण । तेवीं भोगीं ज्यांसी अभोक्तेपण । ते भक्त पूर्ण उत्तमोत्तम ॥ ५७ ॥ उत्तम भक्त विषय सेविती । हा बोलु रूढला प्राकृताप्रती । त्यांसी विषयीं नाहीं विषयस्फूर्ती । त्यागिती भोगिति दोनी मिथ्या ॥५८॥ स्वप्नींचें केळें रायभोगे । जागा होऊनि खावों मागे । तेणें हातु माखे ना तोंडीं लागे । तेवीं विषयसंगें हरिभक्त ॥ ५९ ॥ येथवरी मिथ्या विषयभान । तरी सेवावया त्यांसी काय कारण । येथ प्रारब्ध बळी पूर्ण । तें अवश्य जाण भोगवी ॥ ६६० ॥ परी मी एक विषयभोक्ता । हे स्वप्नींही त्यास नुमटे कथा । यालागीं उत्तम भागवतता । त्यासीच तत्त्वतां बाणली ॥ ६१ ॥ यापरी विषयासक्तीं । वर्तिजे उत्तम भक्तीं । याहूनि अगाध स्थिती । सांगेन तुजप्रती ते ऐक ॥ ६२ ॥

मुख्य प्राकृत आहे. तो मूर्तीचा भंग झाला असतां देवाचाच निश्चयानें अंत झाला आहे असें समजतो. ५४ याप्रमाणें भजनयुक्त त्रिविध भक्त सांगितले, पण उत्तम भक्ताचीं अद्भुत लक्षणें सांगावयास माझें चित्त फार उत्सुक झालें आहे. ६५५.

इंद्रियैः अर्थान् गृहीत्वा अपि—इंद्रियांनीं विषयांचें ग्रहण करूनहि, **इदं विष्णोः मायां पश्यन्**—हे विश्व विष्णूची माया आहे, असें पहाणारा, **न द्वेष्टि**—द्वेष करीत नाहीं, **न हृष्यति**—व संतोष पावत नाहीं, **सः वै भागवतोत्तमः**—तोच उत्तम भागवत होय. [हें सर्व विश्व ही व्यापक परमात्म्याची माया आहे, असें समजणाऱ्या भक्ताच्या चित्तांत श्रीवासुदेवाचा प्रवेश झालेला असल्यामुळें तो अगोदर इंद्रियांनीं विषयांचें ग्रहण करीतच नाहीं आणि जरी केलें तरी त्यांतील प्रतिकूल विषयांचा द्वेष करीत नाहीं व अनुकूल विषयांमुळें संतुष्ट होत नाहीं, तोच उत्तम भागवत होय.] ४८.

इंद्रियें विषयांचें सेवन करितात. पण त्यामुळें ज्यांच्या चित्तांत सुखदुःख उत्पन्न होत नाहीं, कारण ते विषयांना मिथ्या समजतात, असले भक्त भागवतोत्तम आहेत, असें तूं निश्चयानें जाण. ५६ मृगजलांत स्नान करणारा स्नान करूनहि कोरडाच असतो. त्याप्रमाणें विषयभोगामध्येंहि ज्याला अभोक्तेपण असतें तो उत्तमोत्तम भक्त होय. ५७ ‘उत्तम भक्त विषयांचें सेवन करितात’ ही भाषा प्राकृतांमध्यें रूढ आहे. त्यांना विषयांमध्येंहि विषयानुभव नाहीं, ते विषयांचा त्याग करितात व भोग घेतात हीं दोन्ही मिथ्या आहेत. ५८ स्वप्नांतील राजेळें केळें जागा होऊन खावयास मागतो पण त्यांनीं त्याचा हातहि माखत नाहीं व तें तोंडालाहि लागत नाहीं. त्याप्रमाणें हरिभक्त विषयसंगानें लिप्त होत नाहीं. ५९ विषयभाव जर इतके मिथ्या आहे तर त्याला विषयसेवन करण्याचें कारण तरी काय! पण प्रारब्धकर्म अतिशय बलवान् आहे. तें भक्ताकडूनहि विषय अवश्य भोगवितें. ६६० तथापि मी एक विषयभोक्ता आहें ही वार्ता त्याच्या स्वप्नांतहि कधीं येत नाहीं. म्हणून उत्तम भागवतपणा त्याच्याच ठिकाणीं बाणलेला असतो. ६१ उत्तम भक्तानें याप्रमाणें विषयामध्यें वागावें. राजा, मी आतां तुला याहूनहि अगाध स्थिति सांगतों, ती ऐक. ६६२.

देहेंद्रियप्राणमनोधियां यो जन्माप्ययक्षुद्भयतर्षकृच्छ्रैः ।
संसारधर्मैरविमुह्यमानः स्मृत्या हरेर्भागवतप्रधानः ॥ ४९ ॥

देहेंद्रियमनोबुद्धि प्राण । हेंचि बंधाचें पंचायतन । क्षुधा तृषा भय क्लेश पूर्ण । जन्ममरण इत्यादि ॥ ६३ ॥ या पांचां स्थानीं अपार श्रम । या नांव म्हणिजे संसारधर्म । निजभक्तां प्रसन्न आत्माराम । त्यासी भवभ्रम स्वप्नींही नाहीं ॥ ६४ ॥ क्षुधा लागलिया दारुण । अन्नआकांक्षे पीडे प्राण । भक्तां क्षुधेची नव्हे आठवण । ऐसें अगाध स्मरण हरीचें ॥ ६५ ॥ भावें करितां भगवद्भक्ती । क्षुधेतृषेची नव्हे स्फूर्ती । एवढी पावले अगाध प्रीती । ते भवभयें निश्चितीं डंडळतीना ॥ ६६ ॥ मनामाजीं भवभयभरणी । तें मन रातलें हरिचरणीं । आतां भयातें तेथ कोण मानी । मन मनपणीं असेना ॥ ६७ ॥ मनीं स्फुरे द्वैताची स्फूर्ती । तेथ भवभयाची दृढ स्थिती । ते मनीं जाहली हरीची वस्ती । यालागीं भवभयनिवृत्ती द्वैतेंसीं ॥ ६८ ॥ देहबुद्धीमाजी जाणा । नानापरी उठती तृष्णा । ते बुद्धी निश्चयें हरीच्या स्मरणा । करितां परिपूर्णा बिनटली स्वयें ॥ ६९ ॥ जेथें जें जें स्फुरे तृष्णास्फुरण । तेथें स्वयें प्रगटे नारायण । तेव्हां तृष्णा होय वितृष्ण । विरे संपूर्ण पूर्णामाजी ॥ ६७० ॥ यापरी गा तृष्णारहित । हरिस्मरणें भगवद्भक्त । इंद्रियक्लेशां भक्त अलिप्त । तोही वृत्तांत ऐक राया ॥ ७१ ॥ मुख्य कष्टाचें अधिष्ठान । इंद्रियकर्मीं राया जाण । ते इंद्रियकर्मीं ब्रह्मस्फुरण । हरिभक्तां पूर्ण हरिभजनें ॥ ७२ ॥ दृष्टीनें घेऊं जातां दर्शन । दृश्यमात्रीं प्रगटे नारायण । श्रवणीं शब्द घेतां जाण । शब्दार्थीं पूर्ण विराजे वस्तु ॥ ७३ ॥ घ्राणीं घेतां नाना वासु । वास बोधें प्रगटे परेशु । रसना सेवी जो जो रसु ।

यः—जो, हरेः स्मृत्या—हरीच्या स्मरणानें, देहेंद्रियप्राणमनोधियां—देह, इंद्रियें, प्राण, मन, व बुद्धि यांच्या, जन्माप्ययक्षुद्भयतर्षकृच्छ्रैः संसारधर्मैः—जन्म, नाश, क्षुधा, भय, तृष्णा व श्रम या संसारधर्मांनीं, अविमुह्यमानः—मोहित न केला जाणारा, सः भागवतप्रधानः—तो भागवतश्रेष्ठ होय. [हरीचें स्मरण करीत असल्यामुळें देहादिकांच्या जन्मादि संसारधर्मांकडून जो मोहित केला जात नाहीं, मी संसारी आहें असा मोह ज्याच्या ठिकाणीं उत्पन्न केला जात नाहीं, तो श्रेष्ठ भागवत होय. त्यांतील देहाचे जन्म व नाश, प्राणाचे क्षुधा व तृषा, मनाचें भय, बुद्धीची तृष्णा व इंद्रियाचा श्रम, हे संसारधर्म आहेत.]४९.

देह, इंद्रियें, प्राण, मन व बुद्धि हीं बंधाचीं पांच स्थानें आहेत, त्यांत जन्म, मरण, क्लेश, तहान, भूक, भय, तृष्णा ६३ हे अपार श्रम आहेत, यांनाच संसारधर्म हें नांव आहे. पण आत्माराम आपल्या भक्तावर प्रसन्न असतो. त्यामुळें त्यांना स्वप्नांतहि संसारभ्रम होत नाहीं. ६४ अतिशय क्षुधा लागल्यास अन्नाच्या इच्छेनें प्राण व्याकुळ होतो. पण भक्तांना क्षुधेची आठवणही होत नाहीं. हरीचें स्मरण असें अगाध आहे. ६५ भावानें भगवद्भक्ति करीत असतांना क्षुधा व तृषा यांचा अनुभव येत नाहीं. एवढ्या अगाध भगवत्प्रीतीला जे पोंहोचले आहेत ते संसारभयानें केव्हांहि डळमळत नाहींत. ६६ भवभयाची उत्पत्ति मनामध्यें होते, पण भगवद्भक्ताचें तें मन हरिचरणामध्यें रंगून गेलेलें असतें. तेव्हां तेथें भयाला अवकाश कोठचा मिळणार? कारण त्याचें मन या अवस्थेंतच नसतें. ६७ मनामध्यें द्वैताचा अनुभव येतो, त्यामुळें संसारभयाची दृढस्थिति होते. पण त्याच मनांत हरीची वस्ती झाली म्हणजे द्वैतासह संसारभयाची निवृत्ति होते. ६८ 'देहच मी' या बुद्धीमध्यें अनेक प्रकारच्या तृष्णा उठतात. पण तीच बुद्धि निश्चयानें हरीच्या स्मरणामध्यें लाविली असतां ती स्वतः श्रीहरीच होते. ६९ मग त्या बुद्धींत जें जें तृष्णेचें स्फुरण होतें त्यांत स्वतः नारायण प्रकट होतो आणि तृष्णा वितृष्ण होऊन त्यांतच विरून जाते. ६७० राजा, भगवद्भक्त याप्रमाणें तृष्णारहित होतो. आतां भक्ताला इंद्रियांचे क्लेशहि कसे होत नाहींत तें ऐक. ७१ इंद्रियांच्या कर्मांमध्यें कष्टाचें मुख्य अधिष्ठान असतें. पण हरिभक्तांना हरिभजनानें इंद्रियकर्मांतहि हरीचा अनुभव येतो. ७२ दृष्टीनें पाहूं लागलें असतां प्रत्येक दृश्यामध्यें नारायण प्रकट होतो. श्रवणेंद्रियानें शब्द ऐकूं लागलें असतां शब्दार्थामध्यें पूर्णवस्तु विराजमान होते. ७३ घ्राणेंद्रियानें वास घेऊं लागले असतां त्या सुगंधाच्या बोधरूपानें परमेश्वर प्रकट होतो. रसना ज्या ज्या रसाचें सेवन करिते त्या रसांत

रसीं ब्रह्मरसु निजस्वादें प्रगटे ॥ ७४ ॥ देहीं लागतां शीतोष्ण । अथवा का मृदु कठिण । तेणें स्पर्शज्ञानें जाण । चिन्मात्र पूर्ण प्रगटे स्वयें ॥ ७५ ॥ आतां कर्मेंद्रियप्रवृत्ती । तेथही स्फुरे ब्रह्मस्फूर्ती । घेणें देणें गमनस्थिती । इंद्रियां गती आत्मारामें ॥ ७६ ॥ ऐसे करितां इंद्रियें कष्ट । ते कष्टीं होय निजसुख प्रगट । तेणें इंद्रियां विश्रांती चोखट । पिकली स्वानंदपेठ हरिभक्तां ॥ ७७ ॥ जेणें इंद्रियां कष्ट होती । तेणेंचि इंद्रियां सुखप्राप्ती । हे भगवद्भजनीं नित्ययुक्ती । भोगिजे हरिभजनें ॥ ७८ ॥ जन्म आणि मरण । हें देहाचे माथां जाण । भक्त देहीं विदेही पूर्ण । ध्याता हरिचरण हरिरूप जाले ॥ ७९ ॥ यालागीं देहींची अहंता । कदा नुपजे भगवद्भक्तां । ते भक्तपूर्णतेची कथा । ऐक नृपनाथा सांगेन ॥ ६८० ॥ देह धरिला पंचाननें । भक्त न डंडोळी जीवें प्राणें । वंध्यापुत्रु सुळीं देणें । देहाचें मरणें तेवीं देखे ॥ ८१ ॥ छाया पालखी बैसावी । ऐसें कोणी चिंतीना जीवीं । तैशी देहासी पदवी यावी । हा नुठी स्वभावें लोभ भक्तां ॥ ८२ ॥ देहासी आलिया नाना विपत्ती । भक्तां खेदु नुमटे चित्तीं । जेवीं आकाश शस्त्रघातीं । न ये काकुळती तैसे ते ॥ ८३ ॥ जननीजठरीं देहो जन्मला । भक्तु न म्हणे मी जन्मा आला । रवि थिल्लरीं प्रतिबिंबला । थिल्लर मी जाहला कदा न म्हणे ॥ ८४ ॥ सायंप्रातः सूर्य प्रकाशे । अभ्रीं गंधर्वनगर आभासे । देहप्रतिपाळी अदृष्ट तैसें । म्यां केलें ऐसें स्फुरेना ॥ ८५ ॥ भक्तदेहासी येतां मरण । हेतुरहित हरीचें स्मरण । यालागीं देह निमाल्या आपण । न मरतां पूर्ण पूर्णत्वें उरे ॥ ८६ ॥ थिल्लरा समूळ नाशु जाला । तरी रवि न म्हणे मी निमाला । तेवीं देहो गेलिया भक्त उरला । सद्रूपें संचला हरिस्मरणें ॥ ८७ ॥ आधीं काय सर्पु मारावा । मग दोरातें दोरू करावा । तो न पालटतां निजगौरवा । दोरूचि अवघा दोररूपें ॥ ८८ ॥ तेवीं हरिभक्तां देहाचा अभावो ।

ब्रह्मरस स्वानंदानें प्रकट होतो. ७४ देहाला शीत-उष्ण, मृदु-कठिण इत्यादिकांचा स्पर्श झाला असतां त्या स्पर्शज्ञानानें पूर्ण परब्रह्मच स्वतः प्रकट होतें. ७५ देणें, घेणें, गमन करणें, उभें रहाणें इत्यादि कर्मेंद्रिय प्रवृत्तीमध्येंहि ब्रह्मच स्फुरतें, कारण आत्मारामामुळेंच इंद्रियांना गति मिळते. ७६ याप्रमाणें इंद्रियांनीं व्यापार करीत असतांना तीं इंद्रियें श्रांत होतात; पण त्या श्रमावस्थेंतहि आत्मसुख प्रकट होतें, त्यामुळें इंद्रियांना पूर्ण विश्रांति मिळते. याप्रमाणें हरिभक्तांना स्वानंदाची पेठ पिकली आहे. ७७ कारण ज्यामुळें इंद्रियांना कष्ट होतात, त्यामुळेंच त्यांना सुखप्राप्ति होते. ही भगवद्भजनांतील युक्ति भगवद्भजनानेंच प्राप्त होते. ७८ जन्म आणि मरण हे देहाचे धर्म आहेत. भक्त देहांत असूनहि हरीचरणाचें ध्यान करीत असतांहि पूर्ण विदेही व हरिरूप झालेले असतात. ७९ त्यामुळें भगवद्भक्तामध्यें देहाभिमान कधीं उत्पन्न होत नाहीं. राजा, भक्ताच्या पूर्णतेची कथा मी तुला सांगतों ती ऐक. ६८० देहाला वाघानें जरी धरिलें तरी भक्त आपल्या मनांत डळमळत नाहीं. देहाचें मरण वंध्यापुत्राला सुळी देण्यासारखेंच तो समजतो. ८१ आपल्या प्रतिबिंबानें किंवा छायेनेंच पालखींत बसावें असें कोणीहि मनांत आणीत नाहीं. त्याप्रमाणें देहाला मोठी पदवी प्राप्त व्हावी असा भक्ताला स्वभावतःच लोभ सुटत नाहीं. ८२ तीक्ष्ण शस्त्रांच्या आघातांनीं आकाश जसें व्याकुळ होत नाहीं त्याप्रमाणें अनेक आपत्ति जरी कोसळल्या तरी भक्ताच्या मनांत खेद उत्पन्न होत नाहीं. ८३ सूर्य लहानशा डबक्यांत जरी प्रतिबिंबित झाला तरी मीच हें डबकें झालों आहें, असें तो समजत नाहीं त्याप्रमाणें मातेच्या उदरांत देह जरी जन्मला तरी भक्त 'मी जन्माला आलों' असें म्हणत नाहीं. ८४ सकाळीं व संध्याकाळीं अभ्रामध्यें गंधर्वनगर भासतें, त्याप्रमाणें अदृष्ट देहाचें प्रतिपालन करितें. पण सूर्य 'मी गंधर्व नगर केलें' हें जसें म्हणत नाहीं, त्याप्रमाणें भक्त 'मी देहाचें प्रतिपालन केलें' असें म्हणत नाहीं. ८५ भक्ताच्या देहाचें मरण जवळ आलें असतां तो निष्काम हरिस्मरण करितो. त्यामुळें देहपात जरी झाला तरी हा स्वतः न मरतां पूर्णत्वानें पूर्ण रहातो. ८६ पाण्याच्या डबक्याचा समूळ नाश होऊन त्यांतील प्रतिबिंबहि नाहींसें झालें तरी सूर्य 'मीच नाहींसा झालों आहें' असें समजत नाहीं. त्याप्रमाणें देह जरी गेला तरी भक्त हरिस्मरणामुळें सद्रूपानें पूर्ण होऊन रहातो. ८७ अहो, दोरीवर भासलेला सर्प अगोदर मारावा आणि मग त्या दोरीला दोर करावें असें कां कोठें होतें? छे, मुळींच नाहीं. दोरी आपल्या स्वरूपानें नेहमीं दोरीच असते. ८८ त्याप्रमाणें हरिभक्तांना

मा काळ कवणा घालील घावो । आतां आम्ही ते आम्हीच आहों । आम्हीपण वावो आमुचेनि आम्हां ॥ ८९ ॥ इत्यादि संसारदेहधर्म । ज्यासी स्पर्शों न शके कर्माकर्म । मोहो कदा नव्हेच भवभ्रम । तो भक्तोत्तम प्रधानत्वें ॥ ६९० ॥ राया आणिकही एक खूण । तुज मी सांगेन संपूर्ण । ज्याचा काम होय नारायण । तें भक्तलक्षण अवधारीं ॥ ९१ ॥

न कामकर्मबीजानां यस्य चेतसि सम्भवः । वासुदेवैकनिलयः स वै भागवत्तोमः ॥ ५० ॥

हृदयीं चिंतिता आत्माराम । तद्रूप जाहला हृदयींचा काम । त्यासीं सर्व कर्मीं पुरुषोत्तम । देवदेवोत्तम तुष्टोनि प्रगटे ॥९२॥ तेथें ज्या ज्या वासना हृदयवासी । त्याही पडल्या हरिसुखासीं । एवं वासना जडल्या हरिरूपाशीं । हरि आश्रयो त्यांसी दृढ जाहला ॥ ९३ ॥ तेथ जो जो भक्तांसी कामु । तो तो होय आत्मारामु । वासनांचा निजसंभ्रमु । पुरुषोत्तमु स्वयें होये ॥ ९४ ॥ जगीं हरिभक्ति उत्तमोत्तम । भक्त कामेंचि करी निष्काम । चाळितां वासना अनुक्रम । निर्वासन ब्रह्म प्रकाशे स्वयें ॥ ९५ ॥ ग्रासो-ग्रासीं रामस्मरण । तें अन्नचि होय पूर्णब्रह्म । भक्त भोगी मुक्तपण । या रीतीं जाण विदेहा ॥ ९६ ॥ ऐसा जो निष्कामनिष्ठु । तोचि भागवतामाजीं श्रेष्ठु । त्यासीच प्रधत्नवें पाटु । जाण तो वरिष्ठु उत्तमत्वें ॥ ९७ ॥ उत्तम भक्त कैसे विचरती । त्या भक्तांची विचरणस्थिती । तें सांगितली राया तुजप्रती । यथानिगुती तीं श्लोकीं ॥ ९८ ॥ उत्तम भक्त कोण लिंगेंसीं । आवडते जाहले भगवंतासी । तें लक्षण सांगावयासी । अतिउल्हासीं हरि बोले ॥ ९९ ॥

देहाचा अभाव असतो. तेव्हां काळ आपला घाव कोणावर घालणार ! आम्ही ते आम्ही आहोंत. आमचें ब्रह्मत्व केव्हांहि नाहींसें होत नाहीं. त्या आमच्या ब्रह्मस्वरूपामुळें आम्हांला आम्हीपण म्ह० अहंत्व मिथ्या झालें आहे. ८९ याप्रमाणें संसारदेहधर्म व कर्माकर्म त्याला स्पर्श करूं शकत नाहीं व संसारभ्रमाचा मोह कधींच होत नाहीं. तो मुख्य भक्तोत्तम होय. राजा, ६९० ज्याचा काम सुद्धां स्वतः नारायण होतो, तें भक्तलक्षण ऐक. मी तुला त्याची आणखी एक खूण सांगेन. ६९१.

यस्य चेतसि—ज्याच्या मनांत, कामकर्मबीजानां संभवः न—काम, कर्में व वासना यांचा उद्भव होत नाहीं, वासुदेवैकनिलयः—व केवळ वासुदेवच ज्याचा आश्रय आहे, सः वै भागवतोत्तमः—तो भागवततोत्तम होय. [काम, कर्में व वासना यांनीं रहित, केवळ वासुदेवपरायण भक्तच भागवत्तोतम होय. वरील तीन श्लोकांनीं भगवद्भक्त व्यवहारांत कसें आचरण करितो या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. द्वेष, हर्ष, मोह व कामादि यांनीं रहित होऊन तो प्राप्त व्यवहार करितो असें त्या उत्तराचें तात्पर्य आहे.] ५०.

हृदयामध्यें आत्मारामाचें चिंतन केलें असतां हृदयांतील काम आत्माराम होतो व त्याच्या सर्वकर्मांमध्यें देवाधिदेव पुरुषोत्तम प्रसन्न होऊन प्रकट होतो, ९२ त्याच्या हृदयांत ज्या ज्या वासना असतात, त्याहि हरिसुखाकडे वळतात. याप्रमाणें त्या हरिरूपीं जडल्या म्हणजे हरी त्यांचा दृढ आश्रय होतो. ९३ मग भक्ताचा जो जो काम म्ह० विषयेच्छा तो तो आत्माराम होतो. वासनांचा संभ्रमहि स्वतः पुरुषोत्तम होतो. ९४ म्हणून जगांत हरिभक्ति उत्तमोत्तम आहे. ती भक्ताला कामानेंच निष्काम करिते. वासनांच्या उत्पत्तीचा क्रम एकाग्रचित्तानें पाहूं लागलें असतां वासनशून्य ब्रह्मच स्वतः प्रकट होतें. कारण त्या सर्व वासना स्वयंप्रकाश ब्रह्मरूप आहेत, असा अनुभव येतो. ९५ भोजन करितांना प्रत्येक ग्रासाबरोबर रामस्मरण केलें असतां तें अन्नच पूर्ण परब्रह्म होतें. राजा, याप्रमाणें अपरिहार्यविषयांचा भोग घेणारा भक्त मुक्तच आहे असें तूं जाण. ९६ असा निष्कामनिष्ठ भक्तच भागवतामध्यें श्रेष्ठ होय. तोच मुख्यत्वानें मान देण्यास योग्य आहे व तोच सर्व उत्तम भक्तांमध्यें वरिष्ठ आहे. ९७ राजा, या तीन श्लोकांनीं मीं तुला भगवद्भक्ताची व्यवहारस्थिति सांगितली. ९८ आतां उत्तम भक्त कोणत्या चिन्हांनीं भगवंताला आवडते होतात तें सांगण्याच्या इच्छेनें हरि मोठ्या हर्षानें असें म्हणाला. ६९९.

न यस्य जन्मकर्मभ्यां न वर्णाश्रमजातिभिः । सज्जतेऽस्मिन्नहंभावो देहे वै स हरेः प्रियः ॥ ५१ ॥

प्राकृतामधीं देहाभिमान । तेणें गुरुकृपा करितां भजन । पालटे अभिमानाचें चिन्ह । अहं नारायणभावनायुक्त ॥ ७०० ॥ एवं देह हे समूळ मिथ्या । अहं नारायण हें तत्त्वतां । ऐशी भावना दृढ भावितां । ते भावनआंतौता अभिमान विरे ॥ १ ॥ अभिमान हरिचरणीं लीन । तेव्हां भक्त होय निरभिमान । तेंचि निरहंतेचें लक्षण । हरि संपूर्ण सांगत ॥ २ ॥ निरहंकाराचीं लक्षणें । तो जन्मोनि मी जन्मलों न म्हणे । सुवर्णाचीं केलीं श्वुनें । तरी सोनें श्वान हों नेणें तदाकारें असतां ॥ ३ ॥ तेंवीं जन्मादि अहंभावो । उत्तम भक्तां नाहीं पहा हो । कर्मक्रियेचा निर्वाहो । अहंकर्ता स्वयमेवो मानीना ॥ ४ ॥ तो कर्म करी परी न म्हणे मी कर्ता । जेवीं गगनीं असोनि सविता । अग्नि उपजवी सूर्यकांता । तेवीं करोनि अकर्ता निजात्मदृष्टीं ॥ ५ ॥ सूर्यें सूर्यकांतीं अग्निसंग । तेणें होतु याग कां दाघ । तें बाधूं न शके सूर्याचें अंग । तेवीं हा चांग करूनि अकर्ता ॥ ६ ॥ अचेतन लोह चुंबकें चळे । लोहकर्में चुंबक न मैळे । तेवीं हा कर्में करूनि सकळें । अनहंकृतिबळें अकर्ता ॥ ७ ॥ देहींचीं कर्में अदृष्टें होतीं । मी कर्ता म्हणतां तीं बाधती । भक्तां सर्व कर्मीं अनहंकृती । परमात्मप्रतीती भजनयोगें ॥ ८ ॥ एवं देहींचीं कर्में निपजतां । पूर्णप्रतीती भक्त अकर्ता । कर्माकर्मांची अवस्था । नेघे तो माथां अनहंकृती ॥ ९ ॥ जरी जाहला उत्तम वर्ण । तरी तो न म्हणे मी ब्राह्मण । स्फटिक कुंकुमें दिसे रक्तवर्ण । मी लोहिवा पूर्ण

—भक्त कोणत्या चिन्हांनीं भगवत्प्रिय होतो, या प्रश्नाचें उत्तर हरि सांगतो—

यस्य अहंभावः—ज्याचा अहंभाव, **अस्मिन् देहे**—या देहांत, **जन्म-कर्मभ्यां**—जन्म व कर्म यांच्या योगानें, **न सज्जते**-जडत नाहीं आणि, **वर्णाश्रमजातिभिः न**—वर्ण, आश्रम व जाति यांनींहि जडत नाहीं, **सः वै हरेः प्रियः**—तोच हरीला प्रिय होतो. [उत्तम कुळांतील जन्म, तपादि कर्म, ब्राह्मणादि वर्ण, ब्रह्मचर्यादि आश्रम, मूर्धावसिक्तादि अनुलोम, प्रतिलोम जाति यांच्या योगानें या देहांत ज्यांचा अहंभाव जडत नाहीं तो भगवानाला प्रिय होतो. या देहांतील अहंकाररहित सत्कुल, कर्म, इत्यादि चिन्हांनीं युक्त असलेला भक्त हरीला प्रिय होतो, असा याचा भावार्थ.] ५१.

प्राकृतांच्या म्ह० अज्ञ अभक्तांच्या ठिकाणीं ‘ देहच मी असा अभिमान असतो ’ पण गुरुकृपेनें भजन करूं लागलें असतां तें अभिमानाचें चिन्ह पालटतें. तो ‘ मी नारायण ’ या भावनेनें युक्त होतो. ७०० हा देह आपल्या कारणासह मिथ्या आहे आणि मी नारायण हेंच तत्त्व आहे, या भावनेचा दृढ अभ्यास करूं लागलें असतां देहाभिमान तिच्यामध्यें विरून जातो. १ आणि तो देहाभिमान हरिचरणीं लीन झाला असतां भक्त निरभिमान होतो. हरि आतां त्या निरहंतेचेंच संपूर्ण लक्षण सांगतो, २ जो जन्माला येऊनहि ‘ मी जन्मलो ’ असें म्हणत नाहीं. सोन्याचीं कुत्रीं बनविलीं, तरी सोनें कुत्र्याच्या आकाराचें झालें असूनहि तें ‘ मी कुत्रें आहे ’ असें ज्याप्रमाणें मानीत नाहीं. ३ त्याप्रमाणें उत्तम भक्तांना जन्मादिकांचा अहंभाव नसतो. तसाच त्याला कर्माचाहि अभिमान नसतो. ४ तो कर्म करितो, पण ‘ तें मी करितो ’ असें म्हणत नाहीं. सूर्य आकाशांत राहून सूर्यकान्तापासून अग्नि उत्पन्न करितो, त्याप्रमाणें हा भक्त आपल्या दृष्टीनें करून अकर्ता असतो. ५ सूर्यामुळें सूर्यकान्तापासून अग्नि उपजतो. त्या अग्नीच्या योगानें याग होतो व दाहहि होतो, पण सूर्याच्या अंगाला त्यापासून कांहींच पीडा होत नाहीं, त्याप्रमाणें हा भक्ताहि वस्तुतः कर्में करून अकर्ता असतो. ६ जड लोखंडामध्यें लोहचुंबकामुळेंच गति उत्पन्न होते, पण त्या लोखंडाच्या कर्मानेंच लोहचुंबक क्रियावान् होत नाहीं. त्याच न्यायानें हा सर्व कर्में करूनहि निरहंकाराच्या बळानें अकर्ता असतो. ७ देहाचीं कर्में पूर्वकर्मामुळें होतात. पण त्यांचा कर्ता मी आहें असें म्हटलें कीं, तीं बाधतात पण भक्त परमात्मसाक्षात्कारानें भजन करीत असल्यामुळेंच सर्व कर्मांमध्यें ‘ मी कर्ता ’ असा अभिमान धरीत नाहीं. त्याप्रमाणें देहामध्यें कर्में होत असतांहि भक्त पूर्ण प्रतीतीनें अकर्ता असतो. अहंकाराचा त्याग केल्यामुळें तो कर्माकर्मांचा भार आपल्या डोक्यावर घेत नाहीं. ९ जासवंताच्या फुलाच्या सांनिध्यानें स्फटिक तांबडा लाल दिसूं लागतो, पण स्फटिक स्वतः ‘ मी लाल आहें ’ असें समजत नाहीं, त्याप्रमाणें हा भक्त ब्राह्मण वर्णांत जरी उत्पन्न झाला तरी ‘ मी ब्राह्मण ’ असें म्हणत

स्फटिक न म्हणे ॥ ७१० ॥ ज्यासी नाहीं देहाभिमान । तो हातीं न धरी देहाचा वर्ण । तैसाचि आश्रमाचा अभिमान । भक्त सज्ञान न धरी कदा ॥ ११ ॥ अंगीं बाणला संन्यासु । परी तो न म्हणे मी परमहंसु । जेवीं नटाअंगीं राजविलासु । तो राजउल्हासु नट मानी ॥ १२ ॥ तेवीं आश्रमादि अवस्था । भक्त न धरीच सर्वथा । तैशीच जातीचीही कथा । न घे माथां भक्तोत्तम ॥१३॥ जाति उंच नीच असंख्य । परी तो न म्हणे हे माझीचि एक । जेवीं गंगातीरीं गांव अनेक । परी गंगा माझा एक गांव न म्हणे ॥१४॥ तेवीं जन्म कर्म वर्णाश्रम जाती । पूर्ण भक्त हातीं न धरिती । चहूं देहांची अहंकृती । स्वप्नींही न धरिति हरिभक्त ॥ १५ ॥ आशंका । तरी काय वर्णाश्रम जाती । भक्त निःशेष सांडिती । त्यांत असोनि नाहीं अहंकृती । ते हे उपपत्ती बोलिलों राया ॥ १६ ॥ तो जेव्हां पावे जन्मप्राप्ती । तेव्हां त्यासवें नाहीं वर्णाश्रम जाती । जन्मअभिमानें माथां घेती । कुळगोत जाती पैं माझी ॥ १७ ॥ ऐशा नाथिल्या अहंकृतीं । ब्रह्मादिक गुंतले ठातीं । बाढवितां वर्णाश्रम जाती । सज्ञान गुंतती निजाभिमानें ॥ १८ ॥ ऐशी अहंतेची अतिदुर्धर गती । ब्रह्मादिकां नव्हे निवृत्ती । सोडूं नेणे गा कल्पांतीं । सज्ञान ठकिजेती निजाभिमानें ॥१९॥ येथें भक्तांच्या भाविकास्थिती । अभिमान तुटे भगवद्भक्तीं । ते निराभिमान भक्तस्थिती । राया तुजप्रती दाविली स्वयें ॥७२०॥ समूळ देहाभिमान झडे । तो देहीचि देवासी आवडे । ते भक्त जाण वाडेकोडें । लडवाळे हरीचे ॥२१॥ ते जें जें मागती कौतुकें । तो देवोचि होय तितुकें । त्याचेनि परम संतोषें । देव सुखावे सुखें दोंदिल होये ॥२२॥ जो जिकडे जिकडे जाय । देव निजांगें तेउता ठाये । भक्त जेउती वास पाये । देव ते ते होय पदार्थ ॥२३॥ त्यासी क्षणीं कोणाची दृष्टी लागे । यालागीं देवो त्या पुढें मागें । त्यासभोंवता सर्वांगें । भक्तीच्या पांगें

नाहीं. ७१० ज्याला देहाभिमान नाहीं, तो देहाच्या वर्णाकडे मुळींच लक्ष देत नाहीं. तसाच ज्ञानी भक्त आश्रमाचा अभिमानहि कधींच धरीत नाहीं. ११ संन्यास रोमरोमीं जरी खिळला असला तरी ' मी परमहंस आहें ' असें तो समजत नाहीं. नटानें राजाचा वेष घेऊन त्याच्यासारखे विलास जरी केले तरी तो ज्याप्रमाणें स्वतःला राजा मानीत नाहीं, १२ त्याचप्रमाणें भक्त आश्रमादिकांचा अभिमान धरीत नाहीं. तसाच उत्तम भक्त जातीच्या अभिमानाचा बोजा आपल्या माथ्यावर घेत नाहीं. १३ उंच, नीच इत्यादि असंख्य जाति आहेत; पण ' ही माझीच एक जाति आहे ' असें म्हणत नाहीं. ज्याप्रमाणें गंगेच्या तीरीं गांवें अनेक असतात, पण गंगा त्यांतील हा एक गांव माझा आहे, असें म्हणत नाहीं. १४ त्याप्रमाणें जन्म, कर्म, वर्ण, आश्रम, जाति यांना भक्त हातीं धरीत नाहीं. १५ ते स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चारी देहांचा अहंकार स्वप्नांतहि धरीत नाहींत. तर मग काय भक्त वर्ण,आश्रम, जाति सर्व सोडून देतात ! नाहीं. हे राजा, ते सोडीत नाहींत, तर त्यांत राहूनहि त्यांचा अहंकार सोडितात. ही उपपत्ति मीं तुला पूर्वींच सांगितली आहे. १६ भक्ताचा जेव्हां जन्म होतो, तेव्हां त्याबरोबर कांहीं वर्ण, आश्रम, जाति येत नाहींत. मागून अभिमानानें तो ' कुल, गोत, जाति हीं माझीं ' असें म्हणून तीं आपल्या माथीं घेतो. १७ अशा या मिथ्या अभिमानामध्यें ब्रह्मादिक गुंतून रहातात, मग सामान्य सज्ञान स्वाभिमानानें वर्ण, आश्रम व जाति यांत गुंतले तर त्यांत काय आश्चर्य आहे ! १८ राजा, अहंतेची अशी दुर्धर गति आहे. ब्रह्मादिकांपासूनहि तिची निवृत्ति होत नाहीं. ज्ञानी लोकहि स्वाभिमानाकडून ठकविले जातात. त्यामुळें तेहि कल्पांतींसुद्धां या अहंतेला कसें सोडावें हें जाणत नाहींत. १९. पण भक्तांच्या भाविकस्थितींत भगवद्भक्तीमुळें त्यांचा अभिमान तुटतो. तीच त्यांची निरभिमानस्थिति मीं तुला दाखविली. ७२० ज्याचा देहाभिमान समूळ झडतो, तो भक्तच देवाला आवडतो. असे भक्तच देवाचे लाडके होतात व त्यांचेंच हरीला कौतुक वाटतें. २१ ते ज्याची ज्याची इच्छा करितात तें तें सर्व देवच स्वतः होऊन त्यांना सुखी करितो व भक्त सुखी झालेला पाहून देवालाहि परम संतोष होतो. २२ तो जिकडे जिकडे जातो तिकडे तिकडे देव स्वतः उभा राहतो. भक्त ज्याची इच्छा करितो तो तो पदार्थ देव होतो. २३ भक्ताला दृष्ट लागूं नये म्हणून देव त्याच्या पुढें, मागें, सभोंवार रहातो. एका भक्तीच्या आवडीनें देव भक्तांवर

भुलला असे ॥२४॥ निरभिमानाचेनि नांवें । देव निजांगें करी आघवें । जेवीं कां तान्हयाचेनि जीवें । जिवें भावें निज जननी ॥२५॥ एवं राखतां निजभक्तांसी । तरी देव धाके निजमानसीं । हा जरी आला निज-ऐक्यासी । तरी हे प्रीति कोणासीं मग करावी ॥२६॥ कोणासीं पाहों कृपा दृष्टी । कोणापें सांगों निजगोष्टी । कोणासी क्षेम देवों मिठी । ऐशी आवडी मोठी प्रेमाची ॥ २७ ॥ या काकुळती श्रीअनंतु । ऐक्यभावें करी निजभक्तु । मग देवों भक्त दोहींआंतु । देवचि नांदतु स्वानंदें ॥ २८ ॥ एवं आपुली आपण भक्तीं । करीतसे अनन्यप्रीतीं । हेंचि निरूपण वेदांतीं । अद्वैतभक्ति या नांव ॥ २९ ॥ त्यासी चहूं भुजीं आलिंगितां । हांव न बाणेचि भगवंता । मग रिघोनियां आंतौता । परमार्थता आलिंगी ॥७३०॥ ऐसें खेंवाचें मीस करी । तेणें भक्त आणी आपणाभीतरीं । मग आपण त्यां आतबाहेरीं । अतिप्रीतीवरी कोंदाटे ॥ ३१ ॥ नवल आवडीचा निर्वाहो । झणीं यासी लागे काळाचा घावो । यालागीं निजभक्तांचा देहो । देवाधिदेवो स्वयें होये ॥३२॥ ऐसा जो पढियंता परम । तो भागवतांमाजीं भक्तोत्तम । यापरी भागवतधर्म । पुरुषोत्तम वश्य करी ॥३३॥ ऐशिया उत्तम भक्ता । भेदाची समूळ नुरे वार्ता । तेचि भक्तअभेदकथा । ऐक नृपनाथा सांगेन ॥ ३४ ॥

न यस्य स्वः पर इति वित्तेष्वात्मनि वा भिदा । सर्वभूतसमः शान्तः स वै भागवतोत्तमः ॥ ५२ ॥

अद्वैतभजनाचे बोजें । मी माझें तूं आणि तुझें । ज्यासी नुरेचि सहज निजें । तो भक्त मानिजे उत्तमत्वें ॥ ३५ ॥ यापरी ज्याचे चित्ताचे ठायीं । भेद निःशेष उरला नाहीं । तेथ माझें तुझें हें कांहीं । तें निमालें पाहीं जेथिंच्या तेथें ॥३६॥ जेवीं अग्नीशीं जें जें टेंके । तें तें अग्नीचि होऊनि ठाके ।

इतका भुलतो. २४ आई आपल्या तान्हेल्यासाठीं जसे सर्व कष्ट जीवाभावानें सोसते तसा देव निरभिमानाच्या नांवानें भक्ताचें सर्व काज करितो. २५ याप्रमाणें आपल्या भक्तांना राखीत असतां देवाला आपल्या मनांत असा धाक पडतो कीं, जर हा भक्त माझ्याशीं ऐक्यरूप झाला तर मग अशी प्रीति मीं कोणावर करावी ! २६ मीं कृपादृष्टीनें कोणाकडे पहावें ! गोष्टी कोणाला सांगाव्या ! सुखावह आलिंगन कोणाला द्यावें ! २७ अशा काकुळतीनें श्रीअनंत आपल्या भक्ताला ऐक्यभाव देतो. मग देव व भक्त या दोघांत देवच स्वानंदानें नांदूं लागतो. २८ याप्रमाणें तो आपणच आपली अनन्यप्रीतीनें भक्ति करितो. वेदान्तामध्यें हेंच निरूपण केलें आहे व यालाच अद्वैतभक्ति हें नांव आहे. २९ तो आपल्या चार भुजांनीं भक्ताला आलिंगितो. पण तेवढ्यानें त्याची हौस पुरी होत नाहीं. म्हणून त्याच्या हृदयांत शिरून नखशिखांत तद्रूप होतो. ५३० तो असें आलिंगनाचें निमित्तमात्र करितो आणि त्या मिषानें भक्ताला आपल्या स्वरूपांत घेतो. मग स्वतः त्याच्या आंत व बाहेर राहतो. याप्रमाणें तो अतिप्रेमानें भरून जातो. ३१ आवडीचा प्रकार अद्भुत आहे. आपल्या भक्तांवर काळाचा घाला पडूं नये म्हणून देवाधिदेव स्वतः आपल्या भक्ताचा देह बनतो. ३२ जो भक्त भगवंताचा इतका लाडका झालेला असतो तोच भागवतामध्यें भक्तोत्तम होय. राजा, याप्रमाणें भागवतधर्म पुरुषोत्तमाला वश करून घेतो. ३३ उत्तम भक्ताच्या ठिकाणीं भेदाची वार्ताहि उरत नाहीं. तीच भक्ताच्या अभेदाची कथा मी आतां तुला सांगतों. ७३४.

यस्य-ज्याची, वित्तेषु-धनांवर, वा-किंवा, आत्मनि-आत्म्यावर, स्वः परः–माझें व दुसऱ्याचें, इति भिदा न–अशी भेदभावना नसते, सर्वभूतसमः– जो सर्व भूतांशीं सम व, शान्तः-शांत असतो, सः वै भागवतोत्तमः–तोच भागवतोत्तम होय. [धनांवर हें माझें व हें दुसऱ्याचें, आणि आत्म्यावर हा मी व हा परका असा भेदभाव ज्याच्या मनांत नसतो, जो सर्व प्राण्यांशीं सम व शांत असतो तो भागवतश्रेष्ठ होय.] ५२.

अद्वैत भजनाच्या सामर्थ्यानें 'हा मी व हें माझें, हा तूं व हें तुझें' असा भेदभाव ज्याच्या ठिकाणीं रहात नाहीं तर स्वभावतःच ज्याला सर्व स्वकीय आहे असें वाटतें, तो उत्तम भक्त आहे असें समजावें. ३५ याप्रमाणें ज्याच्या चित्तांत भेद मुळींच उरला नाहीं, त्याच्या ठिकाणीं 'माझें तुझें' इत्यादि सर्व जेथल्या तेथें विरून गेलें आहे, असें तूं जाण. ३६ अग्नीशीं ज्याचा ज्याचा संसर्ग होतो, तें तें स्वतः अग्नीच होऊन जसें रहातें त्याप्रमाणें अभेददर्शी भक्त

तेवीं अभेदभक्त जें जें देखे । तें तें यथासुखें स्वरूप होये ।। ३७ ।। निजवित्त आणिकापाशीं देतां । आवांकू नुपजे त्याचिया चित्ता । न देखे पारकेपणाची वार्ता । विकल्प घालितां तरी उपजेना ।। ३८ ।। डावे हातींचे पदार्था । उजवे हातीं स्वयें देतां । येथें कोण देता घेता । तेवीं एकात्मता सर्वभूतीं ।।३९।। आपणासकट सर्व देहीं । भक्तां भगवंतावांचूनि नाहीं । यालागीं शांति त्यांचे ठायीं । स्वानंदें पाहीं निःशंक नांदे ।। ७४० ।। ऐशिया निजसमशांतीं । भगवद्भक्त क्रीडा करिती । यालागीं उत्तमत्वाची प्राप्ती । सुनिश्चितीं पावले ।। ४१ ।। हरिभक्तांची निरपेक्षता । ऐक सांगेन नृपनाथा । उत्तम भक्तांची सांगतां कथा । अतिउल्हासता हरीसी ।। ४२ ।। निरपेक्ष तो मुख्य भक्त । निरपेक्ष तो अतिविरक्त । निरपेक्ष तो नित्यमुक्त । सत्य भगवंत निरपेक्षी ।। ४३ ।।

त्रिभुवनविभवहेतवेऽप्यकुण्ठस्मृतिरजितात्मसुरादिभिर्विमृग्यात् ।
न चलति भगवत्पदारविन्दाल्लवनिमिषार्धमपि यः स वैष्णवाग्र्यः ।। ५३ ।।

सप्रेमभावें करितां भक्ती । हरिचरणीं ठेविली चित्तवृत्ती । निजस्वार्थाचिये स्थिती । अतिप्रीती निजनिष्ठा ।। ४४ ।। तेथें त्रिलोकींच्या सकल संपत्ती । कर जोडूनि वरू प्रार्थिती । तरी क्षणार्ध न काढी चित्तवृत्ती । भक्त परमार्थी अतिलोभी ।। ४५ ।। क्षणार्ध चित्तवृत्ती काढितां । त्रिभुवनविभव ये हाता । एवढिया सांडूनि स्वार्था । म्हणाल हरिभक्तां लाभ कोण ।। ४६ ।। हरिचरणीं अपरोक्षस्थिती ।

जें जें पाहतो, तें तें सर्व स्वभावतःच स्वरूप होतें. ३७ आपलें धन दुसऱ्याला देतांना त्याच्या मनांत यत्किंचित्हि शंका येत नाहीं. परकेपणाचें नांवहि त्याला कोठें आढळत नाहीं. दुसरा कोणी त्याच्या मनांत परकेपणा उत्पन्न करूं लागल्यास तो उत्पन्न होत नाहीं. ३८ डाव्या हातांतील वस्तु उजव्या हातांत स्वतः देऊं लागल्यास तेथें जसा देणारा व घेणारा हा भेद नाहीं, तशीच सर्वभूतांमध्यें त्याला एकात्मता प्रतीत होते. ३९ आपणासह सर्व देहांमध्यें भक्त व भगवंत यावांचून त्याला कांहीं दिसत नाहीं, त्यामुळें त्याच्या ठिकाणीं शांति स्वानंदानें निःशंकपणें रहाते. ७४० भगवद्भक्त अशा आत्मशांतीनें क्रीडा करितात. त्यामुळें त्यांना निश्चित उत्तमत्वाची प्राप्ति होते. ४१ राजा, मी तुला आतां हरिभक्तांच्या निरपेक्षपणाची कथा सांगतों, ती ऐक. हरीला उत्तम भक्तांची कथा सांगत असतां अतिशय उल्हास वाटला. ४२ जो निरपेक्ष असतो तोच मुख्य भक्त, तोच अति विरक्त व तोच नित्य मुक्त, कारण स्वतः भगवंत निरपेक्ष आहे. ७४३.

यः अकुण्ठस्मृतिः—जो भगवच्चरणाहून अन्य कांहीं सार नाहीं अशा प्रकारची स्मृति ढळूं न देणारा, **त्रिभुवनविभवहेतवे अपि**—त्रैलोक्याच्या राज्यासाठींहि, **लवनिमिषार्धं अपि**— अर्धा क्षण व अर्धें निमिषहि, **अजितात्मसुरादिभिः**—हरीमध्येंच ज्यांचें मन आहे अशा सुरादिकांनाहि, **विमृग्यात्**—दुर्लभ असल्यामुळें केवल शोध करण्यास योग्य असलेल्या, **भगवत्पदारविंदात्**—भगवानाच्या चरणकमलापासून, **न चलति**—चलित होत नाहीं, **सः वैष्णवाग्र्यः**—तो वैष्णवांतील श्रेष्ठ होय. [त्रैलोक्याच्या राज्यासाठींहि जो एक क्षणभरहि भगवत्-चरणाचें भजन सोडीत नाहीं तो श्रेष्ठ वैष्णव होय. अहोपण, एक क्षणभर भजन सोडल्यानें जर त्रैलोक्यराज्यप्राप्तीसारखा लाभ होत असेल तर तें कां सोडूं नये ? 'अकुंठस्मृतिः' —भगवच्चरणाहून दुसरें कांहीं सार नाहीं, अशा प्रकारची त्याची स्मृति अढळ असते. म्हणून तो तेवढ्या लाभासाठींहि एक क्षणभरसुद्धां भजन सोडीत नाहीं. पण भगवच्चरणाहून दुसरें सर्व असार कां ? हरीमध्यें ज्याचा सर्व भाव आहे अशा देवादिकांनाहि हरिचरण दुर्लभ आहेत, त्यामुळें त्यांना सुद्धां त्याचें केवल चिंतनच करीत रहावें लागते, म्हणून हरिचरणाच्या अपेक्षेनें इतर सर्व तुच्छ आहे. याची सतत आठवण ठेवणारा भक्त हरिचरणभजनापासून ढळत नाहीं.] ५३.

प्रेमभावानें भक्ति करण्यासाठीं भक्तानें हरिचरणावर आपली चित्तवृत्ति ठेवलेली असते. आत्मप्राप्तीमध्यें त्याची दृढनिष्ठा असते. ४४ त्रैलोक्याच्या सर्व संपत्ति त्यास वरण्यास त्याच्यापुढें तयार असतात. पण परमार्थाविषयीं अति लोभी असलेला भक्त श्रीचरणांपासून आपली चित्तवृत्ति एक अर्धाक्षणहि दूर करीत नाहीं. ४५ अहोपण, एक क्षणभर चित्तवृत्ति दूर केल्यानें त्रिभुवनांतील वैभव जर हातीं येत असेल तर एवढ्या मोठ्या स्वार्थाला सोडून

तेथील क्षणार्धाची जे प्राप्ती । त्यापुढें त्रिभुवनविभवसंपत्ती । भक्त मानिती तृणप्राय ॥ ४७ ॥ सकळ जगाचा स्रजिता । ब्रह्मा पितामहो तत्त्वतां । त्रैलोक्यराज्यसमर्थता । वोळगे वस्तुतां अंगणीं ज्याचे ॥ ४८ ॥ त्रिभुवनवैभवाचे माथां । ब्रह्मपदाची समर्थता । तो ब्रह्माही निजस्वार्था । होय गिंवसिता हरिचरण ॥ ४९ ॥ त्यागोनि ब्रह्मवैभवसंपत्ती । ब्रह्मा बैसोनि एकांतीं । अहर्निशीं हरिचरण चिंती । तरी त्या प्राप्ती सहसा नव्हे ॥ ७५० ॥ सहसा न पवे हरिचरण । यालागीं ब्रह्मा साभिमान । तेणें अभिमानेंचि जाण । नेलीं चोरून गोपालवत्सें ॥ ५१ ॥ तेथ न कष्टतां आपण । न मोडतां कृष्णपण । गोपालवत्सें जाहला संपूर्ण । पूर्णत्वें पूर्ण स्वलीला ॥ ५२ ॥ अगाध हरिलीला पूर्ण । पाहतां वेडावलें ब्रह्मपण । तेव्हां सांडूनि पदाभिमान । अनन्यशरण हरिचरणीं ॥ ५३ ॥ कैलासराणा शूलपाणी । ब्रह्मा लागे ज्याचे चरणीं । तोही निजराज्य सांडोनी । महाश्मशानीं हरिचरण चिंती ॥ ५४ ॥ कौपीनभस्मजटाधारी । चरणोदक धरोनि शिरीं । हरिचरण हृदयामाझारीं । शिव निरंतरीं चिंतित ॥ ५५ ॥ एवं ब्रह्मा आणि शंकर । चरणांचे न पवती पार । तेथें त्रैलोक्यवैभव थोर । मानी तो पामर अतिमंदभाग्य ॥ ५६ ॥ हरिचरणक्षणार्धप्राप्ती । त्रैलोक्यराज्यसंपत्ती । भक्त ओंवाळूनि सांडिती । जाण निश्चितीं निंबलोण ॥ ५७ ॥ हरिचरणसारामृतगोडी । क्षणार्ध जैं जोडे जोडी । तैं त्रैलोक्यवैभवाच्या कोडी । करी कुरवंडी निजभक्त भावें ॥ ५८ ॥ एवं हरिचरणपरतें । सारामृत नाहीं येथें । यालागीं चित्तें वित्तें जीवितें । जडले सुनिश्चितें चरणारविंदीं ॥ ५९ ॥ निमिषार्ध त्रुटी लव क्षण । जे न सोडिती हरिचरण । ते वैष्णवांमाजीं अग्रगण । ते राया जाण उत्तम भक्त ॥७६०॥ जे त्रिभुवनवैभवभोग भोगिती । तेही पावले अनुतापवृत्ती । त्यांच्या तापाची निजनिवृत्ती । हरिचरणप्राप्ती तें ऐक ॥ ६१ ॥

हरिचरणांचें चिंतन करीत बसण्यांतच हरिभक्ताला कोणता लाभ, म्हणून म्हणाल तर सांगतों. ४६ हरिचरणांमध्यें परमात्म्याचा साक्षात्कार होतो आणि तसल्या क्षणार्थापुढें त्रिभुवनाचें ऐश्वर्यहि कस्पटासारखें तुच्छ आहे, असें भक्त मानितो. ४७ अहो, सर्व जगाला उत्पन्न करणारा पितामह ब्रह्मदेव वस्तुतः केवढा मोठा ! सर्व सृष्टीचें त्याला ऐश्वर्य प्राप्त झालेलें, पण तोसुद्धां खरोखर ज्याच्या अंगणामध्यें तिष्ठत उभा राहतो, ४८ त्या ब्रह्मपदाचें सामर्थ्य त्रिभुवनवैभवाहून श्रेष्ठ आहे, हें काय सांगावें ! ब्रह्मदेवाला एवढें ऐश्वर्य प्राप्त झालें असूनहि त्यानें तृप्त न होतां तो स्वरूपप्राप्तीसाठीं हरिचरणांचा शोध करीत रहातो. ४९ तो आपली ब्रह्मैश्वर्यप्राप्ति सोडून एकांतांत बसून अहोरात्र हरिचरणांचें चिंतन करितो. तथापि त्याला त्याची प्राप्ति होत नाहींच. ७५० त्यामुळें त्याला आपल्या ब्रह्मत्वाचा अभिमान झाला आणि त्यानें गोपाळांचीं वत्सें चोरून नेलीं. ५१ पण त्याप्रसंगीं स्वतः मुळींच कष्टी न होता व आपलें कृष्णपण न सोडतां भगवान् स्वलीलेनें गोपालांचीं गोवत्सें झाला. ५२ ही हरीची अगाध लीला पाहून ब्रह्मदेवाचें ब्रह्मपण वेडें झालें आणि ब्रह्मपदाचा अभिमान सोडून तो हरिचरणीं अनन्यशरण झाला. ५३ ब्रह्मदेव ज्याच्या चरणीं लागतो तो कैलासेश्वर शूलपाणिहि आपलें स्थान सोडून काशीक्षेत्रांत राहून हरिचरणांचें चिंतन करितो. ५४ कौपीन, भस्म व जटा यांस धारण करून हरीचें चरणोदक जी गंगा तिलाहि मस्तकावर धारण करून शंकर आपल्या हृदयांत सतत हरिचरणांचें चिंतन करितो. ५५ याप्रमाणें ब्रह्मा व शंकर यांनाहि ज्याच्या चरणांचा अंत लागत नाहीं, त्या चरणांपेक्षां त्रैलोक्याचें ऐश्वर्य थोर आहे, असें जो मानितो तो पामर अति भाग्यहीन होय. ५६ भक्त हरिचरणांच्या क्षणार्धप्राप्तीवरून त्रैलोक्याच्या आधिपत्याला ओंवाळून टाकीत असतात. ५७ भक्ताला एकक्षणार्ध जरी हरिचरणसारामृताची गोडी कळली तरी तो त्यावरून असंख्य त्रैलोक्यवैभवाची कुरवंडी करितो. ५८ याप्रमाणें हरिचरणांहून इतर सारामृत नाहीं म्हणून भक्त चित्त, वित्त व जीवित यांनीं निश्चयानें हरिचरणारविंदीं लीन होतात. ५९ एक निमिषार्ध किंवा एक अर्धा क्षणहि जे हरिचरण सोडीत नाहींत ते वैष्णवांमध्यें श्रेष्ठ होत. राजा, तूं त्यालाच उत्तम भक्त समज. ७६० जे त्रिभुवनाच्या ऐश्वर्याचा भोग भोगितात त्यांनाहि पश्चात्ताप होतो आणि हरिचरणांची प्राप्ति हीच त्यांच्या त्या तापाची निवृत्ति होय. मी आतां तुला हेंच तत्त्व सांगतों, तें ऐक. ७६१.

भगवत उरुविक्रमाङ्घ्रिशाखानखमणिचन्द्रिकया निरस्ततापे ।
हृदि कथमुपसीदतां पुनः स प्रभवति चन्द्र इवोदितेऽर्कतापः ॥ ५४ ॥

थोर हरीचा पराक्रम । पदें त्रैलोक्या आवरी त्रिविक्रम । ब्रह्मांड भेदोनि पदद्रुम । वाढविला परमसामर्थ्यें ॥ ६२ ॥ ते पदद्रुमींचिया दशशाखा । त्याचिया दशधा दशांगुलिका । अग्रीं अग्रफळचंद्रिका । नखमणि देखा लखलाखित ॥ ६३ ॥ ते नखचंद्रिकेचे चंद्रकांत । चरणचन्द्रामृतें नित्य स्रवत । भक्तचकोर ते सेवित । स्वानंदतृप्त सर्वदा ॥ ६४ ॥ त्यांसी कामादि त्रिविधतापप्राप्ती । सर्वदा बाधूं न शके पुढतीं । जेवीं सूर्याची संतप्त दीप्ती । चंद्रबिंबाआंतौती कदान रिघे ॥ ६५ ॥ जे हरिचरणचंद्रचकोर । स्वप्नींही संसारताप न ये त्यांसमोर । ऐसा चरणमहिमा अपार । हरि मुनीश्वर हर्षें वर्णी ॥ ६६ ॥ 'देहे वै स हरेः प्रियः' । येणें श्लोकें गा विदेह्या । दाविली भक्तिलिंगक्रिया । जाण तूं राया सुनिश्चित ॥ ६७ ॥ 'न यस्य स्वः पर इति' । येणें त्याची धर्मस्थिती । राया सांगीतली तुजप्रती । यथानिगुतीं यथार्थ ॥ ६८ ॥ यादृश म्हणिजे कैसे असती । भगवद्भजनें स्वानंदतृप्ती । त्रिविध तापांची निवृत्ती । करोनि असती हरिभक्त ॥ ६९ ॥ आतां त्यांची बोलती परी । नामें गर्जती निरंतरीं । तेंचि ते संक्षेपाकारीं । उपसंहारीं हरि सांगे ॥ ७७० ॥ सकळ लक्षणांची सार स्थिती । प्रेमळाची परमप्रीती । उल्लंघूं न शके श्रीपती । तेंही श्लोकार्थी हरि सांगे ॥ ७१ ॥

—कामानें अति संताप झाला असतां विषयाभिलाषानें चलन संभवतें. पण भगवत्सेवेनें त्या कामाची निवृत्ति झाली असतां भक्ताचें चलन संभवत नाहीं, असें आतां सांगतात—

भगवतः—भगवंताच्या, **उरुविक्रमाङ्घ्रिशाखानखमणिचन्द्रिकया**—प्रचंड विक्रमानें युक्त असलेले जे हरिचरण त्यांच्या अंगुलींचीं नखें हींच रत्नें, त्या नखरत्नाच्या चांदण्यासारख्या शीतल दीप्तीनें, **निरस्ततापे**—ज्यांतील कामादि संताप घालविला आहे अशा, **उपसीदतां हृदि**—भक्तांच्या हृदयांत, **सः पुनः कथं प्रभवति**—तो कामादि संताप पुनः कसा उद्भवेल ? **चन्द्रे उदिते अर्कतापः इव**—चंद्राचा उदय झाला असतां सूर्याचा ताप जसा होत नाहीं त्याप्रमाणें. [फार मोठे पराक्रमी जे हरिचरण, त्यांच्या अंगुली तींच रत्नें, त्यांच्या ज्या चांदण्याप्रमाणें शीतल दीप्तीनें ज्या हृदयांतील कामादि संताप दूर केला आहे, अशा भगवद्भक्तांच्या हृदयांत तोच संताप पुनः कसा संभवेल ? शरद्-ऋतूंतील पूर्ण चंद्राचा उदय झाला असतां सूर्याचा ताप कधींच संभवत नाहीं. 'न यस्य स्वः परः' इत्यादि तीन श्लोकांनीं राजाच्या 'यादृशः'—कोणत्या स्वभावानें कसें वर्तन करितो याचें उत्तर दिलें आहे, आणि तो काय बोलतो या प्रश्नाचें उत्तर 'तो हरिनामें बोलतो' असें दिलें आहे.] ५४.

हरीचा पराक्रम फार मोठा आहे. त्या त्रिविक्रमानें आपल्या तीन पावलांनीं त्रैलोक्याला आपलेसें करून घेतलें आणि आपल्या परमसामर्थ्यानें ब्रह्मांडाचा भेद करून चरणवृक्ष वाढविला. ६२ त्या चरणवृक्षाच्या ज्या दहा शाखा त्याच अगदीं निरनिराळ्या दहा अंगुली आहेत. त्यांच्या अग्रभागीं फळासारखीं लखलखीत नखरनें आहेत,६३ ते नखचंद्रिकेचे चंद्रकांत चरणचंद्रामृत सतत स्रवतात, भक्तचकोर त्याचें सेवन करितात व स्वानंदानें नित्यतृप्त होतात. ६४ सूर्याची प्रखरदीप्ति चंद्राच्या मंडलांत जशी कधींहि शिरत नाहीं, त्याप्रमाणें भक्ताला कामादि त्रिविधताप जरी झाले तरी ते त्यास सर्वथा बाधूं शकत नाहींत. ६५ किंबहुना जे हरिचरणचंद्रचकोर असतात त्यांच्यापुढें संसारताप कधीं स्वप्नांतहि येत नाहीं. हरिचरणांचा असा अपार महिमा, हरिनांवाचा मुनीश्वर मोठ्या हर्षानें वर्णिता झाला. ६६ राजा 'देहे वै स हरेः प्रियः' या श्लोकानें भक्तिलिंगक्रिया सांगितली. ६७ आणि 'न यस्य स्वः पर इति' या श्लोकानें भक्ताची धर्मस्थिति तुला सांगितली. ६८ 'यादृश' म्हणजे कसे असतात ? ते भगवद्भजनानें स्वानंदांत तृप्त असतात. हरिभक्त त्रिविधतापांची निवृत्ति करून भजनांत निमग्न असतात. ६९ आतां ते बोलतात कसे, हेंच हरि ते निरंतर नामाची गर्जना करीत राहतात असें उपसंहार श्लोकांत संक्षेपानें सांगतो. ७७० तसेंच पुढील उपसंहारश्लोकांत हरि सर्वलक्षणांचें सार म्ह० प्रेमळ भक्ताची परम स्थिति, कीं जिचें उलंघन श्रीपतिहि करूं शकत नाहीं, तेंहि सांगतो. ७७१.

विसृजति हृदयं न यस्य साक्षाद्धरिरवशाभिहितोऽप्यघौघनाशः ।
प्रणयरशनया धृताङ्घ्रिपद्मः स भवति भागवतप्रधान उक्तः ॥ ५५ ॥

अवचटें तोंडा आल्या हरी । सकळ पातकें संहारी । तें हरिनाम निरंतरीं । जे निजगजरीं गर्जती ॥ ७२ ॥ ऐसें ज्यांचे जिव्हेवरी । नाम नाचे निरंतरीं । ते धन्य धन्य संसारीं । स्वानंदें हरि गर्जतु ॥ ७३ ॥ सप्रेम सद्भावें संपूर्ण । नित्य करितां नामस्मरण । वृत्ति पालटती आपण । तेंही लक्षण ऐक राया ॥ ७४ ॥ नामासरिसाच हरी । रिघे हृदयामाझारीं । तेणें धाकें अभ्यंतरीं । हों लागे पुरी हृदयशुद्धी ॥ ७५ ॥ तेव्हां प्रपंच सांडोनि वासना । जडोनि ठाके जनार्दना । अहंकारु सांडोनि अहंपणा । सोहंसदनामाजीं रिघे ॥ ७६ ॥ चित्त विसरोनि चित्ता । जडोनि ठाके भगवंता । मनाची मोडली मनोगतता । संकल्पविकल्पता करूं विसरे ॥ ७७ ॥ कृतनिश्चयेंसीं बुद्धी । होऊनि ठाके समाधी । ऐसी देखोनि हृदयशुद्धी । तेथोनि त्रिशुद्धी न निघे हरी ॥ ७८ ॥ हरिनामप्रीतीवरी । हृदयीं रिघाला जो हरी । तो निघों विसरे बाहेरीं । भक्तां प्रीति करी कृपाळू ॥ ७९ ॥ भक्तें प्रणयप्रीतीची दोरी । तेणें चरण धरोनि निर्धारीं । निजहृदयीं बांधिला हरी । तो कैशा परी निघेल ॥ ७८० ॥ भगवंत महा अतुर्बळी । अदट दैत्यांतें निर्दळी । तो कोंडिला हृदयकमळीं । हे गोष्टी समूळी मिथ्या म्हणती ॥ ८१ ॥ जो शुष्क काष्ठ स्वयें कोरी । तो कोंवळ्या कमळामाझारीं । भ्रमर गुंतला प्रीतीवरी । केसर माझारीं कुचंबों नेदी ॥ ८२ ॥ तेवीं भक्ताचिया प्रेमप्रीतीं । हृदयीं कोंडिला श्रीपती । तेथ खुंटल्या सामर्थ्यशक्ती । भावार्थप्रती बळ न चले ॥ ८३ ॥ बाळ

अवशाभिहितः अपि अघौघनाशः—जो अबुद्धिपुरःसर केवल नामोच्चार केल्यानेंहि पापाच्या समूहाचा नाश करितो व, प्रणयरशनया धृताङ्घ्रिपद्मः—प्रेमरज्जूनें ज्याचें चरणकमल हृदयामध्यें बांधून टाकिलें आहे असा, साक्षात् हरिः—साक्षात् भगवानच, यस्य हृदयं न विसृजति—ज्याचें हृदय सोडीत नाहीं, सः भागवतप्रधानः उक्तः भवति—तो भागवतश्रेष्ठ म्हटलेला आहे. [स्वतः साक्षात् हरिच ज्याचें हृदय कधीं सोडीत नाहीं, तो भागवतांमध्यें श्रेष्ठ होय. तो हरि कसा ? तर सहज केवल नामोच्चार केल्यानेंहि भक्तांच्या पापांचा नाश करितो असा. पण तो हृदय कां सोडीत नाहीं ? तर प्रीतिरज्जूनें त्याचें चरणकमल भक्तांच्या हृदयांत घट्ट बांधून टाकलेलें असतें म्हणून तो तें सोडूं शकत नाही.] ५५.

इति श्रीमहाभागवते महापुराणे एकादशस्कंधे नारद वसुदेवसंवादे द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

हरीचें नांव अकस्मात् जरी तोंडांतून आलें, तरी तें सर्व पातकांचा संहार करितें, तें नांव जे सतत उच्चारितात, ७२ ज्यांच्या जिव्हेवर तें जणुंकाय निरंतर नाचतच असतें. ते स्वानंदानें हरिनामाची गर्जना करणारे भक्त या संसारांत धन्य धन्य होत. ७३ प्रेमयुक्त सद्भावानें सतत नामस्मरण करूं लागलें असतां भक्ताच्या वृत्ति आपोआप पालटतात. राजा, तेंहि भक्ताचें लक्षण तूं ऐक. ७४ नामस्मरण करितांच हरि भक्ताच्या हृदयांत प्रवेश करितो आणि त्याच्या धाकानें आंतल्या आंत चित्तशुद्धि होऊं लागते. ७५ वासना प्रपंच सोडून जनार्दनाला चिकटून राहते. अहंकार आपला अहंपणा सोडून भगवत्स्वरूपांत लीन होतो. ७६ चित्त आपला चित्तपणा विसरून भगवंतांत मिळून जातें. मनाचें मनत्त्व नाहींसें होतें. तें संकल्प विकल्प करण्याचें विसरतें. ७७ बुद्धि कृतनिश्चय करून स्थिर होते. भक्ताच्या हृदयाची इतकी शुद्धि झालेली पाहून हरि त्यांतून केव्हांहि बाहेर पडत नाहीं. ७८ हरिनामाच्या प्रीतीनें हरि जो एकदा हृदयांत शिरला तो पुनः बाहेर पडत नाहीं भक्तांची प्रीतिच त्याला इतका दयाळु बनविते. ७९ अहो, भक्तानें प्रीतीची दोरी करून व हरीचें चरण धरून त्यांना एकदा आपल्या हृदयांत बांधून टाकिलें म्हणजे मग तो बाहेर कसा पडणार ? ७८० पण कोणी म्हणेल कीं, भगवान् महा बलाढ्य, मोठमोठ्या दैत्यांचाहि नाश करणारा, तो हृदयकमलांत कसा कोंडला जाईल ! तेव्हां भक्त प्रेमरज्जूनें त्याला आपल्या हृदयकमलांत बांधून ठेवितात, ही गोष्ट सर्वथा खोटी आहे. ८१ पण जो भ्रमर शुष्क काष्ठांनाहि स्वतः कोरून मोठमोठीं भोकें पाडितो, तोच प्रीतीमुळें कोंवळ्या कमळांतहि जसा अडकून पडतो, आणि कमळांतील केसरांना यत्किंचित्‌हि पीडा देत नाहीं ८२ त्याच न्यायानें भक्तांच्या प्रेमावर लुब्ध होऊन श्रीपति भक्तांच्या हृदयांत कोंडला

पालवीं घाली पिळा । तेणें बापु राहे थोकला । तरी काय तो निर्बळ जाहला । ना तो स्नेहें भुलला ढळेना ॥ ८४ ॥ तेवीं निजभक्त लळेवाड । त्याचें प्रेम अत्यंत गोड । निघावयाची विसरोनि चाड । हृदयीं सुरवाड हरि मानी ॥ ८५ ॥ ऐसें ज्याचें अंतःकरण । हरि न सांडी स्वयें आपण। तैसे हरीचे श्रीचरण। जो सांडीना पूर्ण प्रेमभावें ॥ ८६ ॥ हरीचे ठायीं प्रीती ज्या जैशी । हरीची प्रीती त्यासी तैसी । जे अनन्य हरीपाशीं । हरि त्यांसी अनन्य सदा ॥ ८७ ॥ ऐसे जे हरीचरणीं अनन्य । तेचि भक्तांमाजीं प्रधान । वैष्णवांत ते अग्रगण । राया ते जाण भागवतोत्तम ॥ ८८ ॥ गौण करूनि चारी मुक्ती । जगीं श्रेष्ठ भगवद्भक्ती । त्या उत्तम भक्तांची स्थिती । संक्षेपें तुजप्रती बोलिलों ॥ ८९ ॥ पूर्ण भक्तीचें निरूपण । सांगतां वेदां पडलें मौन । सहस्रमुखाची जिव्हा पूर्ण । थकोनि जाण थोटावे ॥ ७९० ॥ ते भक्तीची एकांशता । तुज म्यां सांगीतली जी कथा । यावरी परिपूर्णता । राया स्वभावतां तूं जाणशी ॥ ९१ ॥ हरीसारिखा रसाळ वक्ता । सांगतां उत्तम भक्तकथा । तटस्थ पडिलें समस्तां । भक्तभावार्थता ऐकोनी ॥ ९२ ॥ तंव रावो रोमांचित जाहला । रोममूळीं स्वेद आला । श्रवणसुखें लांचावला । डोलों लागला स्वानंदें ॥ ९३ ॥ पूर्ण संतोषोनि मनीं । ह्मणे भलें केलें मुनी । थोर निवालों निरूपणीं । श्रवणाची धणी तरी न पुरे ॥ ९४ ॥ ऐकोनि हरीचें वचन । राया ह्मणे हे अवघे जण । अपरोक्षज्ञानें ज्ञानसंपन्न । वक्ते पूर्ण अवघेही ॥ ९५ ॥ भिन्न भिन्न करोनि प्रश्न । आकर्णूं अवघ्यांचें वचन । ऐशिया श्रद्धें राया पूर्ण । अनुपम प्रश्न पैं करील ॥ ९६ ॥ रायासी कथेची पूर्ण चाड । पुढां प्रश्न करील गोड । जे ऐकतांचि पुरे कोड । श्रोते वाड सुखावती ॥ ९७ ॥ त्या प्रश्नाचे गुह्य ज्ञान । श्रवणीं पाववीन

जातो. तेथें त्याचें सर्व सामर्थ्य कुंठीत होतें. प्रेमापुढें कोणाचें कांहीं बल चालत नाहीं. ८३ अहो, लहान मूल बापाचा पदर धरून त्याला थांबवितें, पण तेवढ्यानें तो कांहीं निर्बल होत नाहीं! तो जसा पुत्रस्नेहाला भुलल्यामुळें एक पाऊलहि पुढें टाकीत नाहीं, ८४ त्याप्रमाणें भक्त हरीचे लाडके असतात. भक्ताचें प्रेम त्याला फार आवडतें, त्यामुळें त्यांतून निघण्याचें तो सर्वथा विसरून जातो. हरि त्यांच्या हृदयांतच सुख मानितो. ८५ याप्रमाणें हरि स्वतः ज्याचें अंतःकरण सोडीत नाहीं व जो हरीचे श्रीचरण पूर्णप्रेमभावानें सोडीत नाहीं. ८६ म्ह० हरीच्या ठिकाणीं ज्याची जशी प्रीति असते, त्यावर हरि तशीच प्रीति करितो. जे हरीशीं अनन्य असतात त्यांच्याशीं हरीहि अनन्य असतो. ८७ असे जे हरिचरणांशीं अनन्य असतात तेच भक्तांमध्यें श्रेष्ठ व वैष्णवांत अग्रगण्य आणि भागवतोत्तम होय, असें तूं जाण. ८८ हे राजा, चारहि मुक्तींना गौण समजून जगामध्यें भगवद्भक्तिच जे श्रेष्ठ समजतात, त्या उत्तम भक्तांची स्थिति मीं तुला सांगितली. ८९ भक्तीचें पूर्ण निरूपण करीत असतांना ती स्वानुभवगम्य असल्यामुळें शेवटीं वेदहि मौन धरितात सहस्रमुख शेषाचीहि जिव्हा थकून जाते. ७९० यास्तव मीं भक्तीचें जें दिग्दर्शन केलें आहे त्यावरून तुला त्याचें महत्त्व आपोआप कळेल. ९१ हरीसारखा रसाळ वक्ता उत्तम भक्तकथा सांगत असतां भक्ताचा भावार्थ ऐकून सर्व श्रोते तटस्थ झाले. ९२ राजाच्या अंगावर रोमांच उभे राहून रोमरोमीं स्वेद आला. श्रवणसुखाला तो लांचावला व स्वानंदानें डोलूं लागला, ९३ आणि मनांत संतुष्ट होऊन म्हणाला 'हे मुनिराज, तुमचें हें निरूपण ऐकून मी तृप्त झालों; पण माझ्या श्रवणेंद्रियाची अद्यापि तृप्ति झाली नाहीं. असो; ९४ हरीचें हें पूर्वोक्त वचन ऐकून राजा मनांत म्हणाला 'हे सर्वहि मुनि अपरोक्षज्ञानांनीं संपन्न आहेत. हे सर्वच मोठे वक्ते आहेत. ९५ यास्तव त्यांना भिन्नभिन्न प्रश्न करून आपण या सर्वांचेंच भाषण ऐकूं या.' अशा पूर्ण श्रद्धेनें राजा यापुढें अनुपम प्रश्न विचारील. ९६ कारण त्याला कथेची फार गोडी होती, म्हणून तो पुढें गोड प्रश्न करील व ते प्रश्न ऐकूनच श्रोत्यांची हौस पूर्ण होऊन त्यांना मोठें समाधान वाटेल. ९७ मीहि त्या प्रश्नाचें रहस्य श्रोत्यांना ऐकवीन. पण मी केवळ तोंडानें बोलणारा आहें

संपूर्ण । वदनीं वक्ता श्रीजनार्दन । यथार्थें पूर्ण अर्थवी ॥ ९८ ॥ पावा नाना मधुर ध्वनीं गाजे । परी तो वाजवित्याचेनि वाजे । तेवीं एका जनार्दनीं साजे । ग्रंथार्थबोजें कविकर्ता ॥ ७९९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे निमिजायंतसंवादे एकाकारटीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

इति श्रीमद्भागवत महापुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंस संहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकांनुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ—भावार्थासह नारद-वसुदेवसंवाद नांवाचा द्वितीय अध्याय समाप्त झाला.

अध्याय तिसरा.

श्रीगणेशाय नमः ॥ ओं नमो जी श्रीगुरुराया । म्हणोनि सद्भावें लागें पायां । तंव मीपण गेलें वायां । घेऊनियां तूंपणा ॥ १ ॥ नवल पायांचे कठिणपण । वज्रें न तुटे लिंगदेह जाण । त्याचेंही केलें चूर्ण । अवलीळा चरण लागतां ॥ २ ॥ पायीं लागतांचि बळी । तो त्वां घातला पाताळीं । पायीं लवणासुरा रवंदळी । अतुबळी निर्दाळितां ॥ ३ ॥ पाय अतिशयेंसीं तिख । कालियासी लागतां देख । त्याचें शोषोनियां विख । केला निर्विख निःशेष ॥ ४ ॥ पाय अतिशय दारुण । शकटासी लागतां जाण । त्याचें तुटलें गुणबंधन । गमनागमन खुंटलें ॥ ५ ॥ पायांचा धाकु सकळां । पायें उद्धरिली अहिल्या शिळा । पाय नृगें देखतां डोळां । थित्या मुकला संसारा ॥ ६ ॥ आवडीं पाय चिंतिती दास ।

आणि त्याचा यथार्थ समग्र अर्थ प्रकट करणारा माझा गुरु श्रीजनार्दन आहे. ९८ पांवा नानाप्रकारच्या मधुर ध्वनींनी वाजतो, पण त्याचें सर्व श्रेय वाजविणाराकडे असतें, त्याप्रमाणें काव्यकर्ता जरी हा एकनाथ आहे तरी ग्रंथार्थाच्या मिषानें त्याचें कर्तृत्व जनार्दनस्वामींनाच शोभतें. ७९९.

'हे सद्गुरुराया ! तुला नमस्कार असो.' असें म्हणून जो तुझ्या पायां पडावें तों 'तूंपणा घेऊन मीपणा' व्यर्थ जातो. १ सद्गुरु चरणांचा कठिणपणा विलक्षण आहे. जें सूक्ष्म शरीर वज्रानेंहि तुटत नाहीं, त्याचेंहि तूं आपल्या चरणस्पर्शानें सहज लीलेनें चूर्ण करितोस. २ बळीला तुझा पाय लागतांच त्याला तूं पाताळांत घातलेंस. अति बलिष्ठ अशा लवणासुराचाहि तूं नुस्त्या पायानें संहार केलास. ३ तुझे पाय अतिशय तीक्ष्ण आहेत. ते कालिया सर्पाला लागतांच त्याचें सर्व विष शोधून घेऊन तूं त्याला पूर्णपणें विषरहित केलेंस. ४ शकट या नांवाचा कंसाचा एक अनुचर होता. त्यानें श्रीकृष्णाला मारण्यासाठीं शकट म्ह० गाडीचें रूप घेतलें होतें. परंतु त्याला श्रीकृष्णाचा चरणस्पर्श होतांच त्याचें सर्व भवबंधन तुटलें व जन्म-मरणांतून सुटून तो मुक्त झाला. ५ (भागवत स्कंध १०. अ. १२ यांत ही कथा आहे.) मोठ्या समर्थांनाहि तुझ्या पायांचा धाक आहे. रामावतारीं गौतमाच्या शापानें शिळा होऊन पडलेल्या अहिल्येला तुझा पाय लागतांच तिचा उद्धार झाला. नृगनांवाच्या राजानें एकदां पुष्कळ गोप्रदानें दिलीं. त्यांतील एका ब्राह्मणास दान केलेली गाय चुकून राजाच्या गायींच्या कळपांत शिरली. राजाला ही गोष्ट कळली नव्हती, त्यामुळें त्यानें ती गाय दुसऱ्या एका ब्राह्मणाला दान दिली. तेव्हां पहिल्यानें दान घेणाऱ्या ब्राह्मणानें क्रोधानें त्या राजाला 'तूं सरडा होशील' असा शाप दिला. तो राजा सरडा होऊन पडला असतां श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शानें मुक्त झाला. (ही कथा महाभारत अनु० अ० ७० यांत आहे.) ६ जे तुझे भक्त मोठ्या प्रेमानें तुझ्या पायांचें चिंतन करितात, त्यांच्या जन्म-मरणांचा नाश